बा. वि. शा. 1318

तीन मुले

— साने गुरु

तीन मुले

साने गुरुजी

इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे ३०

ISBN -81-7418-068-0
TIN MULE (Marathi)
SANE GURUJI

◆ **प्रकाशक**
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य
२७३, शनिवार पेठ, पुणे ३०.

◆ **© सर्व हक्क प्रकाशकाधीन**

◆ **प्रकाशन दिनांक**
८ जानेवारी २००४

◆ **मुद्रक**
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ, पुणे ३०

◆ **मूल्य ८० रुपये**

: तीन मुले : : १ :

सारंग गावची गोष्ट आहे. सारंग गावं समुद्रकाठी होता. मोठा सुखी, व समृद्ध गाव. दर्यावर्दी व्यापार तेथे फार चाले. तेथून मालाने भरलेली गलबते दूर देशांत जात व दूरच्या देशांची मालाने भरलेली गलबते तेथे येत. बंदर नेहमी गजबजलेले असे. देशोदेशीचे खलाशी येत. एकदोन दिवस मुक्काम करीत. पुन्हा जात. कधी वादळ असले, समुद्र खवळलेला असला, म्हणजे ते अधिक दिवसही तेथे रहात. अशा वादळात गलबते फुटत, प्राणहानी होई. गलबतातील तरंगता माल तीरास येऊन लागे. एकदा नारळांनी भरलेली गलबते वादळात फुटली. हजारो नारळ सारंग गावाच्या किनाऱ्यावर येऊन पडले. लोकांनी पोती भरभरून नेले. खाववत ना म्हणून ते फोडून गुराढोरांना त्यांनी खायला घातले. इतक्या नारळांचे काय करावे हे लोकांना कळेना. एकदा आंब्याची गलबते फुटली व हजारो कलमी आंबे किनाऱ्याला येऊन लागले. लोकांनी आंबे पाट्या भरभरून नेले. कधी कधी मेलेले खलाशी, मेलेली माणसेही किनाऱ्याला येऊन लागत. त्यांचे देह माशांनी खाल्लेले असत. ते देह पाहून भीती वाटे. गावातील कोणीतरी येत व त्या देहास मूठमाती देत. कधी एखादा जिवंत मनुष्यही किनाऱ्याला येऊन लागे. नावेच्या फुटक्या तुकड्याचा आधार घेऊन अथांग सागरातून तो किनारा गाठी. सारा गाव मग त्याच्या भोवती जमा होई व अंगावर काटे आणणाऱ्या त्याच्या गोष्टी ऐके.

सारंग बंदर दिसे मोठे छान. समुद्रावर दाट नारळीची बने होती. समुद्र सारखा नाचत असे. नारळी सारख्या डोलत असत. त्या नारळींच्या बनांच्या मधून व्यापाऱ्यांच्या वखारी असत. मधून मधून लहानमोठ्या खानावळी होत्या. त्या खानावळींपैकी एक खानावळ एका म्हाताऱ्या आजीबाईची होती. त्या आजीबाईला कोणी नव्हते. ती एकटीच होती. कोणी एखादा मुशाफर येई व तिच्या खानावळीत उतरे. तिच्या एकटीचे जीवन अशा रीतीने पार पडे. समुद्रकाठी

खेळायला येणारी मुले या आजीबाईकडे यावयाची. म्हातारी त्यांना खाऊ द्यायची. कधी ती त्यांना एखादी गोष्ट सांगायची. ती मुले म्हणजे त्या म्हातारीची करमणूक असे.

अशा अनेक मुलांपैकीच ती तीन मुले होती. दोन होते मुलगे. एक होती मुलगी. मुलांची नावे बुधा व मंगा. मुलीची नाव मधुरी. मधुरी व मंगा जवळ जवळ रहात असत. बुधाचे घर लांब होते. मधुरी व मंगा या दोघांची बुधाजवळ समुद्राच्या किनाऱ्यावरच ओळख झाली. एके दिवशी मधुरी व मंगा समुद्राच्या वाळूत खेळत होती. वाळूत किल्ले बांधीत होती; परंतु किल्ला टिकेना. किल्ला सारखा पडे.

'तुला येतच नाही बांधता.' मधुरी म्हणाली.

'तू तरी दाखव बांधून!' मंगा चिडून म्हणाला.

'मुली वाटतं किल्ले बांधतात?' हसून मधुरीने विचारले.

'मुलींना फक्त दुसऱ्याला हसता येते.' मंगा म्हणाला.

त्या दोघांचे असे भांडण चालले होते. जवळच एक मुलगा येऊन उभा राहिला होता. तो त्या दोघांकडे पहात होता. शेवटी त्याच्याने बोलल्यावाचून राहवेना. तो पुढे झाला व म्हणाला, 'मी देऊ का किल्ला बांधून?'

'मला येत नाही. तुला का येईल?' मंगा म्हणाला.

'हो, येईल.' तो म्हणाला.

'दे बांधून.' माधुरी म्हणाली.

'आपण दोघे मिळून बांधू.' मंगा त्या मुलाला म्हणाला.

'चालेल.' तो म्हणाला.

'पण तुझे नाव काय?' मधुरीने विचारिले.

'बुधा.' तो म्हणाला.

'माझे नाव मधुरी.' ती म्हणाली.

'माझे नाव मंगा.' मंगाने सांगितले.

'ये मंगा, किल्ला बांधू.' बुधा उत्साहाने म्हणाला.

'दोघे मिळून माझ्यासाठी किल्ला बांधा.' मधुरी म्हणाली.

'तू जणू किल्ल्याची राणी.' मंगा म्हणाला.

'आणि आपण?' बुधाने विचारले.

'आपण राणीचे चाकर, रडवणाऱ्या राणीचे नोकर.' मंगा म्हणाला.

'आता बोलू नका. बांधा लौकर किल्ला.' मधुरीने सांगितले.

आणि फारच सुंदर किल्ला त्यांनी बांधला. त्या किल्ल्याकडे तिघं पहात होती. परंतु एकदम किल्ला ढासळला! पडला! तिघांना वाईट वाटले.

'वाळूचे किल्ले टिकत नाहीत.' बुधा बोलला.

'आपण रोज नवीन बांधू.' मंगा म्हणाला.

'रोज नवा खेळ.' मधुरी म्हणाली.

'मी रोज तुमच्यात खेळायला येत जाईन.' बुधा म्हणाला.

'ये.' मधुरी म्हणाली.

'तुझे मित्र नाहीत का?' मंगाने विचारले.

'मला कोणी नाही मित्र. मी एकटाच येतो किनाऱ्यावर.' बुधाने सांगितले.

'तुझे घर कोठे आहे?' मधुरीने विचारले.

'तिकडे लांब आहे; मोठे तीन मजली घर.' बुधा म्हणाली.

'त्या घराभोवती बाग आहे, हो ना?' मधुरीने विचारले.

'हो.' बुधाने उत्तर दिले.

'तू श्रीमंत आहेस.' मधुरी म्हणाली.

'आम्ही गरीब आहोत.' मंगा म्हणाला.

'मी निरनिराळे खेळ आणीत जाईन. खाऊ आणीत जाईन. आपण एकत्र खेळू. एकत्र खाऊ खाऊ. आपण तिघं मित्र.' बुधा

म्हणाला.

अशी त्या तिघा मुलांची ओळख झाली. दिवसेंदिवस ओळख दृढ होत गेली. एकमेकांशिवाय त्यांना करमत नसे. संध्याकाळी तिघे समुंद्रावर येत. समुद्रकाठी एक लहानशी वाळूची टेकडी होती. त्या टेकडीवर तिघे बसत. दुरून समुद्र हसे. कधी कधी त्या टेकडीवरून खाली घसरत जाण्याचा खेळ ती खेळत. मंगा व मधुरी एकमेकांचा हात धरून झरकन् घसरत खाली जात; परंतु त्यांचा हात धरावयास बुधा धजत नसे.

'बुधा, मी मध्ये बसते. माझ्या उजव्या बाजूस मंगा बसेल व डाव्या बाजूला तू बस. एक हात तू धर, एक हात मंगा धरील. आपण तिघे एकदम घसरत खाली जाऊ.' मधुरी म्हणाली.

त्याप्रमाणे तिघे बसली. एक, दोन, तीन करून घसरगुंडी सुरू झाली. परंतु बुधा मध्येच थबकला. मंगा खाली गेला. बुधा वरच राहिला. मधुरीच्या हातांची, ओढाताण झाली. व शेवटी मंगाने त्या दोघांना ओढले. बुधाने मधुरीचा हात सोडला. मधुरी व मंगा खाली जाऊन उभी राहिली. बुधा ओशाळला व रडवेला झाला.

'बुधा, तू भित्रा आहेस.' मंगा म्हणाला.

'श्रीमंतांची मुले भित्री असतात.' मधुरी म्हणाली.

'मधुरी, तू एकटीच माझा हात धर. बघ येतो की नाही खाली घसरत. मी भित्रा नाही.' बुधा म्हणाला.

आणि मधुरीने बुधाचा हात धरला. दोघे घसरत खाली गेली. बुधाचे तोंड फुलले. आपण भित्रा नाही असे त्याने दाखविले.

एके दिवशी बुधाने सुंदर पतंग आणला होता. मंगाने खूप उंच उडविला; परंतु बुधाला उडविता येईना. मंगा त्याला चिडवू लागला. बुधा रडू लागला.

'बुधा, रडतोस काय मुलीसारखा?' मधुरी म्हणाली.

'रडू नको तर काय करू?' तो म्हणाला.

'घे पतंग व उडव.' ती म्हणाली.

'आपण दोघे मिळून उडवू ये. तू पण दोरा धर, म्हणजे मला धीर येईल. तू अशी दूर उभी राहून बघू नकोस. ये ना ग मधुरी!' तो म्हणाला. आनंदला. मंगा नेहमी नवीन नवीन खेळ शोधून काढी. तो चपळ होता, नारळाच्या झाडावर चढे तो माशाप्रमाणे समुद्राच्या पाण्यात नाचे. तो वाटेल तेथून उडी टाकी. परंतु बुधा सौम्य होता, शांत होता.

त्या दिवशी समुद्रास भरती आली होती. त्या लाटांकडे तिघे बघत होती.

'मधुरी, मी जातो पाण्यात.' मंगा म्हणाला.

'संध्याकाळ होत आली. आता नको जाऊस.' बुधा म्हणाला.

'जाणार मी. जाणार.' मंगा उड्या मारीत म्हणाला.

आणि तो पाण्यात गेला. तो लाटांशी खेळू लागला. मध्येच मोठी लाट येई आणि मंगा दिसेनासा होई. दोन लाटांच्या मधल्या खळग्यात तो नाचत राही. जणू पाळण्यातच आहे. तरंगमय पाळण्यात. सागरसंगीत चालले होते. तरंगाच्या पालखीत बाळ नाचत होते. मंगा आनंदाने मस्त झाला होता. परंतु आता अंधार पडू लागला. पाण्यातील मंगा दिसेना. मधुरी हाका मारू लागली. परंतु समुद्राच्या गर्जनांमुळे ती हाक त्याला थोडीच ऐकू जाणार होती?

'मधुरी, आपण चल जाऊ. मला घरी रागावतील. उशीर झाला.'

'मंगाशिवाय आपण कसे जायचे?'

'तो आपणास सोडून कशाला पाण्यात गेला?'

'परंतु तो सुरक्षित येईपर्यंत आपणास थांबायला नको का?'

'मला येथे भीती वाटते.'

'मी आहे ना जवळ. माझा हात धर.'

मधुरीचा हात धरून बुधा उभा होता. थोड्या वेळाने मंगा

आला. तो कोरडे नेसला.

'किती रे वेळ लावलास? आम्हांला काळजी.' मधुरी म्हणाली.

'काळजी कसली? समुद्र म्हणजे मला गंमत वाटते. हजारो हातांनी समुद्र मला खेळवतो, नाचवतो.' मंगा म्हणाला.

'येथेच उभी राहू आपण. अंधारात उभी राहू.' मंगा म्हणाला.

'मला घरी रागावतील.' बुधा म्हणाला.

'मला घरी रागावले तरी मी त्याची कधी पर्वा करीत नही.' मंगा म्हणाला.

'मला घरी बोलतात, परंतु मी मनावर घेत नही.' मधुरी म्हणाली. शेवटी तिघं निघून गेली.

त्या दिवशी बुधाने खारका आणल्या होत्या.

'बुधा, मजजवळ दे. मी वाटते.' मधुरी म्हणाली.

'मीच वाटतो.' तो म्हणाला.

'पण माझ्याजवळ दिल्यास म्हणून रे काय झाले?' ती म्हणाली.

'माझ्याच हाताने मी देईन.' तो म्हणाला.

त्याने मधुरीला तीन खारका दिल्या, मंगाला दोन दिल्या, स्वतःला तीन घेतल्या.

'मंगाला दोनचशा?' तिने विचारिले.

'आठच होत्या. कोणाला तरी एक कमी येणार.' बुधा म्हणाला.

'येताना नऊ का आणल्या नाहीस?' मंगाने विचारले.

'माझ्या नाही आले ध्यानात.' बुधाने उत्तर दिले.

'मी वाटल्या असत्या तर तुम्हाला तीन तीन देऊन मी दोनच घेतल्या असत्या. वाटणाराने स्वतः कमी घ्यावे.' मधुरी म्हणाली.

'वाटण्याचा आनंद वाटणाऱ्याला असतोच.' मंगा म्हणाला.

'तुम्ही दोघे नेहमी माझ्याविरुद्ध असता.' बुधा म्हणाला.

'असे नाही हो बुधा, त्या दिवशी मंगाने तुला पाडले तर मी

नव्हती का तुझी बाजू घेतली ? मी तुम्हा दोघांना सारखे देईन.' मधुरी म्हणाली.

'मला खारीक नकोच मुळी. मी गरीब म्हणून मला बुधाने एक खारीक कमी दिली.' मंगा म्हणाला.

'आणि मी वाटतं श्रीमंत आहे?' मधुरीने विचारले.

'परंतु तू मुलगी आहेस.' मंगा म्हणाला.

'मंगा, श्रीमंत नि गरीब रे काय? माझ्या नाही असे कधी मनात येत.' बुधा म्हणाला.

'नाही कसे येत? त्या दिवशी तू रस्त्यातून चालला होतास. मी हाका मारल्या. तू मागे वळून पाहिले नाहीस. एकदा तुझ्या घरी मी आलो होतो. परंतु तुझ्या नोकरांनी मला घालवून दिले.' मंगा म्हणाला.

'तुझ्या हाका मला ऐकू आल्या नाहीत. नोकरांनी तुला घालविलेले मला काय माहीत?' बुधा म्हणाला.

'श्रीमंतांना ऐकायला कमी येते.' मंगा म्हणाला.

'असे भांडू नका रे. मंगा, घे या खारका.' मधुरी म्हणाली.

'मला दोनच पुरेत. तुझी तिसरी नको.' मंगा म्हणाला.

'घे रे, तू कधी ऐकायचा नाहीस. हट्टी आहेस.' मधुरी म्हणाली.

'आणि तुम्ही नाही वाटते हट्टी?' त्याने विचारले.

'आमचा हट्ट थोडा वेळ असतो. मंगा, माझी खारीक घे. नाही तर उद्यापासून मी खेळायला येणार नाही. तुझ्याजवळ बोलणार नाही.' मधुरी म्हणाली.

'आणा सगळ्यांच्या खारका. मी साऱ्या खाऊन टाकतो. द्यायच्या असतील तर साऱ्या द्या. मधुरी, तुझ्या तिन्ही खारका दे.' तो म्हणाला.

'घे हो मंगा, पण रागावू नकोस.' ती म्हणाली.

आणि मधुरी, माझ्या तिन्ही तू घे.' बुधा म्हणाला.

'त्याच्या घेतल्यास तर बघ.' मंगाने धमकी दिली.

'मधुरीला मुळीच नकोत वाटते?' बुधाने विचारले.

'मला मिळाल्या म्हणजे तिला मिळाल्या.' मंगा म्हणाला.

'आणि तिला मिळाल्या म्हणजे मला मिळाल्या. घरी आणखी घेईन व खाईन, घे ग मधुरी.' बुधा म्हणाला.

'तुम्ही दोघे मला रडकुंडीस आणता. त्या दिवशी तू समुद्रात डुंबत राहिलास. हा बुधा सारखे सांगे, घरी चल. मी जावे की राहावे? माझी आपली ओढाताण. दोघे भांडता व रडवता. आणा साऱ्या खारका मजजवळ; मी नीट वाटते. उरतील त्या दातांनी फोडून सर्वांना वाटीन. आणा.' ती म्हणाली.

'या घे.' बुधा म्हणाला.

'या घे.' मंगा म्हणाला.

'आता कसे शहाणे झालात.' ती हसून म्हणाली.

तिने चिमणीच्या दातांनी फोडून सारख्या वाटल्या. तिघांनी त्या खाऊन टाकल्या.

'आपण बिया रुजत घालू.' बुधा म्हणाला.

'येथे त्याची झाडे होत नाहीत.' मंगा म्हणाला.

'आपण त्या बिया समुद्रात फेकू. जेथे खारकांची झाडे होत असतील, तेथे ह्या बिया तो घेऊन जाईल.' मधुरी म्हणाली.

'मधुरी, तू वेडी आहेस. समुद्राच्या लाटांवर त्या बिया वाटेल तिकडे जातील. परंतु त्या तरंगतात थोड्याच! त्या बुडतील.' मंगा म्हणाला.

'मला काही कळत नाही.' मधुरी म्हणाली.

'मला सारे कळते.'

'आम्हांस शिकवीत जा.' मधुरी म्हणाली.

'मी कितीतरी पुस्तके वाचतो.' बुधा म्हणाला.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

'मला नाही आवडत पुस्तके.' मंगा म्हणाला.

'तुझे माझ्याविरुद्ध असावयाचेच.' बुधा म्हणाला.

'पुरे रे भांडण. आता खेळू.' ती म्हणाली.

'आम्ही दोघे पळतो. तू धर.' मंगा म्हणाला.

'पण एक वाटोळी रेघ काढ. तिच्या बाहेर जायचे नाही.' ती म्हणाली.

मंगाने रेघ काढली. भरती येऊन केव्हाच गेली होती. वाळू घट्ट बसली होती. खेळायची मजा होती. मधुरी त्यांना धरू लागली. मंगा खूप पळे. बुधा पटकन् सापडला.

'बुधा, तू मुद्दाम पळाला नाहीस. हा का खेळ? मधुरीला आज आपण दमवले असते.' मंगा म्हणाला.

'मला फार पळवत नाही, मी दमतो. मुद्दाम नाही काही मी सापडलो.' बुधा म्हणाला.

'बरे, आता मला धर.' मंगा म्हणाला.

मंगाच्या पाठीस बुधा लागला. परंतु मंगा सापडेना. शेवटी बुधाने मधुरीला धरले. मंगा संतापला.

'तुम्ही दोघे एकमेकांना धरता. मला कोणीच पकडीत नाही.' तो म्हणाला.

'तू आम्हांला सापडत नाहीस.' बुधा म्हणाला.

'आम्ही आता दोघे तुला पकडतो. दोघे तुला धरतो.' मधुरी म्हणाली.

'चल तर.' मंगा म्हणाला.

पुन्हा खेळ सुरू झाला. मंगा त्या दोघांना चुकवीत होता. शेवटी सापडला. एकदम त्या दोघांनी धरले.

'मेलास ना?' मधुरीने विचारले.

'तुम्ही दोघांनी मला मारलेत. नाहीतर मी मेलो नसतो.' मंगा म्हणाला.

'मला भूक लागली आहे.' मधुरी म्हणाली.

'मी आजीबाईकडून आणू का काही खायला?' मंगाने विचारले.

'आपण सारीच तिच्याकडे जाऊ.' मधुरी म्हणाली.

'मी नाही येणार. तेथे का खायचे?' बुधाने विचारले.

'आमच्याबरोबर नाही खाणार? चल.' मधुरीने सांगितले.

ती दोघं म्हातारीच्या खानावळीत आली. त्यांना पाहून म्हातारीला आनंद झाला.

'काय रे, अलीकडे येत नाही फार ते?' तिने विचारले.

'पण आज आलो ना? आता खायला दे. आम्हांला भुका लागल्या आहेत.' मंगा म्हणाला.

'थांबा, थालीपीठ लावते व तुम्हांला देते.' म्हातारी म्हणाली.

म्हातारी थालीपिठाच्या तयारीला लागली. मुले तेथे बसली होती. मधुरी म्हातारीच्या पाठीशी उभी होती.

'हसायला काय झाले मधुरी?' म्हातारीने विचारले.

'तू किती म्हातारी झालीस? केस पिकायला लागले.' मधुरी म्हणाली.

'परंतु मी अजून तीस वर्षे जगेन. मी पुरी शंभर वर्षे जगेन. मी लौकर मरणार नाही. ' म्हातारी म्हणाली.

'तू मुलांना खाऊ देतेस म्हणून देव तुला नेत नाही. होय ना ग आजी?'

'देवाला आजीबाई आवडत नाही. म्हणून देव नेत नाही.' मंगा म्हणाला.

'देवाला सारी आवडतात.' बुधा म्हणाला.

'आजी, मला कुडकुडीत हवे हो.' मंगा म्हणाला.

'मला मऊ हवे.' बुधा म्हणाला.

'आणि मधुरी तुला ग?' म्हातारीने विचारले.

'मी एक तुकडा कुडकुडीत खाईन व एक नरम खाईन.' मधुरी म्हणाली. मुलांनी थालीपीठ खाल्ले. मुले जायला निघाली. म्हातारी तेथे अंगणात उभी होती. 'येत जा रे रोज माझ्याकडे.' ती म्हणाली. 'बरे हो.' म्हणून मुले गेली.

एके दिवशी त्या वाळूच्या टेकडीवर तिघे बसली होती.

'मधुरी, आज आपण गंमतीचा एक खेळ खेळू. मी फुलांच्या माळा आणल्या आहेत आणि तुरे व कोवळी पाने आणली आहेत.' मंगा म्हणाला.

'कोणता खेळ खेळायचा?' तिने विचारले.

'थांब. आधी तुला सजवू दे. तुझ्या केसांत, कानांत ही फुले, हे तुरे, ही पाने घालू दे. तू राणी दिसशील.' मंगा म्हणाला.

'कोणाची राणी?' तिने हसून विचारले.

'ते मग सांगेन.' तो म्हणाला.

त्याने तिला सजवले, नटविले. मधुरी गोड दिसू लागली. मंगाने टाळी वाजविली. बुधा सारे पहात होता.

'बुधा, आता मी व मधुरी येथे बसतो. आम्ही खेळातली नवरानवरी. तू गाणे म्हण. श्लोक म्हण. आमचे तू लग्न लाव. मग आम्ही या माळा एकमेकांना घालू.' मंगा म्हणाला.

'पण मीच होतो नवरा. तू आमचे लग्न लाव.' बुधा म्हणाला.

'तू नाही, मी फुले आणली, आणि आता तू आपला नवरा होणार का?' मंगा रागाने म्हणाला.

'मधुरी का फक्त तुझी?' बुधाने विचारले.

'हो, माझी.' तो म्हणाला.

'माझीही आहे. मी तिच्याजवळ बसेन.'

'बघू कसा बसतोस तो. तुला खाली फेकीन.'

दोघांची झोंबी सुरू झाली. बुधाला मंगाने पाडले. मधुरी भांडण सोडवीत होती. ती रडू लागली.

'हे रे काय माझ्यासाठी भांडता? मी जातेच मुळी. आजपासून मी बंदरावर येणार नाही.' मधुरी म्हणाली.

'तू माझी आहेस.' बुधा म्हणाला.

'माझी आहेस तू.' मंगा म्हणाला.

'मी तुमच्या दोघांची नवरी होते. चालेल? लटोपटीच्या लग्नात सारे जमते. एकदा तू बस माझ्याजवळ, एकदा तू बस.' मधुरी म्हणाली.

'पहिल्याने मी बसेन. पहिला माझा हक्क. ये मधुरी. बुधा, म्हण शुभमंगल सावधान.' मंगा म्हणाला.

'मधुरी व मंगा जवळ जवळ बसली. बुधा कविता म्हणू लागला. शुभमंगल सावधान म्हणू लागला. मंगा व मधुरी यांनी एकमेकांस माळा घातल्या.

'आता मला बसू दे.' बुधा म्हणाला.

'ये बस.' मधुरी म्हणाली.

आता मंगाने श्लोक म्हटले. दोघांनी त्याच माळा पुन्हा एकमेकांस घातल्या. तिघे आनंदली. मंगाने दोन्ही माळा शेवटी मधुरीच्या गळ्यात घातल्या.

'आपण आजीबाईकडे जाऊ.' मंगा म्हणाला.

'गळ्यात माळा घालून?' मधुरीने विचारले.

'हो आजीबाई हसेल. लग्न झाल्यावर पाया पडावे लागते.' बुधा म्हणाला. तिघे धावत पळत म्हातारीकडे आली. मधुरीला पाहून म्हातारीला हसू आले.

'फुलांनी सजून देवीच झाली आहेस!' आजीबाई म्हणाली.

'आजी, आज मधुरीचे लग्न लागले.' मंगा म्हणाला.

'कोणाशी रे?' तिने हसून विचारले.

'आम्हा दोघांशी.' बुधा म्हणाला.

नगर वाचनालय, सातारा
बालविभाग

‘होय का ग माधुरी?’ म्हातारीने विचारले.

‘मी दोघांची लहानशी बायको. म्हणजे हे भांडणार नाहीत.’ मधुरी म्हणाली.

‘लटोपटीच्या खेळात सारे चालते. मुले आहात अजून.’ म्हातारी म्हणाली.

‘मधुरी, पाया पड आजीबाईच्या.’ मंगा म्हणाला.

मधुरी म्हातारीच्या पाया पडली. म्हातारीने तिला कुरवाळले, पोटाशी धरले.

‘आजी, ‘तू दोघांची छोटी राणी हो’ असा मधुरीला आशीर्वाद दे ना.’ बुधा म्हणाला.

‘असे कसे म्हणू?’ म्हातारी म्हणाली.

‘लटोपटीच्या खेळात सारे चालते. तू नाही का आमच्या खेळात सामील? तू सुद्धा आमच्या खेळातीलच जणू. म्हण ना ग आजी, नाही तर आम्ही तुझ्याकडे येणार नाही.’ मंगा म्हणाला.

‘मधुरी, दोघांची छोटी राणी हो, छोटी नवरी हो.’ म्हातारी हसून म्हणाली.

‘आजी, आता नवरानवरीचे तोंड गोड कर ना.’ मंगा म्हणाला.

‘अरे लबाडा!’ म्हातारी म्हणाली.

म्हातारीने त्यांना केळी व गूळ दिला. मुलांना आनंद झाला. लग्नाची मेजवानी झाली.

‘आजी, मेजवानी झाली लग्नाची.’ बुधा म्हणाला.

‘परंतु वाजंत्री कोठे आहेत?’ मंगा म्हणाला.

‘समुद्राच्या लाटांची वाजंत्री.’ म्हातारी म्हणाली.

‘खरेच की.’ मधुरी हसून म्हणाली.

तिघे घरी जायला निघाली. हसत खेळत जात होती. आधी बुधाच्या घराजवळ ती आज सारी आली.

'मधुरी, तू माझीही आहेस हो.' बुधा हळूच म्हणाला.

'मी दोघांची, जा आता.' मधुरी म्हणाली.

आता मंगाचे घर आले.

'मधुरी, तू माझी आहेस. आधी माझा हक्क. होय ना!' मंगाने विचारले.

'होय, पण मी दोघांची छोटी राणी. भांडू नका.' मधुरी म्हणाली.

मधुरी घरी आली. जेवून ती झोपी गेली. त्या माळा तिच्याजवळ होत्या. ती माळा पहात होती. ती स्वप्नात दोघांना सांगत होती, 'भांडू नका. मंगा, बुधा, मी तुमची दोघांची चिमुकली नवरी, दोघांची छोटी राणी.'

❖❖❖

: बुधा : : २ :

बुधा श्रीमंत बापाचा एकुलता एक मुलगा होता. आईबापांचा तो फार लाडका होता. त्याचे सारे हट्ट पुरविले जात, त्याचे सारे लाड केले जात. तो मागेल ते खेळणे त्याला मिळे. तो मागेल तो व मागेल तितका खाऊ त्यास मिळे. त्याला एक पंतोजी घरी शिकविण्यासाठी येत असत. बुधा आता मोठा झाला होता; परंतु कृश होता. त्याचे डोळे पाणीदार दिसत; त्याला पाहून मन शांत व प्रसन्न होत असे.

आपल्या मुलाचे लग्न करावे असे बापाच्या मनात आले. श्रीमंताच्या एकुलत्या एक मुलाला कोण मुलगी देणार नाही? अनेक मुली सांगून येऊ लागल्या. बाप निवड करू लागला. विचार करू लागला. एके दिवशी बुधाचे आईबाप त्याच्या लग्नाविषयी बोलत होते.

'माझे इतक्यात लग्न नको, असे बुधा म्हणतो.' बाप म्हणाला.

'त्याचे काय ऐकता? मुलांचे का ऐकायचे असते?' आई म्हणाली.

'अग, तो लग्नाला उभा तरी राहिला पाहिजे ना? कोठे पळून गेला तर? डोक्यात राख घालून गेला तर?' तो म्हणाला.

'काही नाही पळून जात. बुधा भित्रा आहे साऱ्या मुलखाचा. थोडी रात्र झाली तर तो बाहेर जायला भितो. समुद्राच्या पाण्यात जायला भितो. तो कोठे जाणार पळून?' ती म्हणाली

'अग, एखादे वेळेस भित्री मुलेच शूर होतात. वाटेल ते ती करू शकतात. बुधा हट्टी आहे. मनात आणील ते तो करील. म्हणून त्याच्या तंत्राने घ्यावे. त्यालाही विचारावे. काही दिवस जाऊ द्यावे.'

'आपले लग्न झाले तेव्हा आपण केवढी होतो?' ती म्हणाली.

'मला ते आठवत नाही.' तो म्हणाला.

'मलाही आठवत नाही.' ती म्हणाली.

'परंतु बुधा ऐकत नाही. आपलेच चुकले. आपण त्याला लग्नाशिवाय इतका मोठा होऊन दिला हेच चुकले. कळत नसते तेव्हाच मुलांची लग्ने केलेली बरी. त्यांचा हात धरून बसविता येते. मनासारखे सारे करता येते.' तो म्हणाला.

'मी तुम्हाला सांगत होते, परंतु तुम्ही ऐकले नाही.' ती म्हणाली.

'तू त्याची समजूत घाल. त्याला तयार कर. तुझे तो ऐकेल.'

'सांगेन. माझे तो ऐकेल.' ती म्हणाली.

एके दिवशी बुधा आपल्या खोलीत बसला होता. त्याची खोली मोठी सुंदर होती. खोलीतून दूरचा समुद्र दिसत असे. खोलीत वारा खेळत असे. खोलीत सुंदर चित्रे होती. बुधाही चित्रकला शिकला होता. त्याला चित्रांचा नाद लागला होता. आजही तो एक चित्र काढीत होता. कशाचे चित्र? सूर्योदयाचे का सूर्यास्ताचे? फुलांचे का मुलांचे? समुद्राचे का नारळीच्या बनाचे? मनुष्याचे का मनुष्येतर

सृष्टीचे? ते चित्र एका मुलीचे होते.

बुधा चित्रात रमला होता. हातात रंगाचे कलम होते. त्या चित्राकडे तो पहात होता. इतक्यात खोलीत आई येऊन उभी राहिली. बुधाला कळलेही नाही.

'बुधा, तुझ्याकडे मी आले आहे.' आई शेवटी म्हणाली.

'ये आई, बस.' तो म्हणाला.

'बुधा!'

'काय आई?'

'तू मला फार आवडतोस. किती गोरा गोमटा दिसतोस!'

'आई, मी तुला आवडतो. परंतु सर्वांना आवडेन असे नाही.'

'कोणाला आवडणार नाहीस? तू सर्वांना आवडशील! गुलाबाचे फूल कोणाला आवडत नाही? कमळाचे फूल कोणाला आवडत नाही? आकाशातील चंद्र कोणाला आवडत नाही? मोलाचे माणिक मोती कोणाला आवडत नाही? तू माझे माणिक मोती, तू माझे चंद्र, तू मला आवडतोस, सर्वांना आवडतोस.'

आई, हे चित्र तुला आवडते की नाही?'

'कुणाचे रे हे?'

'पण तुला आवडते की नाही?'

'किती सुरेख काढले आहेस!'

'आई, एका मुलीचे आहे ते चित्र!'

'बुधा, मुलीच्या चित्रात रमतोस. प्रत्यक्ष खरोखरीची अशी एखादी सुंदर मुलगी जर मिळाली तर किती रमशील, किती हसशील, आनंदशील? स्वप्नापेक्षा प्रत्यक्ष अनुभवात अधिक मौज आहे.'

'आई, स्वप्नच अधिक सुंदर असते. कल्पनाच अधिक गोड असते. हे चित्र नेहमी असेच दिसेल. ते कधी रुसणार नाही, रागावणार नाही. प्रत्यक्ष सजीव मूर्ती सदैव का अशीच दिसेल? तिचे रंग क्षणोक्षणी बदलतात.'

बाळ, म्हणूनच त्यात अधिक गोडी. हे चित्र आहे तसेच राहील. ते रागावणार नाही, ते बोलणार नाही. त्यात काय मजा? मनुष्याला रागावणे, रुसणे आवडते. लहानपणी तू रागवावे, तुझे गाल फुगावे असे मला कधी कधी वाटे. तुझे कधी मुके घेत असे तर तुला 'लबाडा' असे म्हणून गंमतीने चिमटेही काढीत असे. तुला खोटे नाटे रागे भरत असे. हसणारा माझा राजा मग ओक्साबोक्शी रडू लागे. मग त्याला एकदम पोटाशी घट्ट धरून उगी करण्यात मला किती धन्यता वाटे. बुधा, वेडा आहेस तू. चित्र क्षणभर रमवील. कायमचे नाही हो रमवणार. हे चित्र डोळ्यांना आनंदवील, परंतु कानांना, दातांना, सर्वेंद्रियांना थोडाच आनंद देणार आहे? बुधा, खोलीत बसून मुलीचे चित्र नको काढीत बसू. आता तुझे लग्न करायला हवे. तू हूं म्हण. कितीतरी मुली सांगून येत आहेत. सोन्यासारख्या मुली.'

'आई कोणती मुलगी आणणार तुम्ही?'

'चांगली असेल ती. कुलवंताची, धनवंताची.'

'आई, मला मधुरी आवडते. माझी लहानपणाची मैत्रीण.'

'लहानपणाची मैत्रीण लहानपणी गोड. मधुरी एका गरिबाची मुलगी. तिच्याशी का लग्न लावावयाचे? सारे जग हसेल. जे नीट शोभेल, साजून दिसेल, तेच केले पाहिजे. रत्नाला सोन्याचे कोंदण शोभते.'

'आई, मी एकदाच कायमचे सांगून टाकतो. मधुरीशिवाय दुसरी मुलगी मला नको. मला मधुरी मिळाली नाही तरी तिची शेकडो चित्रे मी काढीत बसेन. मधुरी, मधुरी असे तिचं नाव जपत बसेन. ते नाव पाटीवर लिहीन, कागदावर लिहीन. माझे सारे जग म्हणजे मधुरी. हसणारी मधुरी मी रंगवीन. रडणारी मधुरी मी रंगवीन, समुद्राच्या लाटांशी खेळणारी, टेकडीवर बसलेली, फुलांनी नटलेली, शेकडो स्वरूपांत दिसणारी मधुरी मी काढीन. प्रत्यक्ष मधुरी न मिळाली तर काल्पनिक मधुरीशी मी लग्न लावीन.'

'बुधा, हा हट्ट सोड. तुझ्या पित्याला तो आवडणार नाही.'

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

'तुला आवडेल का?'

'मलाही आवडणार नाही. तू आमचा एकुलता एक मुलगा, आम्हाला दुःखी करू नकोस.'

'आई, मी घरातून निघून जाऊ?'

'नको हो, असे मनातही आणू नकोस. काही कर, परंतु आम्हांला सोडून नको जाऊस.'

आईने पित्याला ती गोष्ट सांगितली. मधुरी-मजुराची मुलगी मधुरी? पिता रागावला, संतापला. दुसऱ्या एका घरची फारच सुंदर मुलगी सांगून आली होती. पाच हजार रुपये हुंडा देणार होते. एके दिवशी पिता बुधाची समजूत घालीत होता.

'बुधा, नाही म्हणू नकोस. थोरामोठ्यांचे घराणे, नक्षत्रासारखी मुलगी, पाच हजार रुपये हुंडा. जावयाचे किती कौतुक करतील. ऐक माझे.'

'नाही बाबा. या एका गोष्टीत मी कोणाचे ऐकणार नाही. मधुरी, मधुरीशिवाय मला कोणी नको. लहानपणापासून माझ्या जीवनात ती शिरली आहे. ती कशी जाणार? माझ्या कानात तिचे बोलणे आहे, डोळ्यांत तिचे रूप आहे. मी तिला कसा विसरू? मला मधुरी द्या.'

'भिकाऱ्याची मुलगी?'

'परंतु मी श्रीमंताचा आहे ना? माझ्याशी लग्न करून ती श्रीमंताची होईल. बाबा, भिकारीही माणसेच ना?'

'परंतु दरिद्री माणसांना ना मान, ना प्रतिष्ठा. श्रीमंतांच्या घरी कसे वागावे, ते त्यांना काय कळे?'

'बाबा, गरिबांनाही स्वाभिमान असतो. पुष्कळ वेळा श्रीमंतच आपली श्रीमंती टिकावी म्हणून स्वाभिमान सोडतात. श्रीमंत भित्रे असतात. गरीब निर्भय असतात. समुद्राच्या पाण्यात जायला, झाडावर चढायला, अंधारातून जायला मला भय वाटे, परंतु मंगाला भय वाटत नसे. श्रीमंतांचे जीवन कृत्रिम, वरपांगी. त्यांच्या संपत्तीच्या भाराखाली त्यांचे खरे जीवन प्रकट न होता दडपले जाते. बाबा,

माझ्या जीवनाचा खरा विकास व्हावा म्हणून गरिबाचीच मुलगी मला द्या.'

'तुझ्याजवळ काय बोलावे कळत नाही.'

'बाबा, सारे समजते तुम्हाला, माझे मागणे मला द्या. माझ्यासाठी मधुरीच्या बापाकडे जा. तिला मागणी घाला.'

'मी का त्या मजुराकडे जाऊ?'

'बाबा, ही काय तुमची घमेंड? मजूर म्हणजे का माती? जगात मजूर नसतील तर तुमची शेतेभाते कोण पिकवील? तुमचे मळे कोण फुलवील? तुमचे बंगले कोण बांधील? तुम्हाला कोठून मिळेल अन्न, कोठून मिळेल वस्त्र, कोठून मिळतील दुधे-तुपे? मजूर नसतील तर कोण हाकील नांगर? कोण हाकील मोट? कोण खणील रस्ता? कोण वल्हवील नावा? गलबतात माल कोण चढवील, कोण उतरवील? मजूर म्हणजे जगाचे प्राण, मजुराचा घाम म्हणजे जगाचे जीवन. मजूर या जगाची नाडी, जगाची फुफ्फुसे. त्यांच्यामुळे सारी दुनिया जगत आहे. मजुराकडे जाण्यात कोणती मानहानी आहे? साऱ्या सृष्टीत तो एक पूज्य आहे. मान त्याला द्यावा. गौरव त्याचा करावा. जा बाबा, मधुरीच्या बापाकडे आदराने जा.'

'लोक मला हसतील.'

'माझ्यावर तुमचं प्रेम आहे ना? मुलासाठी एवढेही नाही करणार? मी सुखी व्हावे असे तुम्हाला नाही वाटत? लग्न माझे व्हायचे. माझे जीवन सुखी व्हावे, माझा संसार गोड व्हावा, असे तुम्हांला नाही वाटत? तुमच्या मुलाच्या भावी आनंदासाठी जा.'

'आणि त्याने मागणी नाकारली तर?'

'तुम्ही मधुरीला विचारा.'

'आणि तिनेही नकार दिला तर?'

'तर माझी चित्रकला आहे. हे रंग आहेत. हे कुंचले आहेत. माझी मधुरी मी निर्मीन.'

पिता निघून गेला. मुलाला समजाविण्यासाठी आला होता. परंतु मुलानेच समजावून देऊन परत पाठविले. बुधा आपल्या खोलीत विचार करीत बसला. पिता आपल्या खोलीत विचार करीत बसला. शेवटी मधुरीच्या घरी जाऊन मागणी घालण्याचे बुधाच्या बापाने ठरविले आणि एके दिवशी त्याप्रमाणे तो खरोखरच गेला.

काय असेल ते असो, मधुरीचा बाप आज घरी होता. मधुरी जरा आजारी होती. ती पित्याची फारशी लाडकी नव्हती, तरीही तिच्या आग्रहामुळे आज तो कोठे कामधाम करावयास गेला नाही. बुधाचा बाप दिसताच तो एकदम उठला. त्याने स्वागत केले. नीट बैठक घातली. बुधाचा बाप बसला व जवळ थोड्या अंतरावर मधुरीचा बाप बसला. बोलणे सुरू झाले.

‘आज घरी होतेत बरे झाले.’ बुधाचा बाप म्हणाला.

‘मधुरीला आज गोड वाटत नाही. जरा आजारी आहे. कामाला आज जाऊ नका म्हणाली. मुलीची जात; राहिलो.’ तो म्हणाला.

‘तुमची मुलगी काही आता लहान नाही.’

‘तशी लहान नाही. परंतु आईबापांना लहानच. केव्हाच तिचे लग्न व्हायचे, परंतु अद्याप राहिले.’

‘यंदा करायचे आहे का?’

‘पाहू जमेल तसे. तिच्या कलानेच मी घेणार आहे.’

‘मुलांचा कल वेडावाकडाही असतो.’

‘आपण मोठी माणसे करतो ते तरी सारे कोठे शहाणपणाचे ठरते?’

‘माझा बुधाही लग्नाचा झाला आहे.’

‘तुम्ही मनात आणावयाचा अवकाश. श्रीमंतांना काळजी नसते.’

‘काळजी सर्वांना आहे. जगात असा कोणीही नाही की ज्याला काळजी नाही. श्रीमंतांना त्यांच्यापरी काळज्या असतातच.’

‘श्रीमंतांच्या श्रीमंती काळज्या.’

'काही म्हणा, परंतु असतात. बेडी लोखंडाची असली काय व सोन्याची असली काय; बेडी ती बेडीच.'

'आज तुम्ही गरिबाकडे कोठे आलात?'

'मधुरीला मागणी घालण्यासाठी.'

'काही तरी बोलता.'

'काही तरी नाही, थट्टा-मस्करी नाही. गंभीरपणेच मी बोलत आहे. तुमच्या मुलीला मागणी घालण्यासाठी मी आलो आहे. करीन लग्न तर मधुरीशीच अशी त्याची प्रतिज्ञा आहे.'

'ती प्रतिज्ञा तुम्हांसही मान्य आहे का?'

'मान्य नसली तरी मुलासाठी सारे करावे लागते.'

'आम्ही गरीब मजूर. तुम्ही श्रीमंत. सोयरीक कशी जमणार? लोक तुम्हांला हंसतील. मलाही म्हणतील की, मुलीचे पैसे घेतले असतील.'

'खरे आहे तुमचे म्हणणे.'

'माझी मधुरी श्रीमंताकडे मी कधीही देणार नाही.'

'तुम्ही आपण होऊन श्रीमंताकडे देण्यासाठी जाऊ नका. परंतु श्रीमंत आपण होऊन तुमच्याकडे मागणी घालण्यासाठी आला तर त्याला नाही म्हणू नका.'

'मला वाद नाही करायचा. या बाबतीत मी ठरवून टाकले आहे. श्रीमंत नको.'

'श्रीमंतांचा तुम्हाला इतका का तिटकारा?'

'तुम्हीच त्याचे उत्तर द्या.'

'सारे श्रीमंत का वाईट असतात?'

'बहुतेक असतात. गरिबांना ते तुच्छ मानतात. त्यांना दूर बसवितात. श्रीमंतांच्या कुत्र्याइतकीही आम्हांला किंमत असत नाही. नको. माणुसकी मारणारी श्रीमंती नको. उपाशी ठेवणाऱ्या गरिबीत मी आनंदाने राहीन. परंतु गर्वांध करणारी श्रीमंती मी स्वीकारणार

नाही. माझी मुलगी श्रीमंताकडे दिली तर न जाणो तीही गरिबांचा अपमान करू लागेल. कदाचित माझ्याकडे यायलाही ती लाजेल. गरीब आईबापांना भेटायलाही उद्या तिला संकोच वाटेल. नको. माझी मधुरी मी एखाद्या गरिबाला देईन.'

'परंतु तुम्ही मधुरीला कधी विचारले आहे का?'

'तिलाही श्रीमंती आवडत नाही.'

'परंतु माझ्या मुलाची ती बाळमैत्रीण होती. दोघे समुद्रावर एकत्र खेळत. एका हाती पतंग उडवीत. हात धरून घसरत हातात हात घेत. पाण्यात जात. तुम्ही मधुरीला विचारा. तुम्ही तिच्या कलाने घेण्याचे ठरविले आहे ना?'

'होता होईतो तिच्या इच्छेविरुद्ध मी जाणार नाही.'

'तिला विचारा ना! बोलवा तिला येथे. फार नाही ना आजारी?'

'मीच तिला विचारून येतो.'

मधुरीचा बाप आत गेला. मधुरी आतून सारे ऐकत होती. पित्याची चाहूल लागताच तिने पटकन् तोंडावरून पांघरूण घेतले. तिच्या तोंडावरचे रंग का बदलत होते? ते रंग का ती लपवू पहात होती?

'मधुरी, अगं मधुरी.' पित्याने हाक मारली.

'काय बाबा?' पांघरुणातून तोंड बाहेर काढून तिने विचारले.

'जरा बसतेस का? तुझ्याजवळ बोलायचं आहे थोडं.'

'हो बसते बाबा. सांगा काय ते.' ती उठून बसून म्हणाली.

'तू आता मोठी झालीस. तुझ्या लग्नाच्या गोष्टी निघाल्या आहेत. श्रीमंत नवरा तुला आवडेल का?'

'नको. श्रीमंतीचे नाव नको.'

'मधुरी, बुधा तुझा एक बाळमित्र होता?'

'हो.'

नगर वाचनालय, सातारा
बालविभाग

'तो श्रीमंत होता.'

'परंतु तो आमच्याबरोबर खेळे. वाळूतले किल्ले माझ्यासाठी बांधी. मी त्याला पाण्यात नेत असे. बुधा स्वभावाने गरीब होता. श्रीमंत असून गरीब होता.

'तुला तो आवडतो?'

'हो.'

'तो तुला नवरा आवडेल?'

'नाही.'

'म्हणजे?'

'नवऱ्याशिवाय तो आवडेल.'

'त्याच्या बापाने तुला मागणी घातली आहे. मी काय सांगू?'

'नको असे सांगा. मधुरीला बुधा आवडतो, परंतु नवरा म्हणून नाही आवडणार असे सांगा. जा ना आता बाबा. मला पडू दे. माझे डोके दुखत आहे.'

मधुरीचा बाप बाहेर आला. बुधाचा बाप वाटच बघत होता.

'काय म्हणते मधुरी?'

'नाही म्हणते.'

'बुधा तिला आवडत नाही?'

'आवडतो, परंतु नवरा म्हणून नही आवडणार असे ती म्हणते.'

'तिची समजूत घाला.'

'नकोच. श्रीमंताकडे नकोच संबंध.'

'बुधा माझा एकुलता एक मुलगा. माझी कीव करा. मुलाची निराशा माझ्याने बघवणार नाही.'

'परंतु मधुरी तयार नाही. नकोच.'

'बरे तर, मी जातो.'

बुधाचा बाप घरी आला. पत्नीजवळ सारी हकीकत त्याने

सांगितली. बुधालाही सारे कळले. बुधा खिन्न झाला. त्याचे हसणे संपले. तो आता खोलीच्या बाहेर पडेनासा झाला. खोलीतून दिसणाऱ्या अनंत समुद्राकडे तो बघे व त्याचे डोळे भरत. तो मनाला शांत करण्यासाठी हातात कुंचला घेई. परंतु बोटे थरथरत. डोळे भरत. आजपर्यंत त्याला आशा होती. परंतु आता संपूर्ण निराशा झाली. कुंचला फिरेना. दृष्टी ठरेना. तो चित्रे काढीनासा झाला. त्याची कला मेली. तो विकल झाला. बुधाचे दुःख पाहून आई-बापही दुःखी होत. एके दिवशी पिता बुधाच्या खोलीत येऊन म्हणाला,

'बुधा, माझे ऐक.'

'बाबा, इतर सारे ऐकेन. आता लग्नाची गोष्टच नको.'

'बाळ, तुझ्यासाठी मी मधुरीकडे गेलो. सारा अहंकार बाजूस ठेवून गेलो. तू नाही का रे पित्यासाठी अहंकार सोडणार? दुसरी मुलगी कर. सुखी हो. आम्हाला सुखी कर. तुझे दुःख पाहून आमच्या जिवाचे पाणी होते. ती रडते. माझेही डोळे भरून येतात.'

'बाबा, मी काय करू? लग्न अशक्य आहे. तुमच्यासाठी माझी निराशा विसरून मी हसावे, खेळावे असे मला वाटते. परंतु मला ते जमत नाही. बुधाला असे जगणे जगता येत नाही. आत एक बाहेर एक मला साधत नाही.'

असे काही दिवस चालले. शेवटी बुधाच्या आईबापांनी अंथरूण धरले. बुधा त्याची सेवाशुश्रूषा करीत होता. परंतु आईबाप वाचले नाहीत. बुधाच्या दुःखाने ते मेले. बुधाच्या निराशेने त्यांचे प्राण नेले. बुधा एकटा राहिला. आईबापांच्या आठवणी करीत तो एकटा त्या घरात भुतासारखा बसे. गरीब बिचारा दुर्दैवी बुधा!

❖❖❖

: मधुरी : ३ :

मधुरीचा बाप मजूर होता. स्वतःची झोपडी होती. मधुरीसुद्धा कधी कधी मजुरी करायला जात असे. आपल्या आईबापांना मदत करीत असे. आता कोठले खेळ, कोठले हिंडणे, फिरणे? तिच्या लहानपणाच्या मित्राची व तिची आता वरचेवर गाठ पडत नसे. तिची आई तिला कोठे दळायला पाठवी. कोठे भांडी घासायला पाठवी. मधुरीचा अल्लड स्वभाव. ती नेहमी आईचे ऐके असे नाही. कधी कधी तिला रागे भरे. मारीही.

एके दिवशी आईने मधुरीला भांडी घासावयास पाठविले. परंतु रस्त्यातून मिरवणूक जात होती. वाजंत्री वाजत होती. मधुरी मिरवणूक पहात उभी राहिली. भांडी घासायला मोलकरीण अजून आली नाही, म्हणून मधुरीच्या आईला बोलवायला पाठविले.

‘किती ग उशीर? भांडी कधी घासणार?’ मालकिणीने विचारले.

‘मधुरीला कधीच पाठविले होते. ती नाही का आली?’

‘नाही.’

‘कोठे गेली ही कार्टी?’

असे म्हणून मधुरीची आई भांडी घासायला बसली. ती भांडी घासू लागली. थोड्या वेळाने मधुरी आली. आई संतापली होती.

‘कोठे ग होतीस? आता का यायचे भांडी घासायला? आणि त्यांनी दुसरी मोलकरीण लाविली तर? खाल काय? येथे यायचे सोडून कोठे गेलीस हिंडत?’

असे बोलून आईने हातातील उलथने मधुरीला मारले; ती तिला मारू लागली. मधुरी ओरडू लागली. शेवटी मालकाच्या मंडळींनी शांत केले सारे.

मधुरी मुसमुसत होती. गरिबांना मिरवणूक पाहावयास स्वातंत्र्य नाही. त्या दिवसापासून ती कधी इकडे तिकडे रमली, गेली नाही.

खेळकर हरणी, हिंडणारे उडणारे पाखरू, परंतु आता ते जणू बंदिवान झाले होते.

एके दिवशी मधुरीचा बाप घरी जखमी होऊन आला. बंदरावर काही तरी बोलाचाली होऊन मारामारी झाली. मंगाचा बाप व मधुरीचा बाप यांच्यात मारामारी झाली. शेवटी मंगानेच ती मारामारी सोडवली. मधुरीचा बाप तणतणत घरी आला होता. त्याचे कपडे फाटले होते, रक्त येत होंते, कपाळाला पट्टी बांधलेली होती.

'काय झाले बाबा?' मधुरीने विचारले.

बाप बोलला नाही. तो खाटेवर पडला. दांतओठ खात होता. अद्याप त्याचा राग शांत झाला नव्हता. मधुरी बापाजवळ बसली होती. ती त्याचे डोके दाबीत होती. ती दुःखाने त्याच्याकडे बघत होती. आता बाप जरा शांत झाला. मधुरीने पुन्हा प्रश्न केला.

'बाबा, काय झाले?'

'मारामारी झाली.'

'कोणी मारले कपाळावर?'

'मंगाच्या बापाने.'

'मंगाच्या?'

'हो.'

'काय झाले कारण?'

'बोलाचाली.'

'कशाची?'

'तुझ्या लग्नाची.'

'काय म्हणत होता मंगाचा बाप?'

'म्हणत होता की मधुरीला विकणार आहेत.'

'खरंच?'

'हो. मला राग आला. शेवटी भांडण झाले. मी त्याच्या अंगावर

धावून गेलो. त्याने मला आपटले. डोक्याला लागले.'

'तुमच्या मदतीला कोणी धावून नाही आले?'

'मंगा आला धावत. त्यानेच शेवटी मारामारी सोडविली.'

'माझ्या मंगाने?'

'तुझा मंगा?'

'हो. माझा मंगा. मला आवडतो बाबा. त्यानेच सोडविले तुम्हांला?'

'मधुरी, मंगाचे नाव पुन्हा काढू नकोस. ज्याच्या बापाने माझा अपमान केला त्याचे नाव नको. माझ्या घरात तरी नको.'

'परंतु मंगाचा काय अपराध? काय दोष?'

'बापाच्या इस्टेटीत भागीदार होतो. बापाच्या पापातही मुलगा भागीदार नाही का? ज्याने मला मारले, पाडले, शिव्या दिल्या, ज्याने माझी बेअब्रू केली, त्याच्या कुटुंबातील कोणाशीही संबंध नको. समजलीस ना?'

'बाबा, मंगा मला आवडतो.'

'ती आवड मनात ठेव.'

आणखी काही दिवस गेले.

एके दिवशी मधुरी सायंकाळी बाहेर गेली होती. कोठे गेली होती? समुद्रावर. ती समुद्रकाठी उभी होती. तिच्या मनात काय आले, एकाएकी ती आजीबाईच्या खानावळीत गेली. आजीबाई चुलीशी शेकत बसली होती.

'कोण मधुरी? ये, किती दिवसांनी दिसलीस? आणि तुझे सवंगडी कोठे आहेत?'

'आजी, आता मधुरी एकटी आहे. ना सोबती, ना सवंगडी.'

मधुरी म्हातारीजवळ बसली. म्हातारीने तिच्या केसांवरून हात फिरविला. मधुरीच्या डोळ्यांत पाणी आले.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

'मधुरी, डोळ्यांत पाणी का?'

'आजी, मनातील सारे कोणाला मिळाले आहे? बाबा म्हणतात मंगाला विसरून जा. मी कशी विसरू मंगाला? माझ्या नसानसांत तो भरलेला आहे.'

'तुझा मंगा तुला मिळेल.'

'आजीचे शब्द खरे ठरोत.'

इतक्यात दारात कोण होते उभे? कोणीतरी येऊन उभे राहिले होते. ते उभे असलेले माणूस पुढे आले.

'मंगा, तू रे केव्हा आलास?'

'आलो तुमच्या गुजगोष्टी ऐकायला. मधुरी, टेकडीवर येतेस? चल बसू. हसू.'

'बसू. डोळ्यांत आणू आसू.'

'तुझे आसू मी नको पुसू?'

'हा घ्या खाऊ. तोंड गोड करा–' म्हातारी म्हणाली.

मधुरीचा हात धरून मंगा निघाला. दोघे टेकडीवर आली. आता रात्र झाली होती. चंद्र उगवला होता. फार सुंदर दिसत होता देखावा.

'मधुरी, किती वर्षांनी या टेकडीवर पुन्हा बसलो आहोत!'

'त्या वेळी लहान होतो.'

'आज मोठी आहोत.'

'त्या वेळेस अल्लड होतो.'

'आज वयात आलो आहोत.'

'त्या वेळेस पाखराचे पंख होते आपल्याला.'

'आज दुःखाचे, चिंतांचे दगड गळ्याभोवती आहेत.'

'मंगा!'

'काय मधुरी?'

'समुद्र कसा उचंबळतो आहे!'

'आणि आपली मनेही उचंबळत आहेत.'

'मंगा, मला जाऊ दे.'

'माझ्याजवळ बसावे असे तुला नाही वाटत?'

'मी काय सांगू? तूच उत्तर दे.'

'मधुरी, आपण कधी लग्न लावावयाचे?'

'बाबा नको म्हणतात.'

'ते तुझ्या कलाने घेत असत ना? तू म्हणशील तो नवरा तुला देईन असे म्हणत असत ना?'

'परंतु आता म्हणतात की मंगाचे तोंड पाहू नकोस. त्या दिवशीची तुमची ती मारामारी ना.'

'मीच तर ती सोडविली.'

'तरीही तुमच्याविषयी त्यांच्या मनात अढी बसली आहे. काय करू मी?'

'तुझे हृदय सांगेल तसे कर.'

दोघे बोलायची थांबली. त्यांचे हात एकमेकांच्या हातांत होते. मधून मधून एकमेकांच्या तोंडाकडे बघत, पुन्हा समोरच्या समुद्राकडे पहात.

इतक्यात मधुरीचा हात कोणी तरी ओढला.

'कोण?'

'तुझा बाप. ऊठ, निघतेस की नाही? ऊठ, की कमरेत लाथ मारू?'

'खबरदार माझ्या देखत बोलाल तर! तिला लाथ माराल तर मी तुम्हाला समुद्रात फेकीन.'

'ती माझी मुलगी आहे.'

'ती माझी मैत्रीण आहे.'

'बाबा, भांडण नको. मंगा, शांत हो.'

'तुला शंभरदा सांगितले की याचा नाद सोड. येथे येऊन गुलगुल गोष्टी करीत बसलीस. तुला लाज नाही वाटत?'

'बाबा, इतरांजवळ बोलायला मला लाज वाटते. मंगाजवळ बोलायला कसली लाज? मंगा माझा आहे.'

'पुन्हा बोल.'

'मंगा माझा आहे.'

'मधुरी, थोबाड फोडीन. पुन्हा बोल.'

'थोबाड फोडा. मी मरेपर्यंत सांगेन की मंगा माझा आहे.' आणि बापाने खरेच मधुरीच्या थोबाडात मारली. मंगा त्याच्या अंगावर धावला. परंतु मधुरीने त्याला दूर केले.

'बाबा, मारीत मारीत मला घरी न्या. मारा, मुलीला मारा.'

आणि खरोखर बाप मधुरीला मारीत घेऊन निघाला. मंगा टेकडीवर एकटाच बसला. त्याचे डोके भणाणले होते.

आता मधुरीचा बाप तिच्या लग्नाची जोराने खटपट करू लागला. एके दिवशी तो तिला म्हणाला,

'मधुरी, मी ठरवीन त्याच्याशी करशील का लग्न?'

'नाही बाबा.'

'मधुरी, विचार करून उत्तर दे.'

'नाही, तुम्ही ठरवाल त्याच्याजवळ मी उभी राहणार नाही. मंगाशी मधुरीचे लग्न लागलेले आहे.

'कोणी लाविले?'

'उचंबळणाऱ्या समुद्राने, त्या टेकडीने; लाटांनी, आमच्या हातांनी, आमच्या डोळ्यांनी; काय सांगू बाबा?'

'काही सांगू नकोस. माझ्या घरात राहावयाचे असेल तर माझी इच्छा प्रमाण.'

'बाबा, माझे लग्नच राहू द्या. मी अशीच घरात राहीन. दळण

दळीन, भांडी घाशीन. माझ्या मंगाला मी मनात ठेवीन, आणि तुम्हीही दुसरा कोणी पाहू नका.'

'लोक मला हसतील. तुला का अशीच ठेवू? आणि तुझ्या हातून उद्या वेडेवाकडे झाले तर? ते काही नाही. तुला माझे म्हणणे ऐकलेच पाहिजे. तू विचार करून ठेव.'

मधुरी काय विचार करणार?

ती आता खिन्न दिसे. तिचे ते हसणे जणू अजिबात मेले. एके दिवशी ती एके ठिकाणी दळण्यासाठी गेली होती. ती दळीत होती. तिच्या डोळ्यांतून पाणी गळत होते, ते पिठात पडत होते. घरांतील सोवळ्या आजीबाईंनी ते पाहिले.

'मधुरी, अग डोळ्यांतील पाणी त्या पिठात पडत आहे ना? सारे पीठ खरकटे झाले. काय तरी बाई. पूस ते डोळे आधी. गरिबाच्या पोटी कशाला आलीस? दळावे लागते म्हणून रडावे? आचरट आहेस!'

मधुरीने डोळे पुसले. डोळ्यांतील पाण्याने भिजलेले थोडे पीठ बाजूला काढले.

'आजीबाई, रागावू नका. आईला सांगू नका. सारे पीठ नाही हो खरकटे झाले. चिमूटभर बाजूला काढले आहे. आता न रडता दळते.' असे ती म्हणाली. दळण संपवून ती घरी जात होती. तो वाटेत कोण? तो बुधा होता. आज कित्येक दिवसांनी तो घराबाहेर पडला होता. आणि मधुरीचे दर्शन झाले. त्याच्या हातात एक फूल होते. गुलाबाचे फूल.

'मधुरी!' त्याने हाक मारली.

'काय बुधा?' त्याने विचारले.

'तू मला विसरली नाहीस?'

'नाही.'

'तू मला विसरणार नाहीस?'

'नाही.'

'तुझे माझ्यावर प्रेम आहे?'

'हो.'

'मग घे हे फूल.'

'बुधा!'

'काय मधुरी?'

'मी ऐकले होते की, तू खोलीतून बाहेर पडत नाहीस; परंतु तू तर बाहेर दिसलास आणि हातात फूल घेऊन जात होतास. असाच आनंदी राहा. फुलांचा वास घे. तुला फुलांचा तोटा नाही. सुंदर सुगंधी फुले, त्यांचा तू भोक्ता हो.'

'मधुरी!'

'काय?'

'कित्येक दिवसांनी मी आज बाहेर पडलो आणि हे फूल मला एकाने प्रेमाने दिले. मला नाही म्हणवेना. ते मी घेतले. परंतु अद्याप त्याचा वासही मी घेतला नाही. माझ्या जीवनात एकाच फुलाचा वास भरून राहिला आहे.'

'कोणत्या फुलाचा?'

'माझ्या मधुरीचा. तुझे माझ्यावर प्रेम आहे. मी दिलेले फूल तू घेतलेस. मग तू माझे प्रेम का घेत नाहीस? तू माझा हात कायमचा स्वतःच्या हातात का घेत नाहीस? मी एकटा आहे. माझ्या घरात ये. माझी राणी हो. माझ्या घरात आनंद आण. सौंदर्य आण. माझ्या जीवनात मधुरता आण. सफलता आण. मला कृतार्थ कर.'

'बुधा, तशा प्रकारच्या माझ्या प्रेमावर मंगाचा अधिकार आहे.'

'आणि माझा नाही?'

'आधी त्याचा. मंगा नसेल तर बुधा.'

'का नाही मरत तो मंगा?'

नगर वाचनालय, सातारा
बालविभाग

'बुधा, काय हे बोलतोस? मधुरीची मान का कापू पहातोस? करशील हो मंगाचा खूनबीन. तू नाहीसच मला आवडत जा. तू असा दुष्ट आहेस हे नव्हते मला माहीत.'

'मधुरी, मनुष्य वैतागला म्हणजे असे बोलतो. पुन्हा नाही हो मी असे बोलणार. मला क्षमा कर. माझ्या मनाची वेदना ह्या शब्दांवरून ओळख. ह्या शब्दांवरून माझ्यावर राग न करता माझी कीव कर. मधुरी, लहानपणी आपण खेळत असू. तू काय म्हणत ससस? आपण लटोपटीच्या लग्नाचा खेळ खेळत असू. आम्ही दोघे नवरदेव होण्यासाठी भांडत असू. मंगा एकदा तुझ्यासाठी फुले व हार घेऊन आला होता. फुलांनी त्याने तुला नटविले व प्रथम त्यानेच तुला माळ घातली. मी रडलो. तू समजूत घातलीस व काय म्हणालीस?'

'काय बरे म्हटले?'

'तुला नाही आठवत ते शब्द?'

'नाही.'

'खोटे सांगतेस. ते शब्द तू कधीही विसरणार नाहीस.'

'लहानपणचे बुधा आपण विसरतो.'

'सारेच नाही विसरत. महत्त्वाचे कोणी विसरत नसतो.'

'सांग ना काय मी म्हटले ते.'

'तू म्हणालीस की मी तुमची दोघांची बायको होईन.'

'बुधा, परंतु आता दोघांची मोठी बायको एकदम कशी होऊ? तू वेडा तर नाहीस! मंगाशी माझे मनाने लग्न लागले आहे.'

'जनात?'

'जनातही लागेल.'

'तुझा बाप तयार आहे?'

'नाही.'

'मग?'

'मी घरातून निघून जाईन.'

'कोठे राहशील?'

'समुद्रकाठच्या टेकडीवर.'

'तेथे कोण येईल?'

'मंगा येईल व मला घेऊन जाईल.'

'मधुरी!'

'काय बुधा?'

'मला विसरू नकोस. मी तुझे स्मरण करीत बसेन. तू एखादे वेळेस तरी दिवसातून माझी आठवण करीत जा.'

'मी तुला विसरणार नाही. घे हे फूल. मला जाऊ दे.'

'फूल राहू दे. थोडा तरी माझा वास तुझ्याजवळ राहू दे.'

'ते बघ बाबा येत आहेत. नको फूल. ते रागावतील.'

'मधुरी, नाही म्हणू नकोस. मी ते तुझ्या केसांत घालतो.'

'बुधा, रस्त्यात असे काय वेड्यासारखे करतोस?'

इतक्यात मधुरीचा बाप तेथे आला. तो रागाने लाल झाला होता.

'काय हा चावटपणा? श्रीमंत झालेत तर घरचे. रस्त्यात गरिबाच्या मुलीला का धरता? लाज नाही वाटत? रस्त्यातून गरिबांच्या मुलींनी फिरणेही कठीण झाले एकूण. हो दूर-चावट कुठला.'

'जपून बोल.' बुधा म्हणाला.

'अरे जा, जपून बोल म्हणणाऱ्या. एक थप्पड मारीन तर पाणी पाजीन. नीघ पाप्याच्या पितरा. फुंकरीनं उडून जाशील.'

'बुधा, जा. नको हे फूल.'

'थांब, कुस्करून टाकतो ते फूल.' असे म्हणून मधुरीच्या बापाने ते फूल कुस्करले. पाकळ्या खाली पडल्या. मधुरी त्या पाकळ्या वेचू

लागली.

'कशाला वेचतेस?'

'त्या पाकळ्यांवर कोणाचा पाय पडू नये म्हणून. बाबा, फुलांवर पाय पडू नये. बुधा, तू जा.'

'कुस्करलेले प्रेम तू गोळा कर.' असे म्हणून बुधा गेला. मधुरी घरी आली. तिच्या हातात त्या गुलाबाच्या पाकळ्या होत्या. ती त्या पाकळ्या डोळ्यांवरून फिरवी. एकेक पाकळी ती हातात घेई. तोंडावर फिरवी व खाऊन टाकी. ती का बुधाला पोटात ठेवीत होती? तिच्या जीवनवृक्षावर मंगा व बुधा दोघांनी का घरटी बांधली होती?

पाठोपाठ बापही घरी आला.

'मधुरी तुझे लग्न येत्या महिन्यात मी करून टाकणार.'

'नको बाबा.'

'ते मी तुला विचारले नाही. तू तयार आहेस ना?'

'नाही.'

'त्या दिवशी सांगितले होते की विचार करून ठेव.'

'केला विचार.'

'हे का विचाराचे उत्तर?'

'हो.'

'मधुरी, तू माझी झोपडी सोडून जा. तुला एक महिन्याची मुदत देतो.'

मधुरीने घर सोडून जाण्याचा निश्चय केला. ती बंधने तोडणार होती. ती मोलमजुरी करीतच असे. ती काही कोणावर फार अवलंबून नव्हती. जो आपल्या उपजीविकेसाठी, जीवनाच्या गरजांसाठी दुसऱ्यावर अवलंबून असतो त्याला स्वातंत्र्य नाही. त्याचा स्वाभिमान नष्ट होतो. त्याची मान खाली असते. त्याला विचार-स्वातंत्र्य, मत-स्वातंत्र्य, आचार-स्वातंत्र्य कसलेच स्वातंत्र्य नसते.

मधुरी स्वतंत्र होती. ती थोडीच मिंधी होती!

'मधुरी, ते सांगतील त्याच्याशी का नाही लग्न करीत?' एके दिवशी आई म्हणाली.

'बाबा म्हणतील विष खा. म्हणून का विष खाऊ? मंगाशिवाय दुसऱ्याजवळ लग्न करणे म्हणजे माझे मरण आहे. आई, मी घर सोडून जाईन. पण मंगाजवळ लग्न करीन.' मधुरी म्हणाली.

'तुला तो आवडतो. परंतु त्याला तू आवडतेस का? मंगाचे वडील तुला सून म्हणून करून घ्यायला तयार आहेत का? तुझ्या वडिलांना मंगा पसंत नाही. त्याच्या वडिलांशी भांडण झाले म्हणून! त्याचप्रमाणे मंगाचा बापही म्हणेल की माझ्याशी भांडणाऱ्याची मुलगी माझ्या मुलाला नको. मग तू काय करशील?'

'आई, मंगाही मग स्वतःचे घर सोडील. आम्ही दोघे कोठेही राहू. मी मंगाशिवाय जगू शकत नाही. तो माझ्याशिवाय जगू शकणार नाही. आई, तुझा आशीर्वाद दे. आम्ही सुखाने संसार करू.'

दिवस चालले होते. ताटकळलेले दिवस. शेवटी महिन्याच्या शेवटचा दिवस आला.

'मधुरी, काय ठरला तुझा विचार?' पित्याने विचारले.

'घर सोडण्याचा.' ती म्हणाली.

'ठीक, तुझा रस्ता मोकळा आहे. जा.'

'येते बाबा.'

मधुरी आईबापांच्या पाया पडून घरातून बाहेर पडली. आईबाप दारात उभे राहून बघत होते. मधुरीने मागे वळून पाहिले नाही. बाप घरात जाऊन खाटेवर पडला.

❖❖❖

: मंगा : : ४ :

मंगाचा बाप धाडसी व धडधाकट होता. तो साहसी होता. बापाचे हे गुण मुलामध्ये भरपूर उतरले होते. गलबतातील माल उतरता उतरता मंगाच्या बापाच्या मनात आपणही असे व्यापारी झालो तर, तर किती छान होईल असे येत असे. परंतु ते त्यांना जमले नाही. एखादे वेळेस बापलेकांचे असे संवाद होत असत.

'बाबा, तुम्ही व्यापारी नाही झालेत; परंतु मी होईन. तुमची इच्छा मी पुढे पुरी करीन.'

'हो, व्यापारी हो. मिळमिळीत जगणे मला आवडत नाही. माझा मुलगा तरी पराक्रमी व श्रीमंत होऊ दे. राजाप्रमाणे जगू दे.'

पिता मंगाच्या मनात असे विचार भरवी. मंगाही बंदरात काम करायला जात असे. माल चढविणे, उतरविणे हे काम करीत असे. एकदा मंगा एका व्यापाऱ्याबरोबर परदेशात जाण्यासाठी निघाला होता. परंतु पित्याने त्याला जाऊ दिले नाही.

'बाबा, का नाही मला जाऊ देत?'

'मी मेल्यावर जा. मी जिवंत आहे तोपर्यंत जाऊ नकोस.'

'का?'

'तुला दूर पाठवावयास मला धीर होत नाही.'

मंगावर पित्याचे फार प्रेम होते. हळूहळू मंगाच्या लग्नाचे विचार पित्याच्या मनात खेळू लागले. आपल्या मुलाला एखाद्या श्रीमंताची मुलगी मिळावी असे त्याला वाटे. पुढे मंगाला जर व्यापारी व्हावयाचे झाले तर पैसे नकोत का? भांडवल नको का?

आणि खरोखर एकदा असा योग आला. एक व्यापारी सारंग गावी आला होता. आपल्या मुलीला योग्य असा वर पाहावयास आला होता. तो गावात सर्वत्र हिंडे. बंदरावर फिरावयास जाई. एके दिवशी बंदरातील म्हातारीच्या खानावळीत तो बसला होता.

म्हातारीजवळ तो बसला होता. इतक्यात मंगा तेथे आला. मंगा सचिंत व खिन्न होता.

'ये मंगा.' म्हातारीने हाक मारली.

'हे कोण पाहुणे?' त्याने विचारले.

'आपल्या गावातील रत्ने पाहावयास ते आले आहेत.' ती म्हणाली.

'आपल्या गावात कसली आहेत रत्ने?'

'तुमच्या गावी रत्नाकर आहे. समुद्राला रत्नाकर म्हणतात. जेथे रत्नाकर आहे, तेथे का रत्ने नसतील?' तो व्यापारी म्हणाला.

'आम्ही लहानपणी बंदरावर फिरत असू. शिंपले गोळा करीत असू परंतु शिंपल्यातील मोती कधी मिळाला नाही. मोत्याचे शिंपले आमच्या समुद्रात होत नाहीत. आमच्या समुद्रात शंख, शिंपा, कवड्या यांचाच साठा आहे.' मंगा म्हणाला.

'रत्नपारखी असतो त्याला रत्न सापडते. तुमचे नाव मंगा वाटते?'

व्यापाऱ्याने विचारले.

'हो.'

'तुम्ही काय करता?'

'मजुरी.'

'काय, मजुरी?'

'हो, या बंदरातच माल चढविण्या-उतरविण्याचे काम मी करतो.'

'तुमचा हात पाहू?'

'तुम्ही का ज्योतिषी आहात?'

'परंतु पाहू दे.'

मंगाने आपला हात पुढे केला. त्या व्यापाऱ्याने तो पाहिला.

आपल्या हातात घेऊन त्याने तो दाबला.

'तुमचा हात राकट नाही. मऊ आहे. तुम्ही श्रीमंत व्हाल. तुमच्या हातांवर पैसा आहे.'

'श्रीमंत व्हावे असे मला वाटते. मी पुढे श्रीमंत होणार आहे. सातासमुद्राच्या सफरी करणार आहे. जगातील माणिक, मोती, हिरे, रत्ने मी आणीन; मी कुबेर होईन.'

'तुम्हांला श्रीमंत व्हावे असे वाटते?'

'हो.'

'तुम्हांला मजुरीचा कंटाळा आहे?'

'मला मजुरीचा कंटाळा नाही. अंगातून घाम आला, मी काम करून दमलो म्हणजे मला बरे वाटते. परंतु श्रीमंत व्हावे असे वाटते. श्रीमंत झाल्यावरही मी काम करीन. बाग करीन. बागेत फुले व फळझाडे लावीन. मला फुलांचा मनातून फार नाद. परंतु आज कोठे लावू फुले? जवळ जमीन नाही. काही नाही. नाना प्रकारची फुले व फळे यांचे मी प्रयोग करीन. परंतु आधी मला श्रीमंत होऊ दे. जगभर हिंडू दे. जगातील फुले, फळे पाहू दे. व्यापाराच्या निमित्ताने मी जगभर जाईन, पैसा मिळवीन, अनुभव मिळवीन. नाना गोष्टी बघेन आणि मग या सारंग गावी मी मळे फुलवीन.'

'आणि आजच कोणी तुम्हांला श्रीमंत केले तर?'

'खोट्या कल्पनांत रमणे मला आवडत नाही.'

'परंतु खरोखरच तुम्हांला कोणी धनदौलत दिली तर?'

'आयती संपत्ती मला नको. मी स्वतः मिळवीन.'

'तुम्ही किती वर्षांचे आहात?'

'वीस-बावीस वर्षांचा असेन.'

'तुम्ही लग्न केलेत का?'

'नाही.'

'करणार का?'

‘हो.’

‘तुमच्या घरी कोण कोण आहेत?’

‘वडील आहेत, आई आहे. भावंडे आहेत.’

‘या म्हाताऱ्या आजीबाईंचा व तुमचा काय परिचय?’

‘आम्हांला या लहानपणी खाऊ देत. आम्ही खेळायला येत असू. आमची भांडणे ही मिटवी. कधी थालीपीठ खायला देई. कधी आणखी काही.’

‘अजूनही खाऊ घ्यायला येता वाटते?’

‘हो. आम्ही आजीला लहानच आहोत. कधी वाईट वाटले तर मी येथेच येतो. पुन्हा आनंदी होऊन जातो.’

‘आज का खिन्न होऊन आले होतेत?’

‘हो.’

‘तरुणांना दुःख नसावे, चिंता नसावी.’

‘तरुणांनाच असावीत. कारण दुःख-चिंतांच्या ओझ्याखाली म्हातारे व अशक्त चिरडले जाणार नाहीत.’

इतक्यात आजीबाईने तेथे केळी आणून ठेवली. परंतु मंगा खाईना.

‘मंगा, खा ना रे.’ आजी म्हणाली.

‘नको.’ तो म्हणाला.

‘पाहुण्यांच्या देखत लाजतोस वाटते?’

‘का हो, खरे की काय?’ व्यापारी म्हणाला.

‘तुम्ही घ्या म्हणजे तो घेईल.’ आजी म्हणाली.

पाहुण्यांनी केळे हाती घेतले. त्यांनी मंगाच्याही पुढे केले. मंगाला नाही म्हणवेना. तो खाऊ लागला.

‘आजीला नाही म्हणालास, परंतु त्यांच्या हातचे घेतलेस. आजी नेहमीचीच. आपण जगाजवळ नीट वागू, परंतु सारी ऐट जवळच्या

माणसाजवळ. खरे की नाही?' आजीने विचारले.

'खरे आहे आजीबाई तुमचे म्हणणे.' व्यापारी म्हणाला.

मंगा निघून गेला. व्यापाऱ्याला मंगा आवडला. आपली मुलगी मंगाला द्यावी असे त्याच्या मनात आले. याला घरजावई करावे असे त्याला वाटले. तो म्हातारीजवळ बोलू लागला. आजीबाई सारे ऐकून घेत होती. शेवटी ती म्हणाली,

'तो तयार होईल असे वाटत नाही.'

'परंतु का?'

'ते मला नाही सांगता येत.'

'मी त्याच्या वडिलांकडे जातो व गळ घालतो.

पहा जाऊन, परंतु पितापुत्रांत त्यामुळे वितुष्ट न येवो म्हणजे झाले.'

दुसरे दिवशी व्यापारी मंगाच्या घरी गेला. मंगाचे वडील घरी होते. मंगा कामाला गेला होता. नमस्कार-चमत्कार झाले. बोलणे निघाले.

'काय असेल ते असो, तुमच्या मुलाने माझे मन मोहून घेतले आहे. मी आजपर्यंत किती तरी तरुण पाहिले. परंतु त्याने मला वेड लावले. माझ्या मुलीला हाच वर असावा, असे मला वाटते. तुम्ही नाही म्हणू नका. माझी एकुलती एक मुलगी. मी तुमच्या मुलाला घरजावई करीन. माझ्या घरी कशाला तोटा नाही. तुमची संमती द्या: मुलाला सांगा.'

'माझे तो ऐकेल?'

'तुमचे प्रेम असेल तर ऐकेल.'

'आईबापांचे का मुलावर प्रेम नसते? परंतु मुले आईबापांचे सारेच ऐकतात असे नाही. परंतु तुम्ही अकस्मात आलेत. योगायोग दिसतो. माझ्या मुलाने श्रीमंत व्हावे असे मला नेहमीच वाटते. कदाचित माझी इच्छा खरी व्हायची असेल. नाही तर असे विचार

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

माझ्या मनात सदैव यावे तरी का?'

'खरे आहे. येणाऱ्या गोष्टींचा आधी गंध येतो. होणाऱ्या गोष्टींची छाया पडते. तुम्ही विचारा हं. मी जातो. उद्या परत येईन.'

तो व्यापारी निघून गेला होता. पिता अत्यंत आनंदला होता. परंतु मंगा ऐकणार नाही, हीच काय ती त्याला भीती होती. आपण धाक घालू, धमकी देऊ वगैरे गोष्टी तो मनात योजीत होता. शेवटी त्या दिवशी त्याने मंगाजवळ रात्री बोलणे काढले.

'मंगा, तुझे नशीब थोर आहे.'

'कशावरून?'

'तू एकदम श्रीमंत होणार.'

'कोणी सांगितले?'

'एक श्रीमंताची मुलगी तुला मिळणार.'

'काय?'

'मंगा, तुझे लग्न करण्याचे विचार माझ्या मनात खेळत होतेच. परंतु इतक्या लौकर अकस्मात काही नेमानेमाच्या गोष्टी घडून येतील असे नव्हते वाटले. आपल्या गावात एक व्यापारी आला आहे. तो आपल्या मुलीला वर शोधीत आहे. त्याची एकुलती एक मुलगी. दुसरे मूलबाळ नाही. तो जावयाला घरजावई करणार आहे. तो व्यापारी आज आपल्याकडे आला व तू त्याच्या मुलीचा नवरा व्हावे अशी स्वतःची इच्छा त्याने प्रकट केली. तुला त्याने कसे, कोठे पाहिले देव जाणे. मी आश्चर्यचकित झालो. परंतु या सर्व गोष्टींत देवाचा वा दैवाचा हात आहे असे मला वाटते. मंगा, दैव चालून आले आहे. भाग्य आपण होऊन भेटायला आले आहे. तू नाही म्हणू नकोस. आलेल्या लक्ष्मीला नाही म्हणू नये. चांगले होईल. माझा मंगा सुखी, श्रीमंत होईल. खरे ना? हो. श्रीमंत हो. मग बंदरावर माल उपसावा लागणार नाही. कपडे मळणार नाहीत. पाठ ओझ्याखाली वाकणार नाही. माझा मंगा सुखाने राहो. राजासारखा राहो. तू मोठा होण्यासाठी जन्मला आहेस असे मला नेहमी वाटे. मंगा, तू असा का

दिसतोस? भाग्याच्या गोष्टी ऐकून तू हसण्याऐवजी रडवेला का झालास?'

'बाबा, नको मला ही श्रीमंती. श्रीमंत व्हायचा असेन तर मी स्वतःच्या श्रमाने, पराक्रमाने होईन. ही मिंधी श्रीमंती मला नको. त्या श्रीमंताची मुलगी मला शंभरदा हिणवील, पदोपदी माझ्या गरिबीची मला आठवण देईल. माझ्या डोक्यावर बसेल. ती मला गुलाम करील. ती मला पिंजऱ्यातील पोपट बनवील. तिचे का माझ्यावर प्रेम आहे? ना आम्ही एकमेकांस पाहिले, ना एकमेकांची तोंडओळख. ती उद्या काय म्हणेल? लग्न म्हणजे का आईबापांची आवड? ज्यांची लग्ने लावायची त्यांना नको का विचारायला? त्या व्यापाऱ्याने स्वतःच्या मुलीचा विचार तरी घेतला का? असे कसे हे लोक? हे लोक मुलाबाळांना चांगले खायला प्यायला देतात, कपडेलत्ते देतात, दागदागिने देतात, सारे लाड पुरवितात, परंतु मुलांचा आत्मा मारतात. त्यांच्या वृत्ती, त्यांचे मन नष्ट केले जाते. छे! मला नाही हे पसंत. हा माझाही अपमान आणि त्या मुलीचाही अपमान. उद्या त्या मुलीला मी आवडलो नाही तर? म्हणेल हा कोठून आला धटिंगण? हा कोठून आणला बाबांनी राक्षस? श्रीमंताच्या मुलींना नाजुक सुकुमार नवरे आवडत असतील. माझ्यासारखा थोडाच आवडेल?'

'तुझ्यासारखेच आवडतात. श्रीमंतांच्या मुलींना, श्रीमंतांच्या बायकांना मोकळेपणाने बोलता येत नाही. परंतु त्यांची मने कोणी पाहिली मंगा? मुलीचे काय? आणाल तो नवरा त्यांना आवडतो. तू कोणाला नाही आवडणार? त्या 'व्यापाऱ्याला जर तुला पाहून एकदम मोहिनी पडली तर त्याच्या मुलीला का पडणार नाही? आणि मला तरी या सर्व गोष्टींत काही तरी ईश्वरी संकेत दिसतो. विधिघटना दिसते. माणसाने देवाच्या इच्छेविरुद्ध जाऊ नये. अशाने भले होणार नाही.'

'बाबा, तुम्ही काही म्हणा. परंतु माझे मन रुकार देऊ शकत नाही.'

'पण का?'

'काय सांगू तुम्हाला?'

'सांग साऱ्या शंका, साऱ्या अडचणी.'

'बाबा!'

'काय बाळ?

'मंगाने स्वतःचे लग्न कधीच ठरविले आहे.'

'कोणाच्या मुलीजवळ?'

'माझ्या लहानपणच्या मैत्रिणीजवळ.'

'ती मधुरी?'

'हो.'

'ती भिकाऱ्याची पोर?'

'ती श्रीमंत मनाची थोर मुलगी.'

'मंगा!'

'काय बाबा?'

'तिच्याजवळ मी नाही तुला लग्न करू देणार. मला मारणाऱ्याच्या मुलीजवळ लग्न? छट्, अशक्य. पित्याचा अपमान करणाऱ्याच्या मुलीजवळ लग्न? बोलू नकोस. तुला काही स्वाभिमान आहे की नाही? चीड आहे की नाही? मंगा, हे भरलेले ताट देवाने आणले आहे; ते लाथाडू नकोस. त्या मधुरीचा नाद सोड. माझे ऐक. पित्याचे ऐकावे.'

'इतर सारे ऐकेन. या बाबतीत नाही ऐकणार. माझ्या मनातून मधुरीला मी आता उपटू शकणार नाही. माझ्या जीवनात तिचे झाड वाढले आहे. मधुरी माझी आशा, मधुरी सारे काही. बाबा, या मंगावर रागावू नका. मला इतर काहीही सांगा. परंतु या बाबतीत नका धरू हेका.'

'आणि मधुरीच्या बापाने ती तुला न देण्याचे ठरविले तर?'

नगर वाचनालय, सातारा
बालविभाग

'तुम्ही मुद्दाम मोडता घालू नका.'

'मी नाही घालणार. परंतु तो मुलगी देणार नसेल तर?'

'तर मंगा वेडा होईल. वाऱ्यावर फिरेल, समुद्रावर फिरेल.'

'काही तरी बोलतोस. मंगा, तू मधुरीचे वेड मनातून काढून टाक. या श्रीमंत व्यापाऱ्याचा जावई हो. आमचीही ददात मिटेल. आमचेही भाग्य फुलेल. श्रम करून मी कंटाळलो. चार दिवस तरी सुखाचा घास खाईन.'

'बाबा, तुम्ही कामाला नका जाऊ. मी दुप्पट काम करीन. मधुरी काम करील. आम्ही तुम्हाला सुखाचा घास देऊ.'

'गरिबाच्या घरात सारे श्रमतील तेव्हाच घर चालते. तुम्ही श्रमून आम्हांला सुखाचा घास द्याल; परंतु तुम्हाला उपाशी राहावे लागेल. तुमच्या मुलाबाळांना उपाशी रहावे लागेल. गरिबाला मेल्यावरच विश्रांती. काम करता करताच तो मरायचा.'

'मला श्रम आवडतात.'

'आज आवडतात, उद्या कंटाळशील.'

'काही असो. मधुरीशिवाय मी नाही जगू शकणार. ती माझी हवा, तो माझा दिवा. तिच्यामुळे जीवनात आशा व प्रकाश. मी कधी दुःखी कष्टी असलो तर हळूच कोठे तरी जाऊन चोरून मधुरीला मी पुन्हा पाहून येतो. मग मी पुन्हा हसतो, आनंदतो. मधुरी माझ्या सर्व सुखाचा ठेवा. ती तुमच्या मंगाचे अमृत, ती या मंगाची संपत्ती. बाबा, मधुरीशिवाय जगातील सारी संपत्ती मिळाली तरी मी भिकारी असेन आणि एक केवळ मधुरी मिळाली तर मी स्वतःला जगातील सर्वांपेक्षा अधिक श्रीमंत मानीन.'

'पण शब्दांनी पोटं भरत नसतात.'

'हृदये भरतात ना पण?'

'भरलेले पोट असले म्हणजे अशी बोलणी सुचतात. उपाशी पोटाला कोठल्या आशा? कोठले मनोरथ? मंगा, विचार कर.'

'बाबा, माझा विचार वज्रलेप आहे.'

'तू का पित्यांची इच्छा मोडणार?'

'ही इच्छा मी मोडणार.'

'पित्याचे घर सोडणार?'

'ही इच्छा माझ्यावर लादली जाणार असेल तर हे घर मी सोडणार.'

'कोठे राहशील?'

'पृथ्वी मोठी आहे, कोठेही राहीन. आकाशाचे पांघरूण आहे. धरित्रीची मांडी आहे. प्यायला नद्यानाल्यांचे पाणी आहे. 'खायला झाडामाडांचा पाला आहे. मधुरी व मंगा एकच असली, म्हणजे मातीचे कण त्यांना माणिकमोती वाटतील. सारी सृष्टी त्यांना दिसेल, सारी दुःखे त्यांना गोड वाटतील.'

'मंगा, माझा करारी स्वभाव तुम्हां सर्वांस माहीत आहे.'

'आणि मीही तुमचाच मुलगा.'

'तू घरातून निघून जा.'

'जातो बाबा, आत्ता या क्षणीच जाऊ?'

'जा, या क्षणीच जा.'

आणि खरेच मंगा उठला. त्याची आई रडू लागली.

'जाऊ दे कार्ट्याला. त्याचे तोंडही मी पाहणार नाही. जा. नीघ.'

मंगा घराच्या बाहेर पडला. बाहेर अंधार होता. परंतु मंगाच्या मनात मधुरीच्या प्रेमाचा दिवा झळकत होता. कोठे जाणार मंगा? त्याचे प्रेम नेईल तिकडे. जा, मंगा जा; प्रेमाशी लग्न लाव.

मंगा पुन्हा घरी येईल असे बापाला वाटत होते. परंतु मंगा घरी आला नाही. बाप त्याला इकडे तिकडे पहात होता. परंतु त्याला तो दिसला नाही. तो व्यापारीही निराश होऊन गेला. काय ही वेडी पोरे, असे म्हणत तो गेला. घरी चालत आलेल्या संपत्तीला लाथाडणाऱ्या

मुलाची त्याला कीव वाटली. हळूहळू बापही मंगाला विसरला आपला एक मुलगा जणू मेला असे समजून तो वागू लागला.

❖❖❖

: तिघांची त्रेधा : : ५ :

मंगा घरातून बाहेर पडला. बरेच दिवस तो कोणाला दिसला नाही. परंतु एके दिवशी तो टेकडीवर बसला होता. आकाश अभ्राच्छादित झाले होते. गार वारा होता. दुपार होत आली होती. मंगा तेथे जरा लवंडला. समुद्राकडे पहात झोपी गेला. त्या विश्वसंगीतात बाळ झोपले. सागराचे व वाऱ्याचे संगीत, गंभीर, गूढ संगीत. त्या नादब्रह्मात मंगा झोपी गेला. उशाला हात घेऊन तो झोपी गेला. परंतु जागा झाला तो त्याचे डोके कोठे होते? डोक्याखाली कोठली उशी होती? मधुरीच्या मांडीवर त्याचे डोके होते. मधुरीच्या हातात त्याचा हात होता. आपण स्वप्नात आहोत की जागृतीत ते त्याला कळेना. तो पुन्हा डोळे मिटून पडला. त्याच्या मुखावर अपार आनंद होता. तेथे शत कोमल भाव फुलले होते. तो सुखावला होता, मंदावला होता. मधुरी गाणे म्हणू लागली.

'नीज राजा नीज

माझ्या मांडीवरती डोके ठेवून नीज।।नीज०।।

खंत नको करू राजा

चिंता नको करू राजा

क्षणभर आकाशीची कडाडते वीज।।नीज०।।

चिंता सरे दुःख हरे

अंधार सरे प्रकाश भरे

अंवस जाऊन सोनियाची उजळते वीज।।नीज०।।

सदा नसे उन्हाळा
येतोच पावसाळा
आशेचे प्रेमवृष्टीत अंकुरेल बीज।।नीज०।।
जगी किती कटकटी
जगी किती ताटातुटी
कष्टाचे अंती परी होते गड्या चीज।।नीज०।।'

मधुरी गाणे म्हणत होती, मंगाला ती थोपटीत होती. शेवटी ती मुकी झाली. शब्दमय गाणे संपून मूक गान सुरू झाले. मौनाचे अपरंपार गान, अनंत अर्थाचे भावनाकल्लोळाचे उत्कट गान. ते मुके गीत गात मधुरा मंगाला थोपटीत होती.

'मधुरी!'

'काय राजा?'

'मी का राजा? बाबा मला राजा करू पहात होते. परंतु राज्य मी भिरकावले. मी भिकारी झालो. घराबाहेर पडलो. मी का राजा? कोठल्या देशाचा मी राजा? कोठे आहे माझे राज्य? कोठे आहे धनदौलत?'

'माझ्या जीवनाचा तू राजा. माझ्या जीवनावर तुझे अक्षय्य राज्य. माझे प्रेम ही तुझी धनदौलत. तू माझा राजा. या मधुराचा गोड गोड राजा.'

'मधुरी, खरेच मला राज्य मिळत होते.'

'कोठचे राज्य?'

'एका श्रीमंताची मुलगी बाबांनी माझ्यासाठी आणली होती धनदौलतीसह.'

'मग?'

'ती मी नाकारली.'

'का? वेडाच आहेस तू.'

'मी वेडाच आहे. तू मला वेडे बनविले आहेस. वेडेपणाचे धडे किती वर्षापासून तू मला देत आहेस. मधुरी, तू दिलेले राज्य, त्यापुढे इतर सारी राज्ये तुच्छ आहेत. बाबांनी मला घरातून हाकलून दिले. मी वणवण करीत दूरदूर भटकत होतो. आज पुन्हा या टेकडीवर आलो. पूर्वीच्या आठवणींच्या समुद्रात डुंबत होतो. त्या आठवणीत न्हाऊन-माखून मी येथे पडलो होतो व मला झोप लागली. तू केव्हा आलीस?'

'आले. दमलेले, भडकलेले डोके मांडीवर घ्यायला आले. मंगा, तू किती अशक्त झालास?'

'तुझ्या प्रेमामुळे मी जगलो. नाहीतर मेलो असतो. मधुरी, तुला कोणी आणले येथे?'

'माझ्या प्रेमाने.'

'तू नेमकी येथेच एकदम कशी आलीस?'

'या टेकडीवरच आपण प्रेमाचे ढीग गोळा केले. प्रेमाचे पर्वत रचिले. या टेकडीवर बसून प्रेमाचे सागर उचंबळविले. प्रेमाच्या बागा आपण फुलविल्या. टेकडी आपले मंदिर, प्रेमाचे मंदिर. मी येथे नको येऊ तर कोठे जाऊ? जेव्हा जेव्हा मी दुःखी असते तेव्हा मी येथेच येते. येथे मला मंगाचे हसणे बोलणे, खेळणे, खिदळणे सारे ऐकू येते. मंगाची मूर्ती मला दिसते.'

'आज का तू दुःखी आहेस?'

'या वेळेस सुखी आहे.'

'मधुरी, असा कापरा का आवाज?'

'प्रेमाच्या वाऱ्याने वेल कापत आहे.'

'मधुरी, काय झाले?'

'गोड झाले.'

'म्हणजे?'

'माझ्या देवाच्या गाठीभेटीसाठी आजपासून मी मोकळी झाले.'

नगर वाचनालय, सातारा
३६, भवानी पेठ, सातारा
दाखल नं - १८३१४ ग्रंथानुक्रमांक- ग्रा. वि. अ. १३१४
किंमत - १०/- पाने - २२४

'कोणी बांधिले होते ?'

'बाबा माझ्या देवापासून माझी ताटातूट करू पहात होते. ते दुसऱ्या कोणाजवळ तरी माझे लग्न करू इच्छीत होते. शेवटी मी भांडले. मला त्यांनी घरातून हाकलून दिले. मी बाहेर पडले. माझ्या मंगाच्या घरी आज रहायला आले.'

'कोठे आहे मंगाचे घर ?'

'तुझे हृदय हे माझे घर. मंगा, तुझ्या हृदयात मी माझे घरटे बांधले आहे. सुंदर घरटे. मला तेथून नको हो हाकलू. नको हो दवडू. नको हो काठीने माझे घरटे पाडू. नीज, माझ्या मांडीवर नीज. डोळे मिटून नीज. मी एक गाणे म्हणते.'

मंगा डोळे मिटून पडला. मधुरी एक गाणे म्हणू लागली.

'घरटे मी बांधियले, तुझिया हृदया रे मधे
तू येथे राहू नको, ऐसे सखया न वदे।।घरटे०।।
घिरट्या जगि घालुनिया
दमले जगि बहु राया
राहुन हृदयकुंजि तुझ्या करिते मी मुदे।।घरटे०।।
पाखरु हे थकलेले
पाखरु हे दमलेले
व्याकुळले भूकभरे, प्रेमफळे मधु मज दे।।घरटे०।।
हाकलती मज सगळे
जाऊ कुठे मज न कळे
एक तुझी मज आशा, डोळे तव मूर्तिकडे।।घरटे०।।
उडत इथे मी आले
आशेला मनि धरिले
जा येथुनि म्हणशि जरी, पडु दे तव चरणि मढे।।घरटे०।।'

मंगा ऐकत होता. मधुरीच्या डोळ्यांतील आसवांची फुले त्याच्या

तोंडावर पडली. त्याने डोळे उघडले. कोणी बोलत नव्हते. गाणे थांबले होते.

'मधुरी, चल आपण जाऊ.'

'कोठे जायचे?'

या उचंबळणाऱ्या सागराच्या काठाकाठाने भटकू. आपले जीवन या समुद्रालाच समजेल. उचंबळणारी हृदये उचंबळणाऱ्या समुद्राशिवाय कोणाला समजतील? चल, दे तुझा हात.'

दोघे उठली. समुद्राच्या काठाने दोघे फिरत निघाली. मध्येच पाण्यातून जात. लाटा त्यांच्या पायांवर नाचत. हातात हात नाचत. अंगावर रोमांच नाचत. एके ठिकाणी बरेच दगड होते. दगडावर खारे पाणी आदळून आपटून दगडाची जणू शस्त्रे झाली होती. प्रेमाला कशाची भीती? प्रेमाने पाषाणाची फुले होतात, तलवारीचे हार होतात; काट्याचे मुकुट होतात, मरणाचे जीवन होते. प्रेम म्हणजे मंत्र, प्रेम म्हणजे जादू, प्रेम म्हणजे किमया. मधुरी व मंगा त्या दगडांवरून नाचत गेली. परंतु मधुरीचा पाय कातळाने कापला होता. त्यातून रक्त येत होते. एकाएकी मंगाचे लक्ष तिकडे गेले.

'मधुरी, काय ग लागले?'

'कुठे?'

'ते बघ रक्त. थांब.'

दोघे तेथे वाळूत बसली. मंगाने धोतराची धांदोटी फाडून पट्टी बांधली. रक्त थांबेना. ते येतच होते.

'भरतीची वेळ आहे.' मंगा म्हणाला.

'होय. लाटा पाहा उसळत आहेत.' मधुरी म्हणाली.

'समुद्राला भरती आणि आपल्या हृदयांना भरती.'

'परंतु हृदयाला कधी आहोट नको हो.'

'आपले प्रेम नेहमीच नाचो, उचंबळो, वाढो!'

'मंगा!'

'काय?'

'या समुद्राची नेहमी मला भीती वाटते. आज माझा पाय कापला.'

'मला कधीही समुद्राची भीती वाटत नाही.'

'मंगा, आपण तेथे बसू चल. ती पाहा दगडातील नैसर्गिक खोली.'

'दगडाचे मंदिर.'

'त्यातील आपण देव.'

दोघे तेथे जाऊन बसली. कोणी बोलत नव्हते. थोड्या वेळाने मंगा म्हणाला,

'मधुरी, दमली आहेस. माझ्या मांडीवर नीज.'

'गाणे म्हणशील?'

'मला गाणे नाही म्हणता येत.'

'बुधा गाणे म्हणतो.'

'बुधा चित्रेही काढतो.'

'बुधा चांगला आहे नाही? सौम्य व शांत.'

'मधुरी!'

'काय मंगा?'

'तुला मी आवडतो की बुधा?'

'मी या क्षणी तुझ्याजवळ आहे यावरून तुला नाही काही समजत?'

'परंतु माझ्या मांडीवर डोके ठेवून आठवण त्याची करीत आहेस!'

'मंगा, किती झाले तरी तो आपला लहानपणचा मित्र. तो घरी एकुटा असतो. हसत नाही. बोलत नाही. त्याची आठवण करणेही का पाप? असा दुष्ट नको होऊ गड्या.'

'नाही हो होणार. तू जवळ असलीस म्हणजे दुष्टपणा माझ्याजवळ येणार नाही. मधुरी, प्रेम मत्सरी असते. मी किती झालो तरी मनुष्यच नाही का?'

'हो, आपण माणसेच.'

'मधुरी, तू आता दमलीस. आपण अशी किती दिवस भटकणार? हिंडणार? कोठे तरी आपण राहिले पाहिजे. झोपडी केली पाहिजे. परंतु एकसुद्धा दिडकी मजजवळ नाही. काय करावयाचे?'

'मंगा तुला मी एक विचारू?'

'विचार.'

'रागवणार नाहीस ना?'

'नाही.'

'मी आज रात्री बुधाकडे जाते, त्याच्याजवळ पैसे मागते व घेऊन येते. तो देईल. जाऊ का?'

'रात्री जाणार?'

'हो. मग केव्हा जाऊ? तुला का शंका आली? शंका आली असेल तर मला या समुद्रात शिरू दे. मित्राकडे केव्हाही जायला भय नसावे. बुधा उल्लू नाही.'

'मी आहे वाटते?'

'थोडासा आहेस आणि म्हणूनच तू मला आवडतोस. तू रागवतोस; रुसतोस व बेफाम होतोस, म्हणून मला आवडतोस. मला शांत सरोवर नाही आवडत. खवळणारा, हसणारा समुद्र आवडतो.'

'समुद्र बुडवील, पोटात गुदमरवील.'

'ते बुडवणे, ते गुदमरणे गोड असते मंगा.'

'मग जाशील त्याच्याकडे?'

'हो. आज रात्री जाईन व लगेच परत येईन.'

'मी टेकडीवर असेन.'

'ठरले तर. तोपर्यंत अशीच येथे बसू. मी निजते.'

'नीज.'

मधुरी मंगाच्या मांडीवर निजली. ती थकली होती, तिच्या म्लान परंतु मधुर मुद्रेकडे मंगा पाहत होता. आपले दारिद्र्य त्याला आठवले. बुधाकडे मधुरीने पैसे मागण्यासाठी जाणे त्याला कसे तरी वाटले. त्याचा स्वाभिमान दुखावला जात होता. बुधाच्या मदतीवर का मी नवा संसार सुरू करू? हा मिंधेपणा आहे. लाजिरवाणे आहे हे. तो खिन्न झाला.

मधुरी एकदम जागी झाली. मंगा सपाट समुद्राकडे शून्य दृष्टीने पहात होता. मधुरी त्याच्याकडे भरलेल्या दृष्टीने बघत होती. ती भुकेली होती. मंगाला ती खात होती. पीत होती. एकदम तिने आपले दोन्ही हात मंगाच्या गळ्यात घालून त्याला खाली वाकविले, त्याचे तोंड जवळ ओढले. फुले भेटली. श्वासोच्छ्‌वास मिसळले.

'खाऊ तुला, खाऊ?'

'हूं खा.'

दोघे शांत झाली. मधुरी बसली. सायंकाळ होत होती. समुद्रावर लाल प्रकाश पसरला होता. तांबडा समुद्र जणू तेथे नाचत होता. अनुरागाचा लाल सागर. मधुरीच्या व मंगाच्या प्रेमाला पाहून तो समुद्रही रंगला, का त्या दोघांची प्रेमाने रंगलेली अनंत हृदये तेथे बाहेर पडून नाचत होती?

'मधुरी. चल, काठाकाठाने परत जाऊ. पाय दुखतो का?'

'नाही दुखत. चल, धर माझा हात.'

दोघे समुद्रकाठाने चालली.

'पाण्यातून चल.'

'नको रे मंगा.'

चल. मी आहे बरोबर.

'मला भीती वाटते!'

थोड्या पाण्याचीही भीती?'

'बरे, चल.'

दोघे पाण्यातून जाऊ लागली. मंगा पाण्यात पुढे पुढे चालला.

'मंगा, पाण्यात तिकडे कोठे जातोस?'

'मधुरी!'

'काय?'

'चल जाऊ समद्रात. जलमंदिरात राहू. नको हे जग. अथांग पाण्यात राहू. रात्रंदिवस संगीत. जवळ माणिकमोत्यांच्या राशी. येतेस?'

'मंगा, वेडा आहेस तू, चल किनाऱ्याला.'

'मला नाही नीरस जगात येववत.'

'परंतु मी आहे ना तुझ्याजवळ?'

'हो, आहेस.'

'मग चल तर.'

दोघे पाण्याच्या बाहेर आली. अंधार पडू लागला. आकाशात तारे चमचम करीत होते. स्तब्धता होती. वारे व लाटा यांचे फक्त गान चालले होते. फिरत फिरत दोघे टेकडीवर आली.

'मंगा, मी जाऊन येते.'

'एकटी जाशील?'

'हो. मधुरी निर्भय आहे.'

मधुरी गेली. मंगा तेथे बसून राहिला. त्याच्या मनात शेकडो विचार येत होते. तो मध्येच एकदम टाळी वाजवी व उभा राही. पुन्हा खाली बसे. जरा आडवा पडे. पुन्हा उठे. अशांत व अस्वस्थ होता तो.

आणि मधुरी गेली. रात्री बुधाला झोप येत नसते ही गोष्ट तिला माहीत होती. बुधा मधुरी म्हणत बसे. तोच त्याचा अखंड जप. बुधा

जागा असेल ही मधुरीला खात्री होती. आणि बुधाचे घर आले; तो तिला काय दिसले? बुधा खिडकीतच उभा होता. मधुरीने वर पाहिले. तिने 'बुधा' अशी मंजुळ हाक मारली.

'कोण, मधुरी?'

'हो. दार उघड.'

'आली, माझी मधुरी आली.'

तो धावतच खाली आला. त्याने दार उघडले. मधुरी आत आली.

'थांब, मी तुझा हात धरून नेतो. पडशील.' त्याने तिचा हात धरला. तो थरथरत होता. मध्येच जिन्यात तो थांबला. दोघांचे श्वास एकमेकांस ऐकू येत होते. मधुरी बोलली नाही. बुधाने शेवटी तिला वर नेले. ती त्याची खोली होती.

'मधुरी, थांब तुझ्यासाठी नीट गादी घालतो.'

'नको. मी येथेच बसते.'

'नाही. गादीवर बस. ऐक माझे.'

त्याने गादी पसरली. तिच्यावर एक सुंदरशी शाल त्याने घातली. मधुरी गादीवर बसली. बुधा जवळ बसला.

'मधुरी!'

'काय बुधा?'

'तू आज आलीस?'

'क्षणभर आल्ये आहे.'

'हा क्षण अमर आहे. अत्तराचा एक थेंबही सारे घमघमाटाचे करतो. हा एक क्षणही माझ्या सर्व जीवनाला दरवळील. का आलीस?'

'तुझ्याजवळ मदत मागायला!'

'प्रेम माग.'

'ते दिलेसच आहे.'

'काय मदत देऊ? मी कोण देणारा! सारे तुझेच आहे. येथून हक्काने ने.'

'उद्यापासून मंगा व मी एकत्र राहणार. आम्ही दोघेही निराधार आहोत. घरातून त्याला बाहेर काढण्यात आले तसेच मलाही. आम्हाला राहायला एखादी झोपडी हवी आहे. उद्या घेते एखादी झोपडी. राहू कोठे तरी. आम्ही मजुरी करून राहू, परंतु आरंभी थोडी मदत हवी. जवळ नाही काही, भांडे ना कुंडे.'

'मधुरी, माझ्याकडेच तुम्ही दोघे येऊन राहा ना.'

'नको. मंगाला ते आवडणार नाही.'

'तू लहानपणी काय म्हणत असस?'

'त्याची आठवण आता नको. देतोस का मदत?'

'मी शेवटी तुझा कोणीच नाही ना?'

'तुझ्याकडे निर्लज्जपणे भीक मागायला आले, यावरून तरी तू मला परका वाटत नाहीस, हे नाही का दिसत? तुम्हां पुरुषांना काही कळत नाही. तू माझा म्हणूनच मी तुझ्याकडे आले, खरे ना?'

'होय.'

'दे लौकर मदत!'

'किती देऊ?'

'दे दोनशे रुपये.'

'पुरेत?'

'पुरे.'

'पुन्हा कधी लागले तर मागशील ना?'

'मागेन.'

बुधा उठला. त्याने दोनशे रुपये आणले व दिले. दोघे बसली होती.

'जाते मी.'

'जरा थांब. पुन्हा कधी येशील तू?'

'जरूर पडेल तेव्हा.'

'कामापुरता तेवढा मी.'

'देवाची संकटातच आठवण होते.'

'देव होण्यापेक्षा मानव होणे बरे मधुरी.'

'जाते मी.'

'एक क्षणभर या गादीवर निजून जा. नीज. निजवू तुला?'

'नको. ही बघ मीच निजते.'

मधुरी त्या गादीवर आडवी झाली. लगेच उठली.

'त्या उशीवर तुझे तोंड ठेव मधुरी.'

'हे बघ ठेवले. झाले ना? जाते आता मी.'

'मंगा कुठे आहे?'

'टेकडीवर.'

'त्याने तुला एकटीला येऊ दिले?'

'मंगाचा माझ्यावर विश्वास आहे. तुझ्यावर विश्वास आहे, त्या विश्वासाला आपण पात्र होऊ या. मला पोचव. धर माझा हात.'

'मधुरी, मी कसा जगू?'

'माझ्या स्मरणाने जग.'

'तू कठोर आहेस.'

'काय उपाय? मी तरी काय करू?'

'मग जातेसच ना?'.

'हो.'

'मलाही बरोबर ने. समुद्रात नेऊन मला बुडव.'

'बुधा, काय हे बोलतोस?'

'मग तुझ्या प्रेमात मला का बुडवलेस? का मला तुझ्याविषयी प्रेम वाटते?'

'माझा आनंद तो तुझा आनंद ना?'

'होय.'

'ज्याच्यावर आपण प्रेम करतो, त्याची इच्छा प्रमाण ना?'

'होय.'

'मग माझी इच्छा मान. माझी आज्ञा मान. या घरात राहा. आनंदाने राहा. माझी आठवण तुजजवळ आहे.'

'माझे प्रेम इतके निरपेक्ष नाही.'

'तसे निरपेक्ष कर. खरे प्रेम मोबदला नाही मानत. माझ्यावर प्रेम करण्यातच धन्यता मान.'

'मधुरी, हे कठोर धडे मंगाला का नाही देत?'

'त्याची अद्याप तशी लायकी नाही.'

'मी का वरच्या वर्गातील?'

'हो. चल मला पोचव. वरच्या वर्गातील आहेस असे सिद्ध कर.'

'तुझे चित्र काढू?'

'नको आता. तुझ्या डोळ्यांसमोर मी आहेच नेहमी. तिकडे मंगा वाट पहात असेल. जाऊ दे मला. तो निराश झालेला आहे.'

'निराश?'

'म्हणतो समुद्रात जाऊ. नको हे जग.'

'का असे म्हणतो?'

'मधून मधून मनुष्य असं म्हणतो.'

'प्रेम अनंताची खोली दाखविते. जीवनमरण दाखविते. प्रेम एका क्षणात सारे मंगल व भीषण, शुभ्र व अशुभ यांचे दर्शन घडविते.'

'मला नाही समजत काय म्हणतोस ते. परंतु मरावे असे

ज्याच्या मनात येत नाही असा कोण आहे जगात?'

'कोणी नाही. सारे रडणारे व हसणारे.'

'हं. धर माझा हात व पोचव.'

बुधाने तिचा हात धरला. जिन्यात क्षणभर थरथरत दोघे उभी होती. मधुरीने आपली मान त्याच्या खांद्यावर ठेवली. तिच्या डोळ्यांतून पाणी गळले. तिने चलण्याचा इशारा केला. दाराजवळ दोघे आली. कडी निघाली. दार उघडले गेले.

'जातेस ना शेवटी?'

'बुधा, रडू नकोस. नीट राहा. खात-पीत जा. मधुरी आनंदाने राहावी असे वाटत असेल तर खा, पी, हस, खेळ. बुधा माझ्या मनाची किती रे ओढाताण होत असेल? किती त्रेधा होत असेल? काही कल्पना कर. माझी कीव कर. माझ्यासाठी जगशील ना?'

'होय, जगेन.'

'स्वतःची काळजी करशील ना?'

'करीन.'

'जाते आता मी.'

मधुरी गेली. तिने मागे वळून पाहिले. पुन्हा निघाली. पुन्हा वळून तिने पाहिले. पण आता गेली. बुधा वर गेला. ती उशी त्याने हृदयाशी धरली. तिच्यावर त्याने अभिषेक केला. परंतु मनात म्हणाला, मला रडता नाही कामा. मधुरीच्या आनंदासाठी मला हसले पाहिजे. तो हसला. ते हसणे होते की रडणे!

इकडे टेकडीवर मंगा वाट पाहात होता. हळूच मधुरी येऊन डोळे धरील असे त्याला वाटे. जरा चाहूल लागताच मधुरी आली असे त्याला वाटे. तो वाट पाहून दमला. 'मधुरी येईल का? का बुधाकडेच राहील! बुधाने तिला नाही येऊ दिले तर? बुधाचे तिच्यावर प्रेम आहे. मी उल्लू आहे. मधुराला मी आवडतो की बुधा? उल्लू मंगा काय कामाचा? बुधाजवळच मधुरी राहिली तर काय

वाईट? मी असा शतदरिद्री, भिकारी. बुधाजवळ मधुरी राहील तर तिला कशाची वाण पडणार नाही. जाऊ का मी या अथांग सागरात? लहानपणापासून हा समुद्र मला हाक मारतो. जाऊ का त्याच्या घरी? करू का मंगाचा शेवट?' असे विचार त्याच्या मनात उसळू लागले आणि तो खरेच उठला. टेकडीवरून खाली उतरला. समुद्राकडे चालला. तो तेथे पाण्यात उभा होता. पुढे जाण्याचे त्याला धैर्य होईना. मधुरी आली तर? आपण न दिसलो तर तिला काय वाटेल? माझ्यासाठी तिने घरदार सोडले, आईबाप, भावंडे, सर्वांचा तिने त्याग केला. माझ्या एका खांबावर तिच्या जीवनाची सोन्याची द्वारका उभी आहे. ती काय म्हणेल मी गेलो तर? तिला फसवू, रडवू? दुष्ट आहे मी.' मंगा अशा प्रकारे विचारांच्या सागरात हेलावत होता. तो पुढे जाई. मागे येई. लाटा पुढे जात. मागे येत. त्याप्रमाणे त्याचेही चालले होते.

मधुरी टेकडीवर आली. तो तेथे मंगा नाही. तिच्या पोटात धस्स झाले. मंगाचे शब्द तिला आठवले. 'चल, आपण समुद्रात जाऊ.' हे ते शब्द तिला आठवले. ती घाबरली. बावरली. तिने दूर पाहिले. कोणीतरी पाण्यात उभे आहे असे तिला वाटले. ती धावली. तिच्याने हाक मारवेना. ती एकदम पाण्यात शिरली. पाण्याला भिणारी मधुरी आज निर्भय झाली होती. मंगा तिकडे एकदम आणखी पुढे गेला. मधुरी पुढे चालली. एकाएकी मंगाने मागे पाहिले तो मधुरी त्याला दिसली. पाण्यात धडपडणारी मधुरी. मधुरीने शेवटी केविलवाणी हाक मारली. मंगा मागे आला. प्रेमाने त्याला मागे खेचले. तो बाहेर आला.

'तू कशाला पाण्यात आलीस? तू भीत असस ना?'

'तू जवळ असलास म्हणजे मला भीती वाटत नाही. मी मरणालाही तुझ्याबरोबर मिठी मारीन. मंगा, तुम्ही सारे का रे माझा छळ करता?'

'सारे म्हणजे कोण?'

'तू व बुधा. मधुरीला मरू दे, मरू दे.'

'मधुरी!'

'बुडव या मधुरीला दूर पाण्यात. का रे आलास टेकडीवरून?'

कोण माझी त्रेधा! कशी पळत आल्ये. पाण्यात शिरल्ये. आपण एकत्र राहिलो नाही तोच मला कंटाळलास ना? बायकांची वेडी जात. तुम्हा पुरुषांना काही नाही. तुम्हांला माया नाही , दुसऱ्याच्या मनाची कल्पना नाही. तुमचे खेळ होतात; पण आमचे जीव जातात.'

'मधुरी, चल बाहेर.'

दोघे टेकडीवर आली. जवळ जवळ बसली.

'आणलेस पैसे?'

'हो.'

'किती?'

'पुरेसे. उद्या एक झोपडी विकत घेऊ.'

'एक लहानशी झोपडी आहे. पन्नास-पाऊणशे रुपयांत मिळेल. तू किती आणलेस पैसे?'

'दोनशे रुपये. झोपडी घेऊ, भांडीकुंडी घेऊ, संसार मांडू.'

'मधुरी!'

'काय?'

'आपले लग्न लागले का?'

'अद्याप शंका का आहे? मी माझ्या बाबांना सांगितले की, आमचे लग्न लागले. नकोत समारंभ काही. उद्यापासून संसार सुरू.'

'हे रुपये नकोत असे मला वाटते. बुधा हिणवील. लोकांजवळ सांगेल.'

'बुधा कोणाजवळ बोलत नाही. बिचारा घरातून बाहेरही पडत नाही. तो का परका आहे?'

'नकोतच हे रुपये. फेकून दे ते समुद्रात. दुसऱ्याचे काही नको.'

'मंगा, नको रे मला रडवू, मला छळू.'

'बरे तर, राहू देत. तुम्ही बायका म्हणजे रडणाऱ्या.'

'तुम्ही पुरुष रडवणारे. मी दमून गेले आहे. निजते आता मी. तूही नीज.'

'नीज. मीही निजतो.'

दोघे तेथे झोपली. प्रेमाची पासोडी पांघरून दोघे झोपी गेली. गार वारा वहात होता. वरती तारे चमचम करीत होते. समुद्र झोपला नव्हता. तो या दोन प्रेमी जीवांना गाणी म्हणत होता. दोघांचे हात एकमेकांच्या हातात होते. प्रेमावर पोसलेले जीव. प्रेमावर जगणारे जीव. प्रेमासाठी घरेदारे, आईबाप, धनदौलत सारे सोडणारे ते जीव. घाल, वाऱ्या, त्यांना प्रदक्षिणा घाल. समुद्रा, त्यांना गाणी गा. ताऱ्यांनो, वरून त्यांच्यासाठी शांतिमंत्र म्हणा. साऱ्या विश्वास प्रेमाचे आकर्षण आहे. पृथ्वी सूर्याभोवती फिरते; चंद्र पृथ्वीभोवती फिरतो. घाला. सारे प्रेमाच्या प्रदक्षिणा घाला. अशा प्रदक्षिणा घालून जीवनात थोडाफार प्रकाश आणा. थोडीफार सहृदयता, कोमलता, मधुरता आणा. मंगा, मधुरी, तुम्ही दोघे झोपा. शांतपणे या प्रेमळ आकाशाच्या खाली झोपा. मने शांत करून उठा.

❖❖❖

: झोपडीतील संसार : : ६ :

मंगा व मधुरी झोपडीतून राहू लागली. सुखाचा संसार. प्रेमाचा नवीन संसार. ती त्यांची स्वतःची झोपडी होती, झोपडीभोवती थोडी जागा होती. मधुरीला स्वच्छतेचा नाद. मंगाला फुलाफळांचा नाद. त्या झोपडीभोवती त्यांनी फुलझाडे लाविली. सुंदर फुलझाडे. कोणी तेथे येताच ती फुले सर्वांचे स्वागत करीत. मंगा रोज कामाला जाई. मधुरी घरीच असे. एखादे वेळेस तीही दळणकांडण करायला जाई.

कोणाकडे तिखट, मीठ कुटायला-दळायला जाई. पैपैसा मिळवी.

'मधुरी, तू कशाला जातेस कामाला?' एके दिवशी मंगा म्हणाला.

'तू कामाला जातोस. मी वाटतं घरी बसू?' तिने विचारले.

'तू घरी काम करतेस तेवढे पुरे. स्वयंपाक करतेस, भांडी घासतेस, झाडतेस, सारवतेस, चिरगुटे, पांघरुणे धुतेस, फुलझाडांना पाणी घालतेस. थोडे का घरी काम असते? तू नको करू आणखी कोठे काम.'

'मधून मधून मी जाते. रोज उठून थोडीच जात्ये मी?'

'तुला आता जाववतही नसेल. तू जपून वाग. बाळंतपण नीट होऊ दे. माझा जीव घाबरतो.'

'वेडा आहेस तू. सारे नीट होईल. मंगा, तू दिवसभर थकतोस. किती रे तुला काम? रोज मेली ती ओझी उचलायची.'

'परंतु तुझी आठवण होते व सारे श्रम मी विसरतो. घरी मधुरी वाट पहात असेल, गेल्याबरोबर हसेल, गोड बोलेल, असे मनात येऊन सारे श्रम मी विसरतो. मधुरी, खरेच तू माझे अमृत, तू माझे जीवन.'

'मंगा, ही फुले बघ.'

'ती कशी आहेत ते सांगू?'

'कशी?'

'तुझ्या डोळ्यांसारखी. फुलांतील हे परागांचे पुंज कसे बुबुळासारखे दिसतात, नाही? जणू ही फुले प्रेमाने जगाकडे बघत असतात.'

'परंतु जगाला त्याची जाणीव असते का मंगा? एखाद्याने प्रेमाचे घडे भरून ठेवावे, परंतु ते रिते करायला कोणी नसावे! काय वाटेल बरे त्या माणसाला? ही फुले असेच म्हणतील का?'

'फुलांना कोणी प्रेम देवो न देवो, ती जगाला आनंद देत

असतात. ती जगासमोर आपली जीवने घेऊन उभी असतात. मधुरी, तुझ्या प्रेमाचे घडे मी नाही का पीत?'

'परंतु असे मी कुठे म्हटले? पितोस हो मंगा. तुझ्यासाठी माझे प्रेम मी भरून ठेविले आहे. पी, पोटभर येता जाता पी. ते संपणार नाही.'

'मधुरी!'

'काय?'

'तुला मुलगी होणार का मुलगा?'

'मी काय सांगू? काहीही होवो. ते मंगाला आवडेल.'

'आणि तुला?'

'नवऱ्याला आवडले की बायकोला आवडतेच.'

'खरे आहे हो मधुरी.'

'माझे डोहाळे पुरवशील ना?'

'काय आहे तुझी इच्छा?'

'ओळख तूच.'

'फुले हवी असतील?'

'नाही.'

'केळी हवीत?'

'नाही.'

'दागिना हवा?'

'नाही.'

'काय हवे तुला?'

'तुझे प्रेम.'

'ते दिलेच आहे.'

'ते रोज दे. मला कधीही सोडून जाऊ नकोस. मला कंटाळू नकोस.'

'असे का म्हणतेस?'

'मंगा, मुले-बाळे होऊ लागली की आम्ही बायका पूर्वीप्रमाणे थोड्याच दिसू? आम्ही आमचे लावण्य, आम्ही आमचे सौंदर्य, मुलांना देतो. आम्ही दरिद्री होतो. तुम्ही पुरुष मग कंटाळता. खरे ना?'

'मला काय माहीत? आपणाला अनुभव काय येतील ते पाहू. तुला वाटते का की, मी तुला सोडून जाईन?'

'एखादे वेळेस मनात येते. तुझे ते निराशेचे वचन आठवते. 'चल जाऊ समुद्रात.' हे तुझे म्हणणे आठवते.'

'वेडी आहेस तू मधुरी. निराशा टिकत नसते. मी ते शब्द कधीच विसरून गेलो.'

'बायका नाही विसरत.'

'चल, आपण भाकर खाऊ व फिरायला जाऊ.'

दोघांनी भाकर खाल्ली. जेवताना मधून मधून मंगा मधुरीच्या तोंडात तुकडा देई. मधुरी त्याच्या तोंडात देई. दोघे हसत.

'मधुरी!'

'काय राजा?'

'उद्या आपली मुले मोठी झाली म्हणजे एकमेकांच्या तोंडात असा तुकडा येईल का देता?'

'मग मुलांच्या तोंडात घास आपण देऊ. खरे ना?'

'मधुरी, तुझे बोट चावू?'

'ते का साखरेचे आहे?'

'हो. तुझी बोटे म्हणजे ऊसाची पेरे. खाऊ का?'

'वेडा आहेस हो मंगा. माझी बोटे गोड झाली असतील तर ती का, ते आहे का माहीत?'

'का!'

'तुझा हात हातात धरून. तुझे डोळे झाकून. माझ्या हातात गोडी तू ओतली आहेस.'

दोघे फिरायला निघाली. हळू हळू जात होती. मंदमंद पावले टाकीत जात होती.

'मंगा, आजीबाईकडे येतोस का?'

'चल.'

दोघे समुद्रावर आली. म्हातारी झोपडीच्या दारात रामराम म्हणत बसली होती. मधुरी एकदम गेली. तिने म्हातारीचे डोळे झाकले. मंगा दूर उभा होता. म्हातारी म्हणाली, 'सोड डोळे.'

'आजी, तू कसे ओळखलेस!' तिने विचारले.

'तुझीच आठवण करीत होते. खाऊ ठेवला होता तुम्हाला.'

'कोठे आहे?' मंगाने विचारले.

'मधुरी आणील.' आजी म्हणाली.

मधुरीने घरातून खाऊ आणला. केळी होती. खारका होत्या. मधुरीने मंगाला दोन केळी दिली. स्वतःला तीन घेतली.

'तुला एक जास्तसे?'

'मी बरोबर वाटणी करते.'

'ती कशी!'

'आजी, दोन मला व एक माझ्या बाळाला. नाही का ग?'

'होय हो मधुरी.'

'आजी!'

'काय बाळ!'

'नीट होईल ना माझे बाळंतपण?'

'तू माझ्याकडेच ये बाळंतपणाला. मी तरी कोणाचे करू! मलाही आनंद मिळू दे. मधुरी, माझे घर म्हणजे तुझे माहेर. येशील का? देशील का मला ही धन्यता, कृतार्थता?'

लोक हसतील आजी.

'हसतील विचारे. ज्यांना हृदये आहेत ते आनंदतील. त्यांना बरे वाटेल.'

'मंगाला काय वाटेल माझ्या?'

'काय रे मंगा?' आजीने प्रश्न केला.

'मी विचार करीन.'

'विचार रे कसला करायचा त्यात?'

'आजी, मंगा स्वाभिमानी आहे.'

'माझ्याकडे येऊन थालीपीठे मागणारे ते का स्वाभिमानी? तुमचा स्वाभिमान का माझ्याजवळ पोरांनो?

'आजी, जन्मदात्यांजवळही स्वाभिमान दाखविणारी आम्ही पोरे.'

'जन्मदात्यांजवळ दाखवाल, परंतु जगात नाही दाखविणार. निदान माझ्यांजवळ तुम्ही नाही दाखवता कामा. पहिले बाळंतपण तरी तुझे करू दे. तू पहिलटकरीण. तुझा धीर चेपू दे. पुढे दुसऱ्या वेळेस मी नाही हट्ट धरणार. तुलाही भय वाटणार नाही. पहिल्याने धास्ती वाटते.'

'येईन हो तुझ्याकडे. मंगा येऊ ना?'

'ये.'

दोघे तेथून गेली. हळूहळू चालत होती. वाळवंटात हिंडत होती.

'म्हातारबाईचे किती प्रेम, नाही का! जणू आई!' मधुरी म्हणाली.

'देव कोणाला तरी उभे करितो. नाही तर हा मंगा असा दरिद्री! तुझे कसे झाले असते! मी आता निर्धास्त झालो. मधुरी, रोज मला भीती वाटे, धाकधूक वाटे.'

'बस जरा, दमलीस तू.'

'त्या टेकडीवर जाऊ. आपले प्रेममन्दिर तेथे आहे.'

'तुला वर येववेल?'

'तू ने मला उचलून.'

'तू जड आहेस.'

'मंगा, कितीसे रे माझे वजन वाढले असेल? थट्टा करतोस?'

'बरे. नेतो उचलून खांद्यावर.'

मंगाने मधुराला खांद्यावर घेतले व टेकडीवर नेले. तिला खांद्यावर घेऊन तो नाचला.

'पुरे.' ती म्हणाली.

'मधुरी, आपण लग्नात दुसऱ्याच्या खांद्यावर बसून एकमेकांवर गुलाल थोडाच उधळला? खरे ना? तू म्हणालीस, 'आपले लग्न समुद्राने लावले; त्याने फेस उधळला तेवढा पुरे. नकोत इतर समारंभ. परंतु आज मी तुला नाचविले.'

'आणि तुला कोण नाचवील?'

'तू आहेस ना मला नाचविणारी. माझे हृदय नाचवितेस, रोमरोम नाचवितेस.'

'खरेच का मंगा?'

'हो.'

'मी का जादुगारीण आहे?'

'नाही तर काय! मी श्रीमंत होणार होतो. परंतु श्रीमंताची मुलगी व श्रीमंती मी झिडकारली. आईबाप सोडले. कोणी सोडायला लावले? कोणी केली ही जादू?'

'आणि मी रे? मी नाही का बुधाची संपत्ती सोडली? मी नाही का घरदार, आईबाप सोडले? मंगा तू सुद्धा जादूगार आहेस. तुला कल्पना नसेल परंतु तूही मला नाचवतोस. या टेकडीवर मी कितीदा आले आहे. घरी कोणी मला टोचून बोलावे व येथे येऊन मी बसावे, रडावे. येथील अणूरेणू मला शांतवी. येथे मंगाची मूर्ती मला दिसे. मंगा, तुझे पाय जेथे पडले तेथील मातीही मधुरीला नाचविते,

वाकविते. पुरुष अधिक जादूगार असतात हो.'

असे म्हणून मधुरीने मंगाच्या डोळ्यांकडे मधुरपणे पाहिले. दोघे हसली.

'पड जरा मधुरी.' तो म्हणाला.

'तुझी मांडी म्हणजे माझी उशी.'

'दुसऱ्या चांगल्या उशा मला कोठे देता येताहेत! ना नीट गादी ना नीट उशी. मंगा गरीब आहे.'

'परंतु कशाला दुसऱ्या उशा! ही उशी छान आहे. सजीव उशी. थरथरणारी उशी. मंगा तू नेहमी आपली गरिबी मनाला का लावून घेतोस? अशाने तू वाळून जाशील. चिंतेने, काळजीने काळवंडशील. मला आनंद आहे हो गरिबीत. तुझे हसणे बोलणे मला मिळाले. तू माझा हात प्रेमाने हाती घेतलास, की मी राजाची राणी असते. खरेच हो मंगा.'

'आता जरा पडून राहा. बोलू नकोस. तू थकतेस.'

'मंगा, तुला गाणे नाही येत? म्हण रे एखादे. खलाशाचे गाणे म्हण. येत असेल तुला.'

'नाही हो मला गाणे येत. मंगा रसिक नाही.'

'म्हण काही वेडेवाकडे. मनात जमवून म्हण माझ्या मंगाचे गाणे.'

आणि मंगा खरेच गुणगुणू लागला. गाणे म्हणू लागला, 'नको हे जग चल, समुद्रात जाऊ.' अशा अर्थाचे ते गाणे होते. थोड्या वेळाने तो थांबला.

'तू रचलेस हे गाणे?' मधुरीने विचारले.

'मला नाही नीट रचता येत. कसे तरी शब्द जुळविले.'

'परंतु कशा तरी जुळविलेल्या शब्दांतूनही हृदय डोकावते. समुद्रात बुडून जाण्याची तुझी इच्छा त्यातही आहेच. मंगा, काढून टाक ते मनातील खूळ. नाही ना असे मनात आणणार पुन्हा?'

'नाही.'

'माझ्या बाळाची शपथ घे.'

दोघे घरी गेली. असे दिवस जात होते. मधुरीचे दिवस भरत येत होते. म्हातारीनं तयारी केली होती. वारा लागू नये अशी व्यवस्था तिने केली होती. खाट तिने करवून घेतली. दोन नवी कांबळी विकत घेतली. खाण्यापिण्याचे काही करून ठेवले आणि एके दिवशी मधुरीचे पोट दुखू लागले. मंगाने गाडीत घालून तिला म्हातारबाईकडे नेले. म्हातारीने स्वागत केले. प्रसववेदना सुरू झाल्या. मंगा फेऱ्या घालीत होता. क्षणात आत जाई. कावराबावरा होऊन पुन्हा मागे जाई. त्याला वाईट वाटत होते. नवीन बाळाचा जन्म झाला. नवीन बाळाचे कोवळे केविलवाणे रडणे. अगतिक निराधार जीव. कसे होईल या जगात माझे, असे का मनात येऊन मूल रडत जन्माला येते?

'मुलगा झाला. मंगा, सारे ठीक आहे.'

'मी येऊ पाहायला?'

'थांब जरा.'

थोड्या वेळाने मंगा आत आला. त्याने बाळ पाहिले. तो पुन्हा बाहेर गेला. बाळबाळंतिणीचे सारे ठीक झाले. तो दिवस गेला. दुसऱ्या दिवशी मंगा माधुरीजवळ बसला होता. मधुरी थकलेली होती. लहान बाळ झोपले होते. झोपूनच ते वाढते. मधुरीच्या केसांवर मंगा हात फिरवीत होता.

'थकलीस हो तू.'

'आता दोन दिवसांत थकवा जाईल.'

'लौकर चांगली हो.'

'होय हो राजा.'

आजीबाई सारे करी. मुलाला न्हाऊ घाली. मधुरीच्या अंगाला लावी.

आजीबाईला किती आनंद झाला होता. जणू सर्व जन्मात असा आनंद तिला झाला नसेल, बारसे झाले, नाव ठेवले गेले, कोणते नाव! ‘सोन्या.’

पुढे काही दिवसांनी बाळबाळंतीण घरी आली. झोपडीत एक पाळणा टांगला गेला. बाहेरच्या अंगणात मंगाने झोपाळा टांगला. सायंकाळी कामावरून आल्यावर तो लहान बाळाला घेऊन झोपाळ्यावर बसे. बाळाजवळ हसे. मंगाला एकदम पोक्त झालो असे वाटू लागले. मूल होईपर्यंत अल्लडपणा असतो. मूल होताच माणसांचा अल्लडपणा जातो. जणू नवीन आईबाप आपला अल्लडपणा मुलाला देतात.

मुलाला नटवावे असे मंगाला वाटे. त्याने मुलाला बाळलेणे केले. प्रथम मधुरी बोलत नसे. परंतु एके दिवशी ती म्हणाली,

‘कर्ज काढून हे बाळलेणे केलेस. खरे का मंगा?’

‘हो.’

‘नको हो कर्ज. नकोत दागिने.’

‘दर वेळेस थोडेच कोणी करणार आहे! लहानपणी मुलाला दागिने शोभतात. या बाळाचे दागिने पुढच्या मुलांना होतील. खरे ना!’

‘किती होतील मला मुले?’

‘मला काय माहीत मधुरी? तू कंटाळलीस का?’

‘मंगा, फुले फुलवायला मला का आवडत नाही? मी नाही हो कंटाळले. मुलांना खेळवून माझी मांडी दमणार नाही. तो बघ उठला राजा. आण त्याला मंगा काढून. मी येथेच बसते.’

‘बरे राणीसाहेब.’

मंगाने बाळाला आणले. मायेने मांडीवर घेतले.

‘खरेच मी राणी आहे. काय आहे मला कमी? सारे सारे आहे हो मंगा. मी राणी आहे. परंतु तू माझा राजा आहेस. खरे ना?’

'होय. मीही राजा आहे. मधुरीचा राजा.'

मधुरी आता फारशी कामाला जात नसे. मंगा तिला म्हणे, लहान मुलाला घेऊन कामाला नको जाऊस. कधी कधी बाळाला घेऊन मधुरी म्हातारीकडे जाई. घटकाभर बसे व येई.

दिवस जात होते. सोन्याचा वाढदिवस आला. कसा करायचा वाढदिवस साजरा? मंगा विचार करीत होता. त्याने मधुरीला नवे पातळ आणले. बाळाला नवीन कापड आणले. एक पिसांची सुंदर टोपी त्याने आणली. घरात खीर करण्यात आली. वाढदिवस झाला. सोन्या भराभर वाढू लागला. चालू लागला, बोलू लागला. मंगा त्याला 'आई' म्हणायला शिकवी. मधुरी त्याला 'बाबा' म्हणायला शिकवी. मोठी गंमत होई. मंगा आता रात्रीही कामाला जाई. ज्या ज्या वेळेस रात्री काम असे तेव्हा तो जाई.

'मंगा, रात्री नको जात जाऊ. मला रात्री एकटीला भय वाटते.'

—'आपल्याकडे चोर येणार नाहीत, आणि मी परत तर येतो.'

'मध्यरात्रीनंतर येतोस. माझे डोळे तुझ्या वाटेकडे असतात. तू घरात नसलास म्हणजे बाळ रडतो. तू घरी असतोस तेव्हा कसा लबाड झोपी जातो. मुळी उठत नाही. परंतु तू कामाला जातोस त्या दिवशी जरा निजत नाही.'

'तू एकटी विचार करीत बसू नये म्हणून बाळ जागा राहून तुला सोबत करतो. त्याला आईचे दुःख कळते.'

'पण नको जात जाऊ कामाला. दिवसा काम करतोस तेवढे पुरे. पैसे का कधी पुरेसे झाले आहेत?'

'मधुरी, बुधाचे दोनशे रुपये मी परत करणार आहे.'

'हे काय डोक्यात घेतलेस? त्याने कधी तरी मागितले का? ते पैसे आपण परत केले तर बुधा दुःखाने मरेल. मंगा, नको असे करू.'

'लोक मला नावे ठेवतात.'

'लोकांना काय माहीत?'

'लोकांत कुणकुण आहे खरी.'

'म्हणू दे लोकांना वाटेल ते. परंतु पैसे परत नाही करायचे. ते माझे पैसे होते. बुधाचे नव्हते.'

'बुधाने का सारी धनदौलत तुला दिली आहे?'

'हो.'

'तू ती घेतलीस?'

'हो.'

'मधुरी, बुधावर तुझा जीव आहे. कबूल कर.'

'मी त्याची आठवण कशी विसरू?'

'त्याच्याकडे जातेस राहायला? त्याची राणी हो. जातेस?'

मंगा काय बोलतोस तू? का वर्मी घाव घालतोस? नाही हो आजपासून बुधाचे नाव काढणार. देऊन टाक हो त्याचे पैसे. तुझी इच्छा ती माझी इच्छा. माझे प्रेम तुझ्या इच्छेसाठी आहे.'

मधुरी रडू लागली. सोन्याला घेऊन बसली. संसार म्हणजे गुंतागुंती. कटकटी. यातायाती. परंतु वडाचे प्रचंड झाड दगडधोंड्यांतूनच वाढते व शीतल छाया देते. संसाराचा वृक्षही कटकटीतूनच वाढतो. शेवटी सुखवितो, शांतवितो.

मंगाने काही दिवसांनी रात्री कामाला जाण्याचे बंद केले. मधुरीला बरे वाटले. किती दिवसांत ती इतकी गोड हसली नव्हती.

'आज किती आनंदी आहेस तू?' मंगा म्हणाला.

'आज तू हट्ट सोडलास म्हणून.'

'मी हट्ट नसता केला तर इतके गोड हसणे अनुभवायला मिळाले नसते.'

'शेवटी असे हसणे अनेक दिवसांच्या अश्रूंतूनच जन्मत असते.'

'मधुरी, मी एक गोष्ट ठरविली आहे.'

'कोणती?'

'तुला इवलेही दुःख द्यायचे नाही. तुझ्या इच्छेविरुद्ध कधी जायचे नाही. सांगशील ते ऐकावयाचे.'

'माझा का गुलाम होणार आहेस?'

'हो.'

'मला नाही ते आवडणार. मंगा, तू आहेस असाच राहा, त्यातच मला आनंद आहे. कधी कधी तू मला रडवतोस; परंतु ते रडणेही मला गोड वाटते. तू त्याची मला सवय लावली आहेस. माझा अश्रूंचा रतीब बंद नको करू.'

सोन्या दोन-अडीच वर्षांचा झाला. पुन्हा मधुरीला दिवस गेले. परंतु या वेळेस ती आजीबाईकडे गेली नाही. घरीच सारे झाले. संसार वाढू लागला. मुले होतात त्यांचा आनंद होतो; परंतु पोसायला तोंडे वाढतात. प्राप्ती थोडीच वाढत असते? मंगाची मजुरी? ती हमाली थोडीच वाढत होती? मधुरी घरी लोकांचे दळण आणी. मुलांना खेळवीत दळण दळी. संसारात रुकाभर भर घाली.

आणि एकदा सोन्या पडला आजारी. त्याला अतिसार झाला. त्यातच अमांशही. पाच पाच मिनिटांनी त्याला परसाकडे व्हायचे. मधुरीने सूप करून ठेवले होते. सुपात राख टाकायची. बाळाला बसवावयाचे त्यात. मधुरी रडकुंडीस आली. सोन्याचा नूर गेला. तो नुसता अस्थिपंजर राहिला. मुलाचे हाल आईला पाहवत ना!

'मधुरी, तू नीज. मी बसून राहतो.'

'तू त्याला मारशील परवासारखे.'

'मी का दुष्ट आहे? तुलाच जशी पोरांची काळजी. माझीही ती पोरे आहेत.'

नगर वाचनालय, सातारा
३६, भवानी पेठ, सातारा
दाखल नं - ६२७४ ग्रंथानुक्रमांक - [illegible]
किंमत - ८०/- पाने - २२४ १३१४

'पण माझ्या पोटचे ते गोळे आहेत.'

'बरे हो. मी निजतो. तू जप तुझ्या पिलांना.'

'मंगा रागावू नको. मी निजू? परंतु सोन्याला त्राण नाही हो.

त्याला नाही नीट बसता येत. चिरचिऱ्या झाला आहे. त्याच्यावर रागावू नको हो. तू नेहमी रागावतोस असे नाही. आपणही माणसे कंटाळतो जरा. तू त्या दिवशी येथे नव्हतास. मीसुद्धा मारली एक चापट त्याला. आणि मग त्याला घट्ट पोटाशी धरिले. मंगा, तू तशीच मी हो. मी निजू?'

'हं, नीज.'

मधुरी झोपली. मंगा बसला होता. सोन्याला आता बोलवतही नव्हते. त्याने नुसती खूण केली. बापाने सूप खाली दिले. मंगाने ओल्या फडक्याने त्याचे ढुंगण पुसले. जरा जोराने पुसते.

'जोराने नको हो बाबा. दुखते हो.'

'बरे हो बाळ. नाही जोराने पुसणार. उगी उगी.'

खरेच, संसार म्हणजे शाळा आहे. तपश्चर्येचा आश्रम. संयमाचा आश्रम. मंगा, मधुरी यांचे विकारांचे वेग तेथे कमी होत होते. संसारात किती सहनशीलता अंगी येते! दुसऱ्यासाठी आपण किती धडपडतो! कसे स्वतःला आवरतो! जगात नीट वागण्यासाठी प्रथम घरच्या शाळेतच आपण तयार होतो. आपण घरी माणसाळतो व मग या जगात जरा माणुसकीने वागतो. घर म्हणजे माकडांना माणसे बनविणारी शाळा.

सोन्या बरा झाला. त्या दुखण्यातून तो वाचला. पहिला सोन्या. दुसऱ्या मुलाचे नाव रुपल्या आणि तिसरी आता मुलगी झाली; तिचे नाव मनी. एके दिवशी मंगा म्हातारीकडे गेला होता.

'मंगा, घरी तुम्हांला अडचण पडत असेल, नाही?'

'आजी, चाललेच आहे. मरेपर्यंत गरिबांना विसावा नाही.'

'मंगा, मी तुला एक विचारू?'

'विचार आजी.'

'किती दिवस मनात येतो आहे विचार. सांगेन सांगेन म्हणते, परंतु धीर तर होत नाही. तू रागावणार नाहीस ना?'

'आजी, तुझे आमच्यावर प्रेम. तुझे आमच्यावर किती उपकार! सांग.'

'तुझा सोन्या मला दे. त्याला मी माझा मानीन.'

'आजी, आईबापांना का मुलांचे ओझे असते?'

'नसते हो.'

'आजी, मधुरी काय म्हणेल? आम्ही उपाशी राहू; परंतु बाळाला वाढवू.'

'मंगा, एक मूल द्यायला का रे अडचण? किती दिवस मी मनात म्हणत होते की, सोन्याचं बाळंतपण मी केलं, एक दिवस मी सोन्या मागेन'.

'यासाठी का बाळंतपण केलंस?'

'नाही रे. परंतु आता तीन मुले आहेत तुम्हांला. म्हटले मागावे एक. कोणते मागावे? सोन्याच मागावा. मी त्याला कमी पडू देणार नाही. माझ्याजवळ आहे नाही ते त्याला देईन.'

'आजी, किती ग पैसे तू जमविले आहेस?'

'आहेत सोन्याच्या संसारास पुरेसे.'

'आमच्या घरी येतेस तू राहायला? तू आमची आई हो. मुलांची आजी हो. मुलांचे कोडकौतुक कर.'

'मी माझी झोपडी सोडणार नाही. येथे मी स्वतंत्र आहे. उद्या तुमच्या घरी आल्ये समज आणि झाले भांडणबिंडण तर काय करा? भांड्याशी भांडे आले म्हणजे वाजतेच. एखादे वेळेस मुलांना रागे भरले तर म्हणाल, आमची आहेत मुले. परंतु माझ्या घरी मूल असेल तर माझे म्हणून होईल. माझाच लळा लागेल. खरे ना?'

'खरे आहे. परंतु मी नाही मूल देणार.'

'बरे राहिले.'

मंगा घरी आला. त्याने मधुरीला सारी हकीकत सांगितली. मधुरीला राग आला. परंतु किती झाले तरी स्त्रीहृदयाच्या भुका ती

जाणत होती. तिला त्या म्हातारीची कीव आली. परंतु सोन्याला ती थोडीच देणार होती? ती दोघे म्हातारीच्या घरी परत गेली नाहीत. त्यांना संकोच वाटे. जिने आपणावर खूप लोभ केला तिची इच्छा पुरी करता येत नाही म्हणून त्यांना वाईट वाटे आणि तिकडे म्हातारीसही वाईट वाटले. मंगा व मधुरी कित्येक महिन्यांत आली नाहीत म्हणून तिला कसे तरी होई. शेवटी एके दिवशी ती म्हातारी स्वतःच मधुरीकडे आली. मधुरी मनीला झोपवीत होती. सोन्या व रुपल्या अंगणात खेळत होते.

'काय ग मधुरी, काय करते आहेस?' आजीने घरात शिरून विचारले.

'कोण, आजी? ये. मी या मनीला निजवीत आहे.' मधुरी उठून म्हणाली.

'निजव, निजव.' ती म्हणाली.

मनी झोपली. मधुरी व म्हातारी दोघी तेथे बसल्या होत्या.

'काय ग आजी, आज इकडे कोठे आलीस?'

'मधुऱ्ये, माझी झोपडी सोडून मी कधी कोठे गेल्ये नव्हते. आज किती वर्षांनी मी गावात आल्ये आहे.'

'आजी आम्ही तुझ्याकडे आलो नाही म्हणून रागावलीस होय?'

'मी माझ्यावर रागावल्ये आहे. दुसऱ्यांच्या मुलांची भीक मागणारी ती राक्षशीणच असली पाहिजे. मधुरी, मला क्षमा कर.'

'हे काय आजी? तू सोन्या मागितलास त्यात वाईट काय झाले? मी तुझी मनःस्थिती ओळखते. तुझी भूक जाणते. तरीही सोन्या द्यावा असे मला वाटेना. आजी, आम्हीही लोभीच.'

'मधुरी, परंतु तुम्ही माझ्याकडे येण्याचेही बंद केलेत.'

'तुझी इच्छा पुरी करण्याचे धैर्य नाही. म्हणून तू दुष्ट आहेस असे नाही हो आमच्या कधी मनात आलं. आजी, तू आमची आई झालीस. तुझ्या आशीर्वादानेच आम्ही जगत आहो. कोण आहे

आम्हांला? घरची, दारची सारी पारखी झालेली. खरे ना? तुझे प्रेम, तुझे उपकार आम्ही कधीही विसरणार नाही.'

इतक्यात सोन्या व रुपल्या आत आले.

'आई, खाऊ देतेस?' सोन्याने विचारले.

'उद्या आणू सोन्या.' आई म्हणाली.

'रोज रोज म्हणतेस उद्या आणू.' तो म्हणाला.

'ही आजी आली आहे. तिच्याजवळ माग खाऊ.'

'ही का आजी?'

'हो.'

'ये बाळ. ये माझ्याजवळ म्हणजे खाऊ देईन.' म्हातारी म्हणाली.

'आधी द्या खाऊ. मग येईन.'

'नाही. तुम्ही मग देणार नाही.'

'मोठी माणसे का खोटं बोलतील? फसवतील?'

'हो.'

'असे म्हणू नये.'

'बाबा म्हणतात खाऊ देईन व पाठीत मारतात हळूच बुक्की आणि म्हणतात, हा गोड धम्मक लाडू.'

'बरे, हा घे खाऊ.' असे म्हणून आजीने खाऊची पुडी सोडली. तिने खडीसाखर व खारका आणल्या होत्या.

'इतकाच? आणखी दोन खडे.' सोन्या म्हणाला.

'मला द्या.' रुपल्या म्हणाला.

'सोन्या, एकदम का सारा खायचा आहे? मी ठेवून देत्ये हो. उद्या नको का?'

'आजी, तू रोज येशील?' सोन्याने विचारले.

'तू ये ना माझ्या घरी.' आजी म्हणाली.

'कुठे आहे तुझे घर?'

'समुद्रावर.'

'आई रागावेल. परवा मी लांब गेलो खेळत तर आईने मारले; 'जाशील का पुन्हा लांब, तंगडं मोडून टाकीन म्हणाली.'

'माझ्याकडे राहायला येतोस?'

'मला नेता?'

'हो.'

'मी थोडा वेळ राहीन. मग परत येईन.'

'नेहमीच माझ्याजवळ राहा.'

'नाही रे बुवा. आई हवी जवळ.'

'आई मारते ना?'

'तरीसुद्धा ती हवी.'

'सोन्या, जा बाहेर खेळा. रुपल्याला रडवू नको. फुले फार तोडू नको. जा.' मुले बाहेर गेली. म्हातारी आता जायला निघाली.

'येत जा मधुरी माझ्याकडे. मुलांना घेऊन येत जा. तू माझी मुलगीच जणू झाली आहेस.' ती म्हणाली.

'आजी, आमच्याकडे राहायला येतेस? ये ना.'

'नको. मी आहे तेथेच बरी. हातपाय चालत आहेत तोपर्यंत चिंता नाही. जाते हो मी.' असे म्हणून ती गेली. दारापर्यंत मधुरी पोचवायला गेली.

असे दिवस जात होते. मुले वाढत होती. मंगा खपत होता. मधुरी कामाला जात असे. संसार चालविणे सोपे नाही. सर्वांचे श्रम तेथे लागत असतात. मधुरीला व मंगाला दोन्ही टोके मिळविणे, प्राप्ती व खर्च यांची तोंडमिळवणी करणे जड जाई. तरीही दोघे आनंदाने राहात होती.

: अस्वस्थ मंगा : : ७ :

घरी आता फार ओढाताण असे. मंगाला ती पाहवत नसे. मधुरीला नेसू फाटके लुगडे होते. मुलांच्या अंगावर नीट कपडे नव्हते. दिवाळी जवळ येत होती; नवीन कपडे करायला पाहिजे होते. परंतु जवळ दिडकी नव्हती. मंगा खिन्न दिसे.

'तू अलीकडे असा का दिसतोस?' मधुरीने विचारले.

'असा म्हणजे कसा?' त्याने विचारिले.

'सांग ना रे मंगा, काय होते तुला?'

'मला काहीही होत नाही.'

'मग चेहरा का असा? मुद्रा का दीनवाणी?'

'आपण गरीब आहोत म्हणून.'

'गरिबीची खंत मी कधी तरी मानली का? मला नाही हो कसला सोस. नकोत उंची वस्त्रे, नकोत दागदागिने. आपण गरीब आहोत हेच बरे. त्यामुळे तू माझ्याजवळ आहेस.'

'गरिबीमुळे तर आपण दूर जातो. दिवसभर तुझ्यापासून दूर राहावे लागते. मुलाबाळांपासून दूर. त्यांच्याजवळ बसता येत नाही. त्यांना खेळवता येत नाही, फिरायला नेता येत नाही. येऊन जाऊन रात्री दोन शब्द तुझ्याजवळ बोलायचे. आता दिवाळी येणार. आपल्या मुलांना ना नीट खायला ना काही अंगाखांद्यावर! मला वाईट वाटते. दिवसभर मी काम करतो, परंतु काय उपयोग?'

'उगीच असे मनाला लावून घेऊ नकोस. मुले माझी गुणाची आहेत. इवलासासुद्धा हट्ट घेत नाहीत. मंगा, आपण आनंदी राहू. समाधानाने राहू.'

'तुझ्यासाठी मी मधुरी वरवर हसतो. परंतु मनात वाईट वाटल्याशिवाय राहात नाही. तू बुधाजवळ लग्न लावतीस तर किती सुखात असतीस. कशाला तोटा पडला नसता. पलंगावर पडली

असतीस. मच्छरदाणी लाविली असतीस. गाद्यागिर्द्यांवर लोळतीस. सोन्यामोत्यांनी नटतीस. गडीमाणसे घरी असती. गाडीघोडा असता. चांगले खायला, चांगले प्यायला. भांडी घासावी लागली नसती, हात असे राकट नसते झाले. दुसऱ्याचे दळणकांडण करून तुझ्या हातांना असे घट्टे पडले नसते. केसांना तेले लावली असतीस, अंगाला उटणे लाविली असतीस. शृंगारसाज केला असतास. मुलाबाळांचे लाड करतीस. त्यांना नटवतीस. त्यांच्या पाळण्यावर खेळणी लावली असतीस. कधी कंटाळतीस तर हवा खायला दुसऱ्या गावी जातीस. परंतु मंगाजवळ लग्न लावलेस. तीच झोपडी. तीच भाकर. तीच रोज उठूनची ददात. तीच चिंधी नेसायला, तीच भाजी खायला. कंटाळली असशील तू. मुलांना घरी ठेवून तुला कामाला जावे लागते. मधुरी, तुला सर्व गोष्टींचे वाईट वाटते. आज आपले लग्न होऊन पाचसहा वर्षे झाली. परंतु इतके वाईट पूर्वी वाटत नसे. अलीकडे मला भडभडून येते. तुझे कष्ट मला पाहवत नाहीत. आपल्या प्रिय माणसास कष्ट पडू नयेत असे आपणास वाटत असते. मला तर तुझे कष्ट नष्ट करता येत नाहीत. तू पोराबाळांचे करशील, की घरात काम करशील, की दुसऱ्याकडची कामे करशील. की माझी सेवा करशील? दमून जातेस तू. पूर्वीचा तजेला तुझ्या चेहऱ्यावर नाही. तू सुकून गेल्यासारखी दिसतेस. मधुरी, मी जाऊ का कोठे? जाऊ कोठे तरी लांब प्रवासाला? वाटते की देशांतर करावे, व्यापार करावा. धनदौलत मिळवावी आणि मधुरीला सुखाच्या स्वर्गांत ठेवावे.'

'मंगा, कशी तुझी समजूत घालू? माझ्या मनात सुखाच्या कल्पना नाही हो कधी येत. पलंग, गाद्या, गिर्द्या स्वप्नातही मी मनात आणीत नाही. तुझे गोड बोलणे, गोड हसणे यात माझी सारी सुखे आहेत. तू कामावरून येतोस व डोळे भरून मला पाहतोस. त्यानेच मला सारे काही मिळते. मी दिवसभर तुझी वाट पहात असते. केव्हा दृष्टीस पडशील असे मला वाटते. माझा मंगा, बंदरावर काम करीत असेल, बोजे वहात असेल, त्याची पाठ वाकत असेल, घाम गळत असेल. मी जवळ असते तर तुझा घाम पुसला असता. मंगा कधी

कधी आपणही बंदरावर कामाला जावे असे माझ्या मनात येते. आपण बरोबर काम केले असते. मुले आजीबाईकडे खेळली असती. परंतु बायका बंदरावर कामे करीत नाहीत. तुझी मूर्ती सारखी माझ्या डोळ्यांसमोर असते. नको हो जाऊ तू कोठे. भाजीभाकरी तीच असते. परंतु तू रोज नवा आहेस. तुझा जोपर्यंत मला कंटाळा आला नाही तोपर्यंत भाजीभाकरीचाही येणार नाही. तुझी गोडी जोपर्यंत माझ्याजवळ आहे तोपर्यंत बेचव असे काही नाही, नीरस असे काही नाही. ज्या दिवशी तू मला फिका वाटशील, त्या दिवशी मला जिणेच फिके वाटेल. मग ही मधुरी जगू शकणार नाही. आम्ही बायका प्रेमावर जगतो. आम्ही अल्पसंतोषी असतो. एक गोड शब्द मिळाला, एक गोड हास्य मिळाले, एक गोड हळूच चापट मिळाली तर आम्ही मोक्षसुख मानतो. हसतोस काय मंगा? हे काय, अशी जोराने नको थप्पड मारूस. मनी उठली वाटते. झोपाळ्यावर बाहेरच निजली आहे. पडायची एखादे वेळेस. मी घेऊन येते.'

असे म्हणून मधुरी उठून गेली. सोन्या, रुपल्या झोपले होते. मधुरी मनीला घेऊन आत आली. तिला प्यायला घेऊन ती बसली.

'मधुरी. मी बाहेर जाऊन येतो.'

'लौकर ये मंगा. उगीच एकटा समुद्रकाठी नको जाऊस. माझी शपथ आहे. माझ्या बाळाची शपथ आहे.'

'लौकर परत येईन.'

मंगा बाहेर पडला. परंतु तो कोठे जाणार होता? त्याचे निश्चित ठरलेले असे काहीच नव्हते. तो चालला. कोठे तरी. परंतु शेवटी समुद्राकडेच निघाला. मधुरीने जाऊ नको असे सांगितले होते, तरी पाय तिकडेच वळले. तो त्या टेकडीवर आला. अनेक आठवणी त्याच्या डोळ्यांसमोर होत्या. ते रम्य बालपण त्याला आठवले. बालपणी ते वाळूमध्ये खेळणे मौजेचे वाटे. वाळूचे किल्ले, वाळूचे बंगले. त्यात त्या वेळेस मन रमे. परंतु आज मन नीरस झाले होते. पुन्हा एकदा लहान व्हावे असे त्याला वाटले. तो घसरगुंडी करीत

खाली आला. पुन्हा टेकडीवर चढला.

इतक्यात कोण दिसले त्याला? कोणी तरी त्याला दिसले. कसली तरी आकृती दिसली. ती त्याच्याकडे बोटे करीत होती. डोळे वटारून पहात होती. कोणाची ती आकृती? पांढरी सफेद आकृती. भूत की काय? मनुष्य की पिशाच्च? मंगा पहात होता. इतक्यात पाठीमागून कोणी तरी आले. मंगाने मागे पाहिले. तोही का भूत? पुढे भूत नव्हते, तो बुधा होता.

'मंगा!'

'बुधा!'

'किती दिवसांनी आपण भेटत आहोत.'

'पुन्हा त्याच लहानपणाच्या टेकडीवर.'

'परंतु मधुरी मात्र बरोबर नाही. मधुरी बरी आहे ना?'

'हो.'

'मुलेबाळे बरी आहेत ना?'

'हो.'

'आता दिवाळी जवळ आली. मुलांना नवीन कपडे केलेस? मधुरीला नवीन पातळ घेतलेस का?'

'बुधा, मी गरीब आहे.'

'मधुरीला तू मारून टाकशील मंगा. इकडे मी मरत आहे, तिकडे मधुरी मरत आहे.'

'बुधा. मधुरीचे मजवर प्रेम आहे. ती दुःखी नाही.'

'बायका दुःख दाखवीत नसतात. समुद्रावर फेस उसळतो, आत गंभीर असतो. बायका वर हसतात, आत दुःख भरलेले असते. शेजारी सर्वत्र दिवाळीची तयारी होत असेल. मधुरी शिळे तुकडे मोडीत असेल. मुलांना डोळ्यांतील अश्रूंच्या हारांनी नटवीत असेल.'

बुधा, मी जातो.'

'कोठे जातोस? हे बघ काय आहे समोर.'

'कोठे?'

'ते समोर.'

'अरे बाप रे.'

'कोण रे ते?'

'माझ्या बाबांचे ते भूत. तू नाही ओळखलेस? एखादे दिवशी माझ्या खिडकीसमोर ते मला दिसते व चल अशी खूण करते. मी बाहेर पडतो. या टेकडीवर ते भूत मला घेऊन येते. माझ्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरविते. समुद्राकडे बोट करते व हसते. समुद्राप्रमाणे गंभीर राहा, हास, खेळ असे का बाबा सुचवितात?'

'मला माहीत नाही.'

'मंगा, घाबरू नकोस. बाबा दुष्ट नाहीत. मी जातो. मला जाऊ दे.'

'मीही येतो तुझ्याबरोबर.'

'नको बुधा, मला एकट्यालाच जाऊ दे.'

'जा तर.'

मंगा निघाला. तो सारखे मागे पाही. कोणी येत नाही असे पाहिल्यावर त्याच्या जिवात जीव येई. तो घाबरला होता. कसा तरी आला घरी. येऊन एकदम दारात पडला. मधुरी जागी होती. ती बाहेर आली. तेथे मंगा घामाघूम होऊन पडला होता. ती घाबरली. परंतु ती धीराची होती. तिने मंगाच्या डोक्यावर पाणी ओतले. डोके पुसून तिने मांडीवर घेतले. पदराने ती वारा घालू लागली. थोड्या वेळाने मंगा शुद्धीवर आला.

'आत येतोस ना राजा?'

'ने. हात धरून उठव मला.'

मधुरीने त्याला हात धरून आत नेले. अंथरुणावर तिने त्याला निजवले. त्याचा सर्व घाम तिने पुसला. त्याला बरे वाटले. तरी

अद्याप तो बोलत नव्हता.

'मंगा, काय रे झाले?'

'मी घाबरलो.'

'कशामुळे?'

'मला भूत दिसले आज.'

'भूत?'

'हो.'

'कोठे दिसले?'

'टेकडीवर.'

'मंगा, तुला सांगितले होते की टेकडीवर जाऊ नकोस म्हणून. तू का गेलास?'

'तुला माहीत होते टेकडीवर भूत दिसते असे?'

'हो.'

'कोणी सांगितले?'

'बुधाने.'

'बुधाने?'

'हो.'

'तू त्याच्याकडे गेली होतीस की तो तुझ्याकडे आला होता?'

'मीच त्याच्याकडे गेल्ये होते.'

'मला न सांगता?'

'मंगा, मला का इतकेही स्वातंत्र्य नाही! माझ्यावर का तुझा विश्वास नाही! जर माझ्यावर विश्वास नसेल, तर काय करावयाचे ते प्रेम! प्रेम संपूर्ण विश्वास टाकते.'

'का गेली होतीस? भीक मागायला?'

'नाही.'

'मग कशाला?'

'बुधा आजारी आहे असे कळले म्हणून त्याला पाहून आल्ये.'

'काय बोललीस त्याच्याजवळ?'

'त्याला दोन समाधानाच्या गोष्टी सांगितल्या.'

'तो काय म्हणाला?'

'म्हणाला, माझ्याजवळून अधून मधून मदत नेणार असशील तर मी समाधानाने जगेन, तू तिकडे कष्ट काढीत असता मी का माडीत सुखाने नांदू?'

'तू काय म्हणालीस?'

'मी म्हटले, मदतीची जरूर नाही. त्याला धीर देऊन मी आल्ये. मी परत यायला निघाले तेव्हा तो म्हणाला, 'मधुरी, थांब; तुला एक गोष्ट सांगतो.' मी थांबले आणि त्याने ती गोष्ट सांगितली. मंगा तुला सांगितली नाही. रागावू नकोस.'

'मधुरी!'

'काय मंगा?'

'मी तुला खरोखरी आवडतो का? अद्यापही आवडतो का?'

'आता कशाने खात्री पटवू मंगा? फाडू का हे हृदय? तुझ्या नखांनी फाड व बघ आत डोकावून. वेडा! तू माझाच आहेस हो. कसाही अस. गरीब अस, रागीट अस, राकट अस, उतावळा अस. मला आवडतोस. तू पडून राहा. आता शांतपणे झोप.'

'थोपट मला.'

'मंगा, तू लहान का?'

'आज टेकडीवर मी पुन्हा लहान झालो होतो. घसरगुंडी खेळलो. पुन्हा लहानपणातल्याप्रमाणे वाळूत किल्ले बांधावे असे मला वाटत होते. आज तेथे बुधाही भेटला.'

'काय म्हणाला?

तुझी त्याने चौकशी केली.'

'तू त्याला काही वेडेवाकडे बोलला नाहीस ना?'

'तोच मला बोलला.'

'काय बोलला?'

'म्हणाला, तू मधुरीला मारीत आहेस.'

'अरेरे! वेडा आहे. मंगा, तो निराश झालेला आहे. आजारी मनुष्य ज्याप्रमाणे चिरचिऱ्या होतो , त्याप्रमाणे निराश मनुष्यही एखादे वेळेस वाटेल ते बोलतो. तू ते मनाला लावून नको घेऊस. सारे काढून टाक हो. बुधाचे मन चांगले आहे. तुझ्याविषयी त्याला आपलेपणा वाटतो. तो बोलून नसेल दाखवीत.'

मंगा ऐकत होता. मधुरी त्याला थोपटीत होती. तो झोपी गेला. मधुरी जरा अस्वस्थ झाली होती. तो एकटी बाहेर अंगणात आली. कोणी दिसते का पाहू लागली. ती का भूत पहात होती? ती तेथे झोपाळ्यावर बसली. आकाशात चंद्र आता फुलला होता. अंगणातील कळ्याही फुलू लागल्या होत्या. समुद्राची धीरगंभीर गर्जना ऐकू येत होती. गार गार वारा येत होता. मधुरी विचारांच्या तंद्रीत होती. बुधा व मंगा यांच्याभोवती तिचे मन रुंजी घालीत होते. ते एकमेकांचे वाईट नाही ना करणार? ते भूत खरे की खोटे? काही संकट तर नाही येणार? ते भूत सूड तर नाही ना घेणार? एक ना दोन, कितीतरी कल्पना तिच्या मनात येत होत्या.

शेवटी ती उठली. घरात येऊन निजली. मनीला कुशीत घेऊन ती निजली. तिचा तिने मुका घेतला. कशी सोन्यासारखी माझी मुले आहेत. परंतु या मुलांचे पुढे कसे होईल असे विचार का तिच्या मनात येत होते? गरिबांच्या मनात असे फारसे येत नाही. करतील मजुरी व खातील असे त्यांना वाटते. मुलांचे पुढे काय होईल ही चिंता पांढरपेशा मध्यमवर्गीयांसच अधिक असते.

दिवाळी आली होती. मधुरीने घरात गोड केले होते. एके दिवशी सोन्या शेजारी गेला होता. तेथील मुले सांजोऱ्या खात होती. सोन्याने

पण मागितली. त्याला एक तुकडा देण्यात आला. तो घेऊन घरी आला. त्याने आईला दाखवला तुकडा.

'तू कर ना असे.' तो म्हणाला.

'कोणाकडून आणलीस सांजोरी? सोन्या, तुला शंभरदा सांगितले की कोणाकडून मागू नये म्हणून. आज पुन्हा गेलास का? थांब, तुला चांगली आठवण राहिली पाहिजे. चांगला डाग देते जिभेला म्हणजे कोणाकडे मागणार नाहीस पुन्हा.' असे म्हणून मधुरीने त्याचा हात धरून त्याला घरात ओढीत नेले. सोन्या रडू लागला. चुलीतील कोलीत तिने हाती घेतले.

'मागशील पुन्हा? मागशील? वेंगाडशील तोंड दुसऱ्याकडे? का लावू डाग जिभेला? कोणता हात पुढे केलास घ्यायला? हातालाच भाजते म्हणजे हात पुढे होणार नाही.'

'नको ग आई, नको, नको. नाही हो पुन्हा मागणार, नाही कोणाकडे जाणार. नको भाजू आई, आई!'

'नको कसे? मागे असाच गेला होतास खायला. त्या वेळचा मार आठवत नाही? पुन्हा गेला आज. भिकारडा. जसा हपापला आहे खाण्याला मेला. जसा उपाशी मरतच होता. ते काही नाही. कर, हात पुढे कर.' आणि मधुरीने त्याच्या तळहातावर ते कोलीत ठेवले. पोर कळवळले.

'आई, नको, भाजले ग आई.' सोन्याने हंबरडा फोडला.

'बरे झाले. पुन्हा हात कोणापुढे होणार नाही.'

'आई ग, आग होते ग, आई, आई!'

इतक्यात मंगा आत आला.

'काय आहे रे? काय झाले?'

'आईने हात भाजला माझा. कोलीत ठेवलेन हातावर. आई ग.'

'तू काय केलेस?'

'कार्ट्याला सतरांदा सांगितले होते कोणाकडे जाऊ नये म्हणून.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकरण

परंतु आज सणावारी दुसऱ्याच्याकडे गेला व सांजोरी मागितली. दळभद्रा आहे मेला. चांगली आठवण राह्यला हवी म्हणून दिला डाग. पुन्हा हात पसरणार नाही मेला.'

मंगा काही बोलला नाही. त्याने सोन्याला जवळ घेतले. त्याने त्याला उगी केले. त्याचा हात त्याने कुरवाळला, हाताला चांगलाच फोड आला होता. सोन्याला घेऊन तो बाहेर बसला. रुपल्याही रडत होता. त्यालाही त्याने जवळ घेतले. दोन्ही मुलांच्या अंगावरून तो हात फिरवीत होता. सोन्याच्या तळहातावर पुनः पुन्हा फुंकर टाकीत होता. मंगाच्या डोळ्यांतील पाणी त्या तळहातावर गळू लागले. तो गहिवरला.

'बाबा, तुम्ही का रडता? तुम्ही नका रडू.' असे म्हणून सोन्याने बापाच्या गळ्याला एकदम मिठी मारिली. तिकडून मधुरी आली. हाताला गार वाटावे म्हणून लावायला तिने काही तरी आणले होते.

'नको लावू काही जा.' सोन्या म्हणाला.

'लावू दे बाळ. बरे वाटेल. कर हात पुढे. हळूच लाव हो मधुरी.' मंगा म्हणाला. आईने औषध लाविले. तीही रडत होती. सोन्याने आईच्या डोळ्यांतील पाणी पाहिले.

'आई, मला घे ना जवळ, घे.' असे म्हणत तो एकदम येऊन आईला बिलगला. मधुरीने त्याला जवळ घेतले. त्याने आपले तोंड तिच्या पदरात खुपसले. पतिपत्नी तेथे खिन्न होऊन बसली. मंगा उठला व पुन्हा बाहेर जाण्यासाठी निघाला.

'मंगा, कोठे जातोस?'

'मसणात.'

'सणावारी नको हो मंगा असे बोलू.'

'सणावाणी सोन्यासारख्या मुलांस डागावे वाटते?'

'नको अशा शब्दांनी मला भाजू मंगा. जाऊ नकोस या वेळेस कोठे.'

'जाऊ दे मला.'

मधुरी बोलली नाही. मंगा गेला. मधुरीने मुलांना काही तरी गोड करून दिले.

'सोन्या, आवडले ना?' तिने विचारले.

'छान लागते आई.' सोन्या म्हणाल्या.

'मलाही आवडले.' रुपल्या म्हणाला.

तिन्हीसांजा झाल्या. चार पणत्या बाहेर लावण्यात आल्या. मनी झोपाळ्यावर निजली होती. आई दोन मुलांचे हात धरून फिरत होती. इतक्यात मंगा बाहेरून आला.

'काय आणलेत बाबा? खाऊ?' मुलांनी विचारले.

'होय हो बाळ. आणि हे फटाके घ्या. ह्या चंद्रज्योती.' तो म्हणाला.

'खरेच बाबा?' सोन्याने विचारले.

'होय, खरेच.'

मंगाने चंद्रज्योती काढून दिल्या. सोन्याने लाविल्या. रुपल्यानेही काडी हाती धरली. मधुरीने फटाके सोडवून दिले. बांबूचा चिमटा तिने त्या मुलांना करून दिला. चिमट्यात धरून मुले फटाके वाजवू लागली.

'आई, मी हातात धरून वाजवू?' सोन्याने विचारिले.

'नको. एखादे वेळेस हातावर येईल.' आई म्हणाली.

'नाही येणार. मी काही हातात धरून वाजवायला भीत नाही आई.'

'वाजव हो सोन्या.' बाप म्हणाला.

सोन्याने हातात धरून फटाका वाजविला. फटाके, चंद्रज्योती! मजा आली. आणि पेढे, बर्फीही मंगा घेऊन आला होता. सोन्याला दोन पेढे मिळाले. रुपल्याला एका पेढ्याचे दोन करून देण्यात आले. मुलांना आनंद झाला. रात्री मुले निजली. मधुरी व मंगा जागीच होती.

'मंगा, कोठून आणलेस फटाके? पैसे होते का?' तिने विचारले.

'कर्ज काढून आणले सामान.' तो म्हणाला.

'नको हो कर्ज.' ती म्हणाली.

'मला नाही भिकाऱ्यासारखे रहाणे आवडत. मी आता खुशाल कर्ज काढण्याचे ठरविले आहे. सोन्यासारख्या मुलांना साध्या गोष्टीसाठी मार खावा लागावा हे मला सहन होत नाही. तू सोन्याला नाही डागलेस, मला डागलेस. आपण किती दरिद्री या गोष्टीचे तुझ्या मनातील दुःख त्यामुळे प्रकट झाले. मधुरी, कितीदा तुला विचारले की जाऊ का मी कोठे दूर? आणू का पैसे मिळवून? परंतु तू तीही परवानगी देत नाहीस. म्हणतेस मी समाधानी आहे. परंतु तुझ्या मनाची यथार्थ कल्पना आज मला आली. तुझे मन शांत व स्वस्थ नाही. तेथे दरिद्र्याच्या वेदना आहेत. स्वाभिमानाच्या कल्पना आहेत. पोरांना काय बिचाऱ्यांना? छे! मला चैन नाही पडत. कोवळा फुलासारखा हात तू भाजलास. किती तू दुष्ट. आया का इतक्या दुष्ट होऊ शकतात?'

'होय हो, मी दुष्टच आहे. माझीच पोरे खाणारी मी लावी आहे. मंगा, असे सोन्याला डाग देताना माझ्या मनाची काय स्थिती झाली असेल? एका गोष्टीवरून का माझी परीक्षा करणार? अरे, ज्याला मी नऊ महिने पोटात वाढविले, तो माझाच आहे. मी सोन्याचा नाही भाजला, जणू माझाच हात मी भाजला. नाही, हो पुन्हा अशी मी वेडी होणार. मंगा, येतो हो माणसाला कधी राग, संताप. नको मला बोलू. कर्जही नको काढीत जाऊ.'

'ही गरिबी दूर केलीच पाहिजे. हे दारिद्र्य माणसाला दुर्गुणी बनविते, दुष्ट करिते. गरिबीमुळेच सोन्या शेजारी तोंड वेंगाडता झाला, गरिबीमुळेच तू सोन्याला भाजलेस. गरिबी! या जगात सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे ही गरिबी. गरिबीने माणसाचे पशूत रूपांतर होते. गरिबी स्वाभिमानाला मारते. आशाआकांक्षा धुळीस मिळविते. गरिबाला कोणीही बोलावे, कोणीही मारावे, कोणीही त्याचा

पाणउतारा करावा. छे! गरिबीच्या गारठ्यात मी माझी मधुरी अतःपर ठेवता कामा नये. माझ्या मुलांची जीवने गरिबीत नीट वाढणारी नाहीत. मधुरी, वीट आला मला या गरिबीचा. किती तरी वर्षे मी मनात म्हणत आहे की आपण श्रीमंत व्हावे, मधुरीला जणू राजाची राणी करावे; परंतु मी माझ्या मनाला आजपर्यंत लगाम घातला. आता नाही घालणार. मी जाणार कुठेतरी. मधुरी, मला जाऊ दे, देशदेशांतरी, करीन व्यापार, करीन देवघेव. श्रीमंत होईन, तेव्हाच परत येईन.'

'मंगा, नको रे असे म्हणू. माझ्यापासून नको रे कोठे जाऊ. तू म्हणजे माझ्या प्राणांचा प्राण. तू माझ्या डोळ्यांतील बुबुळ, माझ्या कुडीतील श्वास, तुझ्यामुळे मी जगते. तू कोठे गेलास तर या मुलांना कोण? मला तरी मोलमजुरी करता येईल का? मुले सारी घरी सोडून कशी कोठे जाऊ? आज मुले जगत आहेत. उद्या तू गेलास म्हणजे आम्हांस जगणेही कठीण होईल. सोने घेऊन घरी येशील, परंतु सोन्या हवा ना, रुपल्या तर हवा ना, मनी तर हवी ना ते सोने अंगावर घालायला? नको, नको मंगा! नको हो जाऊ. आपण येथेच राहू. चांगले चालले आहे. एखादे वेळेस उठते वादळ. चालायचेच मंगा. आकाश का नेहमी निरभ्र असते? झाडे का नेहमी शांत असतात? नदीला कोठेच का वेग, खळखळाट नसतो? मंगा, हा संसार आहे. मधून कडू, मधून गोड. कोणाचा असा संसार आहे की येथे सदैव सुखाची पुनव फुलेली आहे? सदा आनंदाची दिवाळी आहे? श्रीमंत कुटुंबांतूनही का कुरबुरी नसतात, भांडणे नसतात? श्रीमंत आईबाप का मुलांवर रागावत असतील? मन सर्वत्र एकत्र आहे. मंगा, श्रीमंतांची श्रीमंती भांडणे असतात, गरिबांची गरीब. परंतु भांडणे, बोलाचाली, चालायचेच हो. मंगा, माझे वेडीचे ऐक. माझ्या मनाचा सूर ऐक. कोठे जाण्याचे मनात आणू नकोस. बघ. तिन्ही बाळे कशी सुरेश झोपली आहेत. चांगली आहेत आपली मुले. रडकी नाहीत. हसतात, खेळतात. त्यांना पाहून मला धन्यता वाटते. मंगा, माझ्या मांडीवर ही तीन मुले दिलीस. मी श्रीमंत आहे. ही मुले म्हणजे माझी

संपत्ती. हसती, नाचती, खेळती, बोलती संपत्ती. गोड जिवंत संपत्ती. मला काही नको आणखी. मंगा, नाही ना जाणार कोठे? सांग. नाही तर मला झोप येणार नाही. खाणेपिणे गोड वाटणार नाही. मधुरीला रडवावे असे तर नाही ना ठरविलेस? मधुरी नेहमी दुःखीकष्टी असावी असे तर नाही ना ठरविलेस?'

'मधुरी, काय वेडेवाकडे विचारतेस? तुला सुखाच्या स्वर्गात खेळवावे, सुखाच्या सागरात डुंबवावे म्हणून तर माझी सारी धडपड. कोठे त्रिखंडात गेलो तरी तुला रडविण्यासाठी म्हणून नव्हे, तर तुला कायमचे हसविता यावे म्हणून.'

'हल्ली का मी हसत नाही? उलट तू गेलास कुठे तर मात्र माझे हसे मरून जाईल. माझा आनंद कायमचा मावळेल. माझ्या ओठांची हसण्याची सवय जाईल आणि तू पुन्हा संपत्ती घेऊन घरी येशील तेव्हा कदाचित मला हसू येणार नाही. माझे तोंड फुलणार नाही. मधुरी जडजरठ होईल. मंगा, नको, नको. माझा मंगा मला सोडून जाणार नाही; नाही हो जाणार. खरे ना?' असे म्हणून तिने त्याच्या खांद्यावर मान ठेविली. कितीतरी दिवसांत अशी मान तिने ठेविली नव्हती. मंगाने तिचे डोके खांद्यावरून मांडीवर घेतले व तो तिला थोपटू लागला. कोणी आता बोलत नव्हते.

'मंगा, मांडीवर मान आहे. कापू नको.'

'नाही हो मधुरी; नीज. गोड झोप घे.'

❖❖❖

: समुद्राची हाक : :८:

समुद्र म्हणजे एक महान् काव्य आहे. समुद्र म्हणजे महान् संगीत. समुद्र म्हणजे सृष्टीचे रामायण, महाभारत. अनंत कालापासून हा गर्जना करतो आहे. समुद्र कधी मुका होता? असेल का असा

कधी की ज्या वेळेस तो केवळ निःस्तब्ध होता? असेल का असा काळ की ज्या वेळेस त्याच्यावर तरंग उठत नसतील, त्याच्यात हालचाल नसेल? केव्हापासून हा गर्जू लागला? नाचू लागला? हा सागर का गर्जत आहे? का नाचत आहे? कोणासाठी हा नाच? कशासाठी ही गर्जना? कोणाची त्याला आठवण येत आहे? कोणासाठी हा आक्रोश? समजायला मार्ग नाही. कोणाला रहस्य कळणार? कोणाला याचे गूढ कळणार?

समुद्र म्हणजे मानवी मनाचे प्रतीक तर नाही? मनुष्याच्या मनाचा अंत पार लागत नाही. मनुष्याचे मन वरवर उथळ वाटते. ते हसते, खेळते. परंतु आत प्रचंड लाटा उसळत असतात. मन कधी शांत, स्थिर वाटते, तर कधी वासनाविकारांचा झंझावात उठून ते प्रक्षुब्ध होते, या मनात काय काय भरले आहे कोणास ठाऊक? मनात रत्ने आहेत, मोती आहेत. शिंपा आहेत. कवड्या आहेत. मनाला क्षणाची उसंत नाही. विश्रांती नाही. समुद्राला भरती असो, ओहोटी असो, खळखळ तेथे अखंड सुरूच आहे. कोठे आहे त्याचा विसावा? तसेच मनाने आपण निजलो तरी आपले अनंत असे ते मन विचारावर चालत असते. तसे झोपेतही विचाराला, मनाला कोठे आहे विश्रांती? समुद्र ओरडतो आहे. मनही सारखे ओरडत असते. या मनाला कशाने समाधान नाही. ते सारखे सुखासाठी अट्टाहास करीत असते. कोणाला तरी सारखे हाक मारीत असते. कोण भेटले म्हणजे त्याला कायमचे समाधान होईल?

समुद्रा, कोणाला रे हाक मारीत आहेस? जगातील साऱ्या नद्या तुझ्याकडे धावत येतात. लहान नद्या मोठ्या नद्यांना मिळून त्यांच्या संगतीत तुला भेटायला येतात; सारे पाणी शेवटी तुला येऊन मिळते. कोणती नदी अद्याप तुला भेटायची राहिली? गंगा, सिंधू, ब्रह्मपुत्रा साऱ्या नद्या तुला भेटल्या. साऱ्यांनी तुला माळा घातल्या. साऱ्यांनी तू हृदयाशी धरलेस. तरी तुला समाधान नाही? का रे असे? एखादा वैभवशाली राजा अनेक राण्या असूनही पुनः अशान्त राहतो. तसेच तुझे आहे. कोणती गंगा तुला अजून हवी आहे? सांग, का ही

अशांती? समुद्रा, तुला कशाची भूक लागली आहे? कशाने तुझी भूक शांत होईल! तुझ्या पोटात म्हणे वडवानळ पेटत असतो. तुझ्या पोटात सारखीच आग भडकलेली आहे. कोणता घास मिळाला म्हणजे तुझी अग्नी शांत होईल? आजपर्यंत लाखो गलबते तू भक्षिली असशील. लाखो प्राणी तू भक्षिले असशील. तरी तुझे समाधान कसे कसे होत नाही? तुझी अनंत भूक शांत व्हायला साऱ्या जगाचा का घास तुला हवा आहे? तुझ्या मनात हाच झगडा चालला आहे? का करू का हे जगत्, खतम्, टाकू का गिळून, असे तर नाही ना तुझ्या मनात येत? तुझ्या सहस्त्र लाटा जगाला ओढण्यासाठी खवळून खवळून येतात. परंतु पुनः तू त्यांना आवरतोस. समुद्रा, किती तुझा हा संयम! का ही तुझी धडपड?

तू या मानवजातीसाठी का आक्रोश करीत आहेस? (तू का ऐक्योपनिषद् शिकवीत आहेस?) येणारे सारे प्रवाह मी जवळ घेतो, सम भावाने त्यांना वागवतो; त्याप्रमाणे मानवांनी वागावे असे तर तू नाही ना सुचवीत? तू सारे पाणी जवळ घेतोस म्हणून तू आटत नाहीस, म्हणून तुला मरण नाही. त्याप्रमाणे मानव जर परस्परांस प्रेमाने जवळ घेतील तर मानव जात टिकेल. नाहीतर मानवप्राणी जगातून नष्ट होईल असे तर नाही ना तुला सांगावयाचे? अनंत काळापासून तू ही गर्जना करतो आहेस. परंतु मनुष्याने ती अद्याप ऐकिली नाही. अजूनही मनुष्य मनुष्याला खात आहे. माणूस माणसाला मारीत आहे. लुटीत आहे, छळीत आहे. माणूस माणसाला गुलाम करीत आहे, पायाखाली तुडवीत आहे. मनुष्यप्राणी जन्माला येऊन हजारो वर्षे झाली तरी तुझा संदेश त्याला अद्याप कळला नाही. माझी जात श्रेष्ठ, माझा देश श्रेष्ठ, मी श्रेष्ठ यापलीकडे या मानवप्राण्याची अद्याप दृष्टी जात नाही. समुद्रा, म्हणून का तुझा तडफडाट?

का तू कर्मयोग शिकवीत आहेस? सात्त्विक कर्मयोगी कसा असावा ते का तू सांगत आहेस? मानवांनो, भरती असो, ओहोटी असो, मी सदैव माझ्या कर्मात रमलेला आहे. सुखदुःख विसरून मी

माझे कार्य करीत आहे. माझे स्मरण करा व तुम्हीही असेच झगडत राहा. 'सुख वा दुःख, जय वा पराजय, कर्म करीत राहा, असे का तुला शिकवावयाचे आहे?

समुद्र, तुझी गर्जना ऐकिली की हृदय गंभीर होते. तुझ्या गर्जनेचा अर्थ समजला नाही, तरीही शरीरातील अणुरेणू नाचतो. तुझ्यात काय जादू आहे. कळत नाही. तुझे वर्णन कसे करावे ते कळत नाही. तू परमेश्वराचे प्रतीक आहेस. अनंत ईश्वराचे तू सिंहासन आहेस. लहान होड्या परंतु निर्भयपणे तुझ्या वक्षःस्थळावर त्या नाचत असतात. तू त्यांना खेळवतोस, डोलवतोस, एखादे वेळेस रागावतोस व त्यांच्या थोबाडीतही मारतोस. तुला दयाळू म्हणू की कठोर म्हणू? तुला सत् म्हणू की असत् म्हणू? तुला खारट म्हणू की गोड म्हणू! खारट म्हणावे तर तुझ्याच पाण्याचे होणारे ढग गोड पाण्याची वृष्टी करतात. तू आपला खारेपणा स्वतःजवळ ठेवतोस व मधुरता जगाला देऊन टाकतोस. असे का आहे?

तुला पाहून तो मंगा उगीच नसे शत विचारांत रममाण होत! लहानपणापासून त्याला तुझे वेड. लहानपणापासून तुझा छंद. हृदयसिंधू भरून आला की तुझ्याकडे धाव घेई. अपरंपार शोक असो वा अपार आनंद असो, भावना उचंबळल्या की शांत करावयास मंगा तुझ्याकडे यावयाचा. किती त्याला तुझे आकर्षण! रात्री सारी सृष्टी शांत असावी. सारे गोड झोपेत असावेत, आणि मंगाने तुला भेटायला यावे! या टेकडीवर बसून तुझ्याकडे घटकान् घटका त्याने बघत राहावे. असे कितीदा तरी होत असे. तुला पाहून काय वाटे त्याला! तुझी हाक त्याच्या हृदयाला का अधिक समजे?

मंगा समुद्रावर आला म्हणजे समुद्र त्याच्याजवळ कधी गोड गोष्टी सांगे. कधी भेसूर भीषण कथा सांगे. 'मंगा, मी दुष्ट आहे. येऊ नको माझ्याजवळ. मी फसव्या आहे. मुलासारखा क्षणभर हसतो, परंतु दुसऱ्या क्षणी अक्राळ विक्राळ राक्षस मी होतो. मी चंचल आहे. केव्हा काय करीन त्याचा नेम नाही. माझ्या जवळ याल तर मराल, मराल, असे मी सांगत असतो. मी मृत्यूची गाणी गात असतो आणि

खरे म्हटले तर मंगा या जगात शेवटी मरण आहे. या माणसांच्या धडपडी पाहून कधी कधी मी हसतो. कोण ते त्यांचे अहंकार. बुडबुडे बेटे. अरे, मी हजारो वर्षे खेळ पाहून राहिलो आहे. सर्वांची मरणे मी पाहून राहिलो आहे. मोठमोठे ऋषिमहर्षी, ज्ञानी, तत्त्वज्ञानी, शास्त्रज्ञ, कवी कोठे आहेत ते! सारे गेले. मोठमोठे राजेमहाराजे, त्यांची ती विशाल नगरे, प्रचंड राजे, ते वैभव, ते हत्ती-घोडे-कोठे आहेत सारे? कोठे आहेत कौरवपांडव? कोठे आहेत रामकृष्ण? कोठे गेले ५३ कोटी यादव, १८ पद्मे वानर? कोठे आहे सोन्याची लंका? तो चौदा चौकड्यांचा रावण? कोठे आहे तो अशोक, कोठे आहे समुद्रगुप्त? कोठे आहे ते महान् ग्रीक राष्ट्र, कोठे आहे मिसर? कोठे आहे रोम? कोठे आहे इस्तंबूल? सारे क्षणभर गर्जतात, दुसऱ्या क्षणी नष्ट होतात. अनेक संस्कृती उदयास आल्या व अस्तास गेल्या. एकाचे मरण व दुसऱ्याचा जन्म. मंगा, असा हा भीषण खेळ चालला आहे. परंतु मानवाला भान नाही. मी खदाखदा हसतो. पोट धरून हसतो. मोठमोठी गलबते बांधून ऐटीने माझ्या छातीवरून जाऊ पाहतात. मी त्यांना जाऊ देतो. हा अहंकारी मानव घमेंड करू लागतो, 'पाहा, मी समुद्रावर विजय मिळविला. या समुद्राला तुडवून मी जात आहे.' परंतु एखादे वेळेस मी त्याला धोक्याची सूचना देतो, 'अरे बुडबुड्या, फार नको ऐट, ही जाणीव करून देतो.'

असा कधी कधी समुद्राचा गंभीर व भीषण संदेश मंगाला ऐकू येई, तर कधी प्रेमाच्या गोष्टी ऐकून गुदगुल्या होत. 'ये, मंगा ये. घे एक लहान होडी व ये माझ्याजवळ. माझ्या लाटावर नाचवीत मी तुला जगभर घेऊन जाईन. मंगा, ये. मंगा, तू व्यापारी हो. भर गलबतात माल. नीघ. मी देशोदेशीचे लोक तुला दाखवीन. ही बहुरत्ना वसुंधरा तुला दाखवीन. तुझी दृष्टी कृतार्थ होईल. जगात किती विविधता आहे हे तुला कळेल! शेकडो प्रकारची हवा, शेकडो प्रकारची फुलेफळे, पशुपक्षी; नाना रंगाचे, नाना धर्माचे, नाना स्वभावाचे लोक, चल तुला दाखवतो. तू व्यापार कर. श्रीमंत हो. ये मंगा, असा गरिबीत खितपत नको पडू. ज्याचा दर्या, त्याची लक्ष्मी.

नगर वाचनालय, सातारा
बालविभाग

मी लक्ष्मीला जन्म देणारा. मी तुला श्रीमंत करीन. परंतु हिंडाफिरायला ये. आपले डबके सोड. विशाल दृष्टी घे, अफाट जगात चल. व्याप वाढला की वैभव वाढते. का उगीच रडत बसतोस! कपाळाला हात लावतोस! शिडात वारा भरला म्हणजे नावा झरझर जातात. तू आपल्या भावनांत आशेचा वारा भर व सोड तुझी नाव माझ्यावर, ये. बाळ ये.'

मंगाला समुद्राची ही गोड हाक अलीकडे ओढू लागली होती. दिपवाळीच्या त्या दिवशीच्या प्रसंगापासून तो दारिद्र्यावर संतापला होता. दारिद्र्यापेक्षा मरण बरे असे त्याला वाटू लागले होते. या जगातील सर्वांत पापमय गोष्ट कोणती असेल तर ते दारिद्र्य. ज्याला जगाची सुधारणा करावयाची असेल, मानवी मनाचा विकास करावयाचा असेल, त्याने आधी हे दारिद्र्य दूर करावे, जगाची खाण्यापिण्याची ही साधी ददात आधी दूर करावी.

मंगा बंदरावर काम करायला जाई; परंतु त्या कामात आता त्याचे मन रमत नसे. तो माल उतरू लागे. कधी कधी त्या मालाकडे पाहात राही. शेवटी त्याला मक्तेदार किंवा मालक रागे भरत, तेव्हा तो पुन्हा माल उतरू लागे. आपणही काही असा माल घेऊन गेलो तर! येथला माल दूरच्या देशात विकू. तिकडचा इकडे आणू, असे त्याच्या मनात येई. तो कधी कधी गलबतांवरच्या खलाशांजवळ बोलत बसे. सायंकाळ व्हावी. घरी येण्याची वेळ झाली असावी. परंतु मंगा गलबतावरच असे. माहिती मिळविण्यात दंग असे. अनेक लोकांच्या, अनेक देशांच्या गोष्टी ऐके. कोण कसे श्रीमंत आहेत, श्रीमंत कसे झाले, त्यांच्या हकिकती ऐके.

एके दिवशी मंगा असाच रमला होता. घरी मधुरी वाट पाहून दमली. अलीकडे मंगा वेळच्या वेळी घरी येत नसे, म्हणून तिला वाईट वाटे. परंतु आज कमालच झाली. शेवटी सोन्या व रुपल्या यांना घरी राहा असे सांगून, भांडू नका असे सांगून, धाकट्या मनीला घेऊन मधुरी बंदरावर आली. रात्र झाली होती. होड्या, पडाव वगैरे पडले होते तिकडे ती गेली.

'मंगा, अरे मंगा!' ती हाका मारीत होती.

शेवटी मंगाने ती हाक ऐकली. 'आलो, आलो.' म्हणून त्याने उत्तर दिले. मंगा आला. मधुरी मनीला कडेवर घेऊन तेथे उभी होती. ती काही बोलली नाही. तीन मुले / साने गुरुजी

'मधुरी, तू अंधारातून कशाला आलीस?'

'प्रकाश मिळवायला आल्ये.'

'मी येणारच होतो. कोठे का जाणार होतो?'

'मंगा, अलीकडे तू वेळच्या वेळी घरी का येत नाहीस? सोन्या-रुपल्या तुझी वाट पहात असतात. केव्हा येतील बाबा असे सारखे विचारीत असतात. घरापेक्षा का गलबत आवडते झाले? मुलाबाळांजवळ बोलण्यापेक्षा खलाशांजवळ बोलण्यातच तुला अधिक आनंद वाटतो होय?

'मधुरी, चल आता घरी जाऊ. दे मनीला माझ्याजवळ. ती निजेला आली आहे. मी खांद्याशी धरतो. ती निजेल.'

मंगाने मनीला घेतले. खांद्याशी धरिले. ती झोपी गेली. दोघे घरी आली. सोन्या व रुपल्या दारातच होते.

'बाबा आले, आले बाबा.' दोघे ओरडले.

तेथे झोपाळ्यावर मंगाने मनीला ठेवले. सोन्या व रुपल्या त्याच्याजवळ आले. त्याने दोघांना जवळ घेतले. त्यांच्या डोक्यावरून हात फिरवला.

'बाबा, गोष्ट सांगता एक?' सोन्याने विचारले.

'आता जेवल्यावर गोष्ट. चला जेवायला.' मधुरी म्हणाली.

जेवणे झाली. तेथे अंगणात चटई टाकून सारी बसली. मधुरीच्या मांडीवर मनी होती.

'हं, सांगा बाबा गोष्ट, मोठी, न संपणारी सांगा.' सोन्या म्हणाला.

नगर वाचनालय, सातारा
३६, भवानी पेठ, सातारा
दाखल नं - ८९२७४ ग्रंथानुक्रमांक - बा/वि-३१-१३१४
किंमत - १०/- पाने - २२४

मंगा गोष्ट सांगू लागला... 'एक होता मनुष्य. तो गरीब होता. घरी दोनचार कच्चीबच्ची होती. सर्वांचा सांभाळ कसा करणार तो? तो नेहमी दुःखीकष्टी असे. काय करावे त्याला कळेना. तो आपल्या बायकोस एके दिवशी म्हणाला, 'जाऊ मग कोठे दूर देशाला. नशिबाची परीक्षा पाहतो. पैसे मिळवीन तेव्हाच घरी येईन.' परंतु त्याची बायको रडू लागे व म्हणे, 'जळले मेले पैसे. काय चाटायचे आहेत? कोंड्याचा मांडा करू. सुखात राहू. नका जाऊ आम्हाला सोडून दूर.' परंतु एके दिवशी त्या मनुष्याच्या मनात फारच जोराने विचार आला. तो अस्वस्थ झाला. तो पत्नीला म्हणाला, 'गेल्याशिवाय माझ्याच्याने जगवणार नाही. तू परवानगी दे. येथे मला राहवत नाही. मी मरून का जाऊ?' काय बोलणार बिचारी? शेवटी ती म्हणाली, 'जा. तुम्हाला नसेलच राहवत तर जा. देव आहेच सांभाळणारा.' आणि एके दिवशी तो खरेच गेला. एका गलबतात बसून गेला. पुष्कळ दिवस झाले. परंतु त्याचा पत्ता लागेना. रोज बायको व मुले वाट पाहात, आणि शेवटी तो एके दिवशी आला. प्रथम त्याला कोणी ओळखले नाही. परंतु तो बोलू लागताच सर्वांनी त्याला ओळखले. सर्वांना आनंद झाला. त्याने मुलांसाठी किती तरी गमती आणल्या होत्या. बायकोसाठी दागिने आणिले होते. त्याचे दारिद्र्य गेले. त्याचा संसार सुखाचा झाला.'

'संपली का गोष्ट?' सोन्याने विचारले.

'हो.' मंगा म्हणाला.

'छान आहे गोष्ट.' सोन्या म्हणाला.

'का रे?' बापाने प्रश्न केला.

'त्या मुलांना गंमती मिळाल्या म्हणून.' सोन्या म्हणाला.

'तुला पाहिजेत अशा गंमती?' मंगाने विचारले.

'परंतु तुम्ही कोठे दूर जाता? बाबा, तुम्ही का नाही दूर जात? मग आम्हाला जमती आणाल. आईला दागिने आणाल. आपण श्रीमंत होऊ. बंगल्यात राहू. जा ना हो बाबा कोठे.' सोन्या म्हणाला.

'खरंच जाऊ? मग मी लौकर आलो नाही तर रडशील हो. तुझी आई रडेल. आईला विचार बरे!'

'आई, जाऊ दे ना बाबांना!'

'नको हो. कशाला कोठे जा.' मधुरी म्हणाली.

'तू भित्री आहेस आई. जा हो बाबा तुम्ही.' सोन्या म्हणाला.

'बरे, नीज आता.' मधुरी म्हणाली.

मुले झोपली. मधुरी व मंगा बोलत होती.

मधुरी, खरोखरच माझ्या मनात दूर देशी जावे असे येत आहे. अशी स्वप्ने मी खेळवीत 'असतो. खूप पैसा आणीन. मधुरीला सुखात ठेवीन. तिला सोन्याने मढवीन, पिवळी करीन, असे मनात येते. रोज उठून हल्ली ददात. रोजची वाण. दोन दिवस आपण परस्परांपासून दूर राहू; परंतु पुढे कायमचे सुख मिळेल. थोडी कळ सोसावीच लागते मधुरी. कष्टाशिवाय काही नाही. जाऊ का मी? देशोदेशीच्या गोष्टी मी बंदरावर ऐकतो. खलाशी किती गंमती सांगतात. मला बंदरात ती ओझी वाहण्यात आनंद नाही वाटत. एक दिवस येईल – माझ्या मालाचे गलबत येईल. माझा माल हमाल उतरत असतील, अशी स्वप्ने मनात येतात. मधुरी, जाऊ का? उद्यापासून नाही मी जाणार बंदरावर काम करायला.'

'नको जाऊस मंगा. तू घरी राहा, मनीला खेळव. मी मोलमजुरी करीन. तू तरी किती दिवस करणार? मंगा, मी मिळवीन. तू घरी राहा. परंतु जाऊ नकोस कुठे. माझ्याजवळ राहा. मला सोडून जाऊ नकोस. तू गेलास तर मी मरेन. मग मुलांचे कसे होईल?'

'मधुरी, मरायला काय झाले? आपणास वाटते की, आपले प्रिय माणूस गेले तर आपण मरू. थोडा वेळ वाटते वाईट. मागून पुन्हा मन शांत होते. मनुष्य आपल्या उद्योगात रमतो. उगीच वेड्यावाकड्या कल्पनांत नको रमू. जरा धीट हो. मुळूमुळू रडणारी मधुरी मला नाही आवडत.'

'मंगा, मधुरी रडणारी आहे ही गोष्ट तुला लहानपणापासून माहीत होती. वाळूचे किल्ले आपले नीट झाले नाहीत तरी मला रडू यावे. तू व बुधा भांडत असा व माझे डोळे भरून यावे. तू मला त्या वेळेसही म्हणत असस, 'रडणारी आहेस. रडूबाई आहेस! अशा रडूबाईजवळ कशाला केलेस लग्न?'

'तू तरी माझ्याजवळ कशाला केलेस?'

'तू माझे डोळे पुसशील म्हणून. मी रडणारी, न रडणारा कोणी तरी मला पाहिजे होता. माझे अश्रू पुशील, मला धीर देईल, असा आधार मला पाहिजे होता. मंगा, तू गेल्यावर माझे अश्रू कोण पुशील?'

'मी आल्यावर पुशीन. मधुरी, गरिबीत राहावे असे तुला कसे वाटते?'

'मंगा, मनुष्याला कितीही मिळाले म्हणून का समाधान होते?'

'ते काही नाही. मी जाणार हो मधुरी. सांगून ठेवतो.'

'अरे बघू. आता नीज.'

सकाळी सारी उठली. मंगा आज लौकर उठला नाही. मधुरीने त्याला हाक मारली नाही. उलट मंगाच्या अंगावर तिने आणखी पांघरुण घातले. मुले केव्हाच उठली होती. ती गडबड करीत होती.

'सोन्या, रुपल्या, गडबड नका करू.' मधुरी सांगू लागली.

'आई, बाबांना बरे नाही? का ग ते निजले आहेत?' सोन्याने विचारले.

'त्यांच्या कानात आपण कुर्र करू.' रुपल्या म्हणाला. तिकडे मंगाने डोक्यावरचे पांघरुण दूर केले. त्याचे डोळे उघडे होते. मुले त्याच्याजवळ गेली. त्याच्याजवळ बसली.

'बाबा, उठा ना.' रुपल्या म्हणाला.

'तुझी आई मला म्हणते निजून रहा. तुझ्या आईचे ऐकायला हवे. खरे ना?' मंगाने विचारले.

'बाबा, तुम्ही आईचे नेहमी ऐकता का?' सोन्याने विचारले.

'बहुतेक ऐकतो.'

'तुम्ही न ऐकलेत तर का आई मारते तुम्हांला?'

'हो.'

'मग तुम्ही रडता?'

'हो.'

'पुरे करा रे. जा बाहेर खेळायला. त्यांना निजू दे.' मधुरी म्हणाली. मुले बाहेर गेली. मधुरी तेथेच उभी होती. कोणते विचार होते तिच्या मनात?

'उठू का मधुरी?' मंगाने विचारले,

'नको. आज पडून राहा. रोज उठून बंदरावर जायचे. आज झोप घे जरा. किती तरी वर्षांत इतक्या उशिरापर्यंत तू निजला नससील.'

'आणि तू नाही का रोज पहाटे उठत?'

'ते काही असो. मंगा, तू खरोखरच काही दिवस तरी कामाला जाऊ नकोस. माझे ऐक. मला बरे वाटेल.'

'बरे.'

आणि खरोखरच मंगा काही दिवस कामाला गेला नाही. मधुरी कामाला जाई. मंगा मुलांजवळ खेळे, हसे, बसे. असे दिवस चालले होते. परंतु मधुरीला अतिश्रमाने ताप आला. एके दिवशी ती कण्हत होती.

'मधुरी, काय होते?'

'सारे अंग दुखत आहे.'

'जरा चेपू?'

'नको.'

परंतु मंगा उठला. मधुरीचे अंग निखाऱ्यासारखे होते. मंगाने अंग चेपले. त्याने तिच्या अंगावर पांघरूण घातले. मधुरी रडू

लागली. का बरे रडू लागली?

'हे काय मधुरी? रडतेस का अशी?'

'येते खरे रडू.'

'ताप उद्या निघेल. मोकळी होशील.'

'ताप न निघो. असाच राहो.'

'असे काय म्हणतेस?'

'मी आजारी असले म्हणजे तू मला सोडून जाणार नाहीस. किती तरी दिवसांत आज तुझे प्रेम मिळते आहे, आज माझ्या अंगावर पांघरूण घातलेस. मंगा, तुझ्या प्रेमाचे पांघरूण का फाटले? पडू दे मला आजारी म्हणजे तुझे प्रेम पुनः पोटभर चाखीन. मी तुझ्या मांडीवर पुनः निजेन. तू जवळ असशील, माझा हात चेपशील, कपाळ दाबशील, पाय चुरशील. पडू दे मला आजारी. माझे आजारीपण तुला येथे बांधून ठेवील.'

'वेडी आहेस मधुरी. माझे प्रेम चाखण्यासाठी का आजारीच पडायला हवे? मी दूर देशांतरास जाऊ म्हणतो तो तरी का? तुझ्यावर प्रेम आहे म्हणूनच ना? तू नसतीस तर कोणासाठी मी गेलो असतो? कोठे दूर गेलो तरी सारखी तूच डोळ्यांसमोर असशील. आजच्यापेक्षाही तू अधिक माझी होशील. माणसाचे प्रेम जवळून कळत नाही. परंतु दूर गेल्यावर ते कळते. बरे, ते जाऊ दे. आधी बरी हो.' असे म्हणून तो मधुरीला थोपटू लागला.

इतक्यात सोन्या व रुपल्या आले. मधुरी रडत होती.

'आई, रडतेसशी? बाबा, तुम्ही मारलेत आईला?'

'नाही रे. तिनेच मला मारले व आपणच आता रडते.'

'मलासुद्धा त्या दिवशी निखारा लावून स्वतःशीच रडायला लागली. वेडी आहे आई.'

'अरे, मनी कोठे आहे?'

'आहे अंगणात.'

'ती माती खाईल हो. जा आण.'

'मीसुद्धा आता खडे व माती खाणार आहे बाबा.'

'का रे?'

'तुम्ही खाऊ व खडीसाखर मग का आणीत नाही? आणाल ना?'

'तुझी आई जाऊ देत नाही आणायला!'

'आई, जाऊ दे ना बाबांना.'

'दूर जाऊ दे?'

'दूर जाऊ दे.'

'मग तुम्हांला कोण?'

'आई, तू आहेस ना. जाऊ दे बाबांना. खाऊ आणतील.'

'परंतु आई मारते ना रे?'

'परंतु घेतेसुद्धा. तुमच्यापेक्षा आईच जास्त घेते.'

'मी नाही घेत?'

'तुम्ही किती उशिरा येता. तुमची वाट पाहून आम्ही झोपतो. नाही का ग आई?'

'जा बाहेर. नको रे सारखी कटकट करू.'

'आमची कटकट. बाबांची नाही वाटते कटकट? बाबा नि तू किती वेळ बोलत असता. त्या दिवशी मी जागा झालो तो बाबा नि तू आपली बोलतच होतात. तुम्हांला झोप नाही येत रात्री?'

'अरे मनी रडते आहे. जा, मुंगीबिंगी चावली असेल.'

सोन्या बाहेर गेला. मधुरीच्या अंगावर पांघरूण नीट घालून मंगा चुलीच्या कामाला लागला. आज त्याने स्वयंपाक केला. त्याने मुलांना आधी जेवू घातले. मग मधुरी व मंगा जेवायला बसली.

'आज जेवण गोड आहे मंगा.'

'म्हणजे रोज मी करू वाटते?'

'हो कर. मी मजुरी करीन. तू जेवण कर. मंगा किती दिवसांत तुझ्या हातची भाकर खाल्ली नव्हती. अशी आपण प्रेमाने किती तरी दिवसांत जेवायला बसलो नव्हतो. किती आनंद होतो आहे मला! हा आनंद मधुरीला तू देत असता आणखी कोठे कशाला जातोस? नको हो जाऊ मंगा. मी तुला जाऊ देणार नाही. मंगा माझा आहे. कसा जाईल तो?'

'मधुरी, मी जाईन, जाईन. तू बऱ्या बोलाने परवानगी दे. नाही तर मी तुला न कळत निघून जाईन. तुला सांगून जाऊ की न सांगता जाऊ? तुझा निरोप घेऊन जाऊ, की पळून जाऊ?'

'मंगा, आधी मला बरी होऊ दे. तू असे आजच बोलू लागला तर मला आणखी वाईट वाटेल. मी बरी होईपर्यंत तरी जाण्याच्या गोष्टी करू नको.'

जेवणे झाली. मंगाने मधुरीचे अंथरुण झाडून दिले. त्याने केरही काढला. दोघे बसली होती. हातात हात घेऊन दोघे बसली होती. मधुरी थोड्या वेळाने झोपली. मंगाही झोपी गेला.

काही दिवसांनी मधुरी बरी झाली. मंगा पुन्हा कामावर जाऊ लागला. परंतु परदेशात जाण्याचा मोह त्याला अनावर होऊ लागला. तो अस्वस्थ होऊ लागला. त्याला खाणेपिणे सुचेना, रुचेना. तो बोलेना. एके दिवशी तो मधुरीला म्हणाला, 'मधुरी, मी जाण्याचे ठरवीत आहे. समुद्राच्या लाटा मला बोलवीत आहेत. त्यांची हाक मी नाकारू शकत नाही.'

'मंगा!'

'तुझे म्हणणे मी ऐकणार नाही. मी ठरविले आहे. तुझ्या अश्रूंनी माझा निश्चय डळमळणार नाही. मी नाही बाईलवेडा. मला पुरुषार्थ करू दे. पराक्रम करू दे. हे असे माशा मारीत बसणे मला नाही पसंत. रोज उठून तेच ते ठरीव जीवन. मंगा यासाठी नाही जन्मलेला. मधुरी, मी काही माल घेऊन जाणार आहे. माझ्याजवळ थोडेसे भांडवल आहे व बुधाकडे जाऊन आणखी काही पैसे मागशील?

माझ्यासाठी माग. मी आलो म्हणजे त्याचे पैसे परत देईन. जाशील?'

'मी नाही ज़ाणार. मला नाही कोणाजवळ पैसे मागणे आवडत आणि ज्या बुधाकडे एरव्ही कधीही आपण जात नाही, त्याच्याकडे कामापुरते जाणे हे फारच वाईट. तू येथून जाणार नसशील तर शंभरदा बुधाकडे जाईन व पैसे आणीन. परंतु ज्या पैशामुळे तू आम्हांस सोडून जाणार ते पैसे मी कसे आणू?'

'मधुरी, माझ्या समाधानासाठी आण पैसे. माझ्या महत्त्वाकांक्षेसाठी आण.'

'ही राक्षसी महत्त्वाकांक्षा आहे.'

'मधुरी, तुला असे का वाटते, मला कोठेच पैसे मिळणार नाहीत?'

'मला असे नाही वाटत. माझ्या अंगावर दोन दागिने आहेत ते तू घेऊ शकशील. तुझ्या ओळखी असतील. एखाद्या व्यापाऱ्याजवळही तू मागशील.'

'व्यापाऱ्याजवळ?'

'मागे नव्हता का व्यापारी आला व सारी इस्टेट देऊ पहात होता?'

'त्याच्याकडे का मी पुन्हा जाईन? मधुरी, तू मला काय समजतेस?'

'मी तुला माझा समजते. मंगा, नको रे जाऊ.'

त्या दिवशी बोलणे तसेच राहिले. परंतु मधून मधून बोलणी होत, खटके उडत. घरी आता मंगा बसत नसे. रात्रीही तो बाहेर जाई. समुद्रकाठीही फिरत राही. मनात विचार करी. एके दिवशी तो रात्री निजला होता. परंतु केव्हा तरी उठून बाहेर निघून गेला. मधुरी जागी होऊन पाहते तो मंगा नाही. तिने उठून सर्वत्र पाहिले. मंगा कोठेही नाही. तिला वाईट वाटले. का असे मंगा करतो असे तिला वाटले. ती बाहेर झोपाळ्यावर बसून रडत होती. बराच वेळ झाला.

पहाट होत आली. कोंबडा आरवला. दंवबिंदू टपटप पडत होते. फुलांचा मंद गंध येत होता. हळूच मंगा आला. तो मधुरीसमोर येऊन उभा होता. तो पाठीमागे झाला. त्याने तिचे डोळे धरले. ते ओले होते.

'मधुरी, सारखे रडायला काय झाले तुला?'

'मंगा काय सांगू तुला?'

मंगा एकदम रागावला. त्याने मधुरीला ओढीत घरात नेले. त्याने तिचे दोन्ही हात धरून गदगदा हलविले व म्हणाला, 'झाले काय तुला मुळूमुळू रडायला? सांग, कोणी मारले का आहे? कोणी छळले का आहे?'

'मारले असतेस, छळले असतेस तरी बरे झाले असते हो मंगा. तो मारही गोड मानला असता.'

'मग काय केले मी? का असे डोळ्यांत पाणी आणून मला दुःख देतेस? मी दूर कोठे जावे असे म्हणतो, त्याचे इतके वाईट वाटून घेतेस? मी का मरायला चाललो आहे? लौकर परत येईन. काही दिवस राहून परत जाईन. तुझ्या मुलाबाळांना सुख मिळावे म्हणून मी जात आहे.'

'माझी मुले सुखात आहेत. ती बिचारी काही मागत नाहीत.'

'नाही मागत कशी? शेजारी मागायला गेली म्हणून तर तू डागलेस त्यांना.'

'का पुनः पुन्हा ती आठवण मला करून देतोस?'

'मधुरी, बोल. का रडतेस? बोल.'

'तुला माहीत आहे.'

'तू आजपासून रडू नकोस. मंगाला बरे वाटावे अशी इच्छा असेल तर रडू नकोस. मधुरी, तू आता पुन्हा रडताना दिसलीस तर मी तुजजवळ बोलणार नाही. कबूल कर.'

'बोलू नकोस. परंतु डोळ्यांसमोर तर दिसशील ना? मंगा, तू

माझ्या जवळ असलास म्हणजे पुरे. तुझा श्वासोच्छ्वासही मजजवळ बोलतो. तू कोठे जाऊही नकोस म्हणजे झाले.'

'मधुरी, मी का तुझ्या मनात नेहमी नाही?'

'मंगा, त्याने नसते हो समाधान.'

'खरोखरच एखादे वेळेस मला तुझा फार राग येतो. बायका म्हणजे घोरपडी. चिकटून बसतात, गुदमरवतात. तुम्ही पुरुषांच्या पायातील बेड्या. त्यांच्या मार्गातील दगड.'

'मंगा आजपासून नाही हो तुझ्या मार्गात अडथळा करणार. नाही घोरपड होणार. नाही पायातील बेडी होणार. जा मंगा, कोठेही अस. सुखरूप अस म्हणजे झाले. मी तुझी आठवण काढून सुख मानीन.'

'मधुरी!'

'काय?'

'तू त्राग्याने सांगतेस, होय ना? आटापिटा करून सांगत आहेस, होय ना?'

'नाही हो. मी शांतपणे सांगत आहे.'

'शांतपणे?'

'हो.' एका क्षणात ग कशी शांती आली?'

'अती झाले म्हणजे मनुष्य निराळा होतो मंगा.'

'मग मी जाऊ?'

'हं.'

'बुधाकडून पैसे आणशील?'

'नाही आणणार. तेवढे नको सांगू.'

'मधुरी, बुधाकडे तू कधीच जाणार नाहीस? उद्या मी गेलो व घरी वाण पडली, मुले आजारी पडली तरीही तू नाही जाणार? इतकी तू कठोर आहेस?'

'काय सांगू मंगा? परंतु मला आज जावेसे वाटत नाही. उद्या

काय होईल कोणी सांगावे? मधुरी तुझ्यासारखी निश्चयी थोडीच आहे? मधुरी चंचल आहे मंगा.'

'मग मला भांडवल तर हवे.'

'ही जागा विकून टाक. हे दागिने वीक.'

'तुम्ही कोठे राहाल?'

'राहू एखाद्या रुपया आठ आण्याच्या खोलीत. होईल कसे तरी.'

'मधुरी, मनापासून हे?'

'होय, मनापासून. एकदा ठरले ना तुझे जायचे? मग आता मनापासून न करून काय करू? तुझे समाधान ते माझे. आम्हां स्त्रियांना दुसरे समाधान कोठे आहे मंगा! आम्ही पुरुषांच्या सुखासाठी, त्यांच्या इच्छांसाठी, त्यांच्या महत्त्वाकांक्षांसाठी. आम्हांला निराळे स्थान आहे कोठे! खरे ना? जातोस तर आनंदाने जा. मला समाधानाने निरोप दे.'

'मधुरी, नीज.'

'आता कोठली नीज?'

'हे काय, समाधानाने ना राहणार?'

'होय.'

'मग नीज. जो समाधानी असतो त्याला नीट झोप लागते. नीज मधुरी.'

सकाळ झाली. मधुरीला आज गाढ झोप लागली होती. मुले उठली. मनी आईजवळ निजलेली होती. मंगा उठला होता. त्याने मधुरीला उठविले नाही. तो मधुरीकडे पाहत होता. मधुरी हसली. किती गोड हसणे! मंगा एकदम पुढे झाला व मधुरीचे तोंड त्याने कुरवाळले. ती जागी झाली.

'झालीस का जागी?'

'मंगा, गोड स्वप्न पहात होते. तू मोडलेस माझे स्वप्न.'

'पहाटेचे स्वप्न खरे होते.'

'खरेच का?'

'हो. काय पडले स्वप्न?'

'छान छान स्वप्न. मंगा, खरेच गोड होते स्वप्न.'

'काय पाहिलेस स्वप्नात?'

'कोणाला पाहू?'

'मी काय सांगू?'

'पाहिले एकाला. त्याचे नाव आहे माहीत?'

'म्हणजे मी ना?'

'होय मंगा. तू परदेशातून घरी परत आला आहेस. सोन्या, रुपल्या तुझ्या भोवती नाचत आहेत. मनी तुझ्याकडे पाहात आहे. मी आनंदाने तुझ्याकडे पाहत आहे. तू मनीला बोलावतोस. ती येत नाही. किती गोड स्वप्न. तू माझा हात हातात घेतोस व दाबतोस. बोलत नाहीस. असे स्वप्न मी पाहिले.'

'मधुरी, आता तुझी चिंता गेली ना! देवाने जणू दृष्टान्त दिला. मी सुखरूप येईन. काळजी नको. देव तारी त्याला कोण मारी? देव मारी त्याला कोण तारी? मधुरी, मानवाच्या हातात काय आहे?'

'परंतु म्हणून जपू म्हणू नये काय? आपण काळजीने वागावे. शेवटी देवाची इच्छा. मंगा, स्वप्न गोड पडले खरे. परंतु कधी कधी स्वप्ने खोटी पडतात. खोटी ठरतात. नेमकी उलटी होतात.'

'पहाटेचे तसे होत नाही. तू नीज जरा. गोड स्वप्नाच्या गुंगीत नीज.'

'उठू दे मंगा आता. कोणी आले तर हसेल.'

'सांगेन आजारी आहे मधुरी.'

'मंगा, मला उठू दे...ती.'

'खोटे कशाला ते! उठू दे.'

मंगा तिला उठू देईना. ती रागावली, चिडली. शेवटी मधुरी

उठली. ती उभी राहिली.

'मधुरी, मी बाहेर जाऊन येतो. आपली झोपडी कोणी घेतो का पाहतो.'

'खरेच का विकणार ही जागा?'

'तू म्हणालीस ना विका म्हणून?'

'म्हटले खरे. परंतु नको विकू. ही जागा शेकडो आठवणींची. तू गेलास तर ही जागाच मला आधार देईल. या झोपाळ्यावर माझा मंगा बसे. तेथे निजे. ही फुले तो फुलवी. अशा आठवणी करीन. खरे ना! नको विकू ही जागा.'

'बरे तर जशी तुझी इच्छा. मी बाहेर जाऊन येतो.'

मंगा बाहेर गेला. मधुरी काम करू लागली. तिचे आज कामात लक्ष नव्हते. काही तरी हुरहूर तिला लागली होती. मध्येच हातातील काम ती थांबवी व सुस्कारा सोडी. सोन्या, रुपल्या तिच्याजवळ आले. तिला काय वाटले कोणास कळे. तिने एकदम सारी मुले जवळ घेतली. त्यांचे तिने मुके घेतले. त्यांच्या कपाळांवरून, डोक्यांवरून तिने हात फिरवले. मुले शांत बसली होती. आईला आज काय होते ते त्यांना कळेना. परंतु त्यांना निराळाच काही अनुभव आज येत होता. असा अनुभव पूर्वी कधी त्यांना आला नव्हता.

'गोड आहेत. माझी बाळे गोड आहेत.' असे ती त्यांना कुरवाळून म्हणाली. इतक्यात मंगा आला. तो ते गंभीर पावन दृश्य त्याला दिसले. तोही मधुरीजवळ जाऊन बसला. जणू सर्वांचा एकत्र फोटोच घ्यावयाचा होता. मंगा मधुरीला मुलाबाळांसह पोटात घेत होता. मधुरी मंगाला पोटात घेत होती. ती सर्वजणे बसली होती. मुले मध्येच आईबापांकडे पाहत व आईबाप त्यांचे पापे घेत.

'मधुरी!' मंगाने हाक मारिली.

'काय मंगा?'

'आपण सुखी आहोत, नाही? खरोखर सुखी.'

'होय हो मंगा.' असे म्हणून तिने आपले डोळे पदराने पुसले.

❖❖❖

: मंगाचे प्रयाण : : ९ :

आणि मंगा आता जाणार होता. बंदरात एक दूरचे गलबत आले होते. त्या गलबतातूनच त्याने जावयाचे ठरविले. लौकरच ते गलबत हाकारले जाणार होते. तयारी होत आली होती. निरनिराळे व्यापारी आपापला माल भरीत होते. मंगाने काही भांडवल गोळा केले होते. त्याने होते नव्हते ते विकले. दोनचार दागिने होते ते विकले. घरातील काही भांडीकुंडीही त्याने विकली. मधुरीनेच आग्रह केला. ती म्हणाली, 'आम्हांला काय करायची भांडी? मातीची भांडी असली तरी चालतील. मंगा, तुझ्याजवळ जितके जास्त पैसे असतील तितके चांगले.'

मंगाने आपल्या गावचा काही माल खरेदी केला. त्या गलबतात त्याने तो माल भरला. तो माल चढवीत असता त्याचे हृदय आशेने नाचत होते. गलबतात माल भरला जात होता. हृदयात आनंद भरत होता. आपण व्यापारी होत आहोत असे त्याला वाटले. आता मंगा शेटजी होत होता.

हमालाचा शेटजी होत होता.

घरी मधुरी एक गोधडी शिवीत होती. गावातील शिंप्याकडून तिने चिंध्या आणिल्या. छान छान चिंध्या. धोतरे, लुगडी आत घालून वरून त्या नाना रंगांच्या चिंध्या तिने शिवल्या. किती सुंदर होती ती गोधडी.

'आई, कोणासाठी ही? मनीला?' सोन्याने विचारले.

'अरे, एवढी मोठी मनीला कशाला?' ती म्हणाली.

'मग मला? रुपल्या व मी आम्ही दोघे त्यात मावू.'

'बघू पुढे. तुम्हांला मी दुसरी करून देईन हो.'

'मग ही कोणाला?'

'बाळ, कोणाला बरे?'

'बाबांना? ते जाणार आहेत दूर. त्यांना, होय ना?'

'होय हो.' मधुरीने त्याला जवळ घेऊन म्हटले.

मधुरी मंगाची तयारी करून देत होती. एकीकडे तिला वाईट वाटत होते, परंतु तिलाच तयारी करून द्यावी लागत होती. तिने लाडू केले. काही वड्या केल्या. थोडे पोहे, पापड तिने तयार करून ठेविले. लोणच्याची लहानशी बरणी बांधून ठेविली. गलबत हेच आता मंगाचे घर होणार होते.

मधुरीने ती सुंदर गोधडी अद्याप मंगाला दाखविली नव्हती. परंतु त्या दिवशी सोन्या म्हणाला,

'बाबा, तुम्हीसुद्धा कुकुले बाळच!'

'कशावरून रे?'

'आईने तुमच्यासाठी गोधडी शिवली आहे. आमच्यापेक्षा का तुम्ही लहान? तुमच्यासाठी आईला चिंध्यांची गोधडी करावी लागली.'

'कोठे आहे ती?'

'आईने कोठे तरी ठेविली आहे. किती छान आहे बाबा.'

'मधुरी, कोठे आहे ग गोधडी?'

'जाताना देईन. आधी नाही देणार.'

'दाखव ना. मला पाहू दे.'

'नाही. आयत्या वेळेला देईन तुझ्या वळकटीत मी बांधून. तुला येथे नाही दाखवायची. तू गलबतात बसल्यावर मग ती गोधडी बघ. गलबत निघेल, रात्र होईल, वारा थंडगार वाहू लागेल, तुला थंडी

वाजेल, मग तू वळकटी सोडशील, आणि ती गोधडी दिसेल. तू ती पांघरशील. तुला ऊब देईल. त्या चिंध्या नसतील हो मंगा! काय बरे ते असेल!'

'त्या चिंध्या म्हणजे माझी मोलाची वस्त्रे.'

'नाही.'

'त्या चिंध्या म्हणजे माझे प्राण. त्या चिंध्या म्हणजे माझ्यावरचे तुझे प्रेम, होय ना!'

'नाही.'

'मधुरी, मी कवी नाही.'

'मंगा, त्या चिंध्या म्हणजे माझ्या हृदयाचे तुकडे. माझ्या हृदयाचा एकेक तुकडा कापून तो मी जोडून दिला आहे; खरे ना?'

'होय हो मधुरी; परंतु मी जातो म्हणून वाईट नको वाटून घेऊस. तुझे हृदय मजजवळ असेल. ते मला तारील, ते मला सांभाळील.'

गावात सर्वत्र आता ही गोष्ट जाहीर झाली होती की मंगा जाणार. कित्येकांना आश्चर्य वाटले.

बुधाच्याही कानावर कोणी तरी ही गोष्ट घातली. त्याला काय बरे वाटले? एके दिवशी मधुरी व मुले यांना बरोबर घेऊन मंगा बंदरावर आला. आजीबाईंच्या झोपडीत ही सारीजणे गेली. खाटेवर म्हातारी पडली होती, त्या सर्वांना पाहून तिला आनंद झाला.

'आली माझी पाखरे.' ती म्हणाली.

'परंतु मोठे पाखरू आजी उडून जाणार आहे.'

'मोठ्या पक्ष्यांना पंख फडफडवीत लांब गेल्याशिवाय चैन पडत नाही; त्यांच्या पंखांची शक्ती जाते नाही तर.' म्हातारी म्हणाली.

'सोन्या, तुम्ही जा, खेळा. भांडू नका मात्र. डोक्यात वाळू उडवू नका. शिंपा, कवड्या आणा गोळा करून.'

'शंख पण आणू आई?' रुपल्याने विचारले.

'हं, आणा.' मधुरी म्हणाली.

सोन्या व रुपल्या खेळायला गेले. मनी तेथेच खेळत होती.

'मंगा, नसता गेलास तर नसते का चालले?'

'आता काय आजी? आता तर गलबत भरण्यात आले.'

'अजून रिकामे करता येईल.'

'ती फजिती आहे. साऱ्या गावात मी जाणार असे झाले आहे. आता ऐन वेळी का माघार घेऊ? मग मधुरीला काय वाटेल!'

'मधुरीला मोक्षसुख वाटेल.'

'नको, पण आता मी जाईनच. ठरले ते ठरले. आजी, मी परत येईन; परंतु तोपर्यंत तू-तू आमची मायबाप. आम्ही तुझ्याजवळ लहानपणी खेळलो, तुझ्याजवळ खाऊ खाल्ले, तुझ्याजवळ भांडलो, खरे ना? तू मधुरीचे बाळंतपण केलेस. आजी, तुझे किती उपकार!'

मंगा, उपकार हा शब्द नको बोलूस. माझ्या समाधानासाठी ते मी सारे करीत असे. माझ्या सुनेचे, मुलीचे बाळंतपण करण्याचे भाग्य मला नाही लाभले. परंतु ते सुख मी अनुभवले. मधुरी माझी सून का मुलगी? दोन्ही; खरे ना! मी हा आनंद मिळविला. थोडी धन्यता मला वाटली.'

'आजी, मला तुझा आशीर्वाद आहे ना!'

'माझा आशीर्वाद आहे; परंतु देवाची दया हवी.'

'आजी, तुझ्यासारख्या प्रेमळ माणसात का देव नाही! देवाच्या दयेचा तुझ्यासारख्यांच्या द्वाराच साक्षात्कार होतो. तुझा आशीर्वाद असेल तर देव का शाप देऊ शकेल?'

'जातोस तर जा. परदेशात जाणार. जपून राहा. हवापाणी सदैव बदलते. मधुरीची व मुलांची आठवण ठेव. ती आठवण तुला तारील. ती आठवण तुला वाटेल तसे वागू देणार नाही. ती आठवण तुला असली म्हणजे तू प्रकृतीची काळजी घेशील. खरे ना!'

'होय आजी मी यांच्यासाठीच जात आहे. माझ्या मनाच्या

लहरीसाठी नाही जात. मधुरीला सुखात ठेवावे, मुलांना सुखात ठेवावे म्हणून मी जात आहे.'

'मंगा आम्ही सुखातच होतो हो.'

'ते खरे, परंतु अधिक सुख देता यावे म्हणून जात आहे.'

'मंगा, तू परत केव्हा येशील? फार लोभात गुंतू नकोस. परत ये. पुन्हा परत जा. येणाऱ्या- जाणाऱ्या गलबताबरोबर चिठ्ठी, पत्र पाठवीत जा. खुशाली कळव.'

'आणि कोणी न भेटले तर?'

'वाऱ्यावर निरोप पाठव. रोज वाऱ्याबरोबर बातमी कळव. तो वारा येऊन सारे सांगेल. मधुरी समुद्रावर येईल. ती वाऱ्यावरचा निरोप वाचील. खरे ना मधुरी!'.

'होय, आजी.'

इतक्यात सोन्या व रुपल्या आले. किती तरी सागरी संपत्ती त्यांनी गोळा करून आणिली होती. शिंपा, शंख, कवड्या, ती सारी संपत्ती आईबापांच्या चरणी त्या बाळराजांनी अर्पण केली.

'बाबा, तुम्ही काय आणाल हो तिकडे जाऊन?'

'याच्याहून मोठे शंख आणाल?'

'आणि मोठ्या कवड्या आणाल?'

'मी मोती आणीन, मोती.'

'बाबा, मोती म्हणजे तरी अशीच ना?'

'तिकडे का मोती किनाऱ्यावर येऊन पडतात?'

'मला माहीत नाही हो बाळ.'

'आई, चल ना घरी.'

'सोन्या, तू येथेच राहा.'

'आई राहते का?'

'नाही. पण तू राहा. मी येथे एकटी आहे. मला सोबत राहा.

मला रात्री भीती वाटते. चोर आले तर तू त्यांना काठीने हाकल. राहतोस का?'

'परंतु चोर येईल कशाला? तुमच्याकडे आहे तरी काय? श्रीमंताकडे चोर येतात आजी.'

'मी श्रीमंतच आहे सोन्या.'

'आणि मग अशी कशी झोपडी?'

'चोरांनी येऊ नये म्हणून मुद्दाम झोपडी.'

'आई, चल ना, भूक लागली.'

'बरे चला. आजी, जातो आता आम्ही.'

'दिवस ठरला ना मंगा?'

'हो परवा जायचे. परवा सकाळी आठ वाजता हाकारणार आहे गलबत.'

'जाताना भेटून जाशीलच.'

'हो, परंतु त्या वेळेस बोलवणार नाही, म्हणून आज आलो.'

निघाली सारी मंडळी. मंगाने मनीला घेतले होते. मुले बरोबर उड्या मारीत चालली होती.

'बाबा, मला घ्या उचलून, मी दमलो आहे.' रुपल्या म्हणाला.

'तू का लहान रुपल्या?' मधुरी म्हणाली.

'घ्या ना बाबा.'

मंगाने मनी मधुरीजवळ दिली. खरोखरच रुपल्याला उचलून घेतले.

पुन्हा रुपल्या कधी भेटणार होता? मंगाचे मन गहिवरून आले होते. तो रुपल्यास थोपटीत होता. रुपल्याने खांद्यावर प्रेमाने मान ठेवली होती. बापलेक सुखावले होते.

'ठेव त्याला खाली. हात दुखेल हो मंगा.' मधुरी म्हणाली.

'हात नाही दुखत.' मंगा म्हणाला.

'बाबा, उतरवा आता मला; पुरे.' रुपल्या म्हणाला.

रुपल्या उतरला. सारी घराजवळ आली. मधुरी घरात गेली. मंगा बाहेरच झोपाळ्यावर होता. सोन्या, रुपल्या त्याच्याजवळ होते.

'बाबा, मी आता मोठा झालो, नाही!'

'हो तू आईला मदत करीत जा. भांडू नको. भावंडांना खेळव.'

'बाबा तुम्ही मला उचला ना. मला लहान समजून घ्या ना.'

आणि मंगाला ते शब्द विरघळविते झाले. तो उठला. त्याने सोन्याला उचलले. सोन्या जड होता. त्याने सोन्याला हिंडविले. इतक्यात मधुरी बाहेर आली.

'हे रे काय सोन्या! तू का लहान आता! कोणी पाहिले तर काय म्हणेल? उतर वेडा कुठला.'

सोन्या उतरला. तो झोपाळ्यावर वडिलांजवळ बसला. मंगा सोन्याच्या पाठीवरून हात फिरवीत होता. जसजसा जाण्याचा दिवस येत होता तसतसे प्रेम वाढत होते. बोलणे, चालणे, पाहणे सारे प्रेममय होत होते. हळुवार, गोड सुकुमार होत होते, आंबट आंबा पिकत होता. सारे रसमय होत होते.

आज मधुरीने जेवायला गोड केले होते.

'आज का सण आहे मधुरी! उद्या सकाळी मी जाणार. तुला तर वाईट वाटत आहे. मग हे गोड कशाला? दिवाळी थोडीच आहे?'

'मंगा, तू पुन्हा केव्हा येशील? जाताना तुझे तोंड गोड करू दे. आता निरनिराळे सण येतील. परंतु तू नसशील. परदेशात असशील. ना तेथे कोणी ओळखीचे, ना कोणी नात्याचे. आम्हाला आठवणी येतील. तुला कोण तेथे देईल गोडधोड! म्हणून हे आज देऊन ठेवते. त्या परदेशात येणाऱ्या सणासाठी हो ही आजची माझी मेजवानी. हे गोड तेथे आठव. मधुरीच्या हातचे पक्वान्न आठव.'

सारी त्या टेकडीवर गेली. मुले पाण्यात खेळत होती आणि मंगा व मधुरी टेकडीवर खेळत होती. दोघे जवळ जवळ बसली होती.

हातात हात घेऊन बसली होती.

'मंगा, काय दिसते आहे समोर?'

'समुद्र.'

'आणि त्याच्या पलीकडे!'

'नाना देश, नाना लोक. तुझे भाग्य.'

'मंगा, आपण अशी बसलो म्हणजे सारे भाग्य असते हो त्यात.'

'मधुरी, आपण थोडा वेळ पुन्हा लहान व्हायचे का? घसरगुंडी करायची का?'

'हं. पण लोक हसतील हो.'

'कुठे आहेत लोक! आणि कोणी पाहिले तर पाहिले. इतके लोकांना काय भ्यायचे! चल, धर माझा हात. एकदम धर्रकन् सर्रकन् खाली जाऊ.'

आणि दोघे खरेच घसरत खाली गेली. हसली. पुन्हा पळत वर आली.

'पुरे मंगा.'

'एवढ्यात दमलीस?'

'मंगा, तीन बाळंतपणे झाली माझी. मी का पूर्वीची आहे?'

'बाळंतपण म्हणजे मरण. तीन मरणांतून वाचलीस. होय ना!'

'कठीण असते हो मंगा.'

'आणि आता चौथे येईल तेव्हा मी नसेन.'

'तू सहा महिन्यांत परत नाही येणार?'

'काय नेम! वाऱ्यावर सारे अवलंबून. आलो तर ठीक, नाही आलो तर! मधुरी, आता आपण समुद्राच्या व वाऱ्याच्या स्वाधीन.'

'मंगा, तू नको जाऊस, मला भीती वाटते.'

'वेडी आहेस.'

'मंगा, वाळूच्या टेकड्याही काय कामाच्या!'

'वाळूच्या टेकड्याही काही निरुपयोगी नाहीत. या टेकडीवर आपण लहानपणापासून येत आहोत. ती टेकडी का नाहीशी झाली! मधुरी, मी सुखरूप परत येईन. तुझी गोधडी मला परत आणील. परंतु तुझ्या नव्या बाळंतपणाच्या वेळीच येईन असे नक्की थोडेच आहे! काय ठेवशील नव्या बाळाचं नाव! आपण ठरवून ठेवू.'

'काय ठेवायचे सांग.'

'वेणू नाव मला आवडते.'

'बरे तर. ठेवीन, पण मुलगा झाला तर!'

'त्याचे नाव मोत्या ठेव. मी मोती आणायला जात आहे. तुझ्या पोटी मोती देऊन, तुझ्या ओटीत मोती घालून जात आहे, मोती नाव ठरलं हं.'

'बरे हो मंगा.'

'आज बुधा नाही आपल्याबरोबर.'

'त्याला कळले असेल का?'

'साऱ्या गावाला कळले आहे. त्याच्याही कानावर गेली असेल वार्ता.'

'मंगा, त्याचा निरोप घेऊन येशील?'

नको. मला धैर्य नाही होत. त्याच्या घराभोवती भूत आहे. मधुरी, येथेच मला त्या दिवशी दिसले. मला भीती वाटली.'

आणि मंगाच्या अंगावर काटा उभा राहिला. तो त्या आठवणीने घाबरला. मधुरीने त्याला धरून ठेविले. तो शांत झाला. आसपास पाहू लागला. मग हसला.

'किती भित्रा मी मधुरी!'

'भुतांची भीती वाईट हो. तू मनातून ते काढून टाक.'

'चल आपण खाली खाऊ. मुलांमध्ये मिसळू.'

दोघे खाली आली. मुले समुद्रकाठच्या जंमती जमवीत होती.

'पुन्हा बांधू किल्ला मधुरी!'

'मी राणी.'

'आम्ही तुझे नोकर.'

'लहानपणी सारी मजा असते.'

आणि खरेच मंगा किल्ला बांधू लागला. मुलेही आली मदतीला. काय जोरात सुरू झाले आणि किल्ला तयार झाला. मुलांनी टाळी वाजविली आणि रुपल्याने एकदम हातांतली शिंपली त्याच्यावर फेकली. ढासळला किल्ला.

'लहानशा शिंपलीने ढासळला किल्ला.' मंगा म्हणाला.

'चला, आता घरी जाऊ.' मधुरी म्हणाली.

'एवढ्यात नको आई.' सोन्या म्हणाला.

'अरे भूक लागली; जाऊ.' रुपल्या म्हणाला.

'अरे, त्या मनीला आण. ती बघ तिकडे डोक्यात वाळू घालीत आहे. जा सोन्या.'

सोन्याने तिला आणिले. आईने तिचे डोके झाडले.

'डोक्यात का वाळू घालायची?' असे मधुरीने रागाने म्हटले. मनी रडू लागली.

'हे काय मधुरी, तिन्हीसांजा का रडवायचे! उगी हो मनू उगी. ये तू माझ्याजवळ. मधुरी, मी गेल्यावर मुलांना कधी रागे भरू नकोस. पाच बोटांची थप्पड लावू नकोस. रडवू नकोस, समजलीस ना! त्यांना मारलेले मला लागते.'

'हो, तुला लागते. काय बोलतोस! बरे जाऊ दे. चला आता घरी. ये मने.'

'मी नाही येत जा.' ती चिमुरडी म्हणाली.

आणि मंगाने तिला उराशी अधिकच घट्ट धरिले. सर्व मंडळी घरी आली. दिवे लागले. झोपाळ्यावर मुलांसह मंगा बसला होता. गाणे म्हणत होता. तो आनंदी होता, का गाण्यामुळे मनातील भावना

लपवीत होता? त्याचे गाणे भरलेल्या मनाचे निदर्शक होते ही गोष्ट खरी, आणि आतून मधुरी गाणे म्हणू लागली. मंगा गप्प राहिला.

डोळ्यांमध्ये फिरून फिरून येते राया जळ
युगापरी एकेक मला वाटेल गड्या, पळ।।
मला वाटे हुरहुर
नको गड्या, जाऊ दूर
हृदयाला माझ्या लागे वेदनांची कळ।।
करपून जातो माझा जीव
कर सख्या माझी कीव
कोमेजती सारी गात्रे लागे त्यांना झळ।।
नको करू बघ हट्ट
धरून ठेविन तुला घट्ट
प्रेमाचे रे माझ्या आहे अपरंपार बळ।।

मधुरीचे गाणे थांबले. कापणाऱ्या आवाजात तिने ते म्हटले होते. मंगा व मधुरी बाहेर झोपाळ्यावर बसली होती. आता गाणे नव्हते, काही नव्हते.

'मंगा!'

'काय मधुरी! बोल सारे.'

'जाणार एकंदरीत तू उद्या. तू उद्या गेलास म्हणजे कसे रे होणार माझे? मी रडेन, रडेन. सारखी तुझी आठवण येईल. माझ्या रोमरोमांत तू गुलामा भरला आहेस.'

'मधुरी, मी लवकर परत येईन हो. जप साऱ्या पिलांना. बाळंतपणात काळजी घे. आजीबाईला मी सांगितलेच आहे.'

'तू नको काळजी करूस.'

'तू जिवाला लावून नको घेऊस.'

पुन्हा दोघे थांबली.

'माझ्या मधुरीला मी काय काय तरी आणीन.'

'मंगा, तू आजपर्यंत जे दिलेस त्याहून का ते अधिक मोलवान् असेल? अधिक किंमतीचे असेल? अधिक हृदयापाशी धरण्याच्या लायक असेल? पण आण हो. जंमती जंमती आण. मग मंगाची मी खरी राणी होईन, काळीसावळी राणी.'

'चल आता आत. गार वारा सुटला आहे.'

'येथेच बसू. तुझ्या प्रेमाची ऊब मिळत आहे.'

शेवटी दोघे घरात गेली. पिले झोपली होती.

'बघ कशी निजली आहेत पाखरे. गोड आहेत माझी पाखरे!'

'खरेच हो.' मंगा म्हणाला.

दोघे किती वेळ तशीच मुलांजवळ बसली होती आणि हळूहळू झोपी गेली. मधुरी लौकर उठली. स्वयंपाक करावयाचा होता. ती काम करीत होती. मंगाही उठून आला.

'मधुरी, आज फार गार आहे नाही! कशाला उठलीस इतक्या लौकर!'

'मंगाची भाकर भाजायला.'

'चल जरा पडू. चल मधुरी.'

'नको आता. पाखरे किलबिल करू लागली हो.'

'पण आपली पाखरे झोपली आहेत. चल मधुरी.'

'नको आता.'

'हे ग काय!'

आणि त्याने तिला नेले. मुले जागी झाली.

'बाबा, झाली वेळ!'

'नीज, अजून अवकाश आहे.'

'मला नाही झोप येत. मी तुमच्याजवळ येतो. मला थोपटा.'

सोन्या मंगाजवळ आला. तो बापाच्या मांडीवर डोके टेकून

पडला. मंगा थोपटू लागला आणि रुपल्या उठला तोही आला. त्यालाही बाप थोपटू लागला.

'मंगा, मी जाते. आटोपायला हवे सारे.'

असे म्हणून मंगाच्या खांद्याला चिमटा घेऊन मधुरी गेली. उजाडले आता. प्रकाश आला. अंगणात फुले फुलली होती. मनीला घेऊन मंगा हिंडत होता. मनीच्या केसांत फुले अडकवीत होता; आणि त्याने एक गुलाबाचे फूल तोडले. सुंदर घवघवीत फूल. घरात येऊन त्याने मधुरीच्या केसांत घातले. तो पाहात राहिला.

'सीतेच्या केसांत घातलेली फुले कोमेजत नसत.' मधुरी म्हणाली.

'परंतु हे कोमेजेल.' मंगा म्हणाला.

'नाही कोमेजणार. मी डोळ्यांतील पाणी शिंपडून ते टवटवीत ठेवीन.'

आणि आता वेळ होत आली. मंगा, मुले जेवायला बसली.

'मधुरी, तूही ये आता. मागून नको.'

'बरे तर.'

आता बोलणे बंद पडले. डोळे भरून येत व बघत. पटकन् जेवणे झाली.

आणि झाली वेळ. सारी बंदरावर जाण्यास निघाली. मंगा क्षणभर घरात उभा राहिला. त्याने मधुरीला घट्ट धरले. कोणी सोडीना.

'चल आता मधुरी.'

'चला.'

अंगणात त्याने फुले पाहिली.

'सोन्या, रुपल्या, फुले फुलवा हो, त्यांना पाणी घाला. सुकू देऊ नका या फुलझाडांना, मी आणखीन निरनिराळी फुलझाडे आणीन.'

'निळी फुले आणा बाबा.'

'नाहीतर पिवळी.'

हळूहळू बंदरावर ती आली. आजीबाईकडे गेली. आजीबाई वाटच पहात होती. मंगा पाया पडला. तिने अंगारा लाविला. 'जप हो, लौकर परत ये.' ती म्हणाली आणि पुन्हा सर्व समुद्राकडे निघाली. गलबत पाण्यात दूर उभे होते. मंगा मधुरीचा हात धरून उभा होता.

'चला, वेळ झाली.' खलाशी म्हणाले.

'मधुरी!'

'मंगा, मंगा.'

मंगाने मुलांचे मुके घेतले. मधुरीचा हात हाती घेतला. तिच्याकडे डोळे भरून त्याने पाहिले. 'लौकर येईन, जप.' असे अश्रुपूर्ण शब्दांनी म्हणून तो होडीत बसला. होडी निघाली. झरझर जात होती. मधुरी पहात होती. मुले पहात होती. होडी गलबताजवळ गेली. मंगा गलबतावर चढला. होडी परत आली. मंगा तेथे उभा होता. इकडे बंदरावर मुलांसह माता उभी होती. गलबत हाकारण्याची वेळ झाली. निघाले गलबत. मंगाने हात हालवला. मधुरीने हालवला. मुलांनी आपल्या बाहूंचे बावटे नाचविले. गलबत हळूहळू निघाले. मधुरी पहात होती. तिचे सौभाग्य चालले होते. तिच्या जीवनातील सर्वांत मोठा माल त्या गलबतात होता. किती तरी वेळ ती तेथे उभी होती. शेवटी दिसेना काही. गलबत वळले, दृष्टीआड झाले.

'आई, चल घरी.' सोन्या म्हणाला.

'आई, धर माझा हात.' रुपल्या म्हणाला.

मनीला जवळ घेऊन रुपल्याचा हात धरून ती माता घरी आली आणि अंथरुणावर पडली. जमिनीच्या अंथरुणावर दाबलेले अश्रू बाहेर आले. तिचे रडू थांबेना.

'आई!' सोन्या हाक मारी.

'हे काय आई?' रुपल्या म्हणे.

शेवटी ती शांत झाली. मुलांदेखत रडणे तिला पाप वाटले. ती जरा हसली. तिने त्यांना जवळ घेतले, त्यांचे पापे घेतले. मुले आनंदली.

'आम्ही जाऊ खेळायला?'

'जा. भांडू नका.'

'भांडू कसे? बाबांनी सांगितले आहे भांडू नका.' सोन्या म्हणाला. असे म्हणून मुले गेली. मधुरीने मनीला जरा निजविले आणि ती? तिला काही सुचेना. सारे तिला शून्य वाटत होते. गळून गेल्यासारखे वाटत होते. ती अंगणात आली. तिने फुले पाहिली. दूर पाहिले. पुन्हा घरात आली. हात जोडले. ती देवाला आळवीत बसली. डोळे मिटून बसली. अपार सागरात त्याचाच आधार. त्याच्या स्मृतीचाच आधार.'

'देवा, आण हो माझा राजा लौकर. सुखरूप आण.' ती म्हणाली. डोळ्यांतून अश्रूंची फुले घळघळली आणि मंगा! तोही तिकडे प्रभूची, अश्रुमय पूजा करीत होता.

❖❖❖

: एकटी मधुरी : : १० :

मंगा गेला. मधुरी घर चालवीत होती. मंगाने जाताना काही रुपये देऊन ठेविले होते; परंतु ते पैसे तिने बाजूला ठेविले. अडीअडचणीसाठी ठेवून दिले. ती मोलमजुरी करू लागली. मुलांना ती भाकर करून देई व कामाला जाई.

'सोन्या, भांडू नको हो. मी जाते कामाला. मनीला नीज आली तर निजव.' असे सांगून ती कामाला जाई, आणि मुले भांडत नसत. आई येईपर्यंत खेळत, मनीला निजवीत. कामावरून आल्यावर ती मुलांना जवळ घेई. त्यांच्या पाठीवरून हात फिरवी. 'भांडलेत नाही

ना राजांनो!' असे म्हणे.

'गुणाची आहेत माझी बाळे.' असे म्हणे.

एके दिवशी ती कामावरून आली. मुलांना घेऊन बसली.

'आई, बाबा कधी येतील ग?' सोन्याने विचारले.

'येतील हो लौकरच. का रे?' तिने त्याला जवळ घेऊन प्रश्न केला.

'आई, मला शाळेत जावेसे वाटते. तू रे का शाळेत येत नाहीस?' असे तो गोविंदा म्हणाला.'

'तू काय सांगितलेस!'

'बाबा आले म्हणजे मी येईन शाळेत. ते मला पाटी आणतील. चित्रांची पुस्तके आणतील, असे मी सांगितले.'

'होय हो, ते पुस्तके आणतील, सारे आणतील.'

मधुरीला वाईट वाटत होते. ती आता गरीब होती. घरी मुलांना सांभाळायला कोणी तरी पाहिजे. सोन्याला शाळेत जाऊन कसे चालेल? तिला कामाला जायचे असे. गरिबांच्या मुलांना कोठली शाळा, कोठले शिक्षण? घरी खायला नसता शाळा तरी सुचणार कशी? सक्तीचे शिक्षण केलेत तर गरिबांवर ती खरीच आपत्ती आहे. गरिबांची मुले घरी पाहिजे असतात. ती लहान असतात तोच मदत करू लागतात. शेण गोळा करतात, गुरे राखतात, काही काम करतात. त्यांच्या घरी खाण्यापिण्याची ददात नसेल तेव्हाच ती शिकायला येतील. हातात आधी भाकर द्या व मग पाटी द्या. हातात आधी भाकर द्या मग ज्ञान द्या. देव द्या. सारी संस्कृती अन्नब्रह्मावर उभारलेली आहे. अन्न म्हणजे परमेश्वर असे म्हटले आहे ते खरे आहे. या परब्रह्माचा साक्षात्कार सर्वांना आधी करून द्यायला पाहिजे.

मधुरी फार काम करी. सोन्याही एके ठिकाणी काम करायला जाऊ लागला. परंतु एके दिवशी धन्याने सोन्याच्या थोबाडीत मारली. तो रडत रडत घरी आला. मधुरी आल्यावर त्याने सारी हकीकत सांगितली.

‘सोन्या, काम करायला हवे बाळ. उद्या मी बाळंत झाल्यावर दुसरे कोण आहे घरात?’

‘आई, दुसऱ्या कोणाकडे पाठव ना कामाला?’

‘दुसरे कोण आहे बाळ?’

‘आई, ते एक गृहस्थ मला विचारीत होते की, तू येशील का माझ्याकडे कामाला? त्या उंच माडीत ते राहतात. काय बरे त्यांचे नाव?’

‘बुधा त्यांचे नाव.’

‘जाऊ त्यांच्याकडे कामाला!’

‘नको बाळ. सध्या तरी नको.’

‘तुझ्या ओळखीचे आहेत ते?’

‘हो.’

‘ते चांगले नाहीत?’

‘चांगले आहेत हो.’

‘मग का नको जाऊ!’

‘त्यांच्याकडे शिकायला जात जा; म्हणावे मला शिकवा.’

‘ते शिकवतील?’

‘हो.’

दुसऱ्या दिवसापासून सोन्या थोडा वेळ बुधाकडे जाऊ लागला. बुधाला आनंद झाला. तो त्याला आपल्याजवळ बसवी. दूध प्यायला देई. त्याला लिहायला शिकवी. चित्रे काढायला शिकवी. गप्पा मारी.

‘तुम्ही मला एकट्याला खाऊ देता.’ सोन्या म्हणाला.

‘आणखी कोणाला देऊ?’

‘घरी रुपल्या आहे. मनी आहे.’

‘आणखी कोण आहे?’

‘आई आहे.’

‘आईलाही खाऊ हवा का?’

‘खाऊ लहान मुले खातात.’

‘बरं, हा तुझ्या भावंडांना ने. हा आईला ने.’

‘आईचा आम्हालाच मिळेल.’

‘तुम्ही घेऊ नका. तिला खायला लावा.’

आणि सोन्या खाऊ घेऊन आला. त्याने लहान भावंडांना दिला. रुपल्या आणखी मागू लागला. सोन्या रागे भरला. आज त्याला आपण मोठे आहोत असे वाटत होते. ‘पुरे तेवढा. एकदम का संपवायचा आहे?’ असे त्याला पोक्तपणे सांगत होता. आई घरी आल्यावर त्याने तिला सारी हकीकत सांगितली.

‘आई, तू खा ना खाऊ?’ सोन्या सांगू लागला.

‘तुम्हांलाच होईल. मी का लहान?’ ती म्हणाली.

‘ते मला विचारतील. मग काय सांगू?’

‘सांग आईने खाल्ला म्हणून.’

‘खोटेच? आई, थोडा तरी वडीचा तुकडा खा. नखाएवढा.’ सोन्याने आईच्या तोंडात तुकडा दिला. आईने खाल्ला. बुधाच्या घरचा खाऊ.

एके दिवशी मधुरीचे पोट दुखू लागले.

‘सोन्या, जा बंदरावरच्या आजीला बोलावून आण.’ ती म्हणाली. सोन्या धावतच गेला. तो आजीला घेऊन आला.

‘काय मधुरी?’ ती जवळ बसून म्हणाली.

‘पोट दुखत आहे. तू येथेच रहा दहा दिवस.’

म्हातारीने सारी तयारी केली. मुले घिरट्या घालीत होती. बाहेर खेळत होती. पोट बरेच दुखत होते. काय करावे? शेवटी एकदाचे मूल बाहेर आले. परंतु जिवंत नव्हते. ते मृत मूल होते. मधुरीला वाईट वाटले. म्हातारी तिला समजावीत होती. दोन दिवस गेले. मधुरी खिन्नपणे खाटेवर पडली होती.

'आजी, नाव काय ठेवावयाचे तेही आम्ही ठरवून ठेवले होते.'

'काय ठेवावयाचे?'

'मुलगा झाला तर मोती नाव ठेवू, मुलगी झाली तर वेणू, असे मंगा सांगून गेला होता. परंतु मोत्याचा चूर झाला. वेणू पिचली. आजी, हा अपशकुन तर नाही ना? वेडेवेडे माझ्या मनात येत आहे.'

'तू हातीपायी नीट सुटलीस यातच आनंद मान. आहेत तीन मुले. त्यांना वाढव. डोळे पूस. मनाला लावून घेऊ नकोस.' म्हातारी समजूत घाली.

दिवस भरभर जात होते. म्हातारी पुन्हा बंदरावरच्या झोपडीत गेली. मधुरी कामधंद्याला जाऊ लागली. एखादे वेळेस तिला वाटे, नवीन बाळ देवाने नेले, बरे केले. ते घरात असते तर मी कामाला जाऊ शकले नसते. मुलांना कसे पोसले असते? देव करतो ते बऱ्यासाठी. परंतु हा विचार तिला आवडत नसे, असे मनात येऊन तिला रडू येई.

ती मधूनमधून समुद्रावर जाई. 'वाऱ्या, वाऱ्या, मंगाला सुखी ठेव' असे म्हणे. ती समुद्राकडे पही. कोठे असेल मंगा असे मनात येऊन तिला वाईट वाटे. देवाला हात जोडून ती परत येई.

आणि एके दिवशी प्रचंड वादळ सुटले. तुफान वारे उठले. घों घों आवाज होत होता. किती झाडे पडली. बंदरावरची शेकडो नारळाची झाडे पडली. कित्येक घरांवरची छपरे उडून गेली. वाळूच्या नवीन टेकड्या तयार झाल्या. समुद्र असा कधी खवळला नव्हता. बंदरातील काही गलबते मोठ्या मुश्किलीने वाचली. काही होड्या, काही पडाव उलटले. पर्वतासारख्या लाटा. एका तडाख्यासरशी होड्या पालथ्या होत. सारी मंडळी दारे लावून घरी बसली होती. मुलांना घेऊन मधुरी झोपडीत होती. झोपडीत वारा घुसे, झोपडी उडून जाईल असे वाटे. मुले आईला मिठी मारीत. बिलगून बसत.

मधुरीच्या डोळ्यांसमोर मंगा आला. तो कोठे असेल? समुद्रात अशी वादळे उठतात. त्याचे गलबत नसेल ना सापडले वादळात?

असेल ना ते सुखरूप? नाही नाही ते तिच्या मनात येई. तिला अनेक गोष्टी आठवत व तिच्या अंगावर काटा उभारे.

लोक म्हणाले, असे वादळ कित्येक वर्षांत झाले नव्हते. ज्याच्या त्याच्या तोंडी वादळाच्याच गोष्टी. अनेक लोकांचे नुकसान झाले होते. काहींचा माल यायचा होता. ती गलबते वादळात तर नसतील ना सापडली? अनेकांचे चेहरे चिंतातूर होते.

काही दिवसांनी नवीन गलबते बंदरात आली. बंदरावर गर्दी झाली. वादळाची हकीकत सारे विचारीत होते. भयंकर गोष्टी. समुद्रातील हकिकती! आपण आता बुडणार असे कसे वाटले , परंतु पुन्हा कसे सावरलो; आमच्या डोळ्यांदेखत काही गलबते, मचवे कसे बुडले, त्यांच्या किंकाळ्या, आक्रोश कसे सारे ऐकले वगैरे गोष्टी आलेल्या गलबतांवरील लोक सांगत होते. मधुरीही बंदरावर गेली होती. गेल्यापासून मंगाने चिठ्ठीचपाटी पाठविली नव्हती! का नाही पाठविली? तो मधुरीला का विसरला? त्याला का राग आला होता? का त्याला दुसरे गलबत भेटलेच नाही? मंगाचा काही निरोप कळेल, काही बातमी मिळेल, म्हणून मधुरी आशेने आली होती. परंतु काही कळले नाही. ती खिन्न होऊन माघारी गेली.

नवीन गलबत आल्याचे कळलें की ती वाऱ्याप्रमाणे बंदरावर जाई. काही निरोप मिळतो का बघे. खलाशांना विचारी; परंतु पत्ता लागत नसे. जड मनाने ती घरी परत येई. मधुरी आता नेहमी सचिंत असे. तिचा आनंद मावळला. ती रात्री देवाला आळवीत बसे. काय करावे तिला सुचेना.

आता अशात सोन्या आजारी पडला.

मधुरीला कामाला जाता येईना. ती सोन्याजवळ बसलेली असे. नवीन बाळ मेलेलेच जन्मले. आता जिवंत आहेत ती तरी राहू देत. मंगा येईल, त्याच्याजवळ ही त्याची जिवंत दौलत मी पुन्हा देईन, असे ती मनात म्हणे. सोन्याच्या डोक्यावरून ती हात फिरवी. सोन्याचा ताप निघेना. मधुरी आता मजुरीसाठी जात नसे. घरातले

पैसे संपले. मंगाने अडीअडचणीसाठी म्हणून ठेवलेले पैसे तेही संपले. आता खायचे काय? कशाचे औषध? कोठले दूध? कोठले फळबीळ?

'आई, बाबा कधी येतील? लौकर येईन म्हणाले. अजून का येत नाहीत? कधी येतील? खरे सांग, कधी येतील?' सोन्याने विचारले.

'येतील रे राजा. शांत पडून रहा.' आई समजावी.

आणि सोन्या आता वातात असे. वातात बडबडे. उठू बघे.

'केवढाल्या लाटा! ते बघ आई बाबांचे गलबत. आली लाट. बाबा, बाबा. अरे, कोठे आहे गलबत? कोठे आहेत बाबा? ते बघ, आई, ते बघ, लाटांतून हसत वर येत आहेत. खाऊ हातात आहे, चित्राचे पुस्तक आहे. ओहो, आले, बाबा आले.'

वातात असे तो काही बोले. मधुरी दुःखाने सारे ऐके.

एके दिवशी बुधा एका वैद्याला घेऊन आला. मधुरी चपापली. तिने बसायला घातले.

'मधुरी, वैद्याला घेऊन आलो आहे.' बुधा म्हणाला.

'तुला कोणी सांगितले सोन्या आजारी आहे म्हणून?'

'मला सारे समजते.'

वैद्यबोवांनी परीक्षा केली. नाडी तपासली. जीभ पाहिली. डोळे पाहिले.

'लक्षणे बरी आहेत. नाडी चांगली आहे. मात्र मुळी उठू द्यायचे नाही.'

वैद्य म्हणाले.

'पथ्यपाणी?'

'ताक द्यायचे. गोड अदमुरे ताक.'

'औषध?'

'मी पुड्या पाठवीन. त्या मधातून द्या. चाटवा.'

वैद्य निघून गेले. बुधा तेथेच बसला होता. तो गंभीर होता. मुका होता. सोन्याचा हात हातात घेऊन बसला होता.

'मधुरी!'

'काय?'

'तू एकटी किती जाग्रणे करणार? दिवस, रात्र किती शुश्रूषा करणार?'

'आजीबाईलाही सध्या बरे नाही. नाहीतर म्हातारी आली असती. ती एक आमचा आधार. आकाशच आता फाटले आहे.'

'मधुरी!'

'काय बुधा?'

'मी नाही का आधार? मी नाही का आकाशाला थोडे ठिगळ लावणार? मी नाही का तुझा कोणी? मी आज आलो म्हणून का तुला वाईट वाटले? खरे सांग.'

'बुधा, सांगायची काय जरुरी? मला काय वाटले असेल ते तुला नाही का कळत? न बोलता नाही का कळत?'

'मधुरी!'

'काय?'

'तुला एक विचारू?'

'विचार.'

'मी येऊ का पहारा करायला? रात्री जागायला? नाही तर तुझे आणखी आंथरूण घालावे लागेल. तू नाही आजारी पडता कामा.'

'बुधा, माझे नाही हो भाग्य आजारी पडून मरायचे. दुःखे भोगण्यासाठी मला जगायचे आहे.'

'या मुलांना वाढविण्यासाठी तू नको का? आणि मंगा आशेने येईल, त्याच्यासाठी नको का जगायला? आणि मला दुरून तुझा ओलावा मिळावा म्हणून तू नाही का जगणार? आणि मधुरी, तू प्रकृतीस जपले पाहिजेस. तू कशी होतीस, कशी झालीस? तुझे डोळे,

गाल बसले. हसणे निघून गेले. मधुरी, असे नको करू. मी मदत देईन. पैसे देतो. दूध घेत जा. नीट जेवत जा. माझा का तुझ्यावर थोडाही हक्क नाही? मी का केवळ परका? तुझ्या हृदयात, तुझ्या जीवनाच्या बागेत मीही एक घरटे बांधलेले होते. नाही का?'

'काय सांगू बुधा?'

'मी येऊ का रात्री सोबत? मी सोन्याजवळ बसेन. तू झोप. सोन्याला बरे वाटेपर्यंत येईन. त्याचा ताप निघू दे. घाम निघू दे. मग नाही येणार; येऊ का?'

'मी काय सांगू?'

'मग कोण सांगणार?'

'तुला बरे वाटेल, बरे दिसेल तसे कर.'

'मग आज रात्री येऊ?'

'बुधा!'

'काय मधुरी? घुटमळू नकोस.'

'दिवसा येत जा, तुला नसेलच रहावत तर. रात्री मला काय उद्योग आहे? दिवसा ये. मला चुलीजवळ बसावे लागते. धुणी धुवावी लागतात. सोन्याजवळ तू बसत जा. चालेल?'

'रात्रीही आलो म्हणून काय बिघडले?'

'लोक आहेत हो बुधा.'

तुझे मन निष्पाप आहे ना!'

'बुधा, नकोच पण. दिवसाही नको येऊ. ते बरे नाही. एखादे वेळेस समाचाराला येत जा. रागावू नकोस बुधा. काय रे बुधा, तुला ते भूत अद्याप दिसते का रे!'

'आता नाही दिसत. मी खिडकीत उभा राहतो, परंतु दिसत नाही.'

'भुताची इच्छा का पूर्ण झाली!'

'कोणती असेल इच्छा!'

'माझा सूड घेण्याची.'

'तुझा सूड!'

'हो. मी तुझ्याजवळ लग्न करायचे नाकारले. तू दुःखी झालास, तुझे आईबाप मेले. म्हणून माझा सूड.'

'काही तरी मनात आणतेस.'

'माझा सोन्या बरा होऊ दे.'

'होईल हो बरा. मधुरी, मी जातो.'

'रागावू नको हो बुधा.'

बुधा गेला. मधुरी सोन्याजवळ रडत बसली. औषधांच्या पुड्या आल्या. बुधाकडून मदत आली. मधुरी दूध घेऊ लागली. सोन्याला अदमुरे ताक मिळू लागले. दिवस चालले. सोन्याचा ताप कमी होऊ लागला. हळूहळू ताप थांबला. तो अत्यंत अशक्त झाला होता. काही दिवस त्याची आठवण गेली. तो कोणाला ओळखीना, तो काही तरी बोले. कोठे तरी बघे. हळूहळू शक्ती येऊ लागली व स्मृती येऊ लागली. सोन्या बरा झाला. मधुरी पुन्हा कामाला जाऊ लागली.

परंतु तिचे आता कामात लक्ष लागत नसे. ती सारखी समुद्रावर जावयाची. शून्य दृष्टीने त्याच्याकडे पहायची. बंदरावरच्या गोष्टी ऐकायची. मंगाचे नाव कोणी काढतो का म्हणून कान टवकारायची. परंतु मंगाची बातमी नाही. वेड लागण्याची पाळी आली. ती रागावे. मुलांना मारी. तिचे मुलांवरचे प्रेम कोठे गेले? परंतु पुन्हा त्यांना जवळ घेई व 'नाही हो मारायची पुन्हा' असे म्हणे.

गावात एक पंचांग पाहणारा होता.

एके दिवशी मधुरी त्याच्याकडे गेली.

'जोशीबुवा, पंचांग पहा. माझा मंगा परत कधी येईल ते सांगा. व्यापारासाठी गेला. गलबतातून गेला. आज किती दिवस झाले पत्ता नाही. खुशाल असेल का सांगा!'

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

जोशीबुवा पाहू लागले. हिशेब करू लागले. मध्येच डोळे मिटत. टाळी वाजवीत. पुन्हा तिरके तोंड करीत. प्रश्नार्थक व उद्‌गारार्थक मुद्रा करीत.

'मोघम सांगता येईल.'

'मोघम सांगा.'

'तुझा मंगा परत येईल.'

'पण कधी?'

'ते नाही आज सांगता येणार.'

'त्याच्यावर संकट आहे का?'

'आहे आणि नाही.'

'म्हणजे?'

'प्रवासातच आहे. संकटे यायचीच. परंतु ती असून नसल्यासारखीच. तू काळजी नको करूस. सुखरूप आहे तुझा मंगा.'

दक्षिणा देऊन मधुरी गेली. परंतु तिच्या मनाची रुखरुख जाईना. का अशी सारखी रुखरुख लागावी तिला कळेना.

घरात आता आनंद नव्हता. सणवार आला तर ती मुलांसाठी गोड करी; परंतु स्वतः ती खात नसे.

'आई, तू ग का नाही खात?' सोन्या विचारी.

'माझ्या तोंडाला चव नाही.' ती म्हणे.

'गोड सुद्धा तुला आवडत नाही?'

'गोड मला कडू लागते.'

'आणि कडू गोड लागते का?'

'होय.'

'मग तू कडू तरी खात जा. लिंबाचा पाला. मी आणीत जाऊ?'

'सोन्या, तू वेडा आहेस.'

'हल्ली शिकायला जात नाही म्हणून? पुन्हा जाऊ शिकायला

बुधाकाकांकडे?'

'नको. त्यांना त्रास होतो.'

'ते सुद्धा आजारी आहेत. होय ना?'

'हो. त्यांना बरे नाही.'

'बाबांनाही बरे नसेल का ग आई? तू म्हणालीस की मी बरा झालो म्हणजे बाबा येतील. परंतु ते काही आले नाहीत. कधी येतील बाबा?'

'येतील. लांबून यायला वेळ लागतो बाळ.'

असे मायलेकरांचे संवाद चालत.

एकेक दिवस आता युगासारखा वाटू लागला. कशात राम नाही, असे मधुरीला वाटे. मुले तिला खेळायला बोलावीत तरी ती जात नसे. आई, आम्हांला गाणे सांग असे मुले म्हणत; परंतु ती गाणे सांगत नसे. आई, हास ना ग, असे ती म्हणत. ती हसूही शकत नसे. मधुरीला हृद्रोग जणू लागला. एके दिवशी ती म्हातारीकडे गेली व रडत बसली.

'मधुरी, धीर सोडू नको. मुलांना तू हवीस हो. मुलांसाठी तरी हस, खेळ. त्या पाखरांना कोणाचा आधार? स्वतःच्याच दुःखात नको चूर होऊस. समजलीस ना! येतात असे प्रसंग. मागे एक गलबत या गावचे असेच दोन वर्षांनी परत आले. देवाला दया आहे. तो वाईट नाही करणार. उगीच चिंता करू नकोस. तू अलीकडे भुतासारखी दिसतेस. किती वाळलीस! काय झालीस तरी! किती खोल डोळे गेले!'

'आजी, एखाद्या भुताचाच त्रास आम्हांला आहे का ग! ते भूत बुधाला समुद्राकडे बोट करून दाखवी. त्याचा काय अर्थ! सोन्या आजारी पडला. माझे बाळंतपण तशा प्रकारचे झाले. काही तरी तोच प्रकार असेल!'

'कसले भूत नि काय? मला ७५ वर्षे झाली, मी कधी भूत

पाहिले नाही. मनातल्या कल्पना. उगाच काही तरी मनात घेतलेस.'

'आजी!'

'काय!'

'सारे चांगले होईल ना! म्हण सारे चांगले होईल. तुझ्या शब्दांमुळे धीर येतो. तुझी वाणी म्हणजे देववाणी. सांग आजी, तुझ्या डोळ्यांना काय दिसते! बघ, त्या समुद्राकडे बघ. दिसते का मंगाचे गलबत? दिसते का त्याची मूर्ती? सांग. तुझ्या डोळ्यांना खरे तेच दिसेल. तू खरी भविष्य पाहणारी. पंचांगे पहाण्यापेक्षा पवित्र व शुद्ध माणसांचे मन सांगेल तेच खरे. सांग ना आजी. तुझे पाय धरावे असे वाटते.'

'वेडी पोर, काही तरी विचारतेस.'

'सांग ना पण.'

'येईल हो मंगा, सारे छान होईल. पूस डोळे. रडत रडत नको जाऊस. पोरांना खेळव, हसव, वाढव. मुलांच्या देखत रडणे पाप आहे. मुलांच्या सभोवती आनंद पसरून ठेवावा. त्यांचे वाढते वय. या वेळेस शरीर वाढत असते. मन वाढत असते. या वेळेस आघात होता कामा नये. हसत जा. सारे भले होईल.'

'हसेन आजी. मी हसेन. मंगा लहानपणी मला रडूबाई म्हणे.'

'आता आल्यावर हसूबाई म्हणू दे. हसरी मधुरी हो.'

❖❖❖

: अशुभ वार्ता : : ११ :

असेच दिवस चालले होते. मधुरीच्या मंगाची आठवण सारे गाव जणू विसरून गेले. परंतु मधुरी कशी विसरेल? तिच्या जीवनाची सारी ओढ मंगाकडे होती. तिचे डोळे तिकडे होते. वाट

नगर वाचनालय, सातारा
बालविभाग

पाहून ती दमली. रडून रडून डोळे कोरडे झाले. समुद्रावर जाणे तिने आता बंद केले. तेथे गेल्यावर तिला भरून येई म्हणून ती जाईनाशी झाली.

'आई, अलीकडे तू का ग जात नाही समुद्रावर?' सोन्याने विचारले.

'समुद्राकडे मला पाहवत नाही. तू जात जा.' ती म्हणाली.

'मी जाईन, बाबा आले की नाही पहात जाईन. त्यांची चौकशी करीत जाईन. आजीबाईकडे जाऊन खाऊ खाईन.' सोन्या म्हणाला आणि खरेच सोन्या समुद्रावर जाऊ लागला. आजीबाईजवळ गप्पा मारीत बसे. तिच्यांजवळ खाऊ मागे. खाऊ खाई.

'काय रे सोन्या, आईला फार वाईट वाटते का?' म्हातारीने विचारले.

'होय आजी. आई झोपतही नाही. रात्री देवाची प्रार्थना करीत बसते. आम्हांला जवळ घेते व रडते. ती समुद्रावर येत नाही. समुद्राकडे तिला बघवत नाही. आजी, खरेच बाबा नाही का येणार?'

'येतील हो बाळ.'

'केव्हा येतील? किती तरी दिवस झाले, का ग येत नाहीत? किती तरी गलबते येतात. बाबांचेच तेवढे का येत नाही? कोठे अडकले? कोठे रुतले? आजी, सांग कधी येईल त्यांचे गलबत?'

'मी काय सांगू बाळ?'

अशी बोलणी चालत. सोन्या तिकडे खलाशांकडे जाई. त्यांच्याजवळ बोले. प्रश्न विचारी. सोन्या दिसे चांगला. खलाशांना त्याचे कौतुक वाटे.

'तू येतोस का आमच्याबरोबर?' खलाशी त्याला विचारीत.

'बाबा गेलेले येत नाहीत. मग मी कशाला येऊ? आधी बाबा येऊ देत. आणा ना तुम्ही माझे बाबा.' सोन्या सांगे.

आणि पुन्हा एक नवीन गलबत आले. बंदरावर गर्दी जमली.

व्यापारी आले. देवघेव करणारे आले.

'आई, आज नवीन गलबत आले आहे. तू येतेस?' सोन्याने विचारले.

'बाळ, तूच जा व विचारून ये.' ती म्हणाली.

सोन्या गेला. आईला वाईट वाटते, म्हणून त्याने आग्रह केला नाही. तो आला. तेथे त्याला कोण विचारतो? इकडे तिकडे फिरत होता. शेवटी कंटाळून तो म्हातारीच्या खानावळीत आला. तो तेथे एक प्रवासी उतरला होता. आजीबाईजवळ बोलत होता.

'आजी, हे कोण?'

'ते पाहुणे आहेत. या गलबतातून आले.'

'तुम्हांला आहे का हो माहिती!'

'कोणाची बाळ?'

'माझ्या वडिलाची.'

'कोठे गेले तुझे वडील!'

किती तरी दिवस झाले. ते एका गलबतात बसून गेले. माल घेऊन गेले; परंतु आले नाहीत. तुम्हांला भेटले का ते कोठे?'

'तुझ्या वडिलांचे नाव काय?'

'मंगा.'

'गलबताचे नाव काय?'

'ते नाही मला माहीत.'

'आमच्या गलबतावरच्या खलाशांना काही माहिती असेल. तू येतोस माझ्याबरोबर?'

'हं. चला.'

दोघे निघाले. आता गर्दी कमी झाली होती. खलाशी स्वस्थ बसले होते.

'का रे, तुम्हांला येथल्या एका गलबताची माहिती आहे?'

'कोठले गलबत?'

'वर्ष होऊन गेले, येथून एक गलबत गेले, ते परत आले नाही.'

'एक गलबत बरेच दिवसांपूर्वी वादळात सापडले व बुडाले असे म्हणतात. परंतु ते इथलेच की काय ते कळायला मार्ग नाही.'

इतक्यात आणखी एक मनुष्य आला. तो कोणी व्यापारी दिसत होता.

'काय म्हणता?' त्याने विचारले.

'तुम्हाला आहे का हो माहीत?' त्या पाहुण्याने विचारले.

'त्या गलबताविषयी ना? मघा तीच तर बातमी सांगत होतो. येथले ते गलबत बुडाले. सारे लोक बुडाले. मघा लोक त्यासाठीच जमले होते. फार भयंकर गोष्ट. या गावातील बरेच लोक त्यात होते.'

'माझे बाबा कोठे आहेत?'

'तुझे बाबा?'

'हो.'

'चल बाळ, मग सांगेन.' तो पाहुणा म्हणाला.

सोन्या व तो पाहुणा म्हातारीकडे आले.

'सोन्या, आईला आणतोस का बोलावून?'

'हो.'

असे म्हणून सोन्या गेला. तो पळतच गेला. तो कावराबावरा झाला होता.

'म्हातारबाई, ते गलबत बुडाले. या मुलाचा बापही बुडून मेला. त्या गलबतावरचे कोणी वाचले नाही.'

'काय सांगता?'

'खरी गोष्ट. गावात सर्वत्र ही बातमी गेली. तुमच्या गावावर मोठीच आपत्ती. तुमच्या गावातील बरेच लोक त्या गलबतावर होते.

त्या मुलाच्या आईची समजूत तुम्हीच घालू शकाल. गरीब बिचारी.'

आणि सोन्याची आई आली. धावत आली. गावात गेलेली वार्ता तिच्याही कानांवर आली. ती रडत होती.

'आजी, आजी, काय झाले?'

'मधुरी, उगी, रडू नको.'

'आजी. खरेच का गलबत बुडाले?'

'हो. सारे सांगतात.'

'अरेरे! मंगा, कोठे आहेस मंगा? आजी, मलाही समुद्रात जाऊ दे. मंगाला जाऊन भेटू दे. त्याच्याशिवाय कशी राहू? माझी आठवण करीत बुडाला असेल. मधुरी म्हणून त्याने हाक मारली असेल. आजी इतके दिवस धीर धरला. येईल येईल आशा होती. अरेरे, असे कसे झाले? तुझा आशीर्वाद खोटा कसा झाला? ही माझी मुले. कोण त्राता त्यांना? आम्हाला सुखात ठेवता यावे म्हणून मंगा गेला. मी काम करते, ते त्याला पाहवेना. मुलांच्या अंगावर नीट कपडे नाहीत म्हणून माझा मंगा रडे. मुलांना दागिने नाहीत म्हणून रडे. मला नेसायला उंची लुगडे नाही, म्हणून त्याला वाईट वाटे. आमच्यासाठी मृत्यूच्या जबड्यात गेला. लहानपणापासून त्याला समुद्र हाक मारी. पुन्हा पुन्हा समुद्रात जाण्याचे बोले. आजी, ज्या दिवशी आमचा नवीन संसार सुरू झाला त्याच दिवशी रात्री फिरताना मंगा म्हणाला, 'मधुरी, चल समुद्रात जाऊ.' परंतु एकटा गेला. घात झाला आजी, घात. कोणाजवळ आता बोलू? कोणाजवळ हसू? कोण पुशील माझे डोळे? कोण बोलेल गोड गोष्टी? मंगा, कशाला रे गेलास? मी सारखे सांगत होते नको जाऊस म्हणून. परंतु माझ्यावर रागावे. मी शेवटपर्यंत हट्ट धरला असता तर गेला नसता. माझेच चुकले. माझ्या प्रेमाने मी त्याला बांधून ठेवले पाहिजे होते. काय करू आता? आभाळ फाटले, कुऱ्हाड कोसळली. आजी, जाऊ दे मला समुद्रात. घेऊ दे बुडी. नको जगणे. आता मरणे बरे. सोड आजी, सोड.'

'मधुरी, हे काय? या मुलांना कोण? ही मुले म्हणजे मंगाची

ठेव. मंगाची आठवण. यांच्याकडे बघ. रडू नकोस. काय करणार आपण? हा बघ सोन्या रडतो आहे त्याला जवळ घे.' म्हातारी समजावीत होती.

'आई, रडू नकोस आई.' सोन्या आईला बिलगून म्हणाला.

तिने त्याला पोटाशी धरिले. घट्ट धरिले.

'सोन्या, गेले तुझे बाबा. जाताना तुला उचलून घेतले होते मंगाने, किती तुझ्यावर माझ्या मंगाचे प्रेम सोन्या.'

'मधुरी, पुरे आता. घरी चल.'

म्हातारीने त्या पाहुण्यास दुसरीकडे जायला सांगितले. सोन्याला व मधुरीला घेऊन ती तिच्या घरी आली. रुपल्या व मनी घरी होती. मधुरी आली व धाडदिशी पडली.

'आई, आई' करीत मुले भोवती रडू लागली.

म्हातारीने मधुरीला शुद्धीवर आणिले, दुःख घरात भरून राहिले. अंधार भरून राहिला. शेजारीपाजारी आले. समाधान करून गेले. खरे समाधान कोण करणार? तिन्ही मुलांना जवळ घेऊन मधुरी बसली होती. ती मुले आईकडे बघत.

'आई, नको रडू.' सोन्या म्हणे.

'मी पुसू तुझे डोळे?' रुपल्या म्हणाला.

मधुरीला अधिकच वाईट वाटे. लहान बाळे त्या मातेला धीर देत होती. करुण करुण दृश्य! म्हातारीने स्वयंपाक केला.

'मधुरी, ऊठ, खा हो दोन घास. या चिमुकल्यांसाठी तरी खा. ऊठ.'

आणि मधुरी उठली. मुलांना घेऊन तिने थोडे जेवण केले. मधुरी शांत झाली. दोन दिवस झाले. म्हातारी परत गेली.

तिसरा दिवस होता. मुलांना झोपवून मधुरी बसली होती. तिच्या डोळ्यांतून पाणी गळत होते. दार उघडे होते. तिचे दाराकडे तोंड होते. एकदम ती दुःखाने म्हणाली, 'मंगा, मंगा, ये ना रे. मधुरीसाठी

ये रे ये.' आणि कोणी तरी हाक मारली म्हणून ती एकदम उठली.

'आला, मंगा आला.' असे म्हणून तिने त्याला मिठी मारली. परंतु कोण होते ते?

'मधुरी!'

'कोण?'

'मी बुधा.'

'आणि माझा मंगा कोठे आहे? तू माझा मंगा खाल्लास. तुझ्या वडिलांनी खाल्ला. त्यांचे भूत समुद्राकडे बोट दाखवी. समुद्रात बुडवीन याला असे का ते भूत तुला सांगे? बुधा, माझा मंगा मला दे. आण जा माझा मंगा. मला वाटले माझा मंगाच आला. गोड मधुर मंगा.'

'मधुरी, मी तुझ्या समाधानासाठी आलो आहे. मंगा व मी तुझे मित्र. बुधा बुडाला व मंगा आहे असेच समज. मी तुला उणे पडू देणार नाही. मधुरी, माझा काय दोष? मी बातमी ऐकली व रडत बसलो. तुझे दुःख मनात येऊन मला घास गिळवेना. पहिल्या झटक्यात तुझ्याकडे येणार होतो. परंतु आलो नाही. आज तिसऱ्या दिवशी आलो. मधुरी, मी तुझा कोणीच नाही का? तुला दोन धीराचे शब्द सांगण्याचा माझा अधिकार नाही का? माझ्या प्रेमाला काहीच का अधिकार नाही?'

'बुधा!'

'काय मधुरी?'

'भेटेल का रे मंगा पुन्हा?'

'हो भेटेल.'

'कोठे भेटेल?'

'आपल्या आठवणीत. तुजजवळ त्याच्या शेकडो प्रेमळ स्मृती आहेत. त्यांत त्याची भेट घे. ती टेकडी, तो तेथे मंगा आहे. या मुलांत मंगा आहे. मंगा अंतर्बाह्य भरलेला आहे. मधुरी, रडू नको.'

'बुधा, मंगा मला सुखी करण्यासाठी गेला. मधुरीला मोत्यांनी नटवावे म्हणून गेला आणि समुद्राने माझे मोलाचे मोती गिळले. कोण आणील ते मोती पुन्हा?'

'मधुरी, काळाने गिळलेले मोती परत का मिळते? तू शांत हो. धीर धर. या मुलांना वाढव. मी आहे. तुला मदत करीन. मला परका नको मानू. मीही तुझाच आहे. तू दूर आहेस तरी तेवढ्या ओलाव्याने मी जगतो. मधुरी जगात आहे तोपर्यंत मी मरता कामा नये. 'बुधा, खात जा. नीट जग.' असे तूच ना मला सांगितलंस! मधुरी, तुझी आज्ञा मी मानिली. माझे दोन शब्द तू ऐक.'

'बुधा, मरण मला थोडेच येणार आहे? मरायचे धैर्य तरी मला कोठे आहे? मधुरी जगेल. काळजी नको करू.'

'मी जाऊ?'

'जा. उशीर झाला.'

'तुझ्याकडे मधून मधून आलो तर चालेल?'

'ये हो बुधा.'

'जातो मी.' असे म्हणून बुधा गेला आणि मधुरी बाहेर झोपाळ्यावर बसली. तिचे मन हेलावत होते. मंगाच्या आठवणीत रमले होते. किती वेळ तरी ती बाहेर बसली. इतक्यात मनी जागी झाली. 'आई' तिने हाक मारली. मधुरी एकदम घरात गेली. 'आहे हो मी.' असे म्हणून तिने मनीला थोपटले. तिन्ही मुले झोपली होती. मधुरी त्यांच्याकडे पहात होती. सोन्यासारखी मुले; परंतु आता कोण त्यांची काळजी घेईल? सोन्याला मजुरी करायला जावे लागेल. कोठले शिक्षण नि काय? आणि रुपल्याबद्दल मंगाच्या केवढाल्या उड्या. परंतु सारे स्वप्न ठरले. तिने मुलांचे मुके घेतले. सर्वांना थोडेथोडे थोपटले आणि मनीला पोटाशी धरून-ती झोपी गेली.

आणि एकदम झोपेतून उठली. 'मधुरी' अशी तिला हाक ऐकू आली. ती दचकून उठली. कोठून आली हाक? भास झाला की खरेच कोणी हाक मारली? परंतु कोणी नव्हते. तिने दार उघडून

अंगणात पाहिले. कोणी नव्हते. रातकिडे किर्र करीत होते. तारे चमचम करीत होते. ती परत आली व झोपली. पुन्हा दचकून जागी झाली. पुनः 'मधुरी' अशी हाक. मंगाच्या आवाजासारखी हाक. अगदी हुबेहूब तशीच. मधुरी भ्यायली. मंगाच्या मधुर हाकेने का भ्यायचे? त्या ओळखीच्या प्रेमळ हाकेने का घाबरावयाचे?

'मंगा? कोठे रे आहेस तू? का मला हाका मारतोस? ये व मला भेट रे राया. असा दडून नको बसू; गुप्त राहून नको हाका मारू. मी भिते, घाबरते हो मंगा. मधुरी भित्री आहे' असे ती म्हणाली. पुन्हा पडली. मग ती पुन्हा नाही जागी झाली. सकाळपर्यंत ती निजली. सकाळी सारी उठली. रोजचे कामकाज हळूहळू सुरू झाले. दिवस जाऊ लागले. एके दिवशी समुद्राच्या काठावर तिने फुले सोडली.

'माझ्या मंगाच्या आत्म्याला. त्याला फुले आवडतात. फुलासारखे त्याचे मन. लाटांनो, मंगाला ही फुले द्या आणि ही आसवांचीही माला त्याला द्या. माझ्या डोळ्यांतील फुले.' असे म्हणत रडत रडत ती फुले मंगाच्या पवित्र प्रेमळ स्मृतीस तिने वाहिली. एकवार समुद्राकडे भरलेल्या दृष्टीने तिने पाहिले. किती तरी वेळ ती दूर पहात होती. तिला का कोणी दिसत होते? तिला का मंगाची मधुर मूर्ती तिकडे कोठे लांब दिसत होती? लाटा येत होत्या, वारे वहात होते आणि मधुरी दूर कोठेतरी पहात तेथे पाण्यात उभी होती. शेवटी तिने एक प्रणाम केला व ती माघारी आली. मुलांसाठी माघारी आली.

❖❖❖

: दिवाळी :   : १२ :

दिवस जात होते. दुःखाचा विसर काळामुळे पडतो. हळूहळू

दुःखाची तीव्रता कमी होते. मधुरीचे दुःख कमी झाले. मधून मधून मंगाची तिला आठवण येई. परंतु आता ती एकसारखी रडत बसत नसे. मोलमजुरी करी. मुलांना सांभाळी. असे चालले होते आणि दिवाळीचा सण जवळ येत होता. त्या सणाने मधुरीला पुन्हा एकदा खूप दुःख झाले. ती दोन वर्षांपूर्वीची दिवाळी तिला आठवली. तिने सोन्याचा हात भाजला होता आणि मंगा गोरामोरा झाला होता. त्यामुळेच परदेशात जावयाला तो अधीर झाला होता. दारिद्र्याची चीड त्यामुळेच त्याला फार आली होती. परंतु तो आज नाही. दारिद्र्य दूर करण्यासाठी गेला. परंतु आज घरात अधिकच दारिद्र्य होते. मुलांचे कपडे फाटले होते. ती ते शिवी व त्यांना ठिगळे लावी; परंतु त्या चिंध्या पाहून तिला वाईट वाटे.

'आई, आम्हांला नवीन कपडे कर.' रुपल्या म्हणाला.

'माझा सदरा फाटला आहे.' सोन्या म्हणाला.

'आपल्याजवळ पैसे नाहीत सोन्या.' ती म्हणाली.

'आम्हांला मुले हसतात.' रुपल्या म्हणाला.

'तू आण कोठून तरी पैसे.' सोन्याने सांगितले.

'पैशाचे का बाळ झाड असते?' ती म्हणाली.

'आम्हांला नाही माहीत. नवीन आंगरखा दे म्हणजे झाले.' रुपल्या बोलला.

मुले गेली बाहेर. परंतु मधुरीला खिन्न वाटले. काय या जीवनात राम, असे तिला वाटले, निराशा पसरली. तिला काही सुचेना. इतक्यात बुधा आला. हसत हसत आला. जणू संगीत आले; प्रकाश चाला, आशा आली,

'ये बुधा! ये.' ती म्हणाली.

'बरेच दिवसांनी आलो.' तो म्हणाला.

'का नाही मध्यंतरी आलास?'

'वरचेवर आलो तर बरे दिसणार नाही म्हणून नाही आलो.'

'येत जा रे बुधा. मला दुसरे कोण आहे? हल्ली मंगाची फार फार आठवण येते. दिवाळी आली. लोकांकडे पणत्या लावतील. दिवे लावतील; परंतु माझ्या घरी अंधार आहे. माझ्या कपाळी शोक आहे. माझ्या झोपडीत सारी वाण आहे. मंगा असता तर ही झोपडी फुललेली, आनंदाने भरलेली दिसती. पण कोठे गेला तो माझा पूर्णचंद्र? कोठे गेला माझा सूर्यनारायण? मंगा फुले तोडी व माझ्या केसांत घाली. त्या एका दिवाळीचे वेळेस त्याने असेच केले. मी रागावले त्याचेवर, म्हटले मी का आता लहान आहे? तीन मुलांची आई झाल्ये. तर त्याला वाईट वाटले. मंगा मनाचा मऊ होता. मंगाला थट्टासुद्धा सहन होत नसे. बुधा, का रे माझा मंगा गेला? माझे बाळ जिवंत नाही जन्मले. त्याच वेळेस माझ्या मनात चर्र झाले. काही तरी पुढे वाईट आहे असे वाटले. मधूनमधून मनाला वाटे की मंगाचे कदाचित हे शेवटचेच दर्शन असेल. बुधा, फार वाईट वाटते मला. तू येत जा. लोक म्हणोत वाटेल ते.'

'बरे येईन. ज्यात तुझा आनंद त्यात माझा.'

'हे काय आणले आहेस?'

'आणली आहे तुला व मुलांना जम्मत.'

'काय आहे दाखव ना बुधा.'

बुधाने गाठोडे सोडले. काय होते त्यात? कोणती होती गंमत? त्यात एक सुंदर लुगडे होते. मुलांचे सुंदर सुंदर कपडे होते. मधुरी पहात राहिली.

'मधुरी, लुगड्याचा रंग पहा कसा छान आहे.'

'होय, छान आहे. मंगाला हा रंग फार आवडे. एकदा कर्ज काढून असेच लुगडे त्याने आणले होते. नुकतेच त्या वेळेस आमचे लग्न लागलेले होते. मी त्याचेवर रागावले. तेव्हा तो म्हणाला, 'मधुरी तुला माझ्या प्राणांनी नटवावे असे वाटते. परंतु प्राण कसे काढू म्हणून या लुगड्याने सजवतो. तुला हे छान दिसेल. माझ्यासाठी नेस. माझ्या डोळ्यांना आनंद दे' बुधा, माझा मंगा वेडा होता.'

नगर वाचनालय, सातारा
बालविभाग

'तू नेसशील ना हे?'

'आता मंगा थोडाच आहे? आता खेळ संपला, सारे संपले! आता कोणाला दाखवावयाचे हे लुगडे? त्या लुगड्यात मला पाहून कोण आनंदेल? कोण टाळ्या वाजवील? बुधा, लोक हसतील हो आता. म्हणतील, ही मधुरी दुष्ट आहे. नवरा मेला तरीही छचोरपणा करीत आहे. तुझ्या मधुरीला कोणी नावे ठेवावी असे तुला वाटते का? सांग बरे.'

'कोणी नाही नावे ठेवणार. आणि मला नाही का लोक नावे ठेवणार? मंगाचा मी लहानपणाचा मित्र. मी नाही तुझ्यासाठी काही केले तर मला नाही का लोक बोलणार? मधुरी, तू हे लुगडे नेसलीस तर मला नाही का आनंद होणार? मंगापेक्षा कदाचित थोडा कमी होईल, परंतु होईल. मधुरी, काही प्रिय माणसे सोडून गेली, तर जी उरली असतील त्यांना सुखविणे हेही कर्तव्य नाही का? अपूर्णतेत पूर्णता शोधावी. नेस हो तू हे लुगडे. बुधाचे डोळे आहेत ते पाहतील. बुधाचे डोळे नाचतील. मी का अजिबात तुझ्या जीवनात नाही? हे काय ? असे का करतेस तोंड?'

'बुधा, काय सांगू तुला?'

'सांग सारे सांग.'

'माझ्या मनातले थैमान कोणाला सांगू? माझ्या मनातील लढाई कोणाला माहीत! मी आजपर्यंत दुहेरी जीवन काढीत होते हो बुधा.'

'म्हणजे काय!'

'मला नाही माहीत. जाऊ दे. मनात फार डोकावू नये.'

'मधुरी मी परका आहे?'

'मला नाही काही सांगता येत.'

'बरे हो. नेसशील ना लुगडे?'

'नेसेन.'

'आणि हे मुलांना कपडे. तुला आवडले का?'

'बुधा, इतके उंची कपडे कशाला?'

'मंगा परत आला तर त्याने अशीच उंची वस्त्रे आणिली असती. खरं की नाही! तुला आवडली ना?'

'कोणाला आवडणार नाहीत?'

'मधुरी, दिवाळीला दिवे लाव.'

'कोणासाठी लावू!'

'मुलांसाठी लाव. मुलांना शोकाची कल्पना नको देऊ. त्यांना आनंदात ठेव. आनंदात दिवाळी होऊ दे. आपली रडगाणी त्यांच्या पुढे कशाला? त्या पाखरांना नाचू दे; खाऊ दे गोड गोड. घालू दे नवीन कपडे. मजा करू दे. लावशील ना दिवे?'

'मनात दिवा नसेल तर बाहेर काय कामाचा?'

'मनातही दिवा लाव. हृदयातही दिवा लाव.'

'कसा लावणार? तेथे प्रेमाचा दिवा आता कोण लावील? माझा मंगा होता तो काय करायचा सांगू! माझ्या छातीत बोटे खुपशी. नखे खुपशी व म्हणे तुझ्या आत जाऊन राहू दे. तुझ्या हृदयात जाऊन बसू दे. असा तो होता. माझ्या हृदयात नंदादीप लावणारा तो मंगा. आता कोठला दिवा, कोठली प्रकाशाची प्रेमळ हवा?'

'लहानसा प्रेमाचा दिवा तुझ्या हृदयात मी नाही का लावला? आजपर्यंत मोठ्या दिव्याच्या प्रकाशात त्याचा उजेड दिसला नाही. चंद्र फुलला असता इतर ताऱ्यांचे तेज दिसत नाही. परंतु अमावास्येच्या दिवशी त्या ताऱ्यांची मौज दिसते. मधुरी, तू आपल्या हृदयमंदिरात बघ. तेथे मीही एक दिवा लावलेला आहे असे तुला दिसेल. तो तेवत असेल. तुझ्या हृदयगाभाऱ्यात अगदीच अंधार नाही.'

'बुधा!'

'काय मधुरी?'

'येत जा हो मधून मधून.'

'दिवाळीला काय आणू?'

'बुधा, तू रे दिवाळी कोठे करतोस?'

'आज दहा वर्षांत बुधाने दिवाळी केली नाही.'

'दहा वर्षांत?'

'हो.'

'आणि तुला मी बोलावले नाही. आज दहा वर्षे तुला सणवार नाही. बुधा, या दिवाळीला तू माझ्याकडे ये. मंगा नाही. त्याची आठवण तू भरून काढ. मंगाची जखम तू भरून काढ. येशील माझ्याकडे दिवाळीच्या दिवसांत? जेव, माझ्याकडे फराळ कर; तुझे पान मांडीन, रांगोळी घालीन. मंगाला नीट नाही हो रांगोळी काढता यावयाची. मग रागवायचा.'

'मला छान येते रांगोळी.'

'तू चित्रकार आहेस. माझी किती चित्रे काढलीस सांग.'

'दिवाळीच्या दिवशी घेऊन येईन तुझा चित्रसंग्रह.'

'आण, मला दाखव माझी चित्रे. बुधा, मी पूर्वीसारखी दिसत्ये का रे?'

'थोड्या दिवसांनी पुन्हा तशी दिसशील.'

'म्हणजे!'

'झाडाला पाणी मिळाले की ते पुन्हा हिरवेगार दिसते. फुलाफळांनी बहरते, मोहोरते.'

'बुधा!'

'काय मधुरी!'

'तू ये हो दिवाळीत.'

'आता मी जातो. तू हे लुगडे नेस. तुला एक विचारू?'

'काय विचारायचे?'

'तुला एखादा दागिना आणू?'

'नको. नको. तू वेडा आहेस.'

'तुला फूल आणून देईन. घालशील केसांत?'

'लोक हसतील.'

'माझ्यासाठी, फक्त माझ्यासमोर घाल.'

'मला घालवेल का केसांत?'

'मी घालीन. चालेल?'

'टेकडीवर लहानपणी एकदा मंगाने फुले आणिली होती. माळा आणल्या होत्या.'

'आणि त्या माळा मंगाने तुझ्या गळ्यात घातल्या.'

'आणि मागाहून त्याच माळा तूही माझ्या गळ्यात घातल्यास.'

'आधी मंगा, मग मी.'

'बुधा!'

'आणि मधुरी, त्या दिवशी रात्री नव्हते का दिले फूल?'

'कधी?'

'तुमच्या लग्नाचा पहिला दिवस. तू झोपडीसाठी पैसे मागायला आली होतीस.'

'आणि तुझ्या उशीवर मी माझे तोंड ठेवले होते.'

'आणि जिन्यात आपण क्षणभर थांबलो आणि तू खांद्यावर मान ठेवून रडलीस.'

'हो. त्या दिवशी दिले होतेस फूल.'

'आठवले सारे?'

'हो, आठवले, आणि बुधा, तू एकदा रस्त्यातही मला फूल दिले होतेस. मी व मंगा एकत्र राहण्यापूर्वी; आणि बाबा आले. ते तुला बोलले. तुझे फूल त्यांनी कुस्करिले. त्या कुस्करलेल्या फुलांच्या पाकळ्या मी गोळा केल्या. तुझे कुस्करलेले प्रेम मी गोळा करून घेतले. आठवते?'

'हो आठवते. अशा त्या आठवणींवर तर मी जगतो. पुन्हा

पाकळ्या साधून त्यांचे फूल होईल. नाही होणार मधुरी?'

'जादूगार करील तसे.'

'प्रत्येक मनुष्य, मधुरी, जादूगार आहे. तो कोणाच्या ना कोणाच्या तरी जीवनातला जादूगार बनतो, तो तेथे चमत्कार करतो, ओसाड जागा फुलवतो. अंधाराचा प्रकाश करतो. हसतेस काय मधुरी? बरे, मी आता जातो. आणीन फूल व वाहीन तुला.'

'घालीन हो तुझ्यासाठी मी क्षणभर ते माझ्या केसांत.'

आणि बुधा गेला. मधुरी त्याच्याकडे झोपडीच्या दारातून पहात होती. त्याने वळून पाहिले. दोघांचे डोळे भेटले.

आणि आता मुले आली.

'आई, हे कोणाला? किती छान. ओहो! कोणाला?'

'आई, हा मला का?'

'हा मला नीट होईल.'

त्या मुलांनी आपापले कपडे ओळखून घेतले. त्यांनी अंगात घातले.

'आई, बाबांकडून का ग हे आले? दुरून त्यांनी पाठवले?' रुपल्याने विचारिले.

'मनी कुठे आहे सोन्या?'

'तो बाहेर आहे. मी तिला उचलून आणले. परंतु अंगणातील फुले पाहून उतरली.

'आई, ही फुले घाल माझ्या केसांत.' मनी येऊन म्हणाली.

मधुरीने मनीला नवीन कपडे घातले. तिने ती फुले तिच्या केसांत घातली. मनी नाचू लागली. सोन्या व रुपल्याही नाचू लागले आणि मधुरीचेही मन जरा नाचत होते.

'आई, तू नेस ना हे लुगडे!'

'नेसेन हो.'

'नाही, आता नेस. उठ, नेस.'

मुले आईच्या पाठीस लागली. मनीही म्हणू लागली, 'आता नेस, आत्ताच नेस.' शेवटी माता उठली. तिने ते नवीन लुगडे परिधान केले. मुले आईकडे पहात राहिली. मनी बाहेर गेली नाचत व फुले तोडून घेऊन आली.

'सोन्या, आईच्या डोक्यात फुले घालू ये.' ती म्हणाली.

तिन्ही मुलांनी आईची पूजा केली. मधुरी सारे त्यांना करू देत होती.

दिवाळीची मंगल पहाट झाली. बुधाने तेल, उटणे आणून दिले होतें. मधुरीने बाहेर दिवे जाळले, तिने मुलांना न्हाऊ-माखू घातले आणि ती स्वतः न्हायला बसली. तिचे न्हाणे झाले. ते नवीन लुगडे ती नेसली. आज मधुरी प्रसन्न दिसत होती. आणि बुधा आला.

'बुधाकाका आले.' मुले गर्जली.

'तुमच्या झाल्या वाटते आंघोळी?' बुधाने विचारले.

'हो केव्हाच! आईचेसुद्धा झाले न्हाणे.' रुपल्या म्हणाला.

'तुमची आंघोळ झाली का?' सोन्याने विचारले.

'नाही.' तो म्हणाला.

'आमच्याकडेच करा.' रुपल्या म्हणाला.

'मी तुम्हाला आवडतो?'

'हो, आवडता.' चिमुरडी मनी म्हणाली.

बुधा आत आला. मुले बाहेर फटाके वाजवू लागली. चंद्रज्योती लावू लागली. मधुरी बसली होती.

'ये बुधा.'

'मला म्हाऊ-माखू घाल. दहा वर्षांत कोणी घातले नाही.'

'बरे हो.'

आणि बुधाच्या अंगाला मधुरीने तेल, उटणे लावले,

‘आता तोंडाला लाव; नाही तर पुढच्या जन्मी माकड होशील हो.’

‘तुझ्याच हातांनी लाव. हाती घेतलेले काम पुरे करावे.’

‘मी नाही.’

परंतु बुधाने मधुरीचे हात धरले व ते तेलाचे, उटण्याचे हात स्वतःच्या तोंडावरून त्याने फिरविले. ते हात आपल्या तोंडावर त्याने धरून ठेवले. कढत श्वास मधुरीच्या हाताला लागत होते. ती गुंगली.

‘पुरे आता बुधा.’

‘पाणी दे चल.’

तिने त्याला भरपूर पाणी दिले. बुधाचे मंगलस्नान झाले.

‘असे स्नान बारा वर्षांत केले नाही. मंगलस्नान.’

‘जणू रासन्हाणे.’

‘रासन्हाण्यात दोघे एकदम न्हायला बसतात.’

‘आणि एकमेकांच्या अंगावर चुळा फेकतात.’

‘तू त्या गोष्टी थोड्याच अनुभवल्यास? मंगा व तू लग्नसोहळा थोडाच केलात?’

‘बुधा?’

‘काय?’

‘आता फराळ करतोस का? रांगोळ्या काढ. मुलांना बोलाव.’

बुधाने सुंदर रांगोळ्या घातल्या. पाने मांडली. मुले आली. फराळाला बसली सारी.

‘तुम्हीसुद्धा आमच्याकडे फराळाला?’ रुपल्याने विचारले.

‘हो.’ बुधा म्हणाला.

‘तुमच्या घरी कोणी नाही?’

‘कोणी नाही.’

‘केवढे आहे तुमचे घर?’ सोन्या म्हणाला.

'त्या घरात तुम्ही एकटे राहता?'

'हो.'

'तुम्हाला भीती नाही वाटत?' सोन्याने विचारिले.

'वाटते. परंतु दुसरे कोण येणार?'

'आम्ही येऊ तुमच्याकडे राहायला? मोठ्या घरात राहायला?' रुपल्याने विचारले.

'तुम्हाला आवडेल का माझे घर?'

'ही झोपडीसुद्धा आम्हाला आवडते. मग का तुमचा बंगला आवडणार नाही? आणि तुमची बाग आहे. होय ना हो?'

'आई, यांच्याकडे जायचे का?'

'एखादे दिवशी जाऊ.' ती म्हणाली.

'आणि नेहमीच राहिलो म्हणून काय बिघडले?' सोन्याने विचारले. 'बुधाकाका, आमच्या येथे उंदीर येतात. त्यांना मी घाबरतो. तुमच्याकडे उंदीर नाहीत ना?'

'नाहीत.'

'वा, मग तर छान. जायचेच.'

फराळ झाले. मुले बाहेर गेली. बुधाही जाऊ लागला.

'जेवायला इकडेच ये. चार दिवस आता तू आमचा पाहुणा.' मधुरी म्हणाली.

'पाहुणा!'

'तशा अर्थाने नाही हो बुधा.'

'मी आता तुझा कायमचा पाहुणा होणार आहे.'

'का आम्ही तुझे होणार आहोत! बरे, पण दुपारी फार उशीर नको करू.'

'वेळेवर येईन. वेळ होते तेव्हाच मी येतो.'

'होय बुधा वेळीच सारे साजते. शोभते.'

बुधा गेला. मधुरी विचारात गर्क होती. तिने केर काढला. भांडी घासली. दुपारच्या स्वयंपाकाची ती तयारी करू लागली. तिने भाजी चिरली.

दुपार झाली आणि बुधा आला. सुंदर सुगंधी फुले घेऊन आला.

'मधुरी, ये. तुझ्या केसांत घालतो.'

'बुधा, आण, मीच घालत्ये.'

'नाही. मी माझ्या हातांनी घालतो.'

त्याने तिच्या केसांत फुले घातली. तो तिच्याकडे पहात राहिला.

'बुधा, मी कशी दिसते?'

'गोड गोड दिसतेस.'

'जशी दहा वर्षांपूर्वी दिसत असे, तशी?'

'हो, तशी.'

'काही तरीच.'

'मला वाटते ते मी सांगितले.'

'तुझे डोळे दहा वर्षांपूर्वीचे आहेत.'

'असेल. तसेही असेल.'

'आणि चित्रे आणलीस?'

'मी जेवल्यावर दाखवीन.'

पाटरांगोळ्या झाल्या. सारी जेवायला बसली. मुले जेवून गेली. बुधा पाटावरच होता. मधुरी जेवत होती. तिच्या डोळ्यांतून पाणी आले.

'मधुरी!'

'काय बुधा?'

'नको हो रडू. आठवणी यायच्याच.'

'बुधा, मंगा गेला त्या दिवशी आम्ही एका ताटात जेवलो. तो मला भरवी व मी त्याला. मंगा वेडा होता.'

'मी देतो तुझ्या तोंडात घास.'

'कोणी पाहील?'

'पट्‌कन देतो.'

आणि बुधाने तिच्या तोंडात घास दिला आणि मधुरीने त्याचे बोट धरले.

'चावू का तुझे बोट?' तिने विचारिले.

'ते का गोड आहे मधुरी?' त्याने प्रश्न केला.

'हो, गोड आहे. खाऊन टाकते.' ती म्हणाली.

आणि तिने त्याचे बोट हळूच दातांनी चावले.

जेवणे झाली. निरवानिरव झाली. मुले ओसरीवर खेळत होती.

'बुधा, दाखव चित्रे.' मधुरी म्हणाली.

बुधाने चित्रसंग्रह सोडला. एकेक चित्र दाखवू लागला.

'हे बघ मधुरी, यात तुझे डोळे मी झाकीत आहे असे आहे. माझे हे आवडते चित्र.'

'मला आंधळे करायला तुला आवडते; माझे डोळे झाकून मला वाटेल तेथे नेऊ बघतोस; होय ना?'

'परंतु तुलाही डोळे झाकलेले आवडतात हो.'

'आणि आपण टेकडीवरून घसरत आहोत त्याचे हे चित्र.'

'आणि हे रे बुधा?'

'लहानपणी मी प्रथम भेटलो त्याचे. तुम्ही वाळूचे किल्ले करीत होतात. किल्ला पडे. मी जवळ उभा होतो. मी विचारले, 'मी देऊ का करून?' तो हा प्रसंग.'

'बुधा, तुला सारे कसे आठवते?'

'काही काही गोष्टींचे अभंग ठसे उमटतात मधुरी!'

'आणि समुद्राकाठी उभी असलेली ही मधुरी!'

'हो. सागराला विचारीत आहे, कोठे आहे माझे मोती, माझे रत्न!'

'बुधा, तू का नेहमी चित्रे काढीत बसस?'

'हो, तुला रंगवीत बसे.'

'मधुरी बेरंग आहे. माझ्या जीवनात आता नाही हो रंग.'

'मी पुन्हा भरीन. मला रंग भरता येतात. छान छान रंग. परंतु देशील ना ते भरू? तुझ्या जीवनात मी रांगोळी घालीन. तेथे रांगोळीचे गालिचे घालीन.'

'रांगोळीचे गालिचे?'

'मग कसले मधुरी?'

'मला नाही असले बोलणे समजत. मधुरी भोळी आहे. साधी आहे.'

'मी साध्याच गोष्टी बोलत आहे.'

'ठेव ती चित्रे. कागदावरची चित्रे.'

'दुसरीही आहेत. जी फाटणार नाहीत, भिजणार नाहीत, मळणार नाहीत.'

'कोठे आहेत ती!'

'बुधाच्या अंतरंगातील दिवाणखान्यात. तेथे मधुरीची शेकडो चित्रे; मधुरीच्या अनंत तसबिरी.'

'बुधा, जरा पडते आता मी. तू पडतोस?'

'मी घरी जातो.'

'सायंकाळी ये हो. दिवे लावायला ये.'

आणि मधुरी झोपली. गोड गोड झोप तिला लागली. गोड गोड झोप.

अशीच दिवाळी गेली. आनंदाची दिवाळी झाली. मधुरीच्या जीवनात दिवे लागले. बुधाच्या जीवनात प्रकाश आला.

❖❖❖

: मी विचार करीन : :१३ :

'सोन्या, तू व रुपल्या शाळेत जा.' एके दिवशी बुधा म्हणाला.

'पण पाटी-पुस्तके?' सोन्याने विचारिले.

'मी आणून देईन.'

'रोज आई खाऊ देईल तर मी शाळेत जाईन.' रुपल्या म्हणाला.

'मास्तर देतील ना खाऊ.' बुधा हसून म्हणाला.

'म्हणजे मार ना? तसला खाऊ नको मला. गोड खाऊ हवा.'

'बरे हो. तुमच्याजवळ आणून ठेवीन. जात जा दोघे शाळेत. चांगलं शिका.'

'आणि मनी!'

'मनी हवी आईला मदत करायला.'

'पाणी सांडायला. चिखल करायला.' सोन्या म्हणाला.

मधुरीने चिबूड फोडून आणला.

'घे बुधा.' ती म्हणाली.

'आई, आम्हांला?' मुले म्हणाली.

'तुम्ही खाल्ला नाही का? असे काय आधाशासारखे करता? गोड आहे का साखर लावतोस?'

'गोड आहे.'

'तुला सारे गोडच वाटते.'

'तुझ्या हातचे सारे गोड. परिसाचा स्पर्श होताच लोखंडाचे सोने होते. तुझा हात लागला की असेच होत असेल. माझे जीवन मातीमोल झाले होते. परंतु तू ते आज सोन्याचे केले आहेस. हसतेस काय मधुरी? हस. गोड हस. तुझ्या हसण्याचे किरण पडू देत माझ्या

जीवनावर. माझे जीवन चमकेल. फुलेल.'

बुधा चिबूड खाऊन निघून गेला.

सायंकाळी बुधा आला.

'मधुरी, आज फिरायला येतेस? किती तरी वर्षांत आपण बरोबर समुद्रावर गेलो नाही. येतेस?'

'चल बुधा.'

आणि सारी समुद्रावर गेली. मधुरी ते नवीन अस्मानी पातळ नेसली होती. किती प्रसन्न दिसत होती ती. मुले वाळूत खेळू लागली. पाण्यात डुंबू लागली. बुधा व मधुरी टेकडीवर बसली. कोणी बोलेना. समुद्राकडे बघत होती दोघे.

'मधुरी, किती येथल्या आठवणी!'

'आपण येथे खेळत असू. तुला पतंग उडवता येत नसे. आठवते! मंगा तुला चिडवी. तू रडायला लागस.'

'परंतु तुझा हात मदतीला घेताच माझा पतंग उंचच उंच उडे. गोता खात नसे. खरे ना? मंगाच्या पतंगापेक्षाही मग आपला पतंग उंच उडे.'

'आणि एके दिवशी संध्याकाळी समुद्रात मंगा गेला आणि तू घरी जायला निघालास. मला भीती वाटते म्हणालास. मी तुला धरून ठेवले. नाही का?'

'हो.'

'आणि ती तुमची भांडणे. एके दिवशी तर तुम्ही मारामारी केलीत. माझ्यासाठी मारामारी. आणि मग आजीकडे गेलो. आठवतो का तो खेळ?'

'लटोपटीच्या लग्नाचा खेळ.'

'आणि मी भांडण मिटविले.'

'मधुरी, तू काय म्हटलेस तेव्हा, आठवते?'

'हो.'

'सांग ग.'

'भांडू नका. रडू नका. मी तुमची दोघांची छोटी बायको होईन असे मी म्हटले.'

'आणि आम्ही आनंदलो, खरे ना?'

तिकडे सूर्य मावळत होता. नारळीच्या झाडांवर शेवटचे किरण खेळत होते. जाताजाताच्या गुजगोष्टी करीत होते. समुद्र लालसर दिसत होता. आणि मधुरी व बुधा यांचे चेहरेही जरा लालसर दिसत होते. दोघांनी एकमेकांकडे पाहिले आणि पुन्हा समोर समुद्राकडे त्यांनी डोळे केले. मुले खेळत होती. बुधा-मधुरीचाही खेळ चालला होता. मनकवडेपणाचा खेळ. लपंडावाचा खेळ.

'बुधा!'

'काय मधुरी!'

'एकदा मी लपले होते. तुम्ही दोघे मला धुंडीत होता. आठवते तुला?'

'हो, आठवते. त्या पलीकडील दरडीत तू लपली होतीस आणि भरती येत होती. पाणी येऊ लागले. आणि तू हाका मारल्यास. तू घाबरलीस, खरे ना?'

'आणि मंगा पळत आला.'

'मीही येत होतो. परंतु वाटेत पायाला लागून पडलो.'

'लहानपणच्या गंमती लहानपणाबरोबर जातात.'

'परंतु आठवणी कायमच्या असतात. तू आता लपतेस मधुरी? मी पुन्हा तुला शोधू?'

'आता नको शोधू.'

'खरेच नको! तू का सापडलीस मला?'

इतक्यात मुले आली. उड्या मारीत आली. मनी मागे राहिली. ती रडू लागली.

नगर वाचनालय, सातारा
बालविभाग

'अरे, मनीला आण सोन्या. ती लहान आहे.'

'मी आणतो मधुरी.' असे म्हणून बुधाच गेला.

'आई, बुधाकाका चांगले आहेत.' सोन्या म्हणाला.

'तुम्हांला आवडतात का?'

'हो. पण नेहमीच का नाही ते आपल्याकडे रहात? मग मनीला घेतील. आम्हांला गोष्टी सांगतील.'

'मधुरी, मनी आली बघ मजजवळ.' बुधा म्हणाला.

'तू आलास म्हणजे तिला खाऊ देतोस. गोड दिले की मुले राजी.'

मधुरी म्हणाली.

'मोठ्या माणसांना काय दिले म्हणजे ती राजी होतात?' त्याने विचारले.

'त्यांनाही गोड मिळाले म्हणजे ती राजी होतात.' ती म्हणाली.

'आई, चल घरी.' रुपल्या म्हणाला.

'चला, दिवे लावण्याची वेळ झाली.' मधुरी म्हणाली.

ती घरी जायला निघाली. मनी बुधाजवळ होती.

'चालू दे तिला. लहान नाही ती आता. चल ग मने.' मधुरी म्हणाली.

'मी नाही चालत. मी बसते यांच्या खांद्यावर.' मनी कुरकुरली.

'बरे हो, नाही खाली ठेवीत तुला.' बुधा म्हणाला.

आणि मधुरीचे घर आले. बुधा उभा राहिला.

'ये ना आत.' मधुरी म्हणाली.

'जातो आता.' तो म्हणाला.

'जाशील. तुला घरी काय, इथे काय? आहे कोण घरी वाट पाहायला?'

'मधुरीची चित्रे वाट पाहातील. मी गेलो म्हणजे त्या चित्रांना

बघतो, हृदयाशी धरतो.'

'आणि ती तुझ्याजवळ बोलतात?'

'हो; किती तरी बोलतात, हसतात, रडतात.'

'निर्जीव चित्रे.'

'ती माझा स्पर्श होताच सजीव होतात. जातो आता मधुरी.'

'थांब. दिवा लावते. दिव्याला नमस्कार करून जा.'

मधुरीने दिवा लावला. मुले इकडेतिकडे फिरत होती. मनी स्वतःभोवती फिरत होती.

'बुधा, हा बघ दिवा.'

'माझ्या घरात केव्हा लावशील दिवा?'

'वेळ येईल तेव्हा.'

'जातो मी.'

'बुधा, शांत मनाने जा.'

आणि बुधा गेला. मुले घरात गेली. जेवणे झाली. ती पाखरे झोपली. मधुरी विचारमग्न होती. तिला झोप येईना. केव्हा झोप लागली ते तिला कळले नाही. केव्हा तरी डोळा लागला.

एके दिवशी पुन्हा ती एकदा अशीच फिरायला गेली होती. मुले वाळवंटात खेळत होती. मधुरी व बुधा टेकडीवर बसली होती. दोघे गंभीर होती. मुकी होती.

'बुधा, आज तू बोलत का नाहीस?'

'काय बोलू?'

'काही तरी बोल. तू असा का? काही होते का तुला?'

'मनाच्या कळा कुणाला सांगू?'

'मला सांग. तुझ्या मधुरीला सांग.'

'तू माझी आहेस?'

'लहानपणापासून आहे. मी का तुला परकी आहे? तू मला

परका आहेस? तसे असते तर मी पैसे मागायला तुझ्याकडे आल्ये असते का?'

'मधुरी?'

'काय?'

'तुला एक विचारू?'

'विचार हो बुधा.'

'तुला राग येणार नसेल तर विचारतो. वाईट नसेल वाटणार तर विचारतो.'

'विचार.'

'तू लहानपणी म्हणत असस की, मी तुमची दोघांची छोटी बायको होईन. ते शब्द तू खरे का करीत नाहीस! तू माझी का होत नाहीस? आपण पतिपत्नी म्हणून राहू. चालेल का ? रागावलीस तू? मधुरी, जोपर्यंत मंगा होता, तोपर्यंत मी कधीतरी बोललो का? तुमचा हेवादावा केला का? उलट तुमचा संसार सुखाचा व्हावा म्हणून मी प्रार्थना करीत असे. मंगा गेल्यावरही मी त्याच्या गैरहजेरीचा फायदा घेतला नाही. तुझ्याकडे आलो नाही. परंतु मंगा आता जिवंत नाही. व्हायला नको होते ते झाले. आता इलाज काय? आणि म्हणून आता हे मी विचारीत आहे. तुझ्या स्मृतीवर मी दहा वर्षे काढिली. तुझ्या चित्रांना पाहून आनंद मानला. 'जिवाचे बरे वाईट बुधा नको हो करून घेऊ.' असे तू सांगितलेस. म्हणून मी जिवंत राहिलो. मधुरी, माझी तपश्चर्या सफल कर. रागावू नकोस. तुझ्या मनाला दुखवावे असे नाही मला वाटत. परंतु आम्ही दोघे तुझ्या जीवनात शिरलेली आहोत. तूच परवा म्हणालीस की, माझ्या मनाची ओढाताण मला माहीत. मधुरी, कधी कधी जगात चमत्कार होतात. लहानपणाचे तुझे ते साधे बोल ईश्वराला कदाचित् खरे करावयाचे असतील! तुला नाही असे वाटत? तुझ्या मुलांचा मला लळा आहे. ये, मुलांसह माझ्याकडे ये. माझ्या जीवनात प्रकाश आण, आनंद आण, मला माणसांत आण. माझा दिवाणखाना सजव. माझे घर गजबजव. माझे

सुकलेले बगीचे पुन्हा फुलव. ये. माझ्या घरची झाडलोट कर. अवकळा आहे माझ्या घराला. तेथे कळा आण. रंग आण. रांगोळी आण. संगीत आण. माझे जीवन अव्यवस्थित आहे. तेथे तू ये व व्यवस्था लाव. माझ्या जीवनाची तू धनीण हो. मालकीण हो. माझ्या अंतर्बाह्य जीवनाची तू स्वामिनी हो. मधुरी, दुसऱ्याच्या जीवनात आनंद आणणे, दुसऱ्याची निराशा दडवून आशा देणे याहून थोर काय आहे? आणि मी काही पाप नाही करायला सांगत. मंगा होता तोपर्यंत माझ्या ओठांना कुलूप होते. मी मुका होतो. मी घर सोडून कधी फारसा बाहेर गेलो नाही. माझी खोली, तुझी स्मृती, तुझी मूर्ती, रंग कुंचले यात माझी सारी सृष्टी होती. माझे सागर माझ्या खोलीत भरलेले होते. सारे जग माझ्या खोलीत होते. परंतु आता मंगा नाही म्हणून मी आलो. तुझी दया म्हणून नव्हे, तुझी कीव करावी म्हणून नव्हे; तर माझे स्वतःचे जीवन कृतार्थ व्हावे म्हणून. माझे जीवन जीर्णशीर्ण झाले आहे. फाटले आहे. परंतु तू हस. तुझ्या प्रेमाचे हसरे किरण त्यावर फेक म्हणजे या चिंधीचा भरजरी पीतांबर होईल. मधुरी कर माझी इच्छा पूर्ण. मी तुझा आहे. म्हणून तुजजवळ मागत आहे. तू माझ्या जीवनाचा आधार, तूच विसावा.'

बुधा निराधार तुझाचि आधार
अमृताची धार तुझे नाव
तुझा म्हणूनिया आलो तुझे दारी
मी तव भिकारी भीक घाली
भीक घाल थोडी थोडी तरी दीना
देई जीवदाना अभागीया ।।

'मधुरी, खरेच हो मी निराधार आहे. तुझ्या नावावर मी जगलो. तुझे नाव म्हणजे अमृत. मधुरी, मधुरी असे मी म्हणावे व मिटक्या माराव्या. मधुरी, मधुरी म्हणावे व मी नाचावे. घाल, प्रेम-भीक घाल. तुझ्या दारात आलो आहे. जीवनदान दे. अभाग्याला भाग्य दे. मधुरी, मी तुझा आहे, तुझा आहे. तू माझी हो. होशील का?'

बुधा मधुरीसमोर केविलवाणा बसला होता. उत्कट आर्तीने, उत्कट प्रीतीने तिच्याकडे तो बघत होता. आपण काय बोललो तेही त्याला आठवत नव्हते. तो बोलत होता. हृदय ओतीत होता. तो आता जरा लाजला, संकोचला. पहिली उसळी ओसरली.

'मधुरी राग नको मानू. मी का वेडेवाकडे बोललो? काय बोललो ते देवाला माहीत, तुला माहीत.'

'बुधा रागावू कशाला! तूही माझा आहेस. मनातले बोललास, ठीक झाले. खळखळ ओतलीस, बरे झाले.' ती म्हणाली.

'परंतु तुझे काय? तू होणार का माझी? येणार का माझ्या घरात? माझे घर, माझी संपत्ती, माझे जीवन, माझे सारे सारे-त्याला कृतार्थ कर. सांग, काय करणार सांग.' तो तिचे हात धरून म्हणाला.

'बुधा, आणि मंगा आला तर?'

'मंगा असता तर एव्हाना येता. बोटभर चिठी तरी येती. तो अशा रीतीने तुम्हांला दुःखात ठेवता ना. चिंतेत ठेवता ना. देहरूपाने मंगा आता नाही. थोडी जरी त्याच्या जिवंतपणाची आशा असती तर मी असे बोललो नसतो. मधुरी, दहा वर्षे मी नाही का एकटाच बसलो? तसा मरेपर्यंत बसलो असतो. एक दिवस तू माझीही होशील या आशेने जन्मजन्म शांतपणे बसलो असतो. मंगा नाही म्हणून तर मी बोलतो आहे. आणि आता मंगाची बातमी ऐकूनही बरेच दिवस झाले. आता आपण काही केले तर त्यात उल्लूपणा दिसणार नाही. तुझे-माझेही लहानपणी प्रेम होते हे सर्वांस माहीत आहे. मी तुझ्या प्रेमास्तव आजपर्यंत असा फकिरासारखा राहिलो ही गोष्ट लोक जाणतात. त्यांना बरे वाटेल. लोक आशीर्वादच देतील. बरे झाले म्हणतील. मधुरीला आधार झाला. बुधाला जीवन मिळाले असे म्हणतील. बोल, मधुरी, बोल.'

'बुधा, मी एकदम काय सांगू? विचार करीन. आणि मंगा वर देवाघरी काय म्हणेल? त्याचा आत्मा माझ्याभोवती घुटमळत असेल. आमच्या झोपडीभोवती त्याचा आत्मा प्रदक्षिणा घालीत असेल. तो

काय म्हणेल?'

'तोही आशीर्वाद देईल. म्हणेल, लहानपणचे शब्द खरे झाले. आपल्या मित्राच्याही जीवनात आनंद फुललेला पाहून, वसंत आलेला पाहून, प्रेम दरवळलेले पाहून तो नाचेल. मधुरी, आपण का फसवीत आहोत?'

'परंतु विचार करीन. मागून पश्चात्ताप नको व्हायला. खरे ना बुधा?'

'हो! दहादा विचार करावा व मग पाऊल टाकावे; परंतु मधुरी, यात विचार करण्यासारखे काय आहे? हृदयाचा कल बघ. हृदयाची हाक ऐक. हृदयाचा सूर ऐक. तो फसविणार नाही.'

'बुधा, मी ते सारे पाहीन. मी एकटी रात्री बसेन त्या वेळेस हृदयातील खरा सूर नीट ऐकू येईल. खरे ना? चल आता जाऊ. मुलांकडे जाऊ. त्यांच्या खेळात जरा मिसळू, आपण लहान होऊ. चल, लहानपणाची होऊ. चल.'

❖❖❖

: दुर्दैवी मंगा : : १४ :

पण मंगा कोठे आहे? तो खरोखरच मेला का? त्याचे गलबत बुडाले, तोही बुडाला का? मंगा बुडाला नाही, मेला नाही. मंगा वाचला. लाटांवर तो फेकला गेला. तो पटाईत पोहणारा होता. लाटांवर तो स्वार झाला. गलबत बुडाले. माल समुद्रावर पसरला. मंगाने स्वतःचे लहानसे गाठोडे पटकन पकडले. ते छातीपाशी धरून तो पोहत होता. ते त्याने कमरेला बांधले. काय होते त्या गाठोड्यात? त्यात गोधडी होती. मधुरीचे हृदय होते.

पोहून पोहून मंगा दमला. तो लाटांवर जणू झोपला. जणू पाळण्यात आंदुळला जात होता. समुद्राच्या लाटांनी त्याला खेळवीत

खेळवीत एका किनाऱ्यावर नेऊन सोडले. आणि तेथे तो जागा जाला. जागा होताच कमरेभोवती पाहू लागला. ते गाठोडे होते.

किनाऱ्यावर कोणी नव्हते. कोणत्या देशाच्या किनाऱ्यावर तो येऊन पडला होता? त्याला काही कळेना. प्रवासाची ही पहिलीच त्याची पाळी. तो सभोवती पहात होता. काही चिन्ह दिसेना. जवळपास वस्ती दिसेना. त्याने नेसूचे धोतर व अंगातील कपडे वाळत टाकले. तो दिगंबर होऊन तेथे बसला होता. त्याला मोकळेपणा वाटत होता. त्याने त्या गाठोड्यातील कपडेही वाळत टाकले. ती गोधडी त्याने वाळत टाकली. सुंदर मधुरीच्या हातची गोधडी. त्या गोधडीनेच आपणांस वाचविले असे त्याला वाटले. त्याने ती गोधडी पुनःपुन्हा हृदयाशी धरली. ती स्वतःभोवती गुंडाळली. माझी मधुरी, माझी मधुरी असे तो म्हणे व नाचे.

कपडे वाळले. त्याने पोशाक केला आणि निघाला. कोठे जाणार? आत आत जायचे त्याने ठरविले. त्याला भूक लागली होती. त्याला तहान लागली होती. परंतु चालण्याशिवाय गत्यंतर नव्हते. एके ठिकाणी त्याला एक खळखळ वाहणारा झरा आढळला. तेथे तो पाणी प्याला. थोडी विश्रांती घेऊन तो निघाला. आता किर्र झाडी होती. रानात वानर खूप होते. ते हुपहुप करीत उड्या मारीत होते. सूर्यप्रकाशाचा तेथे प्रवेश नव्हता. मंगा दमला होता तरी झपझप जाते होता. रात्रीच्या आत कोठे तरी निवाऱ्याची जागा मिळावी म्हणून तो धडधडत होता.

आता जंगल संपले. ओसाड प्रदेश दिसत होता. रस्ता कोठेच दिसेना. तो आता अगदी थकून गेला होता तरी चालतच होता. त्या ओसाड प्रदेशातून तो जात होता. आता सखल प्रदेश लागला. मंगाच्या पायांत काही नव्हते. पायाला दगड खुपत होते. चालता चालता तो एका सरोवराच्या काठी आला. मोठे रमणीय प्रसिद्ध सरोवर. तेथे घाट बांधलेला होता. यावरून या बाजूला कोठे तरी वस्ती असावी असे त्याला वाटले. सरोवराच्या काठी झाडे होती. सरोवरात लाल कमळे होती. थंडगार वारा वहात होता. तो पोटभर

पाणी प्याला. त्या घाटावर तो झोपला. दगडाची उशी करून मधुरीची गोधडी अंगावर घेऊन तो पडला.

सर्व रात्र गेली. पहाटे पाखरांनी त्याला जागे केले. तो उठला. मधुरी त्याच्या डोळ्यांसमोर आली. मुले त्याच्या डोळ्यांसमोर आली. मधुरी जाऊ नको, जाऊ नको सांगत होती. आपण हट्ट धरून आलो. त्याला फार वाईट का वाटले? पुढे काय होणार? तो उमेदीने आला. व्यापार करण्यासाठी निघाला होता. त्याची उमेद खचली. तो निराश झाला. परंतु पुन्हा मन म्हणे, 'निराश नको होऊ. तुझ्या जगण्यात अर्थ नसता तर तू वाचतास का? तुझी व घरच्या प्रिय मंडळींची भेट होणार असेल म्हणूनच तू वाचलास.'

आता चांगलेच उजाडले. किती सुंदर सुंदर पक्षी तेथे होते. त्यांचे आवाजही मोठे गोड. त्या पाखरांच्या पंखाचे रंग पाहून मंगा दंग होई. सरोवरात कमळे फुलली होती. काही पक्षी सरोवरात पोहत होते. मंगाचा श्रमपरिहार झाला. इतक्यात त्याला दूर एक फळझाड दिसले. लालसर फळे होती. तो गेला. काही फळे खाली पडली होती. त्याने चाखून पाहिली. ती चवदार लागली. आंबटगोड फळे. त्याने ती फळे खाल्ली. पोटभर फलाहार झाला. येथेच सरोवराच्या काठी राहावे असे त्याला वाटले.

एके दिवशी तो घाटावर झोपला होता; आणि तेथे कोण आले? त्या देशाचा राजा तेथे आला होता. शिकारीला आला होता. गडबड ऐकून मंगा जागा झाला. त्याला घोडेस्वार दिसले. तो घाबरला. परंतु माणसे पाहून आनंदला. मंगाची मूर्ती दिसायला मोठी मोहक होती. राजाला वाटले की कोणी देवदूतच आहे. राजा मंगाजवळ आला. परंतु एकमेकांची भाषा एकमेकांस समजेना.

राजाने एक घोडा मंगाला दिला. आपल्याबरोबर चलण्यास सांगितले. मंगा काय करणार? तो राजाबरोबर निघाला. सारी मंडळी राजधानीस आली. तेथे दुभाषे होते. त्यांच्या द्वारा राजाशी बोलणे चालणे झाले.

नगर वाचनालय, सातारा
बालविभाग

'तुम्ही येथे राहा. तुमची नीट व्यवस्था होईल.' राजा म्हणाला.

'परंतु माझी मुलेबाळे घरी आहेत. राजा, माझी येथून रवानगी कर. मला घरी जाऊ दे.' मंगाने विनविले.

'नाही. येथून जाता येणार नाही,' राजा म्हणाला.

मंगाला एक बंगला देण्यात आला. त्यात सारी व्यवस्था होती. सारा थाटमाट होता. उंची वस्त्रे त्याला देण्यात आली. निजायला छपरी पलंग. जेवायला राजाच्या पंगतीला त्याला बसविण्यात येई. शहर सोडून जाता कामा नये एवढे बंधन त्याच्यावर होते. बंगल्याभोवती बाग होती. तीत त्याने हिंडावे-फिरावे.

मंगा तेथे राजपुत्राप्रमाणे होता. परंतु त्या सुखोपभोगात त्याचे मन रमेना. तो कंटाळला. तो दुःखीकष्टी झाला. परंतु करतो काय? राजाला एक मुलगी होती. त्या मुलीचे प्रेम या मंगावर जडले. करीन लग्न तर त्याच्याशीच असे ती म्हणू लागली. ती त्याच्याकडे येई. त्याला फुले देई. त्याच्याकडे पाहत राही. मंगाला कसे तरी वाटे.

एके दिवशी ती मंगाकडे आली. तो मंगा झोपलेला होता. मधुरीने दिलेली गोधडी त्याने अंगावर घेतली होती. राजकन्या पहात राहिली. मोठमोठी किंमतीची पांघरुणे तेथे असता गोधडी पांघरलेली पाहून तिला आश्चर्य वाटले. तिने मंगाला उठविले नाही. ती तेथे बसली. काही वेळाने मंगा जागा झाला. तो लाजला. त्याने ती गोधडी गुंडाळून ठेवली. राजकन्या निघून गेली.

सायंकाळी एका दुभाष्याला बरोबर घेऊन राजकन्या आली. तेथील एका मंचकावर ती बसली. तिने मंगाला स्वतःच्या जवळ बसविले.

'तुम्ही एकटे आहात का?' तिने विचारले.

'येथे तर एकटा आहे.' तो म्हणाला.

'तुमच्या घरी कोण आहे?'

'माझी पत्नी आहे; मुले आहेत.'

'तुम्हांला त्यांची आठवण येते का?'

'प्रत्येक क्षणाला येते. येथे माझे मन कशात रमत नाही. खाणेपिणे रूचत नाही. काय करावे कळत नाही.'

'परंतु येथून तुम्हांला जाता येणार नाही.'

'का बरे?'

'येथील नियम असा आहे की, राजाच्या परवानगीशिवाय जाता येत नाही.'

'राजा मला परवानगी देईल?'

'ते राजाच्या हाती नाही.'

'मग कोणाच्या?'

'राजाच्या मुलीच्या ते हाती आहे. राजाची मुलगी तुम्हांला जाऊ देणार नाही. राजा तिची इच्छा मोडणार नाही. आपली मुलगी दुःखी कष्टी व्हावी असे कोणास वाटेल?'

'राजाची मुलगी इतकी का दुष्ट आहे?'

'प्रेम दुष्ट असते.'

'प्रेम मधुर असते. प्रेमामुळे मनुष्य जगतो. प्रेमामुळे तरतो.'

'प्रेमाला मत्सर असतो. तुमच्यावर दुसऱ्या एका स्त्रीचे प्रेम असावे हे ह्या राजाच्या मुलीला खपत नाही. तुम्ही दुसऱ्या एका स्त्रीचे स्वामी असावे हे तिला पाहवत नाही. ती तुम्हांला येथून जाऊ देणार नाही.'

'मी तुमच्या पाया पडतो.'

'पण मला पाझर फुटणार नाही.'

'तुमचे माझ्यावर प्रेम आहे ना?'

'होय.'

'ज्याच्यावर प्रेम असते, त्याच्यासाठी आपण वाटेल ते करतो ना?'

'हो.'

'मग तुम्ही मला माझ्या स्वदेशास जाऊ द्यावे. ज्यात माझा आनंद, त्यात तुम्ही स्वतःचा माना. माझी मधुरी अशी आहे. ती मला प्रवासास जाऊ देत नव्हती. परंतु मी हट्ट धरला. शेवटी ती म्हणाली, 'तुम्हांला घरी नसेलच बरे वाटत तर जा. तुमच्या मनाचा आनंद त्यातच माझा.' अशी माझी मधुरी आहे. तिनेच म्हणावे की, मंगावर माझे प्रेम आहे. परंतु तुम्ही कसे म्हणू शकाल?'

'तुमच्याशिवाय मीही जगू शकणार नाही.'

'असे सगळे बोलतात आणि सगळे जगतात. क्षणभर माणसास वाईट वाटते.'

'तुम्हांला एक विचारू?'

'विचारा.'

'येथे मौल्यवान वस्त्रप्रावरणे असता ती गोधडी पांघरून तुम्ही का निजलेत? राजाला हे कळले तर तो रागावेल.'

'तुमच्या सर्व मौल्यवान वस्तूंपेक्षा ती चिंध्यांची गोधडीच मौल्यवान आहे. ती गोधडी म्हणजे माझे सर्वस्व, माझे जीवन.'

'ती का मंतरलेली आहे?'

'हो. तिनेच मला खवळलेल्या सागरात तारले.'

'कोणी दिली ही तुम्हांला?'

'मधुरीने-माझ्या पत्नीने. आणि देताना ती म्हणाली, 'माझ्या हृदयाचे तुकडे कापून त्यांची ही गोधडी मी शिवली आहे.' खरेच, जाऊ द्या हो मला माझ्या मधुरीकडे. ती वाट पहात असेल. किती तरी दिवस झाले, ती रडत असेल. मुले सारखी आठवण करीत असतील. येथे तुरुंगात पडून किती तरी दिवस झाले. मला का येथेच नजरकैदेत ठेवणार? पिंजऱ्यात पोपटाला ठेवणार? झुरून झुरून हा पोपट मरेल.'

'झुरून झुरून मीही मरेन. देवाने तुम्हांला इकडे का आणिले?

माझ्यासाठीच तुम्ही आला असे मला वाटते. तुम्ही माझे आहात. मी तुम्हांला जाऊ देणार नाही. येथे आपण दोघे झुरून झुरून मरू. तुम्ही रडा, मी रडेन. तुमचे खाण्यापिण्यात लक्ष नाही. माझे आहे वाटते? मी माझ्या महालाच्या खिडकीतून सारखी तुमच्याकडे पहाते. ही तुमची जागा म्हणजे माझे मंदिर. तुम्ही माझे देव. नका जाऊ तुम्ही. तुमचे नाव मंगा मला फार आवडते.'

'तुमचे काय नाव?'

'तुम्हांला आवडेल का?'

'नाव मला आवडेल.'

'आणि स्वतः मी? माझ्या जीवनाचे फुल तुम्हांला आवडेल का? या फुलाचा कोणीही वास घेतलेला नाही. हे फूल न हुंगलेले, अनाघ्रात असे आहे. हे नाही का तुम्हांला आवडत? हे फूल तुमच्यासाठीच फुललेले आहे. माझे जीवन कोणासाठी, खरेच कोणासाठी, म्हणून मी रात्रंदिवस मनात म्हणत असे. माझ्या जीवनाच्या फुलातील मध कोणाला देऊ, रसगंध कोणाला देऊ, सौंदर्य कोणाला अर्पण करू असे वाटे. अनेक राजपुत्र आले गेले. सारे माझ्या मते अनुत्तीर्ण झाले. माझे हृदय त्यांना पाहून हसले नाही, शरीर थरथरले नाही, त्यांना पाहून पदर सरसावला नाही, श्वास वेगाने सुरू झाला नाही. मी तशीच राहिल्ये. माझ्यासाठी राजा रडे , राणी रडे. माझे आईबाप माझ्यामुळे दुःखी कष्टी होतात. एकदा तर म्हणाले, 'जा जगात व शोध तुझा वर.'

'मग का गेला नाहीत तुम्ही धुंडाळायला?'

'माझा वर येथे आपण होऊन चालत येईल असे मी म्हणे. माझे फूल घ्यायला तो येईल. मला फुलून राहू दे. मधुकर येईल. भुंगा गुं गुं करीत येईल. माझ्याभोवती रुंजी घालील.'

'परंतु तो तर मी नाही, तो अजून यायचाच आहे. त्याची वाट पहा. नाही तर तो येईल व त्याची निराशा होईल.'

'मंगा!'

'काय?'

'तुम्ही असे कसे दुष्ट? एकीला सुखविलेत, आता मला सुखवा.'

'असे का जगात शक्य आहे? आमची लहानपणची गोष्ट आहे.'

'सांगा.'

'तुम्हांला कंटाळा येईल.'

'तुमच्याजवळ मी युगानुयुगे ऐकत बसेन. झऱ्याची गुणगुण गोड वाटते. पक्ष्यांची किलबिल कधी नीरस वाटत नाही. चंद्राचे चांदणे कधी शिळे होत नाही. फुलांचा गंध कधी नकोसा वाटत नाही. बोला, माझ्याजवळ पोटभर बोला तरी.'

'आम्ही लहान होतो. मी माझा एक मित्र व एक मुलगी. आम्ही तिघे होतो. आम्ही लटोपटीच्या लग्नाचा खेळ खेळत असू. आमची भांडणे लागत. मी म्हणे ती माझी नवरी होईल, तो म्हणे माझी होईल. शेवटी एकमेकांच्या छातीवर बसेपर्यंत पाळी येई. मग ती मुलगी आमची समजूत घाली. ती म्हणायची, 'रडू नका, भांडू नका. मी तुमची दोघांची छोटी बायको होईन.' पुढे आम्ही मोठी झालो. तिला का दोघांची बायको होता आले असते? एकाजवळ तिने लग्न लावले.'

'कोणाजवळ?'

'माझ्याजवळ.'

'तुमचा मित्र काय करतो?'

'त्याचेही तिच्यावर प्रेम. तो अविवाहित राहिला. तो फकिरासारखा वागतो; परंतु त्याने आमच्या मार्गात अडथळे आणिले नाहीत; तो म्हणतो, 'माधुरीचा ज्यात आनंद तोच मी माझा मानला पाहिजे.' असा तो माझा मित्र आहे. थोर मनाचा मित्र. तुम्हीही तसेच

करा. प्रेमाची पराकाष्ठा करा. ज्याच्यावर आपण प्रेम करतो त्याला गुलाम करून, मारून मुटकून गुलाम करण्यात काय स्वारस्य? प्रेमाने मोकळीक द्यावी. जाऊ द्या मला. मधुरीला केव्हा हृदयाशी धरीन असे मला झाले आहे. तुम्हांला तिच्या हृदयाची जाणीव का होत नाही?

'आणि माझ्याही हृदयाची कल्पना तुम्हांला का होत नाही? मला आज काय कमी आहे? सारी सुखे आहेत; परंतु मी आज संन्यासिनी झाले आहे, मला काय यातना होत असतील? मी का तुम्हांला स्वातंत्र्य देत नाही? तुम्हांला बळे नेले का माझ्या महालात? तुम्हांवर आणले का दडपण? तुमचा केला का छळ? मंगा, प्रेमाचा मत्सर फार दुष्ट असतो. मी तुमचा वधही करीन. प्रेमाची सुरी दुधारी असते. ती दोघांना मारील. मी तुम्हांला ठार करीन व स्वतःलाही करीन. मी काय करीन मला माहीत नाही. प्रेम माणसाला चवताळविते. प्रेमाने मनुष्य हळुवार होतो व दगडाहूनही दगड होतो. मंगा, माझी कीव करा. आज मी जाते. माझे अश्रू रोज पाहून पाहून तुम्ही विरघळाल.'

'मला काय येथे कोंडून मारणार? अरेरे! माझ्या साऱ्या आशा मेल्या. माझ्या मधुरीला सुखात ठेवण्याची माझी इच्छा. मुलाबाळांना सुखात ठेवण्याची इच्छा. ती टाहो फोडीत असतील. घरी खायला नसेल. माझ्या वाटेकडे डोळे लावून बसली असतील बिचारी. आणि मी का येथे सुखोपभोगात रमू? उद्यापासून मी खाणेपिणे बंद करतो. अन्नव्रत घेतो. मधुरीचे स्मरण करीत येथे प्राण सोडतो.'

'नको मंगा, असे करू नका. वाट पहा.'

'किती दिवस येथे वाट पाहू?'

'काही दिवस जाऊ देत. मला आशा आहे की, तुमच्या हृदयात एक दिवस माझ्यासाठी प्रेम फुलेल. तुमच्या जीवनात ती घरटे बांधील. तुमच्या जीवनात, हृदयकुंजात कुहू करणारी मी कोकिळा बनेन. परंतु मंगा, ज्या दिवशी ही माझी आशा संपूर्णपणे मरेल त्या दिवशी मी तुम्हांला जाऊ देईन. मी तुम्हांला मुक्त करीन. मग माझे काहीही होवो. पाण्यावाचून मासा त्याप्रमाणे मी मग तडफडून मरेन.'

आणि ती राजकन्या गेली, मंगा तेथे रडत बसला. शून्य दृष्टीने पहात बसला. किती दिवस येथे पडून राहावे लागणार ते त्याला कळेना. त्याने ती गोधडी काढून आपल्या हृदयाशी धरिली, आणि पुन्हा ती हृदयाशी धरून तो तसाच झोपी गेला.

❖❖❖

: बुधाचा संसार : : १५ :

बुधाने बरेच दिवस मधुरीजवळ पुन्हा गोष्ट काढली नाही. परंतु पुन्हा एके दिवशी त्याने तो प्रश्न विचारला. ती अशीच फिरायला गेली होती. मुले खाली खेळत होती व ती दोघे त्या प्रेममय टेकडीवर होती.

'मधुरी, मग काय? केलास का विचार? कधी संपणार तुझा विचार? या बुधाची दया कर. माझा अंत नको पाहू. स्वीकार माझे जीवन. ते कृतार्थ कर. सांग, काय ठरविलेस?'

'बुधा, आणि मंगा आला तर काय म्हणेल?'

'तुला वाटते का तो आता येईल? तो जिवंत असता तर कधीच येता. खोटी आशा बाळगण्यात अर्थ नाही.'

'परंतु माझ्या हृदयात एखादे वेळेस वाटते की तो कोठे तरी संकटात सापडला असेल. परंतु शेवटी सुखरूप येईल. असे का वाटते?'

'मधुरी, आपण आजीबाईला जाऊन विचारू, चल.'

आणि ती दोघे म्हातारीकडे जायला निघाली. आम्ही आजीबाईकडे आहोत असे मुलांना सांगून ती दोघे गेली. म्हातारी खाटल्यावर पडली होती. तीही आता थकत चालली होती.

'ये मधुरी, ये.' ती म्हणाली.

'आणि मला नाही का हाक मारीत?' बुधाने विचारले.

'तूही ये हो बुधा. तुझ्याबद्दल मला फार वाटते. तुझेही मधुरीवर प्रेम. इतकी वर्षे तपश्चर्या करीत आहेस. धन्य तुझी!'

'आजी, तुला एक विचारायला आम्ही आलो आहोत.' तो म्हणाला.

'काय विचारायचे आहे? विचार.'

'आजी, मधुरीवर माझे व मंगाचे दोघांचे प्रेम होते. मधुरीने मंगाला माळ घातली. मी मुकाट्याने अश्रू ढाळीत माझ्या खोलीत बसून राहिलो. जग निजले म्हणजे दंवबिंदू टप्टप् पडत असतात. जग निजावे परंतु हा बुधा जागाच असे. रडत बसे. आजपर्यंत मी असे दिवस काढले. मंगा व्यापारासाठी गेला तरीही मी दूर होतो. परंतु आता तर मंगा नाही. गलबत दुर्दैवाने बुडाले. कोणी वाचले नाही. संशय उरला नाही. दोन वर्षे होऊन गेली. मंगा असता तर येता. चिठी-निरोप येता. म्हणून मी मधुरीला म्हटले, की तू आता माझी बायको हो. लहानपणी मधुरी म्हणत असे की मी तुमची दोघांची छोटी बायको होईन. ते म्हणणे देवाला खरे करायचे असेल कदाचित! आजी, मी काय वाईट सांगितले? मधुरीचे मजवर अजिबात प्रेम नसते तर गोष्ट निराळी. मलाही तिच्या जीवनात स्थान आहे. तिच्या हृदयात मला जागा आहे. सांग, आजी, तू सल्ला दे.'

'आजी, मला आपले वाटते की मंगा येईल.'

'आता नाही येण्याची आशा. मधुरी, बुधाजवळ लग्न केलेस तरी हरकत नाही. तुम्ही मंगाला फसवता असे नाही. मंगा मेला असे कळल्यावर बुधा अशा गोष्टी तुजजवळ बोलू लागला, तोपर्यंत त्याची कथा, त्याची निराशा त्याने स्वतःजवळ ठेवली होती. मधुरी, बुधाने अपार कष्ट भोगले. सुखात भिकाऱ्यासारखा राहिला. दे त्याला थोडे सुख दे. त्याच्या जीवनात फुलव फुले. त्यात पाप नाही. देव दोष देणार नाही. मीच तुला हे सांगणार होते.'

'आजी, आम्हांला तुझा आशीर्वाद आहे?' मधुरीने विचारले.

'होय आहे.' म्हातारी म्हणाली.

'तर मग तूच आमचे हात एकमेकांच्या हातात दे.' बुधा म्हणाला.

आणि म्हातारीने त्यांचे लग्न लावले. दोघांचे हात हाती देण्यात आले. दोघे आजीबाईंच्या पाया पडलो. आजीबाईने गुळाचा खडा दोघांना दिला. गोड तोंडे करून दोघे गेली. बुधा पळत सुटला. मधुरी मागून येत होती. बुधाने जाऊन मनीला उचलले. तो नाचू बागडू लागला. एकदम त्याला जणू नवे पंख फुटले. एकदम अपार उत्साह व आनंद त्याच्यात संचारला. समुद्र नाचत होता. उचंबळत होता. बुधाही उचंबळत होता. ती सारी घरी आली. एकत्र बसली.

'सोन्या, आता तुम्ही सारी माझ्याकडे राहायला येणार. ठरले.'

'होय का ग आई?' त्याने विचारिले.

'होय. आपण बुधाकाकांकडे राहायला जायचे. ते आता तुमचे बाबा होतील. ते तुम्हांला शिकवतील, खेळवतील, खाऊ देतील. माझ्या मंगाची जागा बुधा भरून काढील.' ती म्हणाली.

'म्हणजे आमचे बाबा होते तसे बुधाकाका, होय ना?' त्याने विचारले.

'होय.' मधुरी म्हणाली.

'आता मोठ्या घरात जायचे रुपल्या.' सोन्या म्हणाला.

'मजा येईल. मी बागेत खेळेन.' रुपल्या म्हणाला.

'मी बागेतील फुले तोडीन.' मनी म्हणाली.

आणि दुसऱ्या दिवशी खरेच सारी बुधाच्या घरी राहावयास आली. मधुरीच्या घरी सामान नव्हतेच फारसे. गडीमाणसे कामाला लागली. झोपडीतील संसार बंगल्यात आला. गावात सर्वत्र बातमी पसरली. लोकांना बरे वाटले.

'बुधा आता हसेल. बारा वर्षे तो हसला नाही.' कोणी म्हणाले.

'त्याचे आईबाप त्याच्या दुःखाने मेले. त्यांच्या आत्म्यास

समाधान मिळेल.' दुसरे म्हणाले.

'मधुरीचे व मुलांचेही बरे झाले. हाल वाचले. नाही तर त्यांना कोणी विचारिले असते? तीन मुलांची आई मधुरी. तरीही बुधाने तिला प्रेमाने स्वीकारिले. धन्य त्याची!'

'त्याने प्रेमाने स्वीकारले का करुणेने?'

'करुणाच असेल - तारुण्यातील प्रेम अद्याप थोडेच असेल?'

'असेल हो.'

असे लोक बोलू लागले. बुधाने गावाला मेजवानी दिली. सारे लोक आनंदले.

'बारा वर्षे घर सुने होते. आता गोकुळ होवो!'

'आता आनंदाने गजबजो.'

'आता संगीत सुरू होऊ दे.'

'आता भरपूर सुख पिकू दे.'

असे आशीर्वाद देऊन लोक गेले. कोणी मंगाबद्दलही हळहळले. मधुरीलाही मधून रडू येई. समारंभ संपला. नवीन घराची मधुरी मालकीण झाली. घराला कळा आली. घर झाडले गेले. नवीन रंग दिला गेला. जणू आज दिवाळीच होती. किती वर्षांत त्या घराला रंग दिलेला नव्हता. कोणाचे नशीब कधी उघडेल याचा नेमच नसतो.

दिवाणखान्यातील हंड्या, झुंबरे, तसबिरी पुसण्यात आल्या. तेथे छानदार बैठक घालण्यात आली. गालिचे पसरले गेले. तक्के, लोड ठेवण्यात आले. मखमलीची कोचे ठेवण्यात आली. फुलांचे गुच्छ ठेवण्यात आले. सर्वत्र स्वच्छता, सौंदर्य व प्रसन्नता दिसून येत होती.

मधुरी रेशमी पातळ नेसली. तिने मोत्याचे अलंकार घातले. ती एकदम निराळी दिसू लागली. ती अगदी नवीन तरुण युवती जणू झाली.

'मधुरी, तू किती सुंदर दिसतेस!' बुधा बोलला.

'तुझ्यामुळे हो. तुझ्यासाठी मी पूर्वीची झाले. तुझ्यासाठी जणू

नगर वाचनालय, सातारा
बालविभाग

नवीन झाल्ये. बारा वर्षांपूर्वी होते तशी झाल्ये. मला आज हलके हलके वाटते आहे. पाखरासारखे उडावे असे वाटत आहे. बुधा, काय जादू केलीस?'

'तुझ्याच हृदयातील बंद भाग उघडल्यामुळे ही जादू झाली. तुझ्या हृदयाचा एक कप्पा आजपर्यंत बंद होता. तो आज उघडला. त्यातील न खर्चिलेली संपत्ती बाहेर पडत आहे. खरे ना?'

'बुधा, मंगा म्हणायचा तुला मोत्यांनी नटवीन.'

'मंगाची इच्छा पूर्ण झाली. तुला दारिद्र्यात खितपत पडावे लागू नये अशी त्याची इच्छा होती. त्यासाठी तो समुद्रापलीकडे गेला. ठीक, तू आता गरिबीत गारठणार नाहीस. आपणांस मंगाचा आत्मा आशीर्वाद देत असेल. तो आपल्याभोवती असेल व प्रेमळ दृष्टीने पहात असेल नाही?'

'होय हो बुधा, मलाही असेच वाटते. मंगाचा तुझ्यात अवतार झाला असे मला वाटते. ज्या दिवशी तू मला विचारलेस त्या दिवशी मंगाच तुझ्यात संचारला असावा. आपल्या मधुरीला व मुलांना दुःख पडू नये, कष्ट पडू नयेत म्हणून मंगानेच या बुधाला प्रेरणा दिली असावी. नाही तर भित्रा बुधा असे विचारायला धजता ना.'

'मधुरी, तुला आनंद आहे ना? रुखरुख नाही ना?'

'असे वाटते. त्यातून देव जाणे.'

'माझी मधुरी आनंदी राहो.' असे म्हणून बुधाने तिचा हात जवळ घेतला.

बुधाने मधुरीचे एक मोठे चित्र रंगविले. ते दिवाणखान्यात मध्यभागी टांगले. त्याच्या हृदयाच्या दिवाणखान्यात तर ती कधीचीच होती. बुधा आता गाणे-बजावणे शिकू लागला. मुलेही शिकू लागली. सोन्याचा आवाज गोड होता. तो चांगला गाणारा होईल असे वाटू लागले.

आनंदात दिवस चालले होते आणि त्या आनंदात भर पडणार होती. मधुरीला नवीन बाळ होणार होते. बुधा हर्षला होता. त्याला

थोडी काळजीही वाटे. तो मधुरीला तिची इच्छा विचारी. ती हसे व म्हणे,

'बुधा, तू वेडा आहेस.'

'का? असे का म्हणतेस?'

'अरे, पहिल्या बाळंतपणाला डोहाळे नि बिहाळे. नेहमी सुरू झाले की का कोणी विचारतो?'

'परंतु माझ्या घरातले तुझे पहिलेच बाळंतपण. मधुरी, तुला नाही का यांचा आनंद होत? खरे सांग.'

'होतो हो, बुधा.'

'मग सांग तुझी इच्छा.'

'माझ्या इच्छा तूच ओळख व पुऱ्या कर.'

'मला कसे काय कळणार तुझ्या मनातील?'

'प्रेमाला सारे कळते. प्रेम सर्वज्ञ असते.'

'मधुरी, उद्या पौर्णिमा आहे.'

'मग?'

'आपण नावेत बसून फिरायला जाऊ, येशील?'

'माझ्या मनातलेच बोललास तू.'

आणि दुसऱ्या दिवशी रात्री मधुरी व बुधा बाहेर पडली. मुले झोपली होती. एक सुंदर नाव सजविण्यात आली. तीत सुंदर गादी घालण्यात आली. मधुरी हळूहळू चालत होती. समुद्रकाठी दोघे आली.

'थांब. मी तुला उचलून ठेवतो.'

'नको रे बुधा, असे काय वेड्यासारखे?'

दोघे नावेत बसली. नावाडी वल्हवू लागले. समुद्राला भरती होती. किती सुंदर देखावा. मधुरी व बुधा हातात हात घेऊन बसली होती.

'मधुरी, माझ्या मांडीवर डोके ठेवून नीज.'

'बुधा, वाजव बासरी. तू हल्ली शिकतोस ना?'

'चांगली नाही येत.'

'आज येईल. वाजव.'

मधुरी बुधाच्या मांडीवर डोके ठेवून शांतपणे पडली. आणि बुधा बासरी वाजवू लागला. तिचे सूर वाऱ्यावर जाऊ लागले. ते बासरीचे सूर मंगाच्या कानावर जातील का? मंगा ओळखील का ते सूर? आणि बासरी ऐकून समुद्र का शांत झाला? वारा का शांत झाला? नाव एखाद्या हंसाप्रमाणे चालली होती. बासरी वाजत होती.

मधुरीच्या डोळ्यांतून पाणी गळत होते. बुधाने बासरी थांबविली. तो खाली वाकला.

'मधुरी, हे काय?'

'काय सांगू बुधा?'

'का डोळे भरले?'

'हृदय भरून आले म्हणून.'

'मधुरी, तुझ्या मनात कोणते विचार खेळत आहेत?'

'सांगितले तर भिशील.'

'तू बरोबर असलीस म्हणजे मी कधी भीत नाही.'

'खरेच?'

'हो.'

'सांगू मनातले विचार?'

'सांग.'

'मला वाटले की ही नाव अशीच दूर दूर जावी आणि पुढे प्रचंड वादळ उठावे. प्रचंड लाटा उठाव्या. आपण हातात हात घ्यावे व मंगाच्या भेटीला जावे. त्याचेही हात आपल्या हातात मिळतील. जेव्हा तुमचे दोघांचे हात मीं माझ्या हाती घेईन तेव्हाच मला पूर्णता वाटेल.

मंगाबरोबर मला अपुरे वाटे. तुझ्याबरोबरही अपुरे. माझी भूक फार मोठी. मी मंगाकडेही उपाशी, तुझ्याकडेही उपाशी. पोटभर जेवण कोठेच नाही. अपुरी पडतात तुमची प्रेमे. तुम्ही दिलेले घास अपुरे. आपण तिघे एकत्र राहू या. एकत्र खेळू, खिदळू. लहानपणी ती पूर्णता होती.'

'मधुरी, लहानपणाचे पूर्णत्व मोठेपणी अपूर्ण होते आणि अपूर्णातच मौज आहे. ओकेसतो जेवण्यात अर्थ नाही. थोडी ती गोडी.'

'तू काही म्हण. माझे असे आहे खरे. चल बुधा, आपण उडी टाकू. अथांग सागरात बुडी. वर चंद्र फुलला आहे. मनात प्रेम फुलले आहे अशा वेळेसच चल बुडी घेऊ. पुन्हा अंधार नको यायला अमावास्येचा. आजचा दिवस आपण अमर करू, ये घेतोस?'

'मधुरी, नको असे बोलू. नीज, मी बासरी वाजवितो.'

'वाजव. पोटातील बाळालाही ऐकू दे बासरी. म्हणजे त्याच्या जीवनात आनंद राहील.'

'मधुरी, बाळाचे नाव ठेवायचे?'

'मुलगा झाला तर मोती व मुलगी झाली तर वेणू. ही नावे मंगाने जाताना सांगितली होती. परंतु ते बाळ वाचले नाही. या बाळाला त्यातील नाव ठेवू. मंगाने दिलेले नाव.' ती म्हणाली.

थोडा वेळ कोणी काही बोलले नाही. बुधा व मधुरी आनंदात मग्न होती.

'बुधा, आता परतू.'

'थांब ना.'

'घरी मनी उठेल. आणि मला हा गार वारा बाधेल.'

'ही घे शाल पांघरायला.'

'तू पण ये. एका शालीत दोघे गुरफटवून घेऊ.'

'मला नको. तूच घे अंगावर मधुरी.'

'वेडा आहेस तू. नुसत्या शालीने थंडी नाही थांबणार. तुझ्या प्रेमाची ऊबही हवी. तीही दे. ये माझ्याजवळ. गारगार वाटत आहे.'

ती दोघे एकच शाल पांघरून बसली. नाव तीराला आली. दोघे उतरली. दोघे हळूहळू घरी आली. मुले शांत झोपली होती. मनी उठली नव्हती. मधुरी व बुधाही झोपी गेली.

मधुरी बाळंत झाली आणि मुलगी झाली. नक्षत्रासारखी मुलगी. तिचे नाव वेणू ठेवण्यात आले. रंगीत पाळणा नवीन घडविण्यात आला. त्यावर मोत्यांचे राघू, पाचूची पाखरे लावण्यात आली. पाळण्याला रेशमाची दोरी. सारा थाट अपूर्व होता.

'सोन्या, रुपल्या, मनी सारी गरिबीत वाढली.' ती म्हणाली.

'मला वाटे तू मजजवळ मदत मागावीस; परंतु तू मागत नसस. तुला गरिबी बाधू नये असे मला वाटे; परंतु काय करणार मी?'

'परंतु देवाने सारे चांगले केले. मुलांना कधी थंडी वारा बाधला नाही, आणि ही वेणू भाग्याची आहे.

'वेणू बासरी ऐकत वाढली - नाव योग्य आहे.' तो म्हणाला.

'मंगाला का पुढचे दिसत होते? बुधाची बासरी ऐकत मधुरीच्या पोटात बाळ वाढत असेल, असे का त्याला दिसले? अशी हसते आहे लबाड? समजते का ग तुला? तुला आहे का माझा मंगा माहीत? आला तर त्याला ओळखशील का ग लबाडे?' असे म्हणून मधुरीने वेणूचे मुके घेतले.

एके दिवशी मधुरी एकटीच बसली होती. जवळ वेणूला निजवली होती. जशी जाईजुईची कळी, मोगऱ्याची कळी - मधुरी काही तरी विचार करीत होती. इतक्यात बुधा आला. मधुरीजवळ बसला.

'मी पण निजतो.' तो म्हणाला.

'नीज हो राजा.' ती म्हणाली.

आणि तो तेथे निजला. मधुरीच्या उशीवर डोके ठेवून तो निजला. मधुरीने थोड्या वेळाने त्याचे डोके उचलून स्वतःच्या मांडीवर घेतले. तो हसला.

'काय झाले हसायला?' तिने विचारले.

'तुम्ही बायका वेड्या.' तो म्हणाला.

'हो, आम्ही वेड्या आहोत. प्रत्येक गोष्टीतून प्रेम प्रकट करावे असे वाटते. हृदयातील प्रेम मावत नाही; ते कोणत्या तरी निमित्ताने आम्ही बाहेर ओततो.'

'मधुरी, मी आता आलो तेव्हा तू का विचार करीत होतीस?'

'हो.'

'कसला विचार?'

'सांगितला तर रागावशील.'

'हे काय असे बोलतेस?'

'ऐक तर. तू एक मंगाचे मोठे चित्र कर ना तयार. मंगाही माझ्या दिवाणखान्यात हवा. करशील तयार?'

'करीन.'

'बुधा, तुला मत्सर नाही वाटत? मंगाचे नाव काढले म्हणजे वाईट नाही वाटत?'

'मत्सर न वाटू द्यायला तू शिकविले आहेस. तुझा आनंद तो माझा.'

'बुधा, तू किती चांगला. असे चांगले लोक फार नसतात हो. जगात मत्सर फार. द्वेष फार. सरळपणा कमी. माझा बुधा सरळ मनाचा आहे. थोर मनाचा आहे. रंगव हो माझा मंगा. माझ्या जीवनाला रंगवणारे तुम्ही रंगारी. दोन रंगारी. मंगा व बुधा. एक रंगवून गेला. दुसरा रंगवीत आहे. कुंचले फिरवीत आहे. खरे ना लबाडा? खरे ना रंगाऱ्या?' असे म्हणून तिने त्याच्या नाकावर बोट

मारले.

आणि बुधा मंगाचे भव्य चित्र रंगवू लागला. त्यात तो रमला, रंगला. मधुरी जवळ येऊन बसे व बघत राही. त्यामुळे बुधाच्या बोटात अधिकच कला नाचू लागे.

'डोळे हुबेहुब साधले आहेत. डोळ्यांवर सारे आहे.' मधुरी म्हणाली.

'सोन्याचे डोळे मंगासारखे आहेत, नाही?' बुधाने विचारले.

'आणि वेणूचे?'

'तिचे माझ्यासारखे आहेत.'

'रंगव. बोलू नकोस. मी जाऊ?'

'नको जाऊ. तू येथेच बस; म्हणजे माझी कुंचली हळुवार चालते.' असे ते चित्र तयार होत होते.

'त्या बाबांचे चित्र.' सोन्या म्हणाला.

'ते आले तर आता असे नाही दिसणार. ते तर म्हातारे झाले असतील.' रुपल्या म्हणाला.

'कशावरून रे?' बुधाने विचारले.

'मेलेली माणसे म्हातारी होतात.' रुपल्या म्हणाला.

'बाबा एकदम आले तर तू ओळखशील का ग आई?' सोन्याने विचारले.

'हो.' ती म्हणाली.

'काही तरीच. नाही ओळखता येणार. हे चित्रातले बाबा छान आहेत.' सोन्या म्हणाला.

'आणि मी!' बुधाने विचारले.

'तुम्ही छान. दोघेही छान.' तो म्हणाला.

एके दिवशी ते चित्र पुरे झाले. मधुरीच्या चित्रासमोरच्या

भिंतीवर ते टांगण्यात आले. जणू एकमेकांकडे दोघे बघत आहेत व मंद स्मित करीत आहेत! एखादे वेळी मधुरी येई, त्या चित्रासमोर येऊन बसे व हात जोडी. 'माझा मंगा' असे म्हणे. पुन्हा पटकन् उठून निघून जाई. तिच्या जीवनात बुधा शिरला होता. परंतु मंगाचे स्थान अढळ होते. मंगाला कोण नेणार? मृत्यू नेऊ शकणार नाही, समुद्र बुडवू शकणार नाही. मंगा, मंगा अशीच हाक तिचे हृदय मुकेपणाने मारीत होते.

❖❖❖

: घरच्या मार्गावर : : १६ :

मंगाच्या मनात प्रेम उत्पन्न व्हावे म्हणून राजकन्या तपश्चर्या करीत होती. ती जणू त्याची मोलकरीण बनली. ती स्वतःची श्रीमंती विसरली. मी राजकन्या आहे ही तिची जाणीव मेली. ती एक प्रेमपूजा करणारी साधी मानव बनली. मंगाची बंगली ती स्वतः झाडी. त्याच्यासाठी स्वच्छ पाणी भरी. त्याचे कपडे धुई. त्याला फुले आणून देई. मंगा बोलत नसे. तरीही ती तेथे येऊन मुकाट्याने बसे. देवाची प्रार्थना करीत होती. प्रेमदेवाला प्रसन्न करू पहात होती.

परंतु मंगाला मधुरीचे वेड. राजकन्येचे सौंदर्य पाहून तो भुलला नाही. ती नवीन नवीन वस्त्रे रोज नसे. नवनवीन दागिने घाली. एखादे दिवशी निर्मळ मोत्यांनी नटून येई, तर एखादे दिवशी सोन्याने पिवळी होऊन येई. कधी फुलांनी नटे व जशी वनदेवता दिसे. नाना प्रकारांनी मंगाला ती मोहू पाहत होती. परंतु मंगा अविचल राहिला.

ती त्याच्या खोलीत येऊन तासन् तास बसे; जणू त्याच्याजवळ भिक्षा मागत होती. तिच्या डोळ्यांतूनही पाणी येई. ती दीनवाणेपणाने त्याच्याकडे बघे. परंतु मंगा बदलला नाही. त्याच्या हृदयातील मधुरी

त्या अश्रूंनी वाहून गेली नाही.

असे दिवस जात होते. राजकन्या आता कठोर झाली. तिने वडिलांना सांगून मंगाला तुरुंगात अडकविले. तुरुंगात त्याला अंधारकोठडीत ठेवण्यात आले. ना जगाचे दर्शन, ना कोणाचे. मधुरीचे चिंतन करीत तो बसे.

एके दिवशी राजकन्या त्याला भेटायला आली.

'कसे काय मंगा?' तिने विचारले.

'चांगले आहे.' तो म्हणाला.

'काही इच्छा आहे?'

'एक आहे.'

'कोणती?'

'माझ्या खोलीतील ती गोधडी मला आणून द्या. मग मी येथे सुखाने राहीन. तेवढी कृपा करा.'

'मंगा, तुला हा एकान्त आवडतो?'

'मी एकटा कधीच नसतो.'

'कोण आहे येथे तुझ्याबरोबर?'

'मधुरी आहे. माझी गोड मुलेबाळे आहेत.'

'माझी दया नाही येत तुला?'

'माझी तुला नाही ना येत?'

'मंगा, का असे हाल सहन करतोस? माझ्याबरोबर सुखाने राहा. सुखाचा जीव दुःखात का घालतोस?'

'मी येथे सुखात आहे.'

'तुझे हालहाल करवते थांब. माझ्या अंगाची आग आज तू करतोस; तुलाही आगीत लोटले पाहिजे.'

'लोट. म्हणजे मी लौकर शांत होईन. मधुरीशिवाय जगणे मला असह्य होत आहे. मला विषाचा पेला दे. फाशी लटकव. हालहाल

करून मार. मी तुझा आभारी होईन.'

'मंगा, मी असे करीन?'

'सारे करशील. प्रेम उलटले तर ते विषाहून मारक होते. श्रद्धा मेली तर मनुष्य अधिक क्रूर होतो. तूच मला बंगल्यात देव म्हणून पूजिलेस. तूच मला आज या अंधारकोठडीत ठेवले आहेस. उद्या मारशीलही. सारे शक्य आहे.'

'नाही हो. मंगा, मी इतकी नीच नाही.'

'तर मग माझी गोधडी मला आणून दे.'

'माझ्या प्रेमापेक्षा ती चिंधी तुला प्रिय आहे ना?'

'हो.'

'उद्या ती गोधडी आणून येथे तुझ्यासमोर जाळून टाकते.'

'तिच्याबरोबर मलाही जाळ. माझ्या अंगाभोवती ती गुंडाळ व दे काडी लावून. माझ्या जीवनाचे सोने होईल.'

राजकन्या गेली. मंगा विचार करीत बसला. मधुरी, मधुरी असा तो जप करी. त्याच्या खोलीत एक उंदीर येई. मंगा त्याला भाकर देई. तो उंदीर त्याला मित्र वाटे. तो त्याचा तेथला सोबती झाला. तो उंदीर आपल्या चंचल डोळ्यांनी त्याच्याकडे बघे. जणू त्याचे सुखदुःख विचारी. कुरतडून टाकू का तुझे दुःख, असे जणू विचारी.

एके दिवशी राजकन्या आली. ती गोधडी घेऊन आली. मंगाला तिने बाहेर काढले. शिपाई उभे होते.

'मंगा, तेथे उभा राहा.' ती म्हणाली.

'उभा राहून काय करू?' त्याने विचारले.

'मधुरीने दिलेल्या गोधडीची होळी बघ.' ती हसत म्हणाली.

तिने ती गोधडी बरोबर आणली होती. शिपायांनी होळी पेटविली. राजकन्या आता ती गोधडी त्या होळीत टाकणार इतक्यात मंगाने वाघासारखी झडप घातली व ती गोधडी त्याने ओढून घेतली. शिपायांनी त्याला खसकन् ओढले.

'धरू नका त्याला.' ती म्हणाली.

शिपायांनी त्याला सोडले.

'तुम्ही निघून जा.' ती शिपायास म्हणाली.

शिपाई गेले. तेथे मंगा व राजकन्या दोघे उभी होती.

'मंगा, माझी कीव कर. मनुष्याची निराशा करणे महापाप आहे. मी क्रूर झाले, माणूसघाणी झाले तर त्याचे पाप तुला लागेल.'

'राजकन्ये, माझा काय इलाज आहे? मधुरीला मी विसरू शकत नाही. माझी मुलेबाळे रोज समुद्रावर येऊन माझी वाट पहात असतील. घरी खायला नसेल. अडचणी असतील. मधुरीने हाय घेतली असेल. तू माझी रवानगी कर. माझा, मुलाबाळांचा दुवा घे.'

'बरे, मी विचार करीन.'

'मधुरीचे प्रेम तुला जिंकून घेवो.'

राजकन्या गेली. ती एके दिवशी राजाला म्हणाली,

'बाबा, मंगाचे मजवर प्रेम आहे.'

'तो फसवील.'

'फसवणार नाही. परंतु त्याचे म्हणणे एवढेच की, एकदा घरी जाऊन येऊ दे. सर्वांचा निरोप घेऊन येऊ दे. जाऊ दे ना बाबा त्याला?'

'एकदा गेला की कसचा येतो?'

'मीही जाते त्याच्याबरोबर. आम्ही दोघे परत येऊ. नाही तरी त्याच्या शिवाय माझ्या जीवनाला अर्थ नाही, आलो परत तर आलो. नाही तर मी तिकडेच राहीन. जेथून त्याचे दर्शन घेता येईल अशा ठिकाणी राहीन. जाऊ का बाबा?'

'मी काय सांगू? तुझ्या मनाला ज्याने समाधान वाटेल ते कर.'

'बाबा, एका लहानशा होडीत बसून आम्ही जाऊ. तरायचे असेल तर देव आम्हांला तारील. मारायचे असेल तर एकदम मारील. तुम्ही नाही म्हणू नका.'

'जशी तुझी इच्छा.'

आणि मंगा तुरुंगातून बाहेर आला. राजकन्येने सर्वांचा निरोप घेतला. समुद्रतीरावर एक सुंदर होडी तयार करण्यात आली. तिला लहानसे शीड होते. त्या होडीत अन्नसामग्री होती. फळफळावळ थोडे फार होते. लहानशा होडीत जेवढी व्यवस्था करण्यासारखी होती तेवढी केली गेली आणि राजकन्या सुंदर वस्त्र नेसून अलंकारांनी नटून नवरीप्रमाणे उभी होती. तीरावर हजारो स्त्रीपुरुष जमले होते. राजकन्येने सर्वांचा निरोप घेतला. मंगाचा तिने हात धरला. होडीत बसली दोघे. तिने वल्हे हाती घेतले. मंगाने दुसरे वल्हे घेतले. निघाली होडी. अनंत समुद्रावर ती लहानशी नाव निघाली. ती टिकणार का बुडणार? देवाला माहीत!

होडी डोळ्यांआड होईपर्यंत लोक तीरावर होते. राजकन्येचे लक्ष आता कोठेच नव्हते. ती डोळे मिटून वल्हे मारीत होती. ती थकली. हात गळून पडणार असे तिला वाटले. ती बोलली नाही.

'मंगा!'

'काय?'

'मला पाण्यात लोटून दे. आणि या समुद्राच्या लाटांनी माझी समाधी बांध. तुझ्या हाताने मला मरण दे. फेक मला पाण्यात.'

'काय हे बोलतेस?'

'मी खरे ते बोलते.'

'तू थकली आहेस. नीज. मी वल्हे मारतो.'

'कोठे निजू?'

'अंथरूण घालून देतो.'

'तुझ्या मांडीवर निजू दे.'

'मग मी वल्हे कसे मारू?'

'थोडा वेळ वल्हे थांबू दे. समुद्र बुडवणार नाही. घे मला जवळ घे घे. क्षणभर तरी माझे डोके तू आपल्या मांडीवर ठेव. मी का

इतकी पापी आहे? किती रे दुष्ट? तुला मी तुरुंगात ठेवले आणि घरी मी रडत होते. जणू माझा प्राणच मी तुरुंगात ठेवला होता. मी तुझ्यापासून जणू निराळी नव्हते. मंगा, मला दुष्ट नको मानू, राक्षशीण नको मानू.'

लाटांचे तुषार उडत होते. नाव नाचत होती आणि राजकन्येने आपले मस्तक मंगाच्या मांडीवर ठेविले होते. आणि त्याने तिचे केस सारखे केले. तिच्या कपाळावर त्याने आपला हात ठेवला. सभोवती सागराची प्रचंड हालचाल चालली होती. त्या दोन शांत जीवांच्या हृदयांतही भावनाकल्लोळ उचंबळला होता.

'राजकन्ये, तुला अंथरूण घालून देतो. तू नीट नीज.'

'द्या घालून.'

मंगाने शय्या तयार केली आणि राजकन्या निजली. खरोखर तिला झोप लागली. मंगा जागा होता. तो नाव नेत होता. काही वेळाने ती उठली.

'आता तुम्ही निजा. तुम्ही थकले आहात.'

'तू थकलीस की मला उठव.'

'उठवीन.'

मंगा झोपला. राजकन्या नाव चालवत होती. रात्र झाली होती. आता अंधार होता. अनंत सागर पसरलेला. अनंत अंधार पसरलेला. मधूनमधून समुद्रातून जाळ उठलेला दिसे. लाटातून ज्वाला पेटलेल्या दिसत. समुद्राचा फेस चमके. राजकन्येच्या डोळ्यांसमोर निराशा होती. ती काही तरी विचार करीत होती. तिच्या अंगावर दागिने होते. सोन्या-मोत्यांचे दागिने. जणू ती विवाहासाठी नटलेली होती. ती मंगाकडे पाही, पुन्हा डोळे मिटी असे चालले होते. शेवटी तिने आपले सारे दागिने तेथे त्याच्या पायाशी काढून ठेवले. मंगाला तिने प्रेममय प्रणाम केला. पोट भरून त्याला शेवटचे पाहिले. नंतर तिने नावेतून समुद्रात हळूच बुडी घेतली. तिने आपले जीवन सागराला अर्पण केले. सागराला की प्रेमसागराला?

काही वेळाने मंगा जागा झाला, तो राजकन्या नाही. कोठे गेली राजकन्या? ते दागिने त्याच्या पायाशी होते, तिने समुद्रात उडी टाकली हे त्याच्या लक्षात आले. तो खिन्न झाला. काय करावे ते त्याला सुचेना. तो शून्य मनाने बसला. नाव लाटांवर खेळत होती. आपण तरी सुरक्षित जाऊ का? कोठे आहे आपला देश? ही लहानशी नाव टिकेल का? वादळ उठले तर ती बुडेल. लहान नाव कशी टिकणार?

त्याच्याजवळ मधुरीची गोधडी होती; ती त्याने अंगाभोवती घेतली. गार गार वारा होता. ती गोधडी पांघरून तो बसला. रात्र संपून उजाडले. दूर कोठे गलबत दिसते का तो पहात होता. एक गलबत दिसले. परंतु ते फार लांब होते त्या गलबताजवळ आपण कसे पोचणार? चालली होती नाव. मारीत होता वल्हे. लावीत होता शीड. आशातंतूवर तो जगत होता. मधुरीची मूर्ती डोळ्यांसमोर आणीत होता. ते गलबत दिसेनासे झाले. आशा अस्तास गेला. कोठे नाव घेऊन जात होता, तो त्याला दूर जमीन दिसली. त्यान नाव तिकडे चालविली. नाव चालवून थके. मग झोपे. स्वतःला समुद्राच्या लाटांच्या व वाऱ्यांच्या स्वाधीन करून ती मधुरीने दिलेली गोधडी पांघरून झोपी जाई. जणू त्याला सागरमाता सांभाळीत होती. तो सृष्टीचा बालक झाला होता. असे दिवस चालले होते.

शेवटी एकदाची मंगाची नाव एका किनाऱ्याला आली. त्याने नाव किनाऱ्याला ओढून आणली. तेथे लोक होते. इतर नावा होत्या. त्याच्याकडे सारे पहात होते. त्याने दागिने एका पेटीत ठेविले होते. सामान काढून तो तेथे उभा राहिला. लोक त्याच्याभोवती होते. परंतु त्यांना त्याची भाषा कळेना व त्याला त्या लोकांची भाषा कळेना. इतक्यात एक मनुष्य तेथे आला. तो खलाशी होता. अनेक देशांच्या भाषा त्याला येत होत्या. मंगाजवळ तो बोलू लागला.

'त्या का गलबतावरील तुम्ही? ते तर बुडाले म्हणून ऐकले.'

'मी वाचलो. एके ठिकाणच्या लोकांनी ही लहान नाव दिली.

नगर वाचनालय, सातारा
बालविभाग

तिच्यात बसून निघालो. परंतु या नावेने दूर सुखरूप कसा जाणार?'

'तुम्ही येथे राहा. थोड्या दिवसांनी एक गलबत येथे येणार आहे. कदाचित ते तुमच्या देशालाच जाईल असे वाटते.'

'तोपर्यंत मी येथे तुमच्यात राहीन.'

'राहा.'

आणि मंगा त्या गावी राहू लागला. तो तेथे एका खानावळीत जेवायला जाई. गावच्या लोकांना गोष्टी सांगे. तेथे काम करू लागला. राहू लागला. बरेच दिवस झाले. गलबत आले नाही. रोज तो येई. समुद्राकडे पाही. काही दूर दिसते का पाही. निराशेने परत येई. गावातील भाषा त्याला समजू लागली. त्याची करुण कहाणी ऐकून लोकांना वाईट वाटे. स्त्री-पुरुष रडत. लहान मुले पाहिली की त्याला घरची आठवण होई. तो लहान मुले जमवी व त्यांना खाऊ वाटी.

पुढे आले एकदा गलबत आणि ते मंगाच्या देशावरून जाणारे होते. मंगाने त्यांना काही देण्याचे कबूल केले आणि तो त्या गलबतावर चढला. गावचे लोक त्याला निरोप द्यायला आले होते. मुले टाळ्या वाजवीत होती.

'रडका बाबा चालला.' कोणी म्हणाले.

'खाऊ वाटणारा चालला.'

'जाऊ दे आपल्या घरी. जाऊ दे आपल्या मुलामाणसांत.' म्हातारे म्हणाले आणि मंगा गेला. आपण मधुरीला आता भेटू. मुलांना भेटू. या आनंदात तो होता; परंतु ओळखतील का मला असे मनात येऊन तो हसे.

❖❖❖

: एक मुशाफर : : १७ :

आणि काही दिवसांनी ते गलबत सारंग गावी आले. हिंडत आले. कोणी उतरले. मंगाही उतरला. त्याच्या चेहऱ्यात किती तरी फरक पडला होता. परदेशाची हवा, दुःखे, संकटे, निराशा यांचा परिणाम त्यांच्यावर झाला होता. त्याची दाढी वाढली होती. तो एखाद्या फकिरासारखा दिसे. साधुबोवासारखा दिसे. तो एकदम घरी थोडाच जाणार होता? म्हातारीच्या खानावळीत आधी जायचे त्याने ठरविले. सामान घेऊन तो आला. म्हातारी दारात बसली होती.

'उतरू का तुमच्या खानावळीत?' त्याने विचारले.

'उतर बाबा. लांबून दिसतोस आलेला.' ती म्हणाली.

'हो, फार थकलो आहे. विसावा हवा आहे.' तो म्हणाला.

'वाटेत आजारी पडलेत वाटते?'

'हो.'

'येथे रहा. या गावची हवा सुंदर आहे. येथे आजारी बरे होतात. रोगी चांगले होतात.'

'तुमच्या झोपडीत राहू?'

'रहा.'

आणि मंगा तेथे राहिला. तो बाहेर फिरायला पडला. तो गावात शिरला. आपल्या झोपडीकडे गेला. तो तेथे त्याला काही दिसले नाही. तो तेथे उभा राहिला. कोठे आहे मधुरी? कोठे आहेत मुले? कोठे गेली सारी? जिवंत नाहीत का? एखाद्या साथीत मरण तर नाही पावली? दुःखाने मुलांना बरोबर घेऊन मधुरीने जीव तर नाही ना दिला? कोठे आहे मधुरी?

तो पुन्हा बंदरावर आला व झोपडीत खाटेवर पडला. तो अस्वस्थ होता.

'बरे नाही का वाटत?' म्हातारीने विचारले.

‘आजीबाई, येथे तुम्ही किती दिवस आहात?’ त्याने विचारिले.

‘किती तरी वर्षे झाली. माझी खानावळ काढून चाळिसाहून अधिक वर्षे झाली.’

‘या गावची तुम्हाला सारी माहिती असेल?’

‘हो, सारी माहिती आहे.’

‘या गावात मंगा म्हणून कोणी एक तरुण मागे होता का?’

‘मंगा ना? हो, होता. त्याची बातमी तुम्ही आणिली आहे का?’

‘या गावात नाही का तो?’

‘त्याची मोठी दुःखदायक कहाणी आहे.’

‘सांगा बरे.’

‘मंगाला मी लहानपणापासून ओळखते. ती तीन मुले होती. मधुरी, मंगा व बुधा. येथे समुद्रावर खेळायची, भांडायची, माझ्याकडे यायची. खाऊ खायची. छान होती मुले. हसणारी खेळणारी मुले मोठी झाली. मधुरीवर बुधा व मंगा दोघांचे प्रेम होते. तिला दोघेही आवडत; परंतु मंगा तिला अधिक आवडे. तिने मंगाजवळ लग्न केले. बुधा तसाच अविवाहित राहिला.’

‘तो का गरीब होता?’

‘नाही. बुधा श्रीमंत होता; परंतु त्याने लग्न केले नाही. तसाच एकटा राहिला.’

‘अजून तसाच आहे का?’

‘थांबा, सारे सांगते. मंगाला नेहमी प्रवासास जावे असे वाटे. मधुरी नको नको म्हणे. तो रागावे, संतापे. शेवटी गेला तो एका गलबतात बसून. मधुरी गलबत येण्याची सारखी वाट पाही. ती त्या वेळेस गर्भार होती. त्या दुःखात तिचे बाळ जन्मले ते मेलेले.’

‘अरेरे! गरीब बिचारी!’

‘तिला ते अशुभ वाटले. नवरा सुखरूप येतो की नाही याची तिला चिंता वाटे. बरेच दिवस गेले आणि एके दिवशी बातमी आली

की, ते गलबत वादळात बुडाले. आमच्या गावचे बरेच लोक त्यात होते. साऱ्या गावात हाहाकार उडाला. मधुरी जवळजवळ दुःखाने वेडी झाली. परंतु मुलांसाठी ती जगली.'

'कोठे आहे ती?'

'सांगते सारे. आणि मंगाचे गलबत बुडालेले कळल्यावर थोड्या दिवसांनी बुधा तिच्याकडे गेला. तो तिचे सांत्वन करू लागला. तिला मदत देऊ लागला. तिला नाकारवेना. असे काही दिवस गेले आणि एके दिवशी बुधाने तिला लग्न कर असे सांगितले.'

'लागले का लग्न?'

'हो. गंमत अशी की, लहानपणी मधुरी दोघा मित्रांना म्हणे की, मी तुमची दोघांची छोटी बायको होईन. ते शब्द बुधा विसरला नव्हता. तो म्हणे, देवाची अशीच इच्छा असेल की ते शब्द खरे व्हावे.'

'आणि मधुरीने का आनंदाने त्याच्याजवळ लग्न लावले?'

'ती तयार नव्हती. तिला काय करावे कळेना. बुधा म्हणे, 'मंगा होता तोपर्यंत मी कधी असे विचारले का? आता विचारतो. माझ्या जीवनात दे आज थोडा आनंद.' मधुरी एके दिवशी माझ्याकडे आली व म्हणाली,

'आजी, मला वाट दाखव. काय करू?'

'काय सांगितले तुम्ही?'

'सांगितले की काही हरकत नाही. कर बुधाजवळ लग्न. मुलांची सोय होईल. बुधाही जरा हसेल. बिचारा बारा वर्षे बैराग्यासारखा राहिला. असे प्रेम दुर्मिळ हो.'

'आणि ती दोघे आता एकत्र राहतात वाटते?'

'हो, बुधाच्या मोठ्या घरात सारी रहावयास गेली. ती पूर्वीची झोपडी गेली. तेथे आता काही नाही. बुधाने ती जागा कोणाला तरी विकली असे वाटते.'

'आता मधुरी आनंदात आहे ना?'

'हो. कधी कधी ती दुःखी होते. या टेकडीवर येते. रडते. माझ्याकडे येते. माझ्या मांडीवर डोके ठेवून पडते. बुधा जणू आनंदाच्या सागरात आहे, मुले सुखी आहेत.'

'मधुरी मंगाला विसरली नाही एकूण?'

'कशी विसरेल? त्यांच्या दिवाणखान्यात मंगाचे एक मोठे चित्र भिंतीवर लावण्यात आले आहे. ती त्या चित्रासमोर डोळे मिटून उभी राहते व प्रणाम करते.'

'मधुरी बुधाला मिठ्या मारते, होय ना?'

'तोही लहानपणचा मित्रच तिचा. असे कसे बोलता? ती काय सुखासाठी हपापली होती? चार मुलांची ती आई होती. बुधासाठी का ती गेली? मुलांसाठी गेली. मंगाचा आत्माही आशीर्वाद देईल अशी तिला आशा आहे. मधुरी थोर मनाची आहे. पवित्र आहे. तिच्या मनाची ओढाताण, कालवाकालव कोणाला कळेना.'

'आणि मंगाची नंतर काही बातमी आली का?'

'काही नाही. त्या गलबतातील कोणीही परत आले नाही.'

'मधुरीला नवीन मूलबाळ झाले असेल का?'

'हो. दोन नवीन मुले झाली आहेत. एक मुलगी व एक मुलगा. आणि त्यांची नावे वेणू व मोती. मंगाने ती मधुरीला होणाऱ्या मुलांसाठी सांगितली होती. मुलगी झाली तर वेणू. मुलगा झाला तर मोती. तीच नावे तिने या नव्या बाळांना ठेवली आहेत. छान आहेत मुले.'

'मी जरा निजतो आजीबाई. मला झोप येत आहे.'

'झोपा हो. झोप लागली की बरे वाटेल. तुम्हांला विश्रांती हवी आहे. तुम्हांला कसली तरी चिंता आहे. हृद्रोग आहे. तुमच्या डोळ्यांतून पाणी येत होते. तुम्ही लपवीत होता. मला म्हातारीला सारे कळते. झोपा. पांघरूण घेऊन पडा.' ती गोड शब्दांत म्हणाली.

त्याला का झोप लागली होती? तो का शांत निजला होता? नाही; त्याला झोप लागली नाही. तो तळमळत होता. तडफडत होता. तो बेचैन होता. तो उठला व कोठे तरी जाण्यासाठी निघाला.

'कोठे जाता?' म्हातारीने विचारिले.

'जातो फिरायला.' तो म्हणाला.

'गार वारा आहे. नका जाऊ. तापबीप यायचा एखादा.'

'लौकर परत येईन. त्या वाळूच्या टेकडीवर जाऊन जरा बसतो.'

'त्या टेकडीवर तीन मुले खेळत. मंगा, मधुरी व बुधा लहानपणी खेळत. घसरगुंडी करीत. खाली येत. अजूनही मधुरी तेथे येते व समुद्राकडे पहात बसते.'

'येतो ती टेकडी पाहून. प्रेमाची टेकडी.'

आणि मंगा निघाला. तो त्या टेकडीवर आला. त्याला शेकडो स्मृती आल्या. त्याच्या डोळ्यांतून शतधारा वहात होत्या. 'मधुरी, मधुरी,' मी म्हणत होतो. 'अनेक संकटे सोसून मी आलो. तिच्यासाठी आलो. मुलांसाठी मी आलो आणि आता काय करू? त्या राजकन्येचे प्रेम झुगारले. तुरुंग भोगला. एकान्तवास भोगला. त्या राजकन्येने बलिदान केले आणि मधुरी? मधुरी का माझ्यावर प्रेम नाही करीत? प्रेम नव्हती करीत? तसे असले तर ती या टेकडीवर येऊन का रडते? केवळ बुधासाठी का तिने असे केले? आणि ते लहानपणचे शब्द. काय आहे ही सारी घटना? आता मी कोठे जाऊ? राहणेही पाप. ओळख देणेही पाप. मधुरीला का दुःख देऊ? तिचे मन कोवळे आहे. तिच्या सुखात का विष कालवू? अरेरे?'

मंगाच्या मनात कोण डोकावेल? त्याच्या मनःस्थितीचे कोण वर्णन करील? कोण तेथल्या खळबळी दाखवील, वेदना दाखवील? तो दमला आणि पुन्हा घरी आला. अंथरुणावर पडून राहिला. जेवला थोडेसे आणि पुन्हा पडला. रात्री त्याला झोप आली नाही.

बाहेर उजाडले. मंगाच्या मनात दाट अंधार होता. त्याला उठण्याची इच्छा नव्हती. बाहेरचा प्रकाश त्याला पाहवेना. त्या प्रकाशाचा त्याला तिरस्कार वाटत होता. त्याने डोक्यावरून पांघरूण घेतले. त्या पांघरुणाच्या आत मधुरीने दिलेली गोधडी होती. त्याच्या मनात येई की, गोधडी समुद्रात फेकावी, चुलीत जाळावी. राजकन्या गोधडीची होळी करायला निघाली होती. उगीच नाही. तिला का दिसत होते सारे? पण नाही, मधुरी वाईट नाही. मी ही गोधडी जाळणार नाही. मधुरीच्या हृदयाची ही ओढाताण आहे. तिच्या हृदयाचे हे तुकडे, हृदयकमळाच्या या पाकळ्या, मधुर व पवित्र पाकळ्या.

म्हातारी अंथरुणावर नव्हती. ती केव्हाच उठली होती. कामधाम करीत होती. झाडलोट करीत होती.

'उठा. कढत कढत दूध घ्या.' ती त्या मुशाफराला म्हणाली.

'तुमचे प्रवाशांवर इतके प्रेम?' त्याने विचारले.

'माझ्या खाणावळीत जे येतात, ते त्या वेळेपुरते जणू माझे. माझ्या घरातले. खरे ना? घ्या कढत कढत दूध. हुशारी वाटेल.'

'तोंड धुतो, मग घेतो.'

तो उठला. त्याने प्रातर्विधी केले. दूध घेऊन तो बाहेर पडला. तो समोर त्याला कोण दिसले? बुधा व मधुरी. बुधाच्या खांद्याशी बाळ होते. बाजूला होऊन मंगाने पाहिले. त्याने मूठ उगारली. दातओठ चावले. परंतु पुन्हा त्याच्या डोळ्यांत करुणा आली. प्रेम आले. पाणी आले. मधुरी व बुधा हसत हसत गेली. मंगा निघाला. तो बुधाच्या घराजवळ येऊन उभा राहिला. सोन्या, रुपल्या, मनी, ती तीन मुले तेथे खेळत होती.

मंगा बाहेर उभा होता.

'सोन्या, बघ दाढीवाला.' रुपल्या म्हणाला.

'खरेच की.' मनी येऊन म्हणाली.

सोन्याही आला. त्या दाढीवाल्याकडे तिघे पहात राहिली.

'कोण पाहिजे तुम्हांला?' सोन्याने विचारले.

'तुमच्या दिवाणखान्यात एक मोठे चित्र आहे; ते मला पहावयाचे आहे.'

'पहिल्या बाबांचे?' रुपल्याने विचारले.

'हो.' मंगा म्हणाला.

'या वरती. कसे छान आहे चित्र! आईला फार आवडते. या वर.'

त्या मुलांनी मंगाला वर नेले. सुंदर दिवाणखाना होता. मऊ-मऊ गालिचे पसरलेले होते आणि ती सुंदर तसबीर होती.

'हे आमच्या पहिल्या बाबांचे चित्र.' सोन्या म्हणाला.

'आणि हे आमच्या आईचे.' रुपल्या म्हणाला.

मंगाने मधुरीचे ते चित्र पाहिले. स्वतःचेही चित्र पाहिले. तो उभा राहिला.

'तुम्हांला आवडली का ही चित्रे?' सोन्याने विचारले.

'हो. सुरेख आहेत. कोणी काढली ही?'

'बुधाकाकांनी.'

'तुम्ही का त्यांना बुधाकाका म्हणता?'

'कधी कधी बाबाही म्हणतो.' रुपल्या म्हणाला.

'तुम्हांला आवडतात का ते?'

'हो. ते आम्हांला जवळ घेतात. खाऊ देतात. गोड गोष्टी सांगतात.'

'बरे मी जातो.'

मंगा गेला. मुले पहात राहिली.

'तो बोवा का रडत होता आईचे चित्र पाहताना?' रुपल्याने विचारले.

'आईसुद्धा कधी कधी हे बाबांचे चित्र पाहताना रडते.' मनी म्हणाली.

'त्याची दाढी छान दिसे नाही?' सोन्या म्हणाला.

'मला तर भीती वाटे.' मनी म्हणाली.

मुले असे बोलत होती आणि फकीर, तो मंगा कोठे गेला? तो त्या टेकडीकडे गेला. टेकडीवर त्याला बुधा व मधुरी दिसली. तोही गेला. बाजूस पाठमोरा बसला. त्यांचे बोलणे त्याच्या कानावर येत होते. तो ऐकत होता.

'बुधा, वाटते की या टेकडीवरच बसावे. येथे मला बरे वाटते. येथे मंगा आहे असे वाटते. तो एकदम येऊन माझे डोळे धरील, माझे हात धरील असे वाटते. माझे डोके मांडीवर घेऊन गाणे म्हणेल असे वाटते. समुद्रातून एकदम नाचत येईल व मला हृदयापाशी धरील असे वाटते. या टेकडीवरील कणन् कण मला काही तरी सांगत असतो.'

'मधुरी, अशा आठवणी येणारच. त्या तुझ्या पवित्र व कोमल आठवणी जाव्यात अशी मी कधीही इच्छा करणार नाही. म्हणून तर मी तुला घेऊन येथे येतो. इतक्या आठवणी तुझ्या हृदयात उसळत असूनही तू मला जवळ केलेस, माझ्या जीवनातही प्रकाश आणलास, सुगंध आणलास, तू थोर मनाची आहेस.'

'मी थोर की घोर? मी चांगली की वाईट? देव मला जवळ घेईल की दूर लोटील?'

देवाला हृदय असेल तर तो जवळ येईल. मधुरी, तुझा विचार करता माझी मती गुंग होऊन जाते. त्या दिवशी रात्री तू झोपली होतीस. मी जागा होतो. तुझ्याविषयी मी विचार करीत होतो. मी एकदम हळूच उठलो व तुझ्या पायांवर डोके ठेविले. तू मला त्यासमयी देवता वाटलीस.'

बुधा, तूही थोर आहेस. किती वर्षे एकटा राहिलास! आमच्या सुखाचा हेवादावा केला नाहीस, काही नाही. नाहीतर प्रेमभग्न लोक

क्रूर होतात हो. ते खूनही करतील.'

'मोती बघ ऐकतो आहे गोष्टी.'

'त्याला समजत असेल हो. लहान मुलांना सारे समजते.'

'चल आता जाऊ. उन्ह झाले. तुला बाधेल.'

ती दोघे उठली व निघाली गेली. फकिराने, त्या मंगाने वळून पाहिले. परंतु त्याच्या अश्रुपूर्ण दृष्टीला काही दिसत नव्हते.

दिवस असाच गेला आणि रात्र आली. रात्री मंगा असाच कोठे जायला निघाला. मधुरीच्या घराजवळ आला. वरती संगीत चालले होते. सोन्या गात होता. गोड गोड गाणे म्हणत होता आणि बुधा बासरी वाजवीत होता. फकिराची, आमच्या या मंगाची, ते गाणे ऐकता ऐकता समाधी लागली. तो तेथे स्तब्ध उभा राहिला.

गाणे थांबले. बासरी थांबली. मंगा वर पहात होता. त्या संगीताचा, त्या आनंदाचा का त्याला मत्सर वाटला? तो मुकाट्याने तेथून माघारा वळला. तो बंदरावरच्या झोपडीत आला.

'किती वेळ झाला?' म्हातारी म्हणाली.

'डोके सुन्न झाले आहे.' तो म्हणाला.

'तुम्ही शांत पडून राहत नाही. तुम्हांला काढा करून ठेवला आहे. तो कढत कढत घ्या. घाम येईल.'

'तुम्ही जणू आईप्रमाणे बोलत आहात.'

'येणाऱ्या वाटसरूची आई बनून मी आईचा आनंद लुटते.'

आणि म्हातारीने मंगाला कढत कढत काढा दिला. तो काढा पिऊन तो झोपला. ती गोधडी त्याने अंगावर घेतली.

'आणखी पांहिजे का पांघरूण!' तिने विचारले.

'एवढी गोधडी पुरे होते. कितीही थंडी असली तरी एवढी पुरते. फार ऊबदार आहे ही.'

'परंतु हाताला तर ऊबदार नाही लागत.'

‘तुम्ही केव्हा पाहिलेत?’

‘संध्याकाळी केर काढताना. घालू का पांघरूण? मजजवळ घोंगड्या आहेत. पाहुण्यांना उपयोगी पडतात. संकोच नका करू.’

‘बरे तर, द्या एक घोंगडी.’

म्हातारीने एक घोंगडी त्याचे अंगावर घातली.

‘आजीबाई, तुम्ही झोपा.’

‘माझे काय म्हातारीचे?’

आजीबाई आता झोपली होती. सर्वत्र सामसूम होते. मंगाही झोपेत होता. तो एकदम ‘मधुरी, मधुरी’ करून ओरडला. म्हातारी जागी झाली. मंगा जागा झाला.

‘काय हो?’ तिने विचारले.

‘तुमची ती गोष्ट. ती स्वप्नात दिसली.’ तो म्हणाला.

: आजारी : : १८ :

मंगा आता चांगलाच आजारी पडला. फणफणून ताप त्याच्या अंगात असे. ताप निघेना. घाम फुटेना. दुखणे हटेना, म्हातारी सेवाशुश्रूषा करीत होती.

‘तुम्हांला उगीच त्रास.’ मंगा म्हणे.

‘मी आता बरा नाही होणार. तुमच्या झोपडीतच माझी कुडी पडेल. येथूनच प्राण उडेल.’

‘असे नका बोलू. बरे व्हाल हो.’

म्हातारी धीर देई. एके दिवशी म्हातारी औषध आणायला बाजारात गेली होती. मंगा एकटा अंथरुणावर होता. शांतपणे पडून

होता. हळूहळू तो रडू लागला. ओक्साबोक्शी रडू लागला. थोड्या वेळाने म्हातारी आली.

‘हे काय? रडू नका असे. अशाने दुखणे वाढते.’

‘वाढू दे दुखणे. मरू दे लौकर.’

‘मी तुम्हांला मरू देणार नाही. निजा.’

‘आजी, माझी नका करू शुश्रूषा. कोणासाठी जगविता?’

‘असतील तुमची मंडळी त्यांच्यासाठी आणि कोणी नसले म्हणून काय झाले? मला तरी कोण आहे? तरी मी जगतेच.’

‘तुम्ही थोर आहात.’

‘आणि तुम्ही का चोर आहात? पडून रहा.’

मंगा झोपला. त्याने आता शांतपणे पडून राहावयाचे ठरविले.

तिसरे प्रहरी बुधा व मधुरी आली होती.

‘आजी, ही घे फळे.’ बुधा म्हणाला.

‘कोठे आहे तो वाटसरू?’ मधुरीने विचारले.

‘झोपला आहे.’ म्हातारी म्हणाली.

मधुरी आत आली. तिने पाहिले. काय दिसणार? पाहुण्याच्या अंगावरून पांघरूण होते. परंतु ती गोधडी घोंगडीतून बाहेर पडलेली दिसत होती. त्या गोधडीकडे मधुरी पाहू लागली. तिला मंगाची आठवण झाली. ती खाटेजवळ गेली. त्या गोधडीला तिने हात लावला. एकदम थरारला. जणू भाजला. ती मागे आली.

‘आजी, छान आहे गोधडी नाही?’ मधुरी म्हणाली.

‘तेवढ्याने त्याची थंडी राहते.’ म्हातारी म्हणाली.

‘चल मधुरी.’ बुधाने हाक मारली.

मधुरी गेली. बुधा गेला. थोड्या वेळाने त्याने डोक्यावरील पांघरूण काढले.

'घाम आला वाटते?' म्हातारीने विचारले.

'नाही. परंतु वरची ही घोंगडी काढा. जड वाटते ती.' तो म्हणाला. म्हातारीने घोंगडी काढली.

'मघा मधुरी आली होती.'

'ती तुमच्या गोष्टीतील मधुरी?'

'हो. तिने फळे आणून दिली. काल तिला सांगितले होते. तुमची गोधडी तिला आवडली.'

'ही गोधडी?'

'हो. तिने हात लावला.'

'आजीबाई, ही गोधडी माझी नाही. माझ्या गावच्या समुद्रतीराला ती वहात येऊन पडली होती. मी ती घरी नेली, धुतली व वापरू लागलो. फुटले असेल गलबत. कोणा मुशाफराची. मला ती उपयोगी पडत आहे, एवढे खरे.'

'बोलू नका फार. थकवा येईल.'

आणि मंगा पडून राहिला. मधुरी आली त्या वेळेस तिच्याकडे पहावे असे कितीदा त्याच्या मनात आले. डोक्यावरून पांघरूण काढावे, मधुरीचे हात हातात घ्यावे, तिच्या मांडीवर डोके ठेवावे असे विचार किती आले; परंतु ते त्याने दडवून ठेवले. त्याने चलबिचल होऊ दिली नाही.

सायंकाळ झाली होती. मधुरी व बुधा घरी परत जात होती. ती म्हणाली, 'बुधा, तू जा घरी मोतीला घेऊन. मी आजीकडून जाऊन येते.'

'लौकर ये हो, नाही तर मी पहायला येईन.' तो म्हणाला.

'मी इकडेच राहणार असे वाटते?' ती म्हणाली.

'बसशील पुन्हा टेकडीवर जाऊन, शिरशील पाण्यात.' तो म्हणाला.

'तुझेही बंध आहेत हो मला. मुलांचे बंध आहेत. कोठे जाईल मधुरी? मधुरी तुम्हां सर्वांची कैदी आहे. जा तू. मी लौकरच येईन.'

बुधा गेला व मधुरी झोपडीकडे आली.

'आजी, कसे आहे त्यांचे?'

'पडून आहे. त्याच्या घरच्या आठवणी येतात. रडतो. त्याला वाटते की आपण मरणार. काल मरणाच्याच गोष्टी बोलत होता.'

'आता झोप लागली आहे?'

'असे वाटते?'

'त्याला आणखी पांघरूण का नाही घालीत?'

'तो नको म्हणतो. मघा घोंगडी काढून टाकली त्याने. आता मी पुन्हा घातली. गोधडीच पुरे म्हणतो आणि मधुरी, ती गोधडी त्याला समुद्रतीरी सापडली. वहात आली होती म्हणाला. त्याला आवडली. ती पांघरली म्हणजे मला बरे वाटते. मग मला मुळीच थंडी वाजत नाही असे म्हणतो.'

'खरे की काय? आजी तुला एक सांगू?'

'काय बेटा?'

'मी मंगाला अशीच एक गोधडी शिवून दिली होती. शिंप्याकडून नाना रंगाचे तुकडे मी आणले होते. त्याची सुरेख गोधडी शिवली. मंगाला जाताना दिली. त्याला सांगितले, मंगा, माझ्या हृदयाचे तुकडे काढून ते शिवून मी ही गोधली केली आहे.'

'मग, ही मंगाची तर नाही गोधडी?'

'असेल. गलबत बुडाले त्या वेळी मंगाच्या अंगाभोवती ती असेल. आजी, तू त्यांच्याजवळ ती गोधडी माग. ती मला हवी. काही कर. माझ्या मंगाचीच ती गोधडी असेल.'

'पण त्याच्याजवळून कशी घेऊ?'

'धुण्यासाठी माग.'

नगर वाचनालय, सातारा
बालविभाग

'बरं, बघेन.'

मधुरी गेली. म्हातारीने दिवा लावला. मंगा पांघरुणातच होता. तो ते बोलणे ऐकत होता. म्हातारी अंथरुणाजवळ आली. कपाळाला तिने हात लावला.

'ताप आहेच.' ती म्हणाली.

'तो निघणार नाही.' मंगा म्हणाला.

'निघेल. ताप निघेल.'

'शेवटच्या क्षणी निघेल. तो निघेल; पण कायमचाच निघेल. मंगा मग थंड होईल. शांत होईल.'

'कोण मंगा? स्वप्नात का आहात तुम्ही?'

'ती तुमची गोष्ट, ती नावेच तोंडात येतात. तो मंगा मीच असे वाटू लागते.'

'मी तुम्हांला सांगू का, ही गोधडी अंगावरची काढून द्या. या गोधडीमुळे तुम्हांला भ्रम होत असावा.'

'काही भूतबीत असेल का वाटते तुम्हांला?'

'शक्य आहे. तुम्हांला ही गोधडी समुद्राकाठी सापडली. कोणी तरी पाण्यात बुडाला त्याची असेल. तो बुडणारा गोधडी शोधीत असेल किंवा त्याचे भूत असेल तिच्यात. ती गोधडी नका घेऊ अंगावर आणि सांगू का, मघा मधुरी आली होती; तिने मंगाला अशीच एक गोधडी शिवून दिली होती. मंगाचे गलबत बुडाले. ही गोधडी त्याच्या अंगाभोवती असेल. मधुरीने त्याला सांगितले होते की, 'माझ्या हृदयाच्या तुकड्याची ही गोधडी आहे. ही तुला तारील. सुखरूप परत आणील.' मंगा तिला विसंबत नसेल; परंतु आता मंगाच्या देहाची खोळ गेली. ही गोधडी मात्र राहिली. कदाचित तीच ही गोधडी असेल. मधुरीला तसे वाटले. काय असतील धागेदोरे कोणाला माहीत? तुम्ही ती काढा अंगावरून.'

'मधुरीला हवी आहे ना? तिला जर तसे वाटत असेल तर द्या तिला. ही घ्या.'

आणि त्याने ती काढून दिली. घोंगडी अंगावर घेऊन तो पडून राहिला. रात्री त्याने घोटभर दूध घेतले. तो आता शांत होता. म्हातारी पडून राहिली. दुसऱ्या दिवशी मधुरी फळे घेऊन आली. पाहुणा पडून होता.

'मधुरी, ही घे गोधडी.'

'त्याने दिली?'

'हो.'

मधुरीने ती गोधडी घेतली. तिने नीट पाहिली. होय. तीच गोधडी होती! तिने ती हृदयापाशी धरिली.

'आजी, मंगाचीच ही गोधडी. माझ्या मंगाची शेवटची आठवण हिच्यात भरून त्याने पाठविली असेल. सारंग गावाच्या तीरावर लाटांबरोबर ही जाईल असे त्याला वाटले असेल. 'लाटांनो, न्या ही गोधडी. मधुरीच्या आठवणींनी भरलेली गोधडी. ती समुद्रावर दररोज येत असेल. माझी वार्ता विचारीत असेल. तिला ही गोधडी द्या. तिला सारे सांगेल.' आजी, असे का मंगा बुडता बुडता म्हणाला असेल? लाटांशी झुंजता झुंजता म्हणाला असेल? आजी, मी जाते. माझ्या मंगाची ही गोधडी. परंतु मंगा कोठे आहे? गोधडी मिळाली. मंगा नाही का मिळणार? मिळेल. पुढील जन्मी तरी मिळेल.'

'मधुरी, मंगा परत आला तर? ही गोधडी आली, ती पांघरणाराही आला तर? तर तू आता बुधाची झाली आहेस; त्याला काय वाटेल?'

'मी त्याची समजूत घालीन. भांडू नका म्हणून सांगेन. मी दोघांची आहे असे सांगून त्यांना गप्प करीन. हळूच थापट मारीन. दोघे माझे ऐकतील. लहानपणी ऐकत. मोठेपणी का ऐकणार नाहीत? आजी, मी जाते. ही गोधडी अंगावर घेऊन पडते.'

आणि मधुरी गेली. ती गोधडी घेऊन ती गेली. आपल्या मंचकावर ती गोधडी पांघरून निजली. आत गोधडी, वरून बुधाची शाल. ती भावनांनी उचंबळली होती.

'हे काय मधुरी! झोपलीसशी!' बुधाने येऊन विचारले.

'आज झोपावेसे वाटत आहे. निजू दे मला.' ती म्हणाली.

'अंग का दुखते? चेपू?'

'नको. अंग, उलटे सुखावले आहे बुधा. तू जा. मला झोपू दे.'

'झोप. मधुरी, झोप. तुला नीटशी झोप कधी येतच नाही.'

'आज येणार आहे पण. किती तरी दिवसांत अशी झोप आली नसेल. आज येणार आहे. जा तू. मुलांना इकडे येऊ देऊ नकोस.'

'नाही येऊ देत.'

बुधा गेला. मधुरीने दार लावून घेतले. ती पडून राहिली. जणू मंगाच्या बाहुपाशात आपण आहोत असे तिला वाटे. ती त्या गोधडीची घडी करी व त्यावर डोके ठेवी. जणू मंगाच्या मांडीवरच डोके आहे. ती गोधडी शरीर फोडून फाडून आत भरावी, असे तिला वाटे. वेडी मधुरी! आणि एकदम थरारून ती उभी राहिली. मंगा आला असे तिला वाटले. येईल का मंगा? तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले आणि आला तर? आला तर? तो काय म्हणेल ? मधदुरीवर रागावेल का? नाही रागावणार. मधुरी वाईट नाही. माझी ओढाताण तो जाणील. बुधा आमचा लहानपणाचा मित्र. आम्ही तिघे निराळी नाही; आम्ही तिघे एका बेलाचे त्रिदळ. पवित्र त्रिदळ. मधुरी पुन्हा ती गोधडी पांघरून पडून राहिली.

आणि इकडे मंगा शतविचारात दंग होता. मधुरी गोधडी पांघरून बसली असेल. माझ्या विचारात रंगली असेल. मला विसरली नाही. मधुरी. माझी मधुरी. अद्याप मी तिच्या जीवनात आहे. इत्यादी विचार तो करीत होता आणि ताप वाढत होता. तो गुपचूप पडून राहिला.

'फार आहे ताप.' म्हातारी म्हणाली.

मंगाने डोळे भरून तिच्याकडे पाहिले. बोलेना. त्याला बोलवत का नव्हते? की आपण बोलू लागलो म्हणजे भडभड सारे ओकून टाकू अशी त्याला भीती वाटे? तो बोलत नव्हता ही गोष्ट खरी.

दोन दिवस असेच गेले. आणि मग एके दिवशी तिसरे प्रहरी तो फार अशान्त व अस्वस्थ होता. म्हातारीही जरा घाबरली.

'काय होते?' तिने विचारले.

'काय सांगू?' तो म्हणाला.

त्याने म्हातारीकडे टक लावली. म्हातारीही पाहू लागली. कोणी बोलत नव्हते.

'काय हवे? असे काय पाहता?'

'काय सांगू? काय मागू?' एवढेच तो म्हणाला.

पुन्हा डोळे मिटून पडला. पुन्हा डोळे उघडले. म्हातारीकडे टक लावून पाहू लागला.

'आजीबाई!'

'काय?'

'मी कोण?'

'मला काय माहीत? सध्या तरी माझ्या घरातले आहात. सारे बरे होईल.'

'मला ओळख आजी. ओळख, नीट बघ.'

'तू का ओळखीचा आहेस माझ्या?'

'हो. तुझा मी मंगा. आजी, तुम्हां सर्वांचा मी मंगा.'

'मंगा? तूच मंगा?'

'होय. पहा नीट म्हणजे ओळख पटेल. आजी, मीच हो अभागी मंगा. माझे गलबत फुटले. बुडले. मी पोहोत होतो. दमलो. एका किनाऱ्यावर जाऊन पडलो. तेथून मी गेलो. एका राज्यात गेलो. तेथील राजाच्या मुलीचे माझ्यावर प्रेम जडले. मी तिचा व्हावा म्हणून तिने पराकाष्ठा केली. तिने माझी पूजा केली, माझे हाल केले आणि

शेवटी ती व मी एका होडीत बसून निघालो. आजी, मला झोप लागली असता तिने अनंत पाण्यात स्वतःच्या जीवनाचा बुडबुडा मिळवून टाकला. मी थक्क झालो. कसे हे असे वेडे प्रेम? आणि मीही तसाच वेडा. ती राजकन्या माझ्यासाठी वेडी, मी मधुरीसाठी वेडा; आणि मधुरी?'

तो थांबला. कोणी बोलले नाही.

म्हातारी एकदम त्याच्याजवळ येऊन बसली. ती त्याच्या केसांवरून हात फिरवू लागली.

'मंगा, तुला ओळखले नाही मी.' ती म्हणाली.

'माझा रंग बदलला, रूप बदलले आहे. आवाज बदलला आहे.'

'परंतु मन नाही बदलले. हृदय नाही बदलले.'

'आजी, मी काय करू? मी मरू?'

'मंगा, बरा होशील तू.'

'बरा होऊन कोठे जाऊ, कोठे राहू, कोणाला पाहू? मला कोण आहे?'

'तू माझ्याजवळ राहा.'

'मधुरीला काय वाटेल? ती वेडी होईल. तिला सुखात राहू दे. मंगाच्या गोड आठवणीत राहू दे. जिवंत मंगाचे दर्शन तिला मारील. बुधा व मधुरी. त्यांचा आनंद मी का धुळीत मिळवू? नको, आता जीवन नको आजी, मी गेल्यावरही मधुरीला सांगू नको. माझी गोधडी तिच्याजवळ आहेच.'

'मंगा, शांत राहा.'

'आजी, आता कायमची शांती मिळेल हो. समुद्र शांत होईल.'

❖❖❖

: आशीर्वाद : : १९ :

आणि मंगा खंगत चालला. त्याला अंत जवळ आला असे वाटू लागले.

'आजी, माझी ती पेटी उघड. तीत जे काय आहे ते बाहेर काढ.' तो म्हणाला. म्हातारीने पेटी उघडली. तीत सोन्यामोत्याचे दागिने होते.

'आजी, हे त्या राजकन्येचे दागिने. माझ्या पायाशी ठेवून ती गेली. मधुरीला नटविण्यासाठी का तिने ठेवले? अशी का तिची इच्छा होती? होय. तीच असेल. हे दागिने मधुरीला दे. मी तिला म्हणत असे, की तुला सोन्यामोत्यांनी नटवीन.'

'ठेवू का ट्रंकेत पुन्हा?'

'दे ठेवून.'

एके दिवशी रात्री मंगा बोलत होता. त्या राजकन्येच्या गोष्टी सांगत होता आणि एकदम थांबला. थोड्या वेळाने आजीला म्हणाला,

'आजी, या जगात सत्य आज ना उद्या बाहेर पडते. नाही का?'

'होय. मंगा, सत्याला शेवटी वाचा फुटते.'

'मी येथे कोणाला न कळवता जरी मेलो तरी पुढे कोणी सांगितले की मंगा येथे येऊन मेला. मधुरीला ते ऐकून काय वाटेल? म्हातारीच्या झोपडीतील तो मुशाफर मंगा होता, तो गोधडीवाला मंगा होता, हे जर कधीकाळी मधुरीला कळले, तर तिला काय वाटेल? त्यापेक्षा मी आपण होऊन तिला ओळख दिली तर? 'माझ्या मनात मत्सर नाही. मी शिव्याशाप नाही देत, तर उलट आशीर्वाद देतो.' असे तिला सांगेन. तिला समाधान वाटेल नाही आजी?'

'होय.'

'मग तू आणतेस मधुरीला बोलावून?'

'आता रात्री?'

'फार का रात्र झाली आहे?'

'असे वाटते.'

'बरे, उद्या उजाडत तिला आण बोलावून. तू आता नीज आजी.'

आजी झोपली. मंगा स्वस्थ पडला होता. मध्येच आजी उठे व बघे. मंगा शांत होता. लेकराप्रमाणे जणू पडला होता.

सकाळ झाली.

'आजी, तू जाणार आहेस ना मधुरीकडे?'

'होय हो, मंगा.'

आजीने झाडलोट केली. ती आता निघणार तो मधुरीच दारात हजर. सुंदर फुले घेऊन ती आली होती.

'मधुरी, तुला शंभर वर्षे आयुष्य आहे.' म्हातारी म्हणाली.

'कशावरून?'

'तुझीच आम्ही दोघं आठवण करीत होतो.'

'दोघं?'

'हो.'

'त्यांना का मंगाची माहिती आहे काही?'

'असे दिसते. तू तेथे बस व त्यांना विचार. मी जाऊन येते बाहेर.'

म्हातारी गेली व मधुरी आत आली. मंगाने तिच्याकडे पाहिले.

'ही पहा ताजी फुले. छान आहे वास.' ती म्हणाली.

'आता तुझी मोठी बाग आहे ना?'

'तुम्हांला काय माहीत?'

'पूर्वी आपली छोटी बाग होती. लहानशा अंगणातील बाग. मला सारे आठवते आहे, मधुरी.'

'कोण तुम्ही?'

'मी तुझा मंगा. उगीच का एकदम 'तुला' असे एकेरी म्हणू लागलो? मधुरी, मी तुझा मंगा. ये, ये; बस माझ्याजवळ. मधुरी, ये. मला दूर लोटू नको.'

'मंगा, माझा मंगा!'

'होय. तोच मी. तुम्हांला कळले मी मेलो; परंतु तुझ्या गोधडीने तारले. मी एकटाच वाचलो असेन. सारे गलबत बुडाले. अनेक संकटांतून वाचून मी आलो. तुझी आठवण तरीही होती मधुरी.'

'मंगा, तू काय म्हणशील? तू सारे ऐकले आहेस येथे?'

'होय, ऐकले आहे, पाहिले टेकडीवर तुला व बुधाला पाहिले. तुमचे बाळ पाहिले, मोती पाहिला.'

'मंगा!'

'मधुरी, रडू नको. लाजू नको. माझ्याविषयी तुझ्या मनात प्रेम आहे, हे मी जाणतो. तू ती गोधडी नेलीस. त्या टेकडीवरचे तुझे शब्द मला अमृताप्रमाणे वाटले. बुधासाठी तू माझ्यावरचे प्रेम जरा बाजूला ठेवलेस. तुझ्या मनाची ओढाताण मी जाणतो. देवाला लहानपणाचे शब्द खरे करायचे असतील. मधुरी, नीट बस. तुझ्या मांडीवर घे माझे डोके.'

'मंगा, माझा मंगा. माझ्यासाठी माझा राजा दूर गेला. माझ्यासाठी परत आला. आणि मी? अरेरे!' तिला बोलवेना.

'मधुरी, अशी रडशील तर मला दुःख होईल. खरोखर, माझ्या मनात मत्सर नाही. द्वेष नाही. शांत हो. देवाने तुम्हांला आशीर्वाद देण्यासाठी मला पाठविले आहे. संकटे भोगून मी अधिक वृद्ध, अधिक शुद्ध झालो आहे. खरे ना? तुम्हांला आशीर्वाद देण्यास योग्य आहे.'

'मंगा, मी काय करू?'

'सांगू?'

'सांग. समुद्रात उडी टाकू? फास लावू? अंगावर तेल ओतून लावू काडी? सांग.'

'मधुरी, ती पेटी इकडे आण.'

'तीत विष आहे? जालीम विष?'

'तू ती पेटी आण व उघड.'

मधुरीने पेटी आणली व उघडली. तो आत सर्व मौल्यवान दागिने. तिने डोळे मिटले. तिला त्या दागिन्यांना हात लाववेना. ती थरथरत म्हणाली,

'मंगा, नको मला लाजवू.'

'मधुरी, मी लाजवणार नाही. माझ्या प्रत्येक शब्दावर विश्वास ठेव. मी मरणाच्या दारी आहे. अशा वेळेला मनुष्य खरे ते बोलतो. परमेश्वर त्याच्या समोर असतो. त्यामुळे लपंडाव नाही करता येत. तुला मी त्या दागिन्यांनी नटवणार आहे. आण ते इकडे.'

मधुरीने ते दागिने मंगाजवळ नेले. मंगा ते तिच्या अंगावर घालू लागला.

'मधुरी, मला शक्ती नाही. घाल ते दागिने. मोत्यांनी नटलेली मधुरी मला पाहू दे.'

मधुरीने दागिने घातले. तिच्या डोळ्यांतून अश्रू गळत होते.

'मधुरी, डोळे पूस व माझ्यासाठी हस.'

तिने डोळे पुसले. ती हसली.

'ये, माझ्याजवळ बस.'

'मंगा, काढून ठेवते हे दागिने.'

'ते तुझे आहेत. तुला नको असतील तर मनीला होतील, वेणूला होतील.'

'मंगा, ते बाळ जगले नाही.'

'कळले मला, सारा इतिहास कळला.'

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

'मंगा, मी वाईट आहे का? खरे सांग.'

'नाही हो. तू आपल्या दिवाणखान्यात माझे चित्र टांगले आहेस. समोरासमोर आपण आहोत. माझ्यासमोर तू. तुझ्यासमोर मी. माझ्या डोळ्यांसमोर शेवटी तू असतेस. तुझ्या डोळ्यांसमोर शेवटी मी असतो. खरे ना? मी तुझ्या दिवाणखान्यात जाऊन आलो.'

'जाऊन आलास?'

'हो. आलो जाऊन. मुलांना भेटून आलो.'

'मुले काय म्हणाली?'

'म्हणाली, या चित्रासमोर आई कधी कधी रडते.'

'ते ऐकून तुला काय वाटले?'

'माझेही डोळे डबडबले. परंतु मुलांना माझे अश्रू दाखविले नाहीत.'

'मंगा, आपण सारी एकत्र राहू.'

'तू वेडी आहेस. मी आता वाचणार नाही. तू आता जा. शेवटचा क्षण आला म्हणजे तुला बोलावू?'

'मी आता येथेच राहीन. जाणार नाही.'

'मधुरी, माझे ऐक. माझी आज्ञा आहे. तू जा. मी बोलवीन तेव्हा बुधाला व मुलांना घेऊन ये. त्या वेळेस सर्वांना शेवटचे पाहीन. तोपर्यंत कोणाजवळ काही बोलू नकोस.'

'मंगा!'

'जा. मधुरी, जा. तू कायमची माझ्याजवळ आहेस. शांतपणे जा, आनंदाने जा.'

'कसे रे असे तुला बोलवते?'

'मला मरताना शांती दे. मधुरी. जा, तू आणलेली फुले हातात देऊन जा.'

मधुरीने मंगाच्या हातात फुले दिली. तिने केविलवाण्या

डोळयांनी त्याच्याकडे पाहिले.

आणि ती गेली. रडत रडत गेली. टेकडीवर गेली. समुद्रात घुसावे असे तिला वाटले; परंतु तिला मंगाची आज्ञा आठवली. ती मुले आठवली. बुधा आठवला. शत बंधने होती. कोण कशी तोडणार?

शेवटी मधुरी घरी आली. तो गोधडी पांघरून ती पडली.

'मधुरी, बरे नाही का वाटत?' बुधाने विचारले.

'बरे आहे.'

'मग अशी का?'

'मला झोप येते.'

'हल्ली तुला इतकी झोप कशी येते?'

'देवाला ठाऊक.'

'तुझ्या मनाला दुःख आहे?'

'होय.'

'सांग मला.'

'वेळ येताच सांगेन. बुधा; जा. मला एकटीला पडू दे.'

बुधा म्हातारीकडे गेला.

'कसे आहे पाहुण्याचे?'

'चिन्ह नीट नाही. असाध्य आहे दुखणे.'

'आजी, तू एकटी किती सेवा करणार?'

'वेळ आली तर तुम्हाला बोलवीन.'

'बोलाव हो आजी. नाहीतर संकोच करशील.'

आणि वेळ आली. रात्री मुले व बुधा गच्चीत बसली होती. मधुरी खाली एकटीच रडत होती. इतक्यात म्हातारीचा 'निघून या' असा निरोप आला.

'बुधा!' मधुरीने हाक मारली.

'आलो ग मधुरी.' त्याने वरून सांगितले.

तो आला आणि तिने त्याला सारी हकीकत सांगितली. त्याच्या खांद्यावर मान ठेवून ती ढसाढस रडली.

'मधुरी!'

'काय?'

'नको रडू. आपण का मुद्दाम फसवले? देव दोष देणार नाही.'

'माझ्या मंगानेही नाही दिला. तो आशीर्वाद देण्यासाठी आला आहे. त्यासाठी हे बोलावणे आहे. चला.'

मधुरी व बुधा सर्व मुलांना घेऊन निघाली.

'आई, कोठे जायचे?'

'बंदरावरच्या आजीकडे.'

'आज का नावेत बसून जायचे सर्वांनी?'

'नाही. बोलू नका.'

आणि सारी त्या झोपडीत आली. म्हातारीने दिवा मोठा केला. सर्व मंडळी बसली.

'बुधा, मित्रा ये. तुझ्यावर माझा राग नाही. वर्षानुवर्षे तू संयम पाळलास. थोर आहेस. माझा मत्सर केला नाहीस. माझ्यासाठी प्रार्थना करीत असस.'

'तुझ्या डोक्यावर माझा हात ठेवू दे. आनंदात रहा. माझी मधुरी तुझी आहे. आपण जणू एक आहोत. ये.'

आणि बुधा मंगाजवळ गेला. त्याने डोके वाकविले. मंगाने त्याच्या डोक्यावर हात फिरविला. बुधाला गहिवर आवरेना. तो उठून बाहेर गेला.

'ये, सोन्या ये. ओळखलेस का मला! मी तुझा जुना बाबा नाही का?'

'ये, राजा ये. ये रुपल्या, तूही ये. मन्ये, तूही ये. या बाळांनो, भेटा.'

'परवा तुम्ही आले होतेत. त्या दिवशीचे तुम्हीच ना?'

'होय हो.'

'तुमच्या डोळयांतून त्या दिवशी पाणी आले होते. खरे ना?'

'होय. या मजजवळ बसा. आनंदाने रहा. मोठे व्हा. कीर्ती मिळवा, नाव कमवा. सर्वांच्या उपयोगी पडा. प्रेमळ व पराक्रमी व्हा.'

'बाबा!'

'काय बाळांनो?'

'काही नाही.'

'मधुरी, वेणू व मोतीला घेऊन ये.'

'मधुरीने ती बाळे पुढे नेली. मोतीला कापऱ्या हातांनी मंगाने घेतले. वेणूच्या कुरळया केसांवरून त्याने हात फिरविला.

'ठेव त्यांना तिकडे, आणि तू ये.'

मधुरीने मुले ठेवून दिली. ती आली. मंगाजवळ बसली. त्याचे डोके मांडीवर घेऊन बसली. आजीने मुलांना अंथरूण घालून दिले. सोन्यासह सारी मुले झोपी गेली. म्हातारी व बुधा खाली बसली होती. मधुरी मंगाजवळ होती.

'मंगा, आम्हांला क्षमा कर.' बुधा म्हणाला.

'कसली रे क्षमा! तुम्ही माझे जणू भाग. वाईट वाटून घेऊ नका. खंत करू नका. मनाला लावून घेऊ नका. मला ही भीक घाला. मरताना ही एक गोष्ट मला द्या. म्हणजे मरणोत्तर मला आनंद मिळेल. रहाल ना आनंदाने! मधूनमधून माझी आठवण काढा. माझ्या आठवणी सांगा. परंतु रडायचे नाही, दुःखीकष्टी व्हायचे नाही. कबूल करा.'

'मंगा, नाही हो आम्ही मनाला लावून घेणार. तू थोर मनाचा आहेस.

तुझे समाधान ते आमचे. आपण तिघे एक. अभिन्न. खरेच एक-अभिन्न.' मधुरी म्हणाली.

'होय हो मधुरी. आजीला आता येथे नका राहू देऊ. आजी तू आता मधुरीकडे राहायला जा. येथे बंदरावर एकटी भुतासारखी नको राहू. कबूल कर. जाईन म्हणून कबूल कर.'

'जाईन हो. मधुरी जणू माझीच मुलगी. माझीच तुम्ही सारी. मंगा, जाईन हो मोठ्या घरी राहायला.'

'मी तर फार मोठ्या घरी जात आहे. देवाच्या घरी. तेथे सर्वांना वाव आहे. खरे ना! आता मला शांतपणे पडू द्या. मधुरी, तुझ्या मांडीवर पडू दे.'

आणि सारी शांत होती. म्हातारीचा जरा डोळा लागला. बुधालाही जरा गुंगी आली. मंगाने मधुरीकडे पाहिले. मधुरी खाली वाकली. खोल आवाजात मंगा म्हणाला,

'माझी मधुरी, माझी मधुरी!'

'होय हो मंगा, होय.'

'जातो आता मधुरी; मधुरी, सुखात रहा.'

मधुरी मधुरी करीत व तिला आशीर्वाद देत मंगा देवाघरी गेला.

❖ ❖ ❖

साने गुरुजींचा मुलां-मुलींशी आणि तरुणांशी सहज-संवाद होत त्यांनी मुलां-मुलींना 'गोड गोष्टी' आणि अमोल गोष्टी सांगितल्या. असंख्य तरुणांना स्वातंत्र्यासाठी लढण्याची त्यांनी प्रेरणा दिली. साने गुरुजींनी सुंदर पत्रांतून मुलांमुलींना 'शेतात डुलणारी पिके, झुळझुळ वाहणाऱ्या नद्या, उंच उंच डोंगर, अथांग सागर पहावा आणि धरतीची लेकरे व्हावे', असे सांगितले. रानफुले आणि पक्षी यांचे सौंदर्य आणि पावित्र्य हे सांगून आपल्याकडील सणावारांतून आपला समाज एक कुटुंब होऊन आनंदाने कसा जगत होता याचे चित्र गुरुजींनी मुलांमुलींसमोर उभे केले. साने गुरुजींच्या गोष्टी ऐकताना, वाचताना मुलंमुली रंगून जात आणि त्यांना साने गुरुजी सांगत की, 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे.'

साने गुरुजी फार प्रेमळ होते आणि त्याच बरोबर कोणी अन्याय केला की ते संतापून उठत. भारतावर ब्रिटिशांचे राज्य होते, या विरुद्ध साने गुरुजींच्या मनात संतापाचा आगडोंब उठे आणि आपल्या भाषणांतून ते तरुणांना सांगत 'येथून तेथून सारा पेटू दे देश, उठू दे देश.' स्वतंत्र भारत एक कुटुंब म्हणून प्रेमाने नांदेल, आजपर्यंत ज्यांना आपण अस्पृश्य म्हणून दूर ठेवले त्यांना जवळ घेईल, सर्व धर्माचे लोक बंधुभावाने एकत्र राहतील, असे स्वप्न साने गुरुजींनी तरुण पिढीपुढे ठेवले.

साने गुरुजींचे साहित्य हे आपले वैभव आहे, कधी न संपणारा हा आनंदाचा ठेवा आहे. मुलांनी हा आनंद लुटावा म्हणून 'इंद्रायणी साहित्य'ने साने गुरुजींनी लिहिलेली 'तीन मुले', 'क्रांती', 'सती' आणि 'स्त्रीजीवन' या सारखी अनेक पुस्तके साने गुरुजींच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने प्रकाशित केली आहेत.

— प्रा. ग. प्र. प्रधान